Downloaded from https:// www.studiestoday.com

# इतिहास

## इयत्ता अकरावी











Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 20.06.2019 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2019-20 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास

## इयत्ता अकरावी

२०१९

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

N3X5P5

आपल्या स्मार्टफोनवरील **DIKSHA APP** द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील **Q. R. Code** द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तकाद्वारे त्या-त्या पाठाला संबंधित असलेल्या **Q. R. Code** द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रथमावृत्ती : २०१९

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ.सदानंद मोरे, अध्यक्ष
डॉ.शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ.सोमनाथ रोडे, सदस्य
डॉ.सतिश चापले, सदस्य
डॉ.प्रिया गोहाड, सदस्य
डॉ.नलिनी वाघमारे, सदस्य
डॉ.प्रशांत देशमुख, सदस्य
सौ.वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**लेखक**

डॉ.शुभांगना अत्रे
डॉ.प्रिया गोहाड

**मुखपृष्ठ व सजावट** : श्री.देवदत्त बलकवडे
**नकाशाकार** : श्री.रवीकिरण जाधव
**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2019-20/Qty. 20,000
**मुद्रक :** M/s. Adarsha Vidyarthi Prakashan, Pune

**इतिहास अभ्यासगट समिती**

प्रा.शिवानी लिमये
श्री.वैजनाथ काळे
डॉ.धनंजय चौधरी
प्रा.श्रीधर घुंडरे
श्री.समीर मानकर
डॉ.धनाजी मासाळ
श्री.कृष्णा देशमुख
डॉ.सिद्धार्थ जाधव
प्रा. अनुरथ काळे
श्री.बाळकृष्ण चोपडे
डॉ. मुशीर शेख
श्री.संदीप डोईफोडे
श्री.बाळासाहेब चावरे
श्री.सचिन डेंगळे
श्रीम.शिवकन्या कदेरकर
प्रा.नागेश कदम
डॉ.रावसाहेब शेळके
श्री.मोहन शेटे
प्रा.अश्विनी बेडगे
प्रा.सुषमा नानगुडे

**संयोजक**

सौ.वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**मुख्य समन्वयक**

श्रीमती प्राची रवींद्र साठे

**निमंत्रित**

डॉ.गणेश राऊत
श्री.मोगल जाधव

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता अकरावीपासून इतिहास विषय तुम्ही स्वतंत्रपणे अभ्यासणार आहात. इसवी सनपूर्व काळापासून सुरुवात करून मध्ययुगीन इतिहासापर्यंतची, भारताच्या संदर्भातील तसेच महाराष्ट्रातील मानवी, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाची वाटचाल सुसूत्रपणे या पाठ्यपुस्तकाच्या साहाय्याने उलगडणार आहे. इयत्ता अकरावीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

कुशल मानवाने घडवलेली पहिली दगडी हत्यारे ते आजच्या युगातील यंत्रमानव आणि कृत्रिम बुद्‌धिमत्ता या मानवी वाटचालीच्या इतिहासातील क्रिया-प्रक्रियांची साखळी सामाजिक-सांस्कृतिक इतिहास घडवत असते. इतिहास शिकताना तो साकल्याने समजण्यासाठी ही क्रिया-प्रक्रियांची साखळी समजली तर इतिहासाचा अभ्यास आपल्या वर्तमान जीवनाचा सांधा अतीताशी जोडणारा असतो. त्यामुळे इतिहास हा विषय अधिक रंजक, ज्ञानदायी आणि ज्ञानरचनेला पूरक होतो.

जगभर विखुरलेल्या मानवी समाजाने प्रगतीचे अनेक टप्पे पार करत, अश्मयुग ते आधुनिक युग ही वाटचाल आणि त्या वाटचालीच्या विविध कालखंडांतील विविध घटनांचा इतिहास आपण दहावीपर्यंत सलगपणे शिकलो. या घटना मानवी इतिहासाच्या विविध टप्प्यांवरील स्थित्यंतरांचे केवळ निर्देशक असतात. मात्र स्थित्यंतरांसाठी कारणीभूत असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, तंत्रज्ञानीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रियांचा विचार करणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या प्रक्रिया इतिहासाच्या घडणीत अत्यंत महत्त्वाच्या असतात. प्रक्रियात्मक साखळीचे आकलन होण्याची क्षमता वाढीस लागली, तर विद्यार्थ्यांमधील ज्ञाननिर्मितीच्या क्षमतेचेही पोषण होईल, हा विचार या पुस्तकाच्या मांडणीचा मूलभूत आधार आहे.

इतिहास विषयाचा अभ्यास करताना तुम्हांला QR कोडवर देण्यात येणारे साहित्य, पाठांत दिलेल्या माहितीपर रंजक, कृतियुक्त विविध चौकटी, रंगीत चित्रे, नकाशे, विविध उपक्रम यांची खूप मदत होईल. त्याचबरोबर पाठांत दिलेल्या लिंकच्या साहाय्याने तुम्हांला अधिक उपयुक्त माहितीही आंतरजालाच्या साहाय्याने मिळवता येईल.

अकरावीतील इतिहास विषयाच्या अध्ययनाने तुमच्या भावी आयुष्यातील ध्येय साकारण्याच्या मार्गावरील वाटचालीला एक निश्चित दिशा मिळेल. तुमच्या महाविद्यालयीन वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## – शिक्षकांसाठी –

इयत्ता अकरावीत प्रवेश करणारा विद्यार्थी आयुष्यातल्या एका नवीन वळणावर येऊन पोचलेला असतो. माध्यमिक शाळेचा उंबरठा ओलांडून कनिष्ठ महाविद्यालयात येणाऱ्या या विद्यार्थ्यांचा एका नव्या जगात प्रवेश होणार असतो. त्याच्या आयुष्यातील हे एक महत्त्वाचे संक्रमण आहे. आतापर्यंत तो जे काही शिकला, त्याचा आढावा घेऊन त्याला या इयत्तेत एक पाऊल पुढे टाकायचे आहे. त्याने निवडलेल्या विषयात अधिक खोलवर जाऊन त्याचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. त्याचा उपयोग त्याला भविष्यातील व्यावसायिक कारकिर्दीच्या संदर्भातील निर्णय घेण्यासाठी होईल. अकरावीतील ज्ञानार्जनाने त्यांच्या भावी आयुष्यातील ध्येय साकारण्याच्या मार्गावरील वाटचालीला एक निश्चित दिशा मिळेल.

विद्यार्थ्यांच्या भावी महाविद्यालयीन प्रवासासंबंधीचा हा दृष्टिकोन विचारात घेऊन इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकाची रूपरेषा तयार केलेली आहे. त्यानुसार या पुस्तकाद्वारे माध्यमिक स्तरावर शिकलेल्या इयत्ता सहावी ते इयत्ता दहावीपर्यंतच्या इतिहासाचा एकत्रित आढावा घेण्यास त्यांना मदत होईल. जणू काही ते त्यांना आधीच परिचित असलेल्या प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासाच्या मार्गिकांवरून पुन्हा एकदा फेरफटका मारतील. त्यायोगे त्या मार्गिकांवरील बारकावे आणि सौंदर्य समजून घेण्यासाठी ते सज्ज होतील; इतिहास हा सैद्धान्तिक पातळीवरही त्यांना आवडू लागेल. या पाठ्यपुस्तकाच्या द्वारे या सर्व गोष्टी सहज घडून याव्यात असा प्रयत्न आहे. ते सहज शक्य होईल कारण अकरावीच्या विद्यार्थ्यांमध्ये मिळवलेल्या माहितीचे विश्लेषण-संश्लेषण करून विषयाचे सखोल आकलन करून घेण्याची पुरेशी क्षमता माध्यमिक अभ्यासक्रमाच्या आधारे विकसित झालेली आहे.

अकरावीमधील विद्यार्थ्यांची आकलनक्षमता पुरेशी विकसित झालेली असल्यामुळे सामाजिक-राजकीय पातळीवर घडणाऱ्या घटनांच्या मुळाशी त्या त्या समाजाची सामूहिक भावनिकता आणि मानसिकता कार्यरत असते, याचे आकलन सहजपणे होऊ शकेल. अशा पद्धतीने हे पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांची स्वतंत्र विचारशक्ती विकसित होण्यास साह्यभूत ठरेल. हे फक्त इतिहासाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित नसेल, तर त्यांच्या भावी आयुष्यातील प्रत्येक वळणावर तसेच त्यांनी निवडलेल्या व्यवसायक्षेत्रामध्ये, या क्षमता त्यांच्यासाठी उपयोगी ठरतील.

नकाशावाचनाचे कौशल्य आणि त्याच्या आधारे ऐतिहासिक माहिती भौगोलिक संदर्भांच्या चौकटीत समजून घेता येणे, ही गोष्ट इतिहासाच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. म्हणून पुस्तकात आवश्यक तेथे ऐतिहासिक नकाशांचा समावेश केलेला आहे. त्यातील माहितीला पूरक अशी माहिती स्वयंअध्ययनाद्वारे मिळवण्यास विद्यार्थ्यांना मदत व्हावी म्हणून योग्य ते आंतरजाल दुवे म्हणजेच वेबलिंक्सही दिलेल्या आहेत.

या पाठ्यपुस्तकामध्ये १०००० वर्षांहूनही अधिक अशा अत्यंत प्रदीर्घ कालखंडाचा इतिहास सामावलेला आहे. इसवी सनपूर्व ८०००-७००० च्या सुमारास भारतीय उपखंडामध्ये विविध ठिकाणी प्राथमिक अवस्थेतील शेतीची सुरुवात झाली. या काळापासून सुरुवात करून मध्ययुगीन इतिहासापर्यंतची सुसूत्र मांडणी या पुस्तकात केलेली आहे. एवढ्या प्रदीर्घ कालखंडातील सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाच्या वाटचालीची मांडणी भारताच्या संदर्भात करत असताना, प्रत्येक पाठ त्या वाटचालीतील एकेका टप्प्याचा प्रातिनिधिक ठरावा अशा पद्धतीने पाठांची रचना केलेली आहे. अर्थातच या पद्धतीच्या मांडणीमध्ये ऐतिहासिक कालक्रम आधारभूत असला तरी त्यामागील संकल्पनात्मक आणि प्रक्रियात्मक साखळी स्पष्ट करण्यावर अधिक भर देण्यात आला आहे.

पहिल्या चार पाठांमध्ये इसवी सनपूर्व १०००० ते ७०० या कालखंडांतील म्हणजे ९००० वर्षांहूनही अधिक कालखंडांतील इतिहासपूर्व काळ उलगडलेला आहे. पाठ ५ ते ९ या पाच पाठांमध्ये प्राचीन भारताच्या इतिहासाची मांडणी केलेली आहे. पाठ १० आणि ११ मध्ये प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडांमधील संक्रमणकालाचा विचार केलेला आहे. पाठ १२ आणि १३ मध्ये जवळजवळ ४५०० वर्षांच्या काळात प्राचीन भारतीयांच्या साहसपूर्ण इतिहासाचा आणि त्या अनुषंगाने दूरवरच्या प्रदेशांपर्यंत भारतीय संस्कृतीच्या झालेल्या प्रसाराचा आढावा घेतलेला आहे. शेवटच्या तीन पाठांत भारताच्या मध्ययुगीन इतिहासाचा आढावा घेण्यात आला आहे. हे पाठ्यपुस्तक भारताच्या इतिहासाविषयीचे असले, तरी महाराष्ट्र हा एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्राचे ऐतिहासिक संदर्भ ठळकपणे स्पष्ट व्हावेत याकडे विशेष लक्ष पुरवण्यात आले आहे.

या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून इतिहास शिकताना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये त्यासंबंधीचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन सहजगत्या रुजत जावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आला आहे. तो साध्य करण्यासाठी संशोधनामधून पुढे आलेली नवीन माहिती तसेच विशेष पूरक माहिती चौकटींमध्ये देण्यात आली आहे. हेतू हा की विद्यार्थ्यांच्या मनामध्ये कुतूहल निर्माण व्हावे, त्यांच्या मनात विषयाची रुची निर्माण व्हावी आणि त्यांनी स्वयंस्फूर्तीने विषयाचे अध्ययन करावे.

हे पुस्तक तुमच्या हातात देत असताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. आम्हाला हा विश्वास आहे की, तुम्ही या पुस्तकाचे स्वागत कराल.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | घटक १ :<br>इतिहासपूर्व काळातील भारत<br>(महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • इतिहासपूर्व काळ ही संज्ञा स्पष्ट करता येणे.<br>• इतिहासपूर्व काळामध्ये भटक्या जीवनाकडून स्थिर जीवनाकडे झालेले संक्रमण स्पष्ट करता येणे.<br>• या संक्रमणाच्या प्रक्रियेमधील शेतीचा शोध आणि शेतीच्या उत्पादनाचे टप्पे, तसेच त्या अनुषंगाने बदललेल्या जीवनशैलीचे स्वरूप सांगता येणे.<br>• स्थिर गाव-वसाहतींच्या उदयाचे आणि व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करता येणे.<br>• नागरीकरणाच्या प्रक्रियांचे स्वरूप सांगता येणे.<br>• व्यापाराचा उत्कर्ष आणि नगरांचा विकास यांमधील सहसंबंध आणि परस्परावलंबित्व जोडता येणे.<br>• व्यापाराचा ऱ्हास आणि नगरांचा ऱ्हास यांमधील परस्पर संबंध शोधता येणे. |
| २. | घटक २ :<br>इ.स.पू. ६ व्या – इ.स.पू. ३ ऱ्या शतकाआधीचा भारत (महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • इतिहास काळ आणि लिखित साहित्य यांच्यातील संबंध स्पष्ट करता येणे.<br>• प्राचीन भारतातील सुरुवातीची राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था यांची चिकित्सा करता येणे.<br>• दुसऱ्या नागरीकरणाच्या काळामध्ये झालेल्या राजकीय आणि सामाजिक, तंत्रवैज्ञानिक, आर्थिक, धार्मिक स्थित्यंतरामागील प्रक्रियेचे अर्थनिर्वचन करता येणे.<br>• प्राचीन काळामध्ये भारतीयांचा बाहेरील प्रदेशांशी आलेला संपर्क नकाशाच्या मदतीने स्पष्ट करता येणे.<br>• भारतात उदयाला आलेले पहिले साम्राज्य आणि त्यामागील पार्श्वभूमी सांगता येणे.<br>• भारत व इतर देशांशी आलेला संपर्कमार्ग नकाशा आराखड्यात दर्शवता येणे. |
| ३. | घटक ३ :<br>इ.स.पू. २ ऱ्या ते १२ व्या शतकापर्यंतचा भारत<br>(महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • मौर्य साम्राज्यानंतर उदयाला आलेल्या साम्राज्याच्या काळात प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये विविध क्षेत्रांत बदल घडून आले, त्याचे स्वरूप स्पष्ट करता येणे.<br>• दक्षिण भारतातील विविध राजसत्तांची चिकित्सा करता येणे.<br>• या काळात भारतीय व्यापार पश्चिमेकडे रोमपर्यंत पोचला होता याची चिकित्सा करता येणे.<br>• काही शतकांनंतर भारतीय व्यापाराची क्षितिजे विस्तारली आणि आग्नेय आशियातील देशांपर्यंत भारतीय व्यापारी पोचले. व्यापाराच्या बरोबरीने भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. याची जाणीव होऊन प्राचीन भारतीय इतिहासाबाबत अभिमान वाटणे.<br>• प्राचीन भारतीय व्यापारी मार्ग जगाच्या आराखड्यात दाखवता येणे.<br>• भारतीय संस्कृतीच्या प्रसाराची ठिकाणे नकाशा आराखड्यात दर्शवता येणे. |
| ४. | घटक ४ :<br>इ.स.१३ ते १९ व्या शतकापर्यंतचा भारत<br>(महाराष्ट्राच्या संदर्भासह) | • मध्ययुगीन भारतातील राजकीय स्थिती स्पष्ट करता येणे.<br>• अरबांच्या आक्रमणाविषयी माहिती स्पष्ट करता येणे.<br>• अल्लाउद्दीन खल्जी आणि देवगिरीचे यादव यांच्यांतील राजकीय संघर्षाची कारणे स्पष्ट करणे.<br>• व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रांतील प्रगतीविषयी माहिती प्राप्त करणे.<br>• शहरीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करता येणे.<br>• या काळातील कला, साहित्य, स्थापत्याच्या क्षेत्रांतील प्रगतीविषयी माहिती सांगता येणे.<br>• भारतात मुघल सत्तेच्या स्थापनेची कारणमीमांसा करणे.<br>• या काळातील जमीन महसूल व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणे.<br>• छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याविषयी विश्लेषण करणे.<br>• शिवकालीन राज्यव्यवस्था समजावून घेणे.<br>• पेशवेकाळाविषयी माहिती स्पष्ट करता येणे.<br>• छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यविस्तार भारताच्या नकाशा आराखड्यात दर्शवता येणे.<br>• पेशवेकालीन राज्यविस्ताराची ठिकाणे भारताच्या नकाशा आराखड्यात दर्शवता येणे. |

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आद्य शेतकरी.................................... | १ |
| २. | भारतातील आद्य नगरे.............................. | ११ |
| ३. | भारतातील ताम्रपाषाणयुगीन गाव-वसाहती........... | २१ |
| ४. | वैदिक काळ ...................................... | २८ |
| ५. | जनपदे आणि गणराज्ये .............................. | ३४ |
| ६. | भारतातील दुसरे नागरीकरण ......................... | ३८ |
| ७. | भारत आणि इराण (पर्शिया)......................... | ४८ |
| ८. | मौर्यकालीन भारत.................................. | ५६ |
| ९. | मौर्योत्तर काळातील भारत........................... | ६४ |
| १०. | भारतीय इतिहासातील नवे पर्व ....................... | ६९ |
| ११. | दक्षिण भारतातील राजसत्ता ......................... | ७७ |
| १२. | भारत, वायव्येकडील देश आणि चीन ................ | ८४ |
| १३. | भारत, श्रीलंका आणि आग्नेय आशिया............... | ९१ |
| १४. | दिल्लीची सुलतानशाही, विजयनगर आणि बहमनी राज्य | १०२ |
| १५. | मुघलकालीन भारत................................. | ११० |
| १६. | स्वराज्य ते साम्राज्य ............................... | ११७ |


• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2019. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १. आद्य शेतकरी

१.१ नद्यांकाठची संस्कृती
१.२ शेतीची सुरुवात : कृषी उत्पादन
१.३ भारतातील आद्य शेतकरी
१.४ स्थिर गाव-वसाहती : संघटन आणि व्यवस्थापन
१.५ व्यापार आणि दळणवळण
१.६ नागरीकरणाची सुरुवात

## १.१ नद्यांकाठची संस्कृती

कुशल मानवाने पहिली दगडी हत्यारे तयार केली. ही दगडी हत्यारे फक्त मृत प्राण्यांच्या कातडीवरील मांस खरवडणे, हाडांच्या आतील मगज खाण्यासाठी ती फोडणे, फळांचे कठीण कवच फोडणे यांसारख्या जुजबी कामांसाठीच उपयोगी होती. हत्यार घडवण्यासाठी आवश्यक तेवढाच जोर लावून दगडाचे हव्या त्या आकाराचे छिलके काढता येणे, ही मानवाची तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील पहिली झेप होती. मानवाच्या उत्तरोत्तर प्रगत होत गेलेल्या प्रजातींनी कुशल मानवाच्या पुढे जात, तंत्रज्ञानाच्या पुढील पायऱ्या गाठत, मानवी तंत्रज्ञानाचा विकास पुढे नेला.

निसर्गाशी असलेल्या जवळकीतून ऋतुचक्राचे निरीक्षण करता करता, मध्याश्मयुगीन मानवाने अनेक वन्य वनस्पतींची लागवड करण्यास सुरुवात केली आणि वन्य प्राण्यांना माणसाळवले. त्याचे पर्यवसान नवाश्मयुगाचा उदय होण्यात झाले. या काळात मानव शेती-पशुपालन करू लागला. त्याचे भटके-निमभटके जीवन संपुष्टात येऊन स्थिर गाव-वसाहती निर्माण झाल्या. पद्धतशीर शेतीची सुरुवात इसवी सनापूर्वी साधारणपणे १२००० ते ११००० वर्षांपूर्वी झाली, असे पुरातत्त्वीय पुराव्याच्या आधारे दिसते. शेतीची सुरुवात आणि स्थिर गाव-वसाहतींचा उदय या दोन घटनांचा अन्योन्य संबंध आहे. शेतीचे तंत्र साध्य झाल्यामुळे जगभरात नद्यांकाठच्या प्रदेशात सर्वाधिक प्राचीन नागरी संस्कृती विकसित झाल्या. ते प्रदेश म्हणजे मेसोपोटेमिया, इजिप्त, भारतीय उपखंड आणि चीन. या चार प्रदेशांमध्ये नवाश्मयुगाचा उदय झाला, शेती-पशुपालनाची सुरुवात होऊन स्थिर गाव-वसाहती प्रस्थापित झाल्या. हे कसे घडले ते पाहण्यासाठी नद्यांकाठच्या संस्कृतींचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

**खालील माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :**

इस्राएल येथील बार इलान विद्यापीठातील नवीन संशोधनाच्या आधारे शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की शेती करण्याचे प्रयोग सुमारे २३००० वर्षांपूर्वीपासूनच सुरू झाले असावेत. यासंबंधीचा पुरावा इस्राएलमधील गॅलिली समुद्राजवळ असणाऱ्या 'ओहालो' नावाच्या पुराश्मयुगीन काळातील हंगामी तळाच्या उत्खननात मिळाला आहे. तिथे मानवी वस्तीच्या पुराव्याच्या बरोबरीने बार्ली आणि काही तृणधान्यांचे दाणे तसेच फळांच्या बिया मोठ्या संख्येने मिळाल्या. त्यांच्याबरोबर शेतातील उगवणाऱ्या विविध जातींच्या उत्क्रांत झालेल्या तणबियाही मिळाल्या. अशा उत्क्रांत तणबिया तेथील धान्य नैसर्गिकरित्या उगवलेले नसून त्याची मुद्दाम लागवड केलेली होती, याचा पुरावा आहे. धान्य शिजवण्यापूर्वी वाटण्यासाठी पाट्या-वरवंट्याप्रमाणे वापरलेले दगडही इथे मिळाले आहेत.

**(१) टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे – मेसोपोटेमिया :** आजचे इराक, सिरीया हे देश तसेच इराणचा पश्चिमेकडील प्रदेश आणि तुर्कस्थानचा आग्नेयकडील प्रदेश यांचा प्राचीन मेसोपोटेमियामध्ये समावेश होतो.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


मेसोपोटेमिया हे टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांच्या खोऱ्याचे ग्रीक भाषेतील नाव आहे. मेसॉस म्हणजे 'मधला'. पोटेमॉस म्हणजे 'नदी'. दोन नद्यांच्या मधला प्रदेश म्हणजे मेसोपोटेमिया. दोन नद्यांचे मुबलक पाणी आणि त्यांना दरवर्षी येणाऱ्या पुरांमुळे सुपीक झालेली जमीन यांमुळे प्राचीन मेसोपोटेमियामध्ये मध्याश्मयुगीन भटके-निमभटके जनसमूह स्थिरावले आणि नवाश्मयुगीन आद्य गाव-वसाहतींचा उदय झाला. मेसोपोटेमियामधील नवाश्मयुगीन आद्य वसाहती इसवी सनापूर्वी १०००० वर्षे इतक्या प्राचीन आहेत. तेथील शेतकरी गहू आणि बार्ली पिकवत असत.

**(२) नाईल नदीचे खोरे – इजिप्त :** आफ्रिका खंडाच्या उत्तरेस असलेला नाईल नदीच्या खोऱ्यातील प्रदेश म्हणजे इजिप्त.

नेपोलियन बोनापार्टने इसवी सन १७९८ मध्ये इजिप्तवर केलेल्या स्वारीमध्ये त्याच्या सैन्याबरोबर विविध क्षेत्रांमधील विद्वानही होते. त्यांनी इजिप्तमधील प्राचीन अवशेषांचा पद्धतशीर अभ्यास करून त्यांची माहिती प्रसिद्ध केली. रोझेटा स्टोनवरील अभिलेखाच्या आधारे इजिप्तच्या चित्रलिपीचे वाचन करता येणे शक्य झाल्यामुळे या अभ्यासाला गती मिळाली.

**खालील माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :**

इजिप्तचे मूळ नाव 'केमेत' म्हणजे 'काळी भूमी' असे होते. नाईलच्या पुरात वाहून आणलेल्या गाळामुळे तेथील मातीचा रंग काळा दिसतो. त्यावरून हे नाव पडले असावे. नंतरच्या काळात इजिप्तला 'व्हट-का-प्ता' (Hwat-ka-Ptah) म्हणजे 'प्ता' देवाचे मंदिर, असे नाव मिळाले. ग्रीकांनी त्याचे रूपांतर 'एजिप्टस' असे केले आणि त्यावरून 'इजिप्त' हे नाव पडले. इजिप्तचे अरबी नाव 'मिस्र' असे आहे.



नद्यांच्या खोऱ्यांमधली नागरी संस्कृती



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

इसवी सनापूर्वी ६००० वर्षांच्या सुमारास नवाश्मयुगीन आद्य वसाहती इजिप्तमध्ये वसल्या होत्या. तिथे शेतीची सुरुवात याच सुमारास झाली. गहू आणि बार्ली ही सुरुवातीची मुख्य पिके होती.

**(३) होयांग हो नदीचे खोरे – चीन :** चीनमधील होयांग हो नदीचे खोरे हे चिनी संस्कृतीचे उगमस्थान समजले जाते. येथे चीनची प्राचीन संस्कृती उगम पावली आणि विकसित झाली.

चीनमधील नवाश्मयुगीन गाव-वसाहतींमध्ये इसवी सनापूर्वी ७००० च्या सुमारास शेतीची सुरुवात झाली होती. गहू, राळा आणि भात ही सुरुवातीची पिके होती.

**खालील माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :**

'यलो रिव्हर' (पित नदी) हे होयांग हो या चिनी नावाचे भाषांतर आहे. तिच्या प्रवाहाबरोबर जो पिवळसर रंगाचा गाळ वाहून येतो, त्यावरून तिला हे नाव मिळाले आहे. तिच्या अन्य नावांमध्ये 'रिव्हर' आणि 'मदर' अशी दोन नावे आहेत. या दोन नावांवरून चिनी संस्कृतीमध्ये तिला जे अनन्यसाधारण महत्त्व आहे, ते लक्षात येते. 'रिव्हर' या नावातून ती एकमेव महत्त्वाची नदी आहे, असे सूचित होते. 'मदर' या नावातून तिला चिनी संस्कृतीची जन्मदात्री मानले जाते, हे स्पष्ट आहे.

गंगा, सिंधू, ब्रह्मपुत्रा या नद्यांप्रमाणेच हिमालयातील हिमखंड चीनमधील होयांग हो आणि यांग-त्से या नद्यांच्या पाण्याचे प्रमुख स्रोत आहेत. प्रवाहाच्या वेगामुळे होयांग होचे पात्र सतत बदलत असे. त्याचप्रमाणे तिला येणारे पूरही अत्यंत विनाशकारक असत. त्या पुरांमध्ये प्रचंड जीवितहानी आणि वित्तहानी होत असे. त्यामुळे तिचे आणखीही एक नाव आहे, 'सॉरो'. 'सॉरो' म्हणजेच 'अश्रूंची नदी'. आधुनिक काळात तिच्यावर ठिकठिकाणी धरणे आणि बंधारे बांधून तिच्या या रौद्र रूपाला आळा घातलेला आहे.

**(४) सिंधू आणि सरस्वती नद्यांचे खोरे – भारतीय उपखंड :** सिंधू आणि सरस्वती नद्यांच्या खोऱ्यांचा प्रदेश हा आजच्या भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागलेला आहे.

पंजाबमधील रावी नदीच्या काठावरील हडप्पा आणि सिंधू नदीवरील मोहेंजोदडो येथे झालेल्या पुरातत्त्वीय उत्खननांमुळे भारतीय उपखंडामध्ये इसवी सनापूर्वी ३००० च्या सुमारास एक प्रगत नागरी संस्कृती नांदत होती, हे सिद्ध झाले आहे.

हडप्पा संस्कृतीपूर्वी अस्तित्वात असलेल्या नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची अनेक स्थळे उजेडात आली आहेत. त्यामुळे भारतीय उपखंडात इसवी सनापूर्वी ८००० च्या सुमारास स्थिर वसाहती अस्तित्वात आल्या होत्या, हे सिद्ध झाले. यांतील काही वसाहतींचा विकास होऊन हडप्पा संस्कृतीचा उदय झाला असावा, हे बहुतेक अभ्यासक आता मान्य करतात.

या गाव-वसाहतींमधील शेतकरी प्रामुख्याने बार्लीचे आणि अल्प प्रमाणात गव्हाचे पीक घेत असत. या गाव-वसाहतींमधील शेतकरी हे भारतीय उपखंडातील आद्य शेतकरी होत. ते गाय-बैल आणि शेळ्या-मेंढ्या पाळत असत. त्यांची घरे मातीची असत.

मेहेरगढ या बलुचिस्तानमधील पुरातत्त्वीय स्थळाच्या उत्खननामध्ये भारतीय उपखंडातील नवाश्मयुगीन संस्कृतींच्या उदयापासून ते हडप्पा संस्कृतीच्या उदयापर्यंतचा सलग कालक्रम आणि त्या संस्कृतीचे भौतिक पुरावे उजेडात आले आहेत.

### १.२ शेतीची सुरुवात – कृषी उत्पादन

शेतीची सुरुवात झाली. हा बदल अत्यंत धिम्या गतीने झाला. त्यासाठी काही हजार वर्षांचा कालावधी लागला. हा काळ नवाश्मयुगाच्या सुरुवातीचा होता. तो इसवी सनापूर्वी साधारणपणे १०००० ते ८७०० हा होय. विविध प्रदेशांमधील नवाश्मयुगाचा काळ वेगवेगळा असू शकतो. शेती आणि पशुपालनाची सुरुवात या काळात झाली. बार्ली हे मुख्य पीक होते. त्यासोबत गहू, जवस यांसारखी पिकेही घेतली जात.


मेसोपोटेमिया, इजिप्त, चीन आणि भारतीय उपखंड या चारही प्रदेशांमध्ये नवाश्मयुगीन आणि शेतीची सुरुवात




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मध्याश्मयुगातील अवजारांसाठी उपयोगात आणलेली पाती 'पन्हाळीदार गाभा' तंत्राने गारगोटीच्या गोट्यांपासून अलग केलेली असतात. ही पाती नखाएवढ्या किंवा त्याहून किंचित मोठ्या आकाराची असतात. त्यामुळे त्यांना 'सूक्ष्मास्त्रे' म्हटले जाते. या काळात टोकाला छोटे पाते बसवलेले बाण उपयोगात आणले जात होते.



पन्हाळीदार गाभा




मध्याश्मयुगीन पाती (सूक्ष्मास्त्रे)



मध्याश्मयुगातील सूक्ष्मास्त्रे आणि त्यांचा बाणाच्या टोकाप्रमाणे केलेला उपयोग




सूक्ष्मास्त्रे बसवून तयार केलेली मध्याश्मयुगातील दातेरी सुरी



हाडांपासून तयार केलेले मध्याश्मयुगातील मासेमारीचे गळ

होण्यासाठी आवश्यक असलेल्या पूर्व परिस्थितीमध्ये अनेक घटक समान होते, असे दिसते. पृथ्वीच्या अब्जावधी वर्षांच्या इतिहासात इसवी सनापूर्वी सुमारे १२०००-११००० वर्षांपूर्वी शेवटचे हिमयुग संपुष्टात येऊन उबदार आणि आर्द्र हवामानाचा एक नवा कालखंड सुरू झाला, त्याला 'होलोसिन' कालखंड असे म्हणतात.

या काळात हिमखंड वितळल्यामुळे जलाशयांमधील पाण्याचे साठे वाढले. त्यामुळे या कालखंडात अन्नासाठी उपयुक्त अशा प्राणी आणि वनस्पती यांची उपलब्धता वाढली. त्याचबरोबर हिमयुगाच्या शेवटी शेवटी मॅमोथसारख्या विशालकाय प्राण्यांच्या अनेक प्रजातीही



मॅमोथ

नष्ट झाल्या होत्या. आता जलाशयांमधल्या माशांच्या अनेक प्रजाती, तसेच शेळी, मेंढी, हरीण यांसारखे आकाराने लहान आणि वेगवान वन्य पशू शिकारीसाठी उपलब्ध होते. त्यांची शिकार करण्यासाठी पुराश्मयुगीन बोजड हत्यारे उपयोगी नव्हती.

उत्तर पुराश्मयुगातच दाबतंत्राने दगडाची लांब पाती काढण्यास सुरुवात झाली होती. मध्याश्मयुगामध्ये हेच तंत्र आणि गारगोटीचे दगड वापरून बोटाच्या नखांएवढी छोटी पाती काढून त्यापासून हत्यारे बनवण्यास सुरुवात झाली. या पात्यांना 'सूक्ष्मास्त्रे' असे म्हटले जाते. ही पाती हाडे किंवा लाकडी दांड्याला खोबण करून किंवा त्यांच्या टोकावर घट्ट बसवून मासेमारीचे गळ, भाले, बाण यांसारखी सुधारित शस्त्रे बनवणे शक्य झाले. निसर्गतः वाढलेली तृणधान्ये आणि फळेही विपुल प्रमाणात उपलब्ध होती. त्यांच्या कापणीसाठी सूक्ष्मास्त्रांचा उपयोग करून विळा आणि कोयत्यासारखी अवजारेही तयार केली जाऊ लागली.

तंत्रज्ञान सुधारले; शिकारीचे आणि अन्नधान्य मिळवण्याचे तंत्र सुधारले; अन्नाची विपुलता वाढली. त्यामुळे मध्याश्मयुगीन जनसमूह एका जागी अधिक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

काळ स्थिरावू लागले. निसर्गतः उगवलेल्या तृणधान्यांची कापणी करता करता लोक धान्य पेरू लागले आणि यथावकाश शेतीचे तंत्र विकसित झाले. शेतीच्या बरोबरीने पशुपालनाचे तंत्रही विकसित झाले. शेतीच्या कामांचे स्वरूपच असे असते, की शेतकऱ्यांना पिकाऊ जमीन जिथे असेल, तिथे कायमस्वरूपी वस्ती करून राहणे क्रमप्राप्त असते. शिवाय अन्न मिळवण्यासाठी सतत भ्रमंती करण्याची आवश्यकता राहत नाही. त्यातून स्थिर गाव-वसाहती निर्माण झाल्या. नवाश्मयुगाचा उदय झाला. या स्थित्यंतराला दीर्घ कालावधी लागला. असे असले तरी शेती आणि पशुपालनामुळे मानवी जीवनशैलीत जो कमालीचा बदल नवाश्मयुगामध्ये घडून आला, तो लक्षात घेता या स्थित्यंतरासाठी गॉर्डन चाईल्ड या ऑस्ट्रेलियन पुरातत्वज्ञाने 'नवाश्मयुगीन क्रांती' असा शब्दप्रयोग केला.

**खालील माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :**

पॅलेस्टाईनमधील जॉर्डन नदीवर वसलेल्या 'जेरिको' या शहराला खूप प्राचीन इतिहास आहे. इसवी सनापूर्वी ९००० च्या सुमारास ही गाव-वसाहत प्रथम वसली. ती नवाश्मयुगात उदयास आलेल्या पहिल्या कायमस्वरूपी वसाहतींपैकी एक आहे. इसवी सनापूर्वी ८००० च्या सुमारास तेथील सामाजिक संघटनाची सुरुवात झाली. तत्कालीन नवाश्मयुगीन वसाहतीच्या भोवती एक संरक्षक भिंत बांधलेली होती, एवढेच नव्हे तर काही काळाने त्या भिंतीला भरभक्कम बुरुजही बांधला होता. हा संघटित समाजाचा पुरावा आहे.

लागवडीची सुरुवात जेरिको आणि जेरिकोच्या आसपासच्या प्रदेशात पहिली गाव-वसाहत वसण्याच्या काही शतके आधीच झाली होती, याचा पुरावा पुढे आला आहे. जेरिकोजवळच्या गिलगॅल या गावातील प्राचीन स्थळाच्या उत्खननात एका जळक्या घरामध्ये अंजीर या फळाचे अवशेष मोठ्या संख्येने सापडले. शास्त्रज्ञांनी त्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली. शास्त्रज्ञांनी काढलेल्या निष्कर्षानुसार गिलगॅल येथील नवाश्मयुगीन लोकांनी अंजिराच्या झाडांच्या छाटलेल्या फांद्यांची कलमे तयार करून त्यांची लागवड केली. नियोजनपूर्वक लागवडीचा हा सर्वप्रथम प्रयत्न होता.

### १.३ भारतातील आद्य शेतकरी

पूर्णतः नवीन धर्तीची दगडी हत्यारे आणि ती घडवण्याचे नवे तंत्रज्ञान यांमुळे या काळाला नवाश्मयुग हे नाव मिळाले. नवाश्मयुगाचे वैशिष्ट्य समजली जाणारी हत्यारे म्हणजे घासून गुळगुळीत केलेली कुऱ्हाडीची लांब आणि बुटक्या आकाराची पाती आणि दगडी कडी. या पात्यांना लाकडाचा दांडा बसवून त्याची अवजारे बनवली जात. ही अवजारे झाडे तोडण्यासाठी, लाकडे तासून त्यांना आकार देण्यासाठी वापरली जात. स्थिर गाव-वसाहती वसवण्यासाठी आणि लागवडीसाठी जमीन उपलब्ध व्हावी म्हणून जंगलतोड करणे आवश्यक होते. त्यामुळे ही नवीन धर्तीची अवजारे उपयोगी ठरत होती.

भारतीय उपखंडातील आद्य शेतकऱ्यांच्या म्हणजे नवाश्मयुगीन वसाहतींमध्ये इसवी सनापूर्वी ७००० च्या सुमारास अस्तित्वात आलेल्या मेहेरगढ या स्थळाचे विशेष महत्त्व आहे, हे आपण पाहिले. बार्ली आणि गव्हाचे पीक तेथील लोक घेत असत. याच सुमारास गंगेच्या खोऱ्यात अस्तित्वात आलेली एक नवाश्मयुगीन गाव-वसाहत होती. तिचे अवशेष जिथे सापडले त्या स्थळाचे नाव आहे लहुरादेवा. हे स्थळ उत्तर प्रदेशातील संत कबीरनगर जिल्ह्यात आहे. येथील शेतकरी भातशेती करत होते.

महाराष्ट्रातील मध्याश्मयुगीन माणूस इसवी सनापूर्वी साधारणपणे १०००० ते ४००० या कालखंडात गुहांमध्ये, शैलाश्रयांच्या (rock shelters) आश्रयाने राहत होता. नद्यांच्या काठांवर वावरत होता. गारगोटीच्या दगडाची सूक्ष्मास्त्रे बनवत होता. परंतु महाराष्ट्रात पूर्णतः नवाश्मयुगीन स्वरूपाची स्थळे मिळालेली नाहीत. महाराष्ट्रातल्या आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती ताम्रपाषाणयुगीन होत्या. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील इनामगाव हे ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या गाव-वसाहतींचे अत्यंत महत्वाचे उदाहरण आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## १.४ स्थिर गाव-वसाहती : संघटन आणि व्यवस्थापन

विविध गणिती आणि संख्याशास्त्रीय प्रतिकृतींच्या आधारे अशा प्राचीन गाव-वसाहतींच्या लोकसंख्येचा अंदाज वर्तवण्याचे प्रयत्न संशोधकांनी केले आहेत. त्या आधारे असे दिसते, की मध्याश्मयुगीन भटक्या-निमभटक्या लोकांचे स्थिर जीवनाकडे स्थित्यंतर होत असताना सुरुवातीला एका जनसमूहात किमान २५ ते ४० लोक असणे आवश्यक होते. नित्य नेमाने लागवड करायला लागण्यासाठी तीच संख्या साधारण ५० पर्यंत वाढणे आवश्यक होते. एखाद्या गाव-वसाहतीचे कायमस्वरूपी सदस्य म्हणून पूर्णपणे शेती-पशुपालनावर अवलंबून असलेले जीवन अवलंबण्यासाठी त्या गाव-वसाहतीची लोकसंख्या किमान १०० पर्यंत असायला हवी.

नवाश्मयुगीन स्थिर गाव-वसाहतींचे स्वरूप हे छोट्या वस्तीसारखे होते. कायमस्वरूपी घरे (बहुतेकदा गोल झोपड्या) हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्याचबरोबर राहत्या घरांशिवाय वस्तीच्या मध्यवर्ती असलेल्या काही सामाईक जागा या धान्य आणि इतर वस्तूंच्या साठवणीसाठी वापरल्या जात असाव्यात. त्या आधारे गाव-वसाहतींच्या अन्नोत्पादनाच्या साखळीशी संबंधित व्यवहारांचे नियंत्रण करणारी एखादी मध्यवर्ती यंत्रणा आणि अधिकारांची साखळी प्रस्थापित झाली असावी असे दिसते. परंतु त्याच वेळेस वैयक्तिक घर-कुटुंबाच्या सीमा, जमिनीवरील मालकी हक्क, प्रत्येक घराचे स्वतःपुरते अन्नोत्पादन आणि त्या अनुषंगाने नातेसंबंधांची गुंफण या गोष्टी अस्तित्वात आल्या. प्रत्येक घरातल्या उत्पादनविषयक खास कौशल्यांचे कुटुंबातील पुढील पिढीला प्रशिक्षण देणे या गोष्टींची सुरुवात नवाश्मयुगातच झाली, असे मानले जाते. म्हणजेच अधिकारांच्या उतरंडीवर आधारलेल्या सामाजिक आणि कौटुंबिक रचनेची आणि वारसा कल्पनेची सुरुवात नवाश्मयुगात झाली, असे म्हणता येईल.

जपानमधील जॉमोन संस्कृतीमधील मातीची भांडी बनवण्यास मध्याश्मयुगातच सुरुवात झाली होती. हा अपवाद वगळता नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यात मातीची भांडी घडवण्यास सुरुवात झाली असे सर्वसाधारणपणे दिसते. घासून गुळगुळीत केलेल्या दगडी हत्यारांप्रमाणेच मातीची भांडी घडवणे, हे नवाश्मयुगाचे एक अनिवार्य लक्षण समजले जाते. ही मातीची भांडी अन्न शिजवण्यासाठी, वाढण्यासाठी आणि साठवणीसाठी वापरली जात. सुरुवातीची मातीची भांडी हाताने घडवलेली असत. हळूहळू ही भांडी चाकावर घडवायला सुरुवात झाली. ही भांडी एकरंगी, पृष्ठभाग घासून गुळगुळीत केलेली असत. त्यावर कोरून किंवा ठसे उमटवून किंवा चिखलाच्या पट्ट्या चिकटवून नक्षी तयार केलेली असे. हळूहळू भांड्यांवर रंगीत नक्षी काढायला सुरुवात झाली. अशा प्रकारे नवाश्मयुगाच्या मध्यावर मातीची भांडी बनवणे ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.

ही भांडी बनवण्यासाठी खालील गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक असते.

(१) चिकण मातीचा स्रोत माहीत असणे. (२) ती वाहून आणण्याची तजवीज करणे. (३) माती उत्तम प्रकारे मळून तयार करणे. (४) भांड्याला हवा असलेला आकार देणे. (५) भांडे सुशोभित करणे. (६) योग्य तापमानाला (८५०° ते ९००° सेल्सिअस) भाजणे.

या सर्व गोष्टींचे ज्ञान असलेल्या कुशल कारागिरांचा वर्ग नवाश्मयुगामध्ये तयार झाला होता. मातीच्या भांड्यांच्या घडणीच्या आधारे ती ज्या स्थळाच्या उत्खननामध्ये सापडली त्या स्थळाचा सांस्कृतिक इतिहास, भौतिक स्तरांवरील संपन्नता, इतर संस्कृतींशी असलेला संपर्क अशा अनेक गोष्टींसंबंधीची माहिती जाणून घेता येते.

नवाश्मयुगामध्ये मातीच्या भांड्यांप्रमाणेच इतर काही विशेष कौशल्यांवर आधारित हस्तव्यवसाय आणि कारागिरांचे वर्ग उदयाला आले होते. त्यामध्ये विविध प्रकारचे मणी बनवण्याचे तंत्र नवाश्मयुगीन कारागिरांनी सुरुवातीपासूनच अवगत केल्याचे दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने विविध प्रकारच्या गारगोटीच्या खड्यांचे तसेच शंखांचे मणी बनवले जात. नवाश्मयुगीन स्थळांमध्ये मणी, ते बनवत असताना वाया गेलेले दगडांचे तुकडे किंवा सदोष असल्यामुळे टाकून दिलेले अर्धवट मणी आणि मणिकाराने वापरलेली हत्यारे मिळतात. मणी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

बनवण्याच्या कार्यपद्धतीत पुढील टप्पे असतात.

(१) मणी बनवण्यासाठी उपयुक्त असलेले दगड आणि शंख यांचे स्त्रोत माहीत असणे. (२) तेथून तो कच्चा माल मिळवणे. (३) तो कामाच्या जागेपर्यंत वाहून आणणे. (४) ओबडधोबड दगडांपासून किंवा शंखाच्या गाभ्यांपासून गुळगळीत, नियमित आकारांचे मणी घडवणे. या सर्व टप्प्यांचे ज्ञान कारागिराला असणे आवश्यक असते.

**अधिक माहितीसाठी :** भारतातील आणखी काही महत्त्वाची नवाश्मयुगीन स्थळे :

१. **भारतीय उपखंडाचा वायव्येकडील प्रदेश –** पहिल्या टप्प्यात (इसवी सनापूर्वी सुमारे ७००० ते ६०००) मातीची भांडी बनवायला सुरुवात झाली नव्हती. दुसऱ्या टप्प्यात (इसवी सनापूर्वी सुमारे ६००० ते ४५००) मातीची भांडी बनवायला सुरुवात झाली होती.

२. **जम्मू आणि काश्मीर –** काश्मीरमधील बुर्झोम आणि गुफक्राल येथे इसवी सनापूर्वी २५०० च्या सुमारास नवाश्मयुगीन गाव-वसाहतीची सुरुवात झाली.

३. **उत्तर प्रदेश –** उत्तर प्रदेशातील चोपनी मांडो, कोलढिवा आणि महागरा येथे इसवी सनापूर्वी ६००० च्या सुमारास नवाश्मयुगीन गाव-वसाहतीची सुरुवात झाली.

४. **बिहार –** बिहार येथील चिरांड, सेनुवार यांसारखी स्थळे. येथे इसवी सनापूर्वी २००० च्या सुमारास नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची सुरुवात झाली.

५. **ईशान्य भारत –** आसाममधील दाओजाली हाडिंग येथील उत्खननात ईशान्य भारतातील नवाश्मयुगाच्या अस्तित्वाचा पुरावा प्रथम उजेडात आला. तेथील गाव-वसाहतींची सुरुवात इसवी सनापूर्वी २७०० च्या सुमारास झाली. येथे मिळालेली नवाश्मयुगीन हत्यारे चीनमधील नवाश्मयुगीन हत्यारांशी अधिक साम्य दर्शवणारी आहेत.

६. **दक्षिण भारत –** कर्नाटकातील संगणकल्लू, मस्की, ब्रह्मगिरी, टेक्कलकोटा, पिकलीहाळ, हल्लूर, आंध्र प्रदेशातील नागार्जुनीकोंडा, तमिळनाडूतील पय्यमपल्ली येथे इसवी सनापूर्वी सुमारे चौथ्या ते तिसऱ्या शतकांत नवाश्मयुगाची सुरुवात झाली.

थोडक्यात शेती, शेतीला पूरक वस्तू, मातीची भांडी, मणी यांसारख्या सर्वच उत्पादन क्षेत्रांतील कामांच्या साखळीत अनेक प्रक्रिया आणि कामाचे विविध टप्पे यांचा समावेश असतो. त्यामुळे कामाची विभागणी होणे आणि त्यासाठी विविध प्रकारची कौशल्ये अवगत असणे अपरिहार्य असते. त्यातून समाजामध्ये विशेष कौशल्यांवर आधारित असे कारागिरांचे वर्ग निर्माण होतात.

## १.५ व्यापार आणि दळणवळण

मध्याश्मयुगातील भटके-निमभटके जनसमूह एकमेकांमध्ये वस्तुविनिमय करत असत. चाकाचा शोध अजून लागला नव्हता. म्हणजेच दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती. नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यावर प्राण्यांचा उपयोग सामानाच्या ने-आणीसाठी होऊ लागला.

नवाश्मयुगीन कुऱ्हाडी, तासण्या आणि छिन्न्या यांसारख्या हत्यारांच्या आधारे माणसाला झाडे तोडण्याचे तंत्र आणि लाकूडकाम या गोष्टी अवगत झाल्या होत्या. सुरुवातीची चाके लाकडाच्या अखंड ओंडक्यांपासून बनवलेली असावीत. कारण ओंडक्यावर छेद घेतल्यानंतर आपोआपच वर्तुळाकृती तुकडे अलग होतात. त्यांना सहजपणे गती देता येते.

चाकाचा वापर सुरू झाला आणि नवाश्मयुगीन मानवाने आतापर्यंत विकसित केलेल्या तंत्रज्ञानामध्ये क्रांती घडून आली.

नवाश्मयुगामध्ये मातीची भांडी चाकावर घडवायला सुरुवात झाली. चाकावर भांडी घडवण्याच्या तंत्रज्ञानामुळे त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करता येणे शक्य झाले. आवश्यक त्या कच्च्या मालाचे स्रोत स्थानिक पातळीवर उपलब्ध नसतील तर तो कच्चा माल दूरवरून आणणे आणि स्थानिक पातळीवर उत्पादित होणाऱ्या वस्तूंना इतरत्र मागणी असेल तर तो तिथे पाठवणे, या गोष्टी अधिक सोप्या रीतीने आणि वेगाने करणे शक्य झाले. यातून व्यापार आणि दळणवळण या गोष्टी विकसित झाल्या.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**सहज जाता जाता :**

नवाश्मयुगीन लाकडाचे चाक असेच दिसत असावे. इथे दिलेल्या चित्रातील चाकाचा काळ माहीत नाही. फक्त ओंडका कापून तयार केलेल्या चाकाची कल्पना येण्यासाठी ते दिले आहे.

### १.६ नागरीकरणाची सुरुवात

स्थिर गाव-वसाहतींमध्ये दीर्घ काळ राहिल्यानंतर नवाश्मयुगीन समाजांमध्ये वैयक्तिक घरे आणि शेतजमीन यांच्याबद्दल मालकीहक्काची भावना प्रस्थापित झाल्याचा उल्लेख याआधी सामाजिक संघटन आणि व्यवस्थापन या मुद्द्यांच्या संदर्भात केलेला आहे. गाव-वसाहतींचा विस्तार होत गेला, त्याच्या बरोबरीने सामाईक जमिनी आणि गावाच्या सीमा या गोष्टींबद्दल जागृती निर्माण होऊन भोवतालच्या परिसरावर हक्काची भावना (territoriality) निर्माण झाली. त्या परिसरातील सामाईक साधनसंपत्ती, पाण्याचे स्रोत, त्यांवर अवलंबून असलेल्या उद्योगांचे, व्यापाराचे आणि समाजजीवनाचे नियंत्रण करण्यासाठी सामाजिक विधिनिषेधांचे संकेत आणि त्यासंबंधीचे नियम तयार होत गेले. धार्मिक आचारविधी आणि त्यांचे सूक्ष्म तपशील यांना महत्त्व येत गेले. व्यापार आणि धार्मिक आचारविधी यांच्या व्यवस्थापनाच्या आणि नोंदी ठेवण्याच्या गरजेतून लिपी विकसित झाल्या, शासनव्यवस्था निर्माण झाली. ही व्यवस्था राबवण्यासाठी जी केंद्रे विकसित झाली तिथे विविध व्यवसाय करणारे लोक आणि अधिकारीवर्ग एके ठिकाणी आल्यामुळे गाव-वसाहतींची लोकसंख्या वाढली आणि गाव-वसाहतींचे परीघ विस्तारून नगरे विकसित झाली. अशा रीतीने नवाश्मयुगातील नागरीकरणाची सुरुवात झाली.

पुढील पाठात आपण भारतातील आद्य नगरांची माहिती घेऊ.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ‘यलो रिव्हर’ हे .............. या चिनी नावाचे भाषांतर आहे.
(अ) केमेत (ब) मदर
(क) सॉरो (ड) होयांग हो

२. ‘नवाश्मयुगीन क्रांती’ असा शब्दप्रयोग .............. या ऑस्ट्रेलियन पुरातत्त्वज्ञाने केलेला आहे.
(अ) गॉर्डन विली (ब) गॉर्डन चाईल्ड
(क) हिरोडोटस (ड) कॉलिंगवुड

३. गिलगॅल येथील नवाश्मयुगीन .............. झाडांची नियोजनपूर्वक लागवड केली होती.
(अ) पेरूच्या (ब) चिक्कूच्या
(क) अंजिराच्या (ड) जांभळाच्या

४. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील .............. हे ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या गाव-वसाहतीचे उदाहरण आहे.
(अ) सरदवाडी (ब) रांजणगाव
(क) पाबळ (ड) इनामगाव

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे - मेसोपोटेमिया
२. नाईल नदीचे खोरे - इराण
३. होयांग हो नदीचे खोरे - चीन
४. सिंधू नदीचे खोरे - भारतीय उपखंड

**प्र.२ (अ) पुढील घटना कालानुक्रमे लिहा.**


१. सूक्ष्मास्त्रांची निर्मिती
२. नवाश्मयुगाचा उदय
३. ‘होलोसिन’ कालखंडाची सुरुवात
४. शेती आणि पशुपालनाच्या तंत्राचा विकास



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**(ब) खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(क) गटात न बसणारा शब्द लिहा.**

प्राचीन संस्कृती असणारे देश : इजिप्त, चीन, भारत, इंग्लंड

**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. मेसोपोटेमियामध्ये नवाश्मयुगीन आद्य गाव-वसाहतींचा उदय झाला.

२. होयांग हो नदीला चिनी संस्कृतीची जन्मदात्री मानले जाते.

३. नवाश्मयुगामध्ये मातीची भांडी बनवणे, ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

१. नवाश्मयुगात मानवी जीवनशैलीत कमालीचा बदल घडून आला.

२. चाकाच्या वापराने तंत्रज्ञानात क्रांती घडून आली.

**प्र.५ पाठ्यपुस्तकातील पान क्र.२ वरील नकाशा पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. आफ्रिका खंडाच्या उत्तरेस कोणता समुद्र आहे?

२. हडप्पा संस्कृती कोणत्या खंडामध्ये उदयाला आली?

३. भारताच्या दक्षिणेस कोणता महासागर आहे?

**प्र.६ टीपा लिहा.**

१. 'जेरिको' शहरातील नवाश्मयुग

२. होलोसिन कालखंड

**प्र.७ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील आद्य शेतकरी आणि शेतीची सुरुवात या गोष्टींवर विस्ताराने लिहा.

२. मातीची भांडी बनवण्यासाठी नवाश्मयुगीन कारागिरांना कोणत्या गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक होते ?

३. नवाश्मयुगातील व्यापार आणि दळणवळणाची माहिती लिहा.

४. नवाश्मयुगातील नागरीकरणाची सुरुवात कशी झाली ते लिहा.

**उपक्रम**

प्राचीन जगातील प्रारंभीच्या काळातील कोणत्याही एका नागरी संस्कृतीची माहिती लिहा.

❖❖❖



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# नवाश्मयुग

इसवी सनापूर्वी
सुमारे ८००० ते ३००० वर्षे

## आद्य शेतकरी





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २. भारतातील आद्य नगरे

२.१ हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये
२.२ नगरे आणि गाव-वसाहती यांच्यातील परस्परसंबंध
२.३ उत्पादन, व्यापार, व्यवस्थापन आणि शासनव्यवस्था
२.४ नगरांचा ऱ्हास

## २.१ हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये

नागरी हडप्पा संस्कृतीची बीजे बलुचिस्तानातील मेहेरगढ येथील हडप्पापूर्व काळातील नवाश्मयुगीन संस्कृतीमध्ये सापडतात, याचा उल्लेख गेल्या पाठात आला आहे. जाँ फ्रॅन्क्वा जॅरीज आणि रिचर्ड मेडो या पुरातत्त्वज्ञांनी मेहेरगढ इथे उत्खनन केले. तिथे हडप्पा संस्कृतीच्या उदयाच्या खुणा दर्शवणाऱ्या ज्या नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष मिळाले, त्या संस्कृतीला 'टोगाओ संस्कृती' या नावाने ओळखले जाते. हडप्पापूर्व काळातील नवाश्मयुगीन 'रावी किंवा हाक्रा' संस्कृतीचे अवशेष हडप्पा (पंजाब, पाकिस्तान), कुणाल, भिराणा, फर्माना (हरयाणा) इत्यादी स्थळांच्या उत्खननात मिळाले आहेत.

वैदिक आर्यांचे आगमन भारतात इसवी सनापूर्वी १५००च्या सुमारास झाले, असा एक प्रभावी मतप्रवाह एके काळी होता. परंतु त्याआधीच्या काळाबद्दल कोणतीच माहिती पुढे आलेली नव्हती. त्यामुळे इसवी सन १९२१ मध्ये हडप्पा आणि १९२२ मध्ये मोहेंजोदडो येथील उत्खनने सुरू होईपर्यंत, इसवी सनापूर्वी १५०० च्या आधीचा भारताचा इतिहास सांगता येत नव्हता. हडप्पा संस्कृतीच्या शोधामुळे भारताचा इतिहास इसवी सनापूर्वी किमान ३००० ते ३५०० पर्यंत जातो. त्या काळात भारतीय उपखंडात अफगाणिस्तानपासून महाराष्ट्रापर्यंत आणि मकरानच्या किनाऱ्यापासून हरयाणापर्यंत १५ लाख चौरस किलोमीटरच्या प्रदेशात, विकसित आणि समृद्ध नागरी 'हडप्पा संस्कृती' नांदत होती. ही संस्कृती कांस्ययुगीन होती, हे सिद्ध झाले. या संस्कृतीची दोन हजारांहून अधिक स्थळे उजेडात आली आहेत. हडप्पा, मोहेंजोदडो, कालीबंगन, लोथल, धोलावीरा, राखीगढी यांसारख्या विस्तृत नगरांच्या उत्खननातून प्रकाशात आलेले अवशेष हडप्पा संस्कृतीच्या गतवैभवाची साक्ष देतात.

या नगरांचा इतिहास तीन कालखंडांत विभागलेला दिसतो. (१) पूर्व हडप्पा संस्कृतीचा काळ (२) प्रगल्भ नागरी हडप्पा संस्कृतीचा काळ (३) उत्तर हडप्पा संस्कृतीचा काळ.

ही नगरे वसवणारे लोक कोण होते, हे कोडे मात्र अजून सुटलेले नाही.

हडप्पा संस्कृतीच्या नगरांमध्ये खालील वैशिष्ट्ये प्रकर्षाने दिसतात.

**(१) सुव्यवस्थित नगररचना :** पक्क्या विटांचे बांधकाम केलेले स्नानगृह, स्वच्छतागृह, विहिरी यांसारख्या सोईंनी युक्त विशाल घरे, धान्याची कोठारे, सार्वजनिक स्वरूपाच्या भव्य इमारती, वीटकाम करताना वापरलेली 'इंग्लिश बाँड' पद्धत (दोन उभ्या आणि दोन आडव्या विटा रचून केलेले बांधकाम - ही पद्धत भूकंपप्रवण प्रदेशात विशेष उपयोगी असते.) उत्तम निस्सारण व्यवस्था, सार्वजनिक स्नानगृहे, नगराचे दोन किंवा अधिक विभाग, प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी, एकमेकांना काटकोनात छेदणारे प्रशस्त रस्ते आणि त्यांमधील मोकळ्या चौकोनी जागांचा रहिवासी घरांसाठी उपयोग.

**२. मध्यवर्ती शासनव्यवस्था :** पाणी आणि इतर साधनसंपत्तीचे स्रोत तसेच व्यापार इत्यादींचे नियंत्रण, प्रमाणीकरण : उदाहरणार्थ, विटांचा आकार १:२:४, ८च्या पटीत वाढत जाणारी वजने (अष्टमान पद्धत), ठरावीक घाटाची आणि सजावटीची मातीची भांडी; प्रशासकीय कामासाठी अनिवासी स्वरूपाच्या स्वतंत्र आणि भव्य इमारती.

**(३) समाजव्यवस्था :** अधिकारदर्शक सामाजिक उतरंड, विशेष कौशल्ये प्राप्त असलेल्या कारागिरांचे,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

कुशल व्यक्तींचे व्यावसायिक वर्ग, श्रद्धाप्रणाली आणि त्यांच्याशी निगडित असलेल्या वस्तू आणि वास्तू, दफनस्थळे-मृत्यूनंतरच्या विधींचा पुरावा.

**(४) आर्थिक व्यवस्था :** व्यापारासाठी उपयुक्त वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन-उदाहरणार्थ, सुबक मातीची भांडी, सोने, चांदी, तांबे आणि कांसे या धातूंच्या वस्तू, सौंदर्यपूर्ण मणी, मूर्ती इत्यादी.

उत्पादनाच्या सोईसाठी कारागिरांचे कारखाने आणि कारागीर यांच्या वस्तीचा स्वतंत्र विभाग.

अंतर्गत आणि दूरवरच्या प्रदेशांशी असणारा भरभराटीचा व्यापार.

शासकीय यंत्रणेद्वारे व्यापारावर नियंत्रण.

**(५) विकसित लेखनकला :** मुद्रांवर आढळणारी लिपी.

### हडप्पा संस्कृतीची काही नगरे

**हडप्पा :** पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील साहिवाल जिल्ह्यात रावी नदीच्या काठावर 'हडप्पा' हे स्थळ आहे. हडप्पा नगराचे प्राचीन अवशेष १५० हेक्टरवर पसरले होते. हडप्पाचे विस्तृत उत्खनन इसवी सन १९२१ मध्ये सुरू झाले. त्यानंतर तिथे पुन्हा उत्खनने केली गेली. त्या उत्खननांपैकी भारतीय पुरातत्त्व खात्याचे सरसंचालक सर मॉर्टिमर व्हिलर यांनी १९४६ मध्ये स्तरशास्त्राच्या आधारे केलेले उत्खनन महत्वाचे आहे. या उत्खननाद्वारे त्यांनी हडप्पा येथील बालेकिल्ल्याभोवतीची तटबंदी शोधली.

हडप्पा येथे पूर्वहडप्पा संस्कृतीची पहिली गाव-वसाहत इसवी सनापूर्वी ३३०० च्या सुमारास झाली. इसवी सनापूर्वी २६०० च्या सुमाराचा काळ हा तेथील नागरी हडप्पा संस्कृतीच्या उदयाचा आहे. इसवी सनापूर्वी २४५० ते १९०० या काळात नागरी हडप्पा संस्कृती नांदत होती. इसवी सनापूर्वी १९०० च्या सुमारास काही अंतर्गत बदल घडून येताना दिसतात आणि उत्तर हडप्पा संस्कृतीचा काळ सुरू होतो. या काळात नागरी हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास होत गेला.

सुरुवातीच्या उत्खननांच्या आधारे हडप्पा नगराचे विभाजन बालेकिल्ला आणि नागरवस्ती अशा दोन विभागांमध्ये झालेले दिसत होते. परंतु अलीकडे झालेल्या उत्खननानुसार तिथे एकूण चार विभाग होते, असे आढळले आहे. बालेकिल्ला आणि नागरी वसाहत या विभागांखेरीज नगराच्या आग्नेयेस कारागिरांची घरे व कारखाने होते. बालेकिल्ल्याच्या उत्तरेस असलेल्या विभागात धान्याचे कोठार आणि तिथे काम करणाऱ्या कामगारांची घरे होती. हे कोठार आणि तिथे काम करणारे कामगार बालेकिल्ल्यात राहणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अखत्यारीखाली होते, हे स्पष्ट आहे. जवळच धान्य कांडण्याचे ओटे होते.

**अधिक माहितीसाठी :** १. मातीच्या भांड्यांची खापरे आणि इतर पुरावस्तू यांची खास वैशिष्ट्ये आणि त्या प्रथम ज्या स्थळाच्या उत्खननात मिळाल्या याचा विचार करून पुरातत्वामध्ये प्रागैतिहासिक काळातील संस्कृतींना नावे दिलेली असतात.


२. घग्गर-हाक्रा या नावाने ओळखली जाणारी नदी ही फक्त पावसाळ्यात प्रवाहीत होणारी नदी असून, ती हिमाचल प्रदेशातील शिवालिक टेकड्यांमध्ये उगम पावून पंजाब, हरयाणातून वाहत राजस्थानमध्ये येते. तिथून पुढे ती पाकिस्तानमधील चोलिस्तान या वाळवंटी प्रदेशात प्रवेश करते आणि सरतेशेवटी कच्छच्या रणात प्रवेश करताना दिसते. पावसाळा सोडल्यास तिचे पात्र कोरडे असते, तिचा भारतातील प्रवाह 'घग्गर' या नावाने आणि पाकिस्तानातील प्रवाह 'हाक्रा' या नावाने ओळखला जातो. घग्गर-हाक्राच्या प्रवाहाच्या सर्वेक्षणामध्ये तिच्या कोरड्या प्रवाहाच्या काठावर हडप्पा संस्कृतीची अनेक स्थळे आढळून आली आहेत.

३. अनेक अभ्यासकांच्या मते घग्गर-हाक्रा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नदीचे कोरडे पात्र सरस्वती नदीच्या लुप्त झालेल्या प्रवाहाच्या खुणा दर्शवणारे आहे. या कोरड्या पात्राचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी उपग्रहांवरून घेतलेल्या छायाचित्रांचा आधार घेतला जात आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




**खालील माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :** हडप्पा संस्कृतीसंबंधी माहिती होण्याआधी भारत आणि पाकिस्तानच्या प्राचीन इतिहासाच्या संदर्भात इसवी सनापूर्वी ३२६ हे सिकंदराच्या भारतावरील स्वारीचे वर्ष, हा एकमेव विश्वासार्ह ऐतिहासिक पुरावा उपलब्ध होता. परंतु ही परिस्थिती बदलणारा, हडप्पा संस्कृतीचा शोध कसा लागला, या कहाणीची सुरुवात इसवी सन १८२९ मध्ये झाली. चार्ल्स मेसन या प्रवाशाने हडप्पाला भेट दिली. हडप्पा येथील प्राचीन अवशेष सिकंदराला थोपवून धरणाऱ्या पोरस राजाच्या राजधानीचे असावेत, असे अनुमान त्याने बांधले. मेसननंतर लेफ्टनंट अलेक्झांडर बर्नस नावाच्या एका अधिकाऱ्याने हडप्पाला भेट दिली होती.

मेसन आणि बर्नस या दोघांनी लिहिलेल्या वृत्तांतांमुळे भारतीय पुरातत्त्व खात्याचे पहिले सरसंचालक सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांचे लक्ष हडप्पाकडे वेधले गेले. त्यांनी इसवी सन १८७२-७३ मध्ये तेथे उत्खनन केले. कनिंगहॅम यांनी केलेल्या उत्खननानंतर हडप्पाचे उत्खनन पुन्हा सुरू होण्यास ४८ वर्षांचा कालावधी जावा लागला. एवढ्या मोठ्या कालावधीत सुद्धा हडप्पाबद्दल युरोपीय संशोधकांमध्ये असलेले कुतूहल टिकून राहिले होते. कारण हडप्पा येथे मिळालेल्या मुद्रांमुळे हडप्पा संस्कृतीचा मेसोपोटेमियातील संस्कृतीशी जवळचा संबंध असावा, असे अभ्यासकांना वाटत होते.



अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी प्रसिद्ध केलेल्या हडप्पा मुद्रेचे पहिले रेखाचित्र. या रेखाचित्रात मुद्रा आयताकृती दिसत असली तरी प्रत्यक्षात हडप्पा संस्कृतीच्या मुद्रा चौरस आकाराच्या असतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**मोहेंजोदडो :** राखालदास बॅनर्जी यांनी इसवी सन १९२१-२२ मध्ये मोहेंजोदडो येथे उत्खनन सुरू केले. या उत्खननात सापडलेल्या मुद्रा आणि इतर पुरावस्तू यांच्यामधील साधर्म्यामुळे मेसोपोटेमियातील प्राचीन संस्कृती आणि हडप्पा संस्कृती यांमध्ये परस्परसंबंध असावेत, असे अनुमान त्यांनी बांधले. इसवी सन १९२३-२४ मध्ये मोहेंजोदडोची अधिक सविस्तर पाहणी करण्यासाठी भारतीय पुरातत्व खात्याचे तत्कालीन सरसंचालक सर जॉन मार्शल, यांच्या मागदर्शनाखाली माधवस्वरूप वत्स, काशिनाथ नारायण दीक्षित, अर्नेस्ट मॅके इत्यादींनी उत्खनन केले. त्या उत्खननांमध्ये विविध पुरावस्तू, रहिवासी घरे आणि इतर वास्तू उजेडात आल्या.



हडप्पा संस्कृतीची मातीची भांडी

मोहेंजोदडो पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील लारकाना जिल्ह्यात, सिंधू नदीवर वसले होते. येथे भूजलाच्या पातळीमुळे खालच्या स्तरांपर्यंत उत्खनन करणे शक्य झाले नाही. परंतु त्या थरांमध्ये मेहेरगढ येथील नवाश्मयुगीन गाव-वसाहतीइतकी प्राचीन गाव-वसाहत अस्तित्वात असण्याची शक्यता आहे.

मोहेंजोदडो हे हडप्पा संस्कृतीच्या आतापर्यंत उजेडात आलेल्या पाकिस्तानातील नगरांपैकी विस्ताराने सर्वाधिक मोठे आहे. मोहेंजोदडोच्या वस्तीचे बालेकिल्ला आणि नागरी वसाहत असे दोन तटबंदीयुक्त भाग होते असे सर्वसाधारणपणे समजले जाते. परंतु आणखी एक तिसरा विभाग हा बाजाराचा होता. या विभागात कारागिरांच्या कार्यशाळा, तसेच मातीची भांडी आणि मणी भाजण्याच्या भट्ट्या होत्या.

मोहेंजोदडो येथील अवशेषांची हडप्पा येथील अवशेषांप्रमाणे नासधूस झालेली नव्हती. त्यामुळे तेथील उत्खननात उजेडात आलेली घरे, मोठ्या इमारती, रस्ते इत्यादींच्या अवशेषांच्या आधारे त्या नगराची भव्यता स्पष्ट झाली. हडप्पा संस्कृतीच्या नगररचनेचे उत्कृष्ट नियोजन आणि नगराचे व्यवस्थापन यांचा पुरावा प्राप्त झाला. मोहेंजोदडोच्या निर्मितीमधील पूर्वनियोजनाची



मोहेंजोदडोमधील अनेक दालने असलेले एक घर

तुलना चंदीगडसारख्या आधुनिक शहराच्या निर्मितीमधील पूर्वनियोजनाशी करता येईल. मोहेंजोदडोसारखे पूर्वनियोजित नगर प्रत्यक्ष उभे करताना आवश्यक असणारे प्रचंड आर्थिक आणि मानवी बळ लक्षात घेता त्याच्या उभारणीमागे काही खास हेतू असावा, याबद्दल खात्री वाटते.

**कालीबंगन :** कालीबंगन बिकानेरहून २०५ किलोमीटर अंतरावर, राजस्थानच्या हनुमानगढ जिल्ह्यात आहे. ते घग्गर नदीच्या काठावर वसलेले हडप्पा संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र होते. टेसिटोरी नावाच्या एका इटालियन भाषाशास्त्रज्ञाने त्याच्या अभ्यासाच्या निमित्ताने केलेल्या दौऱ्यात कालीबंगन हे स्थळ प्राचीन असून ते इतिहासपूर्व काळातील असावे, अशी नोंद करून ठेवलेली होती. परंतु ते हडप्पा संस्कृतीचे एक नगर होते, हे इसवी सन १९६० मध्ये तिथे उत्खनन सुरू झाल्यानंतरच स्पष्ट झाले. हे उत्खनन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याचे तत्कालीन सरसंचालक ब्रिज बासी लाल (बी.बी.लाल) आणि बालकृष्ण थापर (बी. के.थापर) यांच्या मार्गदर्शनाखाली केले गेले.

कालीबंगन येथे नागरी हडप्पा संस्कृतीची आणि त्याआधीची पूर्व हडप्पा संस्कृतीची, अशा दोन वसाहती उजेडात आल्या. हडप्पा, मोहेंजोदडोच्या तुलनेत कालीबंगन लहान होते. नागरी हडप्पा संस्कृतीच्या काळातील वसाहतीचे बालेकिल्ला आणि नागरी वसाहत असे दोन तटबंदीयुक्त विभाग इथेही होते. कालीबंगनचे महत्त्व दोन गोष्टींसाठी आहे. पहिली गोष्ट म्हणजे तिथे पूर्वनागरी हडप्पा संस्कृतीच्या काळातील नांगरलेल्या शेताचा पुरावा. हे नांगरलेले शेत इसवी सनापूर्वी २८०० च्या सुमाराचे आहे. त्यांतील नांगरटीच्या खुणा त्या परिसरातील आताच्या नांगरटीच्या पद्धतीप्रमाणेच आहेत. दुसरी गोष्ट म्हणजे तेथील बालेकिल्ल्यामध्ये



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

ओळीने सापडलेली सहा ते सात अग्निकुंडे. सर्वसामान्यांच्या नागरी वसाहतीमधील घरांमधूनही अग्निकुंड असल्याचे पुरावे मिळाले आहेत. याखेरीज नगराच्या तटबंदीच्या बाहेरही ओळीने अग्निकुंडे असलेली एक वास्तू होती. काहींमध्ये पशूंची हाडे होती. हा पुरावा अग्निपूजेचा असावा, असे काही पुरातत्त्वज्ञांचे मत आहे.

**लोथल :** लोथल हे हडप्पा संस्कृतीचे केंद्र कच्छच्या आखाताजवळ गुजरातमध्ये अहमदाबादपासून ८० किलोमीटरवर आहे. ते तेथील प्राचीन गोदीसाठी प्रसिद्ध आहे. लोथलचे उत्खनन इसवी सन १९५५ ते १९६० या काळात एस. आर. राव यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

लोथलचा बालेकिल्ला आणि नागरी वसाहत यांच्याभोवती तटबंदीच्या स्वतंत्र भिंती नसून त्या एकाच तटबंदीने वेढलेल्या आहेत.

लोथल हे भोगाव नदीच्या तीरावरील हडप्पा संस्कृतीचे महत्त्वाचे बंदर आणि व्यापारी केंद्र होते. तेथील बाजाराचे ओटे, कोठारघर यांसारख्या वास्तू आणि गोदी यांवरून दिसून येते. लोथलच्या गोदीची रचना हे प्राचीन जगतातील अभियांत्रिकीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. आता लोथल समुद्रापासून काहीसे आत असले, तरी ते प्राचीन काळी खंबातच्या आखातातील नद्यांच्या मुखाच्या प्रदेशात होते. लोथल वसवणाऱ्या हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी समुद्राच्या भरती-ओहोटीचे आणि त्यायोगे भोगाव नदीतून आत येणाऱ्या भरतीच्या पाण्याचे व्यवस्थित निरीक्षण केले असणार, हे स्पष्ट आहे. भरतीच्या वेळेस आत येणाऱ्या पाण्याबरोबर समुद्रातील बोटी आत आणता याव्यात आणि त्यांची डागडुजी झाल्यानंतर त्यांना पुन्हा समुद्रात सोडता यावे, अशी गोदीची रचना होती. आवश्यकतेनुसार गोदीतील पाणी जवळच्या कालव्यात सोडण्यासाठी गोदीत पक्क्या विटांची मोरीही बांधलेली होती.

**धोलावीरा :** धोलावीराचा शोध भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे माजी सरसंचालक जे.पी. जोशी यांनी लावला. तेथील उत्खनन इसवी सन १९९० मध्ये आर.एस. बिश्त यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाले. हडप्पा संस्कृतीच्या उत्खनित नगरांमध्ये धोलावीराचा



धोलावीरा येथील पाण्याचा तलाव.

क्रमांक विस्ताराच्या दृष्टीने पाचवा आहे. तेथील नगररचना इतर हडप्पाकालीन नगरांपेक्षा काहीशी निराळी आहे.

धोलावीरा येथे नागरी हडप्पा वसाहतीच्या आधीची पूर्वहडप्पा काळातील वसाहत होती. तिच्याभोवती कच्च्या विटा आणि घडीव दगड वापरून बांधलेली संरक्षक भिंत होती. त्याच्या वरच्या थरातील नागरी हडप्पाकालीन वसाहत तटबंदीयुक्त होती. या तटबंदीच्या आतल्या वसाहतीचे चार स्वतंत्र विभाग होते.

१. बालेकिल्ला २. बालेकिल्ल्याला लागून असलेले अधिकाऱ्यांच्या वस्तीचे राखीव प्रांगण ३. सामान्यजनांची वसाहत. या तीन भागांना त्यांच्या भोवती भिंती बांधून अलग केलेले होते. ४. नगराच्या तटबंदीच्या आत आणखी एक वस्ती होती. तिच्याभोवती संरक्षक भिंत नव्हती. ही वस्ती मजुरांची असावी. नगराच्या बाहेरून वाहणाऱ्या दोन ओढ्यांचे पाणी अडवून ते आणि पावसाचे पाणी साठवण्याची सोय केली होती. त्यासाठी दगड आणि विटा यांचा उपयोग करून नाले आणि तलाव बांधलेले होते. नियोजनपूर्वक जलव्यवस्थापनाचा हा सर्वांत प्राचीन पुरावा आहे.

**राखीगढी :** हरयाणामधील हिस्सार जिल्ह्यामध्ये राखीगढी हे हडप्पा संस्कृतीचे स्थळ आहे. ते दिल्लीपासून १५० किलोमीटर अंतरावर आहे. हे स्थळ चौटांग (प्राचीन दृशद्वती नदी) नदीवर आहे. भारत आणि पाकिस्तानातील हडप्पा संस्कृतीच्या स्थळांमध्ये राखीगढी सर्वांत मोठे आहे. त्याचा विस्तार ३५० हेक्टरहूनही अधिक होता. राखीगढी येथील उत्खनन इसवी सन १९६३ मध्ये सुरू झाले. पुढे इसवी सन १९९७ ते २००० या काळात ते सुरू राहिले आणि त्यानंतर



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पुण्यातील डेक्कन कॉलेजचे संचालक डॉ.वसंत शिंदे यांनीही तिथे उत्खनन केले.

नागरी हडप्पाची सर्व वैशिष्ट्ये राखीगढीमध्ये पहायला मिळतात. राखीगढी हडप्पा संस्कृतीचे पूर्वेकडील प्रदेशातले प्रमुख केंद्र होते, असे दिसते. कालीबंगनप्रमाणे येथेही अग्निकुंडांचे पुरावे मिळाले आहेत.

हडप्पा संस्कृतीच्या नगरांमधून असलेल्या दफनस्थळांचे पुरावे मिळाले आहेत. परंतु तेथून प्राप्त झालेल्या पुराव्याचा आनुवंशिकतेच्या दृष्टिकोनातून अभ्यास झाला नव्हता. राखीगढी येथील मानवी हाडांच्या जनुकशास्त्रीय विश्लेषणाच्या आधारे हडप्पा संस्कृतीचे लोक कोण होते, या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळेल, असा विश्वास शास्त्रज्ञांना वाटतो.

**अधिक माहितीसाठी :** हरयाणातील घग्गरच्या खोऱ्यात पूर्व हडप्पा आणि हडप्पा नागर संस्कृतीची स्थळे खूप मोठ्या संख्येने मिळाली आहेत. नवीन संशोधनानुसार हरयाणातील कुणाल, भिराणा, फर्माना, गिरवाड आणि मिठाथल यांसारख्या स्थळांमधील पुराव्यानुसार नागरी हडप्पा संस्कृतीच्या काळाची सुरुवात इसवी सनापूर्वी ५००० वर्षांहून अधिक प्राचीन असू शकते. हे सिद्ध झाले तर हडप्पा संस्कृतीचा उदय घग्गरच्या खोऱ्यात झाला, असे अनुमान करता येते. याबाबत निश्चित निष्कर्षांपर्यंत पोचण्यासाठी राखीगढी येथील पुरावा उपयुक्त ठरू शकेल.

### २.२ नगरे आणि गाव-वसाहती यांच्यातील परस्परसंबंध

हडप्पा संस्कृतीची नगरे हडप्पापूर्व काळातील गाव-वसाहतींचा विकास आणि विस्तार होण्याच्या प्रक्रियेतून उदयाला आली, हे आपण पाहिले. नागरी जीवनाच्या आणि व्यवस्थापनाच्या गरजांची पूर्ती करण्यासाठी, नगरातील लोक भोवतालचा नैसर्गिक परिसर आणि गाव-वसाहतींवर अवलंबून असतात. हडप्पा नगरांमधील लोकांच्या दैनंदिन जीवनासाठी अन्नधान्य आणि व्यापारी उत्पादनासाठी प्रामुख्याने चिकणमाती, विविध प्रकारचे दगड आणि मौल्यवान खडे, विविध धातू इत्यादी उपलब्ध होण्यासाठीच्या यंत्रणेवर नगरे आणि गाव-वसाहतींमधील परस्परसंबंध अवलंबून होते.

हडप्पापूर्व काळातील सर्वच गाव-वसाहतींचे रूपांतर मोठ्या किंवा छोट्या नगरांमध्ये झाले नाही. काही गाव-वसाहतींमध्ये फारसे बदल घडले नाहीत. हडप्पा संस्कृतीच्या प्रमुख नागरी केंद्रांच्या गरजांची पूर्ती करणारी छोटी नगरे, लहानमोठ्या आकाराच्या गाव-वसाहती आणि निमभटक्या लोकांच्या हंगामी वस्त्या यांचे जाळे अस्तित्वात होते. त्यांमध्ये दुर्गम प्रदेशातील गाव-वसाहतींचाही समावेश होता. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे अफगाणिस्तानच्या बदक्शान प्रांतातील 'शोर्तुगाय' ही हडप्पा संस्कृतीची वसाहत. तिथे लाजवर्दी/इंद्रनील दगडाच्या खाणी आहेत. या दगडापासून केलेल्या वस्तूंना मेसोपोटेमियामध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी होती. मेसोपोटेमियातील महाकाव्यांमध्ये देवी इनन्नाच्या राजवाड्यातील भिंती लाजवर्दीने मढवल्याची वर्णने आहेत. हडप्पा संस्कृतीतील लोकांच्या मेसोपोटेमियाशी असलेल्या व्यापारात लाजवर्दी दगडाला अत्यंत महत्त्व होते.



लाजवर्दी/ इंद्रनील दगड

### २.३ उत्पादन, व्यापार, व्यवस्थापन आणि शासनव्यवस्था

शेतीला सुरुवात झाली तेव्हा मातीची भांडी घडवणे, शेती करणे ही कामे स्त्रियांची होती. स्त्रिया मातीची भांडी हाताने घडवत होत्या. पेरणी करण्यासाठी टेपरणे (Digging Stick) वापरत होत्या. या पद्धतीमध्ये उत्पादन फक्त आपापले कूळ किंवा कुटुंबापुरते होऊ शकते; अतिरिक्त उत्पादन होत नाही.

पूर्व हडप्पा संस्कृतीच्या काळातच बैलांचा उपयोग शेतीच्या कामासाठी आणि वाहतुकीसाठी होऊ लागला. चाकाच्या वापरामुळे मातीची भांडी अधिक वेगाने आणि अधिक मोठ्या प्रमाणावर घडवता येणे शक्य झाले. बैल जोतलेले नांगर वापरात आल्यामुळे शेतीचे उत्पादनही मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. अशा नांगरांच्या मातीच्या प्रतिकृती हरयाणातील बनावली येथे मिळाल्या आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शेतीच्या उत्पादनाखेरीज इतर गरजेच्या वस्तू धान्य देऊन त्याच्या मोबदल्यात घेता येऊ लागल्या. विनिमयाची सुरुवात झाली. धान्याचा विनिमय हा विशेषत: मीठ, धातू आणि मौल्यवान गोष्टी मिळवण्यासाठी होत असे.

नागरी हडप्पा संस्कृतीच्या काळात विनिमयाच्या या व्यवहाराची व्याप्ती वाढून वस्तूंची आयात-निर्यात मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. भारतीय उपखंडाच्या अंतर्गत आणि मेसोपोटेमियासारख्या दूरवरच्या प्रदेशांशी व्यापार सुरू झाला. हा व्यापार पूर्व हडप्पा काळात सुरू झाला होता. मेसोपोटेमियातील 'अक्कड' या साम्राज्याची प्रस्थापना इसवी सनापूर्वी २३३४ मध्ये सम्राट पहिला सार्गन याने केली. त्याच्या कारकिर्दीत हडप्पा संस्कृतीचा मेसोपोटेमियाशी असलेला व्यापार आणि नागरी हडप्पा संस्कृती यांची भरभराट झाली. सम्राट सार्गनच्या एका लेखात या व्यापाराचा उल्लेख आहे. या काळात इराण आणि मध्य आशियातून जाणाऱ्या खुश्कीच्या मार्गाचे महत्त्व कमी होऊन समुद्री व्यापाराला महत्त्व आले. त्यामध्ये 'दिलमुन', 'मकन' आणि 'मेलुहा' अशा तीन प्रदेशांचा उल्लेख आहे. दिलमुन म्हणजे बहरीन, मकन म्हणजे ओमान-इराण-बलुचिस्तानचा किनारा आणि मेलुहा म्हणजे हडप्पा संस्कृतीचा प्रदेश. मेलुहामध्ये प्राचीन काळी तांबे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. मेलुहा नाव तांब्याच्या लाल रंगावरून मिळाले असावे. मेलुहामधून तांबे, हस्तिदंताच्या वस्तू, इंद्रनील/लाजवर्दी, गोमेदाचे (carnelian) मणी, कापड, इमारती लाकूड इत्यादी वस्तू तसेच माकडे, मोर हे प्राणी मेसोपोटेमियात निर्यात केले जात होते. इजिप्तमधील राजघराण्यातील व्यक्तींना मृत्यूनंतर निळ्या कापडात गुंडाळले जाई (mummy). त्यासाठी लागणारी नीळ हडप्पा संस्कृतीचे व्यापारीच निर्यात करत होते. निर्यात केलेल्या वस्तूंच्या मोबदल्यात हडप्पा संस्कृतीच्या लोकांना लोकर, सोने आणि चांदी या गोष्टी मिळत असाव्यात.

हडप्पाकालीन नगरांमध्ये कारखान्यांसाठी नगराचा एक स्वतंत्र विभाग राखून ठेवलेला असे. तसेच केवळ औद्योगिक स्वरूपाच्या वसाहतीही होत्या. सिंधमधील चन्हुदडो हे अशा वसाहतींचे एक ठळक उदाहरण आहे. गुजरातमधील ठाणी विशेषत: व्यापाराच्या सोईसाठी वसवली गेली होती, असे स्पष्ट दिसते. कच्छ-सौराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीच्या कुंतासी, नागेश्वर, बगसरा यांसारख्या ठाण्यांहून तांबे, शंख, मौल्यवान खडे या गोष्टींच्या स्रोतांपर्यंत पोचणे सहज शक्य होते. शिवाय सौराष्ट्राच्या किनाऱ्यावरून तयार झालेल्या वस्तू बाहेर पाठवणे अधिक सोईचे होते. कच्चा माल मिळवणे, त्यांपासून उत्पादन आणि तयार मालाची निर्यात या सर्वच गोष्टी एकाच प्रदेशातून करणे व्यापाराच्या दृष्टीने निश्चितच अधिक फायद्याचे असते. त्याचा विचार करून हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी सौराष्ट्रातील ठाणी उभी केली, असे दिसते. विस्ताराने छोटी असलेली ही ठाणी हडप्पा संस्कृतीची औद्योगिक केंद्रे होती. धोलावीरा हे नगर तेथे तयार होणाऱ्या मालाच्या व्यापाराचे नियंत्रण करण्यासाठी उभारले होते. लोथल हे महत्त्वाचे बंदर होते.

**अधिक माहितीसाठी :** मेसोपोटेमियातील नगरांच्या सत्तेचा आणि शासनव्यवस्थेचा केंद्रवर्ती बिंदू तेथील अत्यंत भव्य असणाऱ्या मंदिरांच्या व्यवस्थापनामध्ये एकवटलेला होता. या मंदिरांना 'झिगुरात' असे म्हटले जाते. मंदिराचा प्रमुख हाच नगराचा शासक असे. नगरातील समाजजीवन, सांस्कृतिक घडामोडी, सत्ता आणि अधिकारांची उतरंड इत्यादी गोष्टी मंदिराच्या अधिष्ठात्या देवतेसाठी करायचे विधी आणि समारंभ यांच्या अनुषंगानेच आकाराला येत. या पार्श्वभूमीवर नागरी हडप्पा संस्कृतीमधील 'धर्मगुरु-राजा' ही संकल्पना मांडली गेली. मेसोपोटेमियामध्ये शेतीचे उत्पादन विपुल प्रमाणात होत असले तरी मौल्यवान धातू आणि रत्ने, इमारतींच्या बांधकामासाठी आवश्यक असणारे लाकूड यांचे स्रोत तिथे नव्हते. या गोष्टी आयात केल्या जात. आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या याद्या आणि त्या जेथून आणवल्या त्या प्रदेशांचे उल्लेख मेसोपोटेमियातील इष्टिकालेखामध्ये मिळतात. निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये कापड, मातीची भांडी, चामड्याच्या वस्तू इत्यादींचा समावेश होता.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

व्यापारी वस्तूंचे उत्पादन, त्यांची आयात-निर्यात आणि त्यासाठी निर्माण झालेली नगरे आणि गाव-वसाहतींमधील परस्परसंबंधांचे जाळे, या सर्व गोष्टींच्या व्यवस्थापनासाठी एक सुसंघटित प्रशासनयंत्रणा प्रस्थापित झालेली असणार, हे स्पष्ट आहे. नगररचना, विटा, वजने-मापे, मुद्रा, विविध वस्तूंचे आकार आणि सुशोभीकरण या सर्वच बाबतींमधले प्रमाणीकरण हे त्या प्रशासनयंत्रणेचे साक्षी आहे. या प्रशासनयंत्रणेची सूत्रे धर्मप्रमुखाच्या हातात होती, असे मानले जाते. मात्र हडप्पा संस्कृतीचा प्रदेश हा एकसंध राष्ट्राच्या स्वरूपाचा होता की संघराज्याच्या स्वरूपाचा होता, हे निश्चितपणे सांगणे शक्य झालेले नाही. मोहेंजोदडो, हडप्पा, धोलावीरा, राखीगढी ही नगरे बहुधा प्रादेशिक राजधानीच्या स्वरूपाची असावीत. मोहेंजोदडो, कालीबंगन, लोथल, राखीगढी ही केंद्रे धार्मिक दृष्टीनेही महत्त्वाची होती.

## २.४ नगरांचा ऱ्हास

१. हडप्पा संस्कृतीचा जेव्हा नुकताच शोध लागला तेव्हा हडप्पा संस्कृतीची नगरे बाहेरून आलेल्या लढाऊ जमातींनी नष्ट केली, असे अनुमान बांधले गेले. इंद्र या ऋग्वेदातील देवाचे वर्णन 'पुरंदर' म्हणजे पुरांचा नाश करणारा असे केले आहे. 'पुर' म्हणजे तटबंदीने युक्त असलेले नगर. हडप्पा संस्कृतीची नगरे तटबंदीने युक्त होती. म्हणजे 'पुर' या संज्ञेच्या व्याख्येत बसणारी होती. इंद्राने हडप्पा संस्कृतीच्या पुरांचा नाश केला, म्हणजेच इंद्राच्या नेतृत्वाखाली वैदिक आर्यांनी हडप्पा संस्कृतीच्या नगरांचा नाश केला, असा अन्वयार्थ सर मॉर्टिमर व्हिलर यांनी लावला. त्या वेळेस व्हिलर यांच्या या अनुमानाला विद्‌वत्वर्तुळात मान्यताही मिळाली, परंतु हडप्पा संस्कृतीच्या संदर्भातील अधिक ठोस पुरावा आता उपलब्ध झाला आहे. तो पुरावा व्हिलरच्या अनुमानाला पुष्टी देणारा नाही. इसवी सनापूर्वी २०००-१९०० च्या सुमाराला नागरी हडप्पा संस्कृतीची घसरण सुरू झाली. हडप्पा संस्कृतीची नगरे उतरणीला लागली, तेथील लोकांना स्थलांतर करणे भाग पडले. येथून उत्तर हडप्पा संस्कृतीचा कालखंड सुरू होतो.

नागरी हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे मुख्यतः व्यापाराची घसरण, हवामानातील बदल, आर्थिक समृद्‌धीची उतरण यांसारख्या गोष्टींच्या एकत्रित परिणामांमध्ये आहे.

उत्तर हडप्पा संस्कृतीच्या काळात मेसोपोटेमियाशी असलेला हडप्पा संस्कृतीच्या लोकांचा व्यापार उतरणीला लागला होता. कारण मेसोपोटेमियाची आर्थिक संपन्नता कमी होऊ लागली होती. सततच्या अंतर्गत लढाया हे एक कारण त्यामागे होतेच. त्याखेरीज पिकाऊ जमिनींचे रूपांतर खारवट जमिनींमध्ये होत जाणे हे शेतीवर अवलंबून असलेल्या मेसोपोटेमियातील संस्कृतींच्या नाशाचे प्रमुख कारण होते. हडप्पा संस्कृतीमधून निर्यात होणाऱ्या मालाची बाजारपेठ क्षीण होत गेली.

२. पर्यावरणाचा ऱ्हास हे जसे मेसोपोटेमियातील संस्कृतीच्या ऱ्हासाच्या प्रमुख कारणांपैकी होते, त्याप्रमाणे हवामानात घडून आलले बदल आणि पर्यावरणाचा ऱ्हास ही हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाच्या प्रमुख कारणांपैकी होती. इसवी सनापूर्वी २००० च्या सुमारास हवामान शुष्क होऊन वारंवार दुष्काळ पडू लागले, पिकाऊ जमिनींची प्रत खालावत गेली. सरस्वती नदी म्हणजेच घग्गर आणि हाक्रा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नदीच्या खोऱ्यात हडप्पा संस्कृतीची अनेक स्थळे मिळालेली आहेत, याचा उल्लेख आपण केला आहे. याच काळात हडप्पा संस्कृतीची नगरे आणि त्यांच्या आर्थिक-सामाजिक जीवनाचा डोलारा सांभाळणाऱ्या गाव-वसाहतींमधील परस्परसंबंधांचा समतोल ढासळला. सरस्वतीच्या खोऱ्यात घडून आलेला प्रचंड मोठा भूकंप, हे त्यामागील प्रमुख कारण होते. त्या भूकंपामुळे सरस्वतीचे पात्र उंचावले जाऊन तिला मिळणाऱ्या सतलज आणि यमुना या तिच्या प्रमुख उपनद्यांच्या पात्रांनी दिशा बदलली. सरस्वतीचे पात्र कोरडे पडले. त्यामुळे हडप्पा संस्कृतीच्या लोकांना स्थलांतर करावे लागले. हडप्पाच्या नगरांना उतरती कळा लागली.

त्यांच्या अवशेषांवर वसलेल्या वसाहती नागरी हडप्पा संस्कृतीइतक्या प्रगत आणि समृद्‌ध नव्हत्या. शिवाय त्यांची मातीची भांडी, घरे, मृत व्यक्तींच्या अंत्यविधींच्या संदर्भातील चालीरीती यांसारख्या गोष्टींमध्ये फरक होता. नैसर्गिक आपत्तींमुळे उत्तर हडप्पा संस्कृतीच्या लोकांनाही स्थलांतर करावे लागले. नागरी हडप्पा संस्कृतीचे आणि उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

जेथे नव्याने वसले तेथे छोट्या गाव-वसाहतींच्या स्वरूपाच्या नवीन संस्कृती उदयाला आल्या. या नवीन संस्कृतींचा प्रसार राजस्थान, गुजरात, माळवा आणि महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये झाला. या संस्कृतींना ताम्रपाषाणयुगीन संस्कृती म्हटले जाते. पुढील पाठात आपण त्यांचा परिचय करून घेणार आहोत.

टीप : परिभाषा–

१. हडप्पा पूर्व संस्कृती – हडप्पा संस्कृती उदयाला येण्याअगोदरच्या संस्कृती
२. पूर्व हडप्पा संस्कृती – हडप्पा संस्कृतीच्या सुरुवातीचा टप्पा
३. प्रगल्भ नागरी हडप्पा संस्कृती – हडप्पा नागरी (प्रगल्भ) संस्कृतीचा संपूर्ण विकसित टप्पा
४. उत्तर हडप्पा संस्कृती – प्रगल्भ हडप्पा संस्कृतीच्या उतरणीनंतरचा काळ
५. हडप्पोत्तर संस्कृती – हडप्पा संस्कृतीच्या विनाशानंतरच्या गाव-वसाहतींचा काळ

## स्वाध्याय

**प्र.१ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. शेतीला सुरुवात झाली तेव्हा .......... भांडी घडवणे, शेती करणे ही कामे स्त्रियांची होती.
(अ) तांब्याची (ब) कांस्याची
(क) मातीची (ड) दगडाची

२. लोथल हे नगर तेथील प्राचीन .......... प्रसिद्ध आहे.
(अ) शेतीसाठी (ब) गोदीसाठी
(क) कापडासाठी (ड) हत्यारांसाठी

३. हडप्पा संस्कृतीचा .......... या संस्कृतीशी जवळचा संबंध आहे.
(अ) चीन (ब) ग्रीक
(क) मेसोपोटेमिया (ड) इजिप्त

४. इजिप्तमधील राजघराण्यातील व्यक्तींना मृत्यूनंतर .......... कापडात गुंडाळले जाई.
(अ) पांढऱ्या (ब) काळ्या
(क) तांबड्या (ड) निळ्या

**प्र.२ (अ) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

मेसोपोटेमियातील संस्कृतीचा ऱ्हास होण्याचे प्रमुख कारण –
(अ) परकीय आक्रमण
(ब) पर्यावरणाचा ऱ्हास
(क) व्यापारातील नुकसान
(ड) स्थलांतर

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. दिलमुन – बहरीन
२. मकन – ओमान-इराण-बलुचिस्तानचा किनारा
३. शोर्तुगाय – मेसोपोटेमिया
४. मेलुहा – हडप्पा संस्कृतीचा प्रदेश

**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. उत्खननामध्ये सापडलेले अवशेष हडप्पा, मोहेंजोदडो, कालीबंगन, लोथल, धोलावीरा, राखीगडी संस्कृतीच्या गतवैभवाची साक्ष देतात.
२. लाजवर्दी दगडांना हडप्पा संस्कृतीच्या व्यापारामध्ये अत्यंत महत्त्व होते.
३. हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास झाला.

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

१. हडप्पा संस्कृतीतील नगरे व गाव-वसाहती यांच्यात परस्परसंबंध होता.
२. हडप्पा संस्कृतीतील नगरात सुसंघटित प्रशासनयंत्रणा असावी.

**प्र.५** हडप्पा संस्कृतीमधील नगरांची वैशिष्ट्ये दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.
(अ) नगररचना (ब) समाजव्यवस्था
(क) शासनव्यवस्था (ड) आर्थिक व्यवस्था

**उपक्रम**

आंतरजाल (इंटरनेट)च्या मदतीने हडप्पाकालीन नगररचना व चंदीगड शहराची नगररचना यांचा तुलनात्मक अभ्यास करून सचित्र माहिती गोळा करा.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## कालरेषा

हडप्पा संस्कृतीची काही महत्त्वाची स्थळे - उत्खनने आणि उत्खनक






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


# ३. भारतातील ताम्रपाषाणयुगीन गाव-वसाहती

३.१ भारतातील ताम्रपाषाणयुग
३.२ ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्र
३.३ भारतातील महापाषाणयुग

## ३.१ भारतातील ताम्रपाषाणयुग

नागरी हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासामुळे उत्तर हडप्पाकालीन लोकांनाही स्थलांतर करावे लागले. नागरी हडप्पा आणि उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक जेथे जेथे पोचले ते तेथील स्थानिक संस्कृतींमध्ये मिसळून गेले आणि त्या त्या ठिकाणी नवीन ग्राम-वसाहतींच्या स्वरूपाच्या नवीन संस्कृती उदयाला आल्या.

उत्तर हडप्पा काळात हडप्पा नगरांच्या अवशेषांवर वसलेल्या वसाहतींची घरबांधणी, ग्राम-वसाहतींची रचना यांमध्ये नागरी हडप्पा संस्कृतीच्या काळातील शिस्त आढळत नाही. त्यांच्या हडप्पा येथील 'एच' या दफनस्थळातील मिळालेल्या अस्थिकुंभांवरील नक्षीचे नमुनेही वेगळ्या प्रकारचे आहेत. त्यामध्ये चंद्र, सूर्य, मासे, हरीण आणि मोर या प्रतीकांचा वापर केलेला



हडप्पाच्या 'एच' दफनस्थळ येथील कुंभावरील नक्षी

दिसतो. मोराच्या पोटात मृताचे शरीर दाखवलेले आहे. थोडक्यात उत्तर हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये काहीशी वेगळी होती.

उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक वैदिक आर्य असावेत, असे काही पुरातत्वज्ञांचे मत आहे. मात्र उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक नागरी हडप्पा लोकांच्या पुढील पिढ्या होत्या की ते आर्य होते, हे ठरवण्यासाठी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.

### राजस्थान

**(१) 'आहाड' किंवा 'बनास' संस्कृती :** भारतातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती हडप्पा संस्कृतीनंतरच्या

**पुन्हा एकदा थोडक्यात :** नागरी हडप्पा संस्कृतीच्या आधी नवाश्मयुगीन ग्राम-वसाहती अस्तित्वात होत्या. त्यांना तांब्याच्या वस्तू बनवण्याचे ज्ञान होते. तेथील लोकांना मातीची भांडी घडवण्याची कला प्राप्त झाली होती. त्यायोगे तंत्रज्ञानाचा विकास आणि व्यापारात वाढ होऊन त्या समृद्ध होत गेल्या आणि हडप्पा नगरांची उभारणी झाली.

चाकावर भांडी घडवणे, गहू आणि बार्ली यांची शेती, तांब्याच्या वस्तू बनवणे यांसारख्या गोष्टींचे ज्ञान नागरी हडप्पा आणि उत्तर हडप्पा संस्कृतींच्या लोकांजवळ होतेच. ते जेथे जेथे गेले तेथील स्थानिक लोकांनाही त्यांनी ते शिकवले असणार. त्याद्वारे प्रादेशिकतेनुसार वैशिष्ट्यांचे वैविध्य दर्शवणाऱ्या ग्राम-वसाहतींच्या स्वरूपातील नवीन संस्कृती उदयाला आल्या. या संस्कृतींना 'ताम्रपाषाणयुगीन संस्कृती' म्हणतात. ताम्रपाषाणयुगीन संस्कृती म्हणजे तांबे आणि दगड या दोहोंची हत्यारे वापरणाऱ्या लोकांची संस्कृती. या संस्कृतीमध्ये तांब्याचा वापर होत असला तरी तो मर्यादित स्वरूपाचा होता.

भारतात राजस्थान, गंगेचे खोरे, गुजरात, बिहार, बंगाल, ओडिशा, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र येथे ताम्रपाषाणयुगीन संस्कृती सापडल्या आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

काळातील आहेत. मात्र राजस्थानच्या मेवाड प्रदेशातील आहाड किंवा बनास या नावाने ओळखली जाणारी संस्कृती हडप्पा संस्कृतीची समकालीन होती. उदेपूरजवळचे बालाथल आणि गिलुंड ही आहाड संस्कृतीची महत्त्वाची स्थळे आहेत. बालाथल येथील पुराव्यानुसार ती इसवी सनापूर्वी सुमारे ४००० वर्षे इतकी प्राचीन होती.

उदेपूरजवळच्या आहाड येथे तिचा शोध प्रथम लागला म्हणून तिला 'आहाड संस्कृती' असे नाव देण्यात आले. हे गाव आहाड या बनास नदीच्या उपनदीवर वसलेले आहे. तिला 'बनास संस्कृती' असेही म्हणतात.

पुरावस्तू आणि पुरावास्तू यांच्या आधारे असे दिसते, की बालाथल येथे मोठ्या प्रमाणावर मातीच्या भांड्यांचे उत्पादन होत होते. बालाथल येथे तयार झालेल्या भांड्यांचा पुरवठा आहाड संस्कृतीच्या इतर ग्रामवसाहतींना केला जात होता असे दिसते. मातीच्या भांड्यांच्या बरोबरीने मातीचे बैल, शंखांच्या वस्तू, दगडी पाती, छिन्न्या, बाणाची अग्रे, तांब्याची हत्यारे यांसारख्या वस्तू विपुल प्रमाणात मिळाल्या. बालाथलमधील घरे पक्क्या विटांची आणि दोन आडव्या, दोन उभ्या विटांची रचना करून (इंग्लिश बाँड पद्धत) बांधली होती.

**सहज जाता जाता :** एखाद्या पुरातत्वीय संस्कृतींचे नाव, ती जिथे प्रथम सापडली ते स्थळ किंवा प्रदेश यांच्या नावावरून दिलेले असते. प्रत्येक संस्कृतीची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण भांडी असतात. ती भांडी हे संबंधित संस्कृती ओळखण्याचे प्रमुख लक्षण असते.

आहाड संस्कृतीच्या मातीच्या भांड्यांमध्ये 'काळी-आणि-तांबडी' भांडी महत्त्वाची आहेत. ती चाकावर घडवलेली असतात. त्यांचा आतील आणि तोंडाजवळचा भाग काळा आणि उरलेला भाग तांबडा असतो. भांडे भट्टीत ठेवताना भांडे उपडे ठेवलेले असेल तर त्याचा आतला भाग काळा होतो आणि बाहेरचा भाग तांबडा होतो. किंवा भांड्याचा जो भाग भुश्श्याने किंवा गवताने भाजलेला असतो तो काळा होतो आणि जो भाग उघडा असेल तो तांबडा होतो.

बालाथलभोवती तटबंदीही होती. हे तेथील लोकांच्या हडप्पा संस्कृतीशी असलेल्या संबंधाचे सबळ पुरावे मानले जातात.

राजस्थानमधील खेत्री येथील तांब्याच्या खाणींमधून या संस्कृतीचे लोक तांबे मिळवत होते. तांबे वितळवून शुद्ध करण्याचे ज्ञानही त्यांच्याकडे होते. हडप्पा संस्कृतीचे लोक आहाड संस्कृतीच्या लोकांकडूनच तांबे आणि तांब्याच्या वस्तू आयात करत असावेत, असे दिसते.

**(२) गणेश्वर-जोधपुरा संस्कृती :** गणेश्वर-जोधपुरा नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीची अनेक स्थळे राजस्थानमधील खेत्री येथील तांब्याच्या खाणीच्या परिसरात सापडली आहेत. तेथील गाव-वसाहती हडप्पापूर्व काळापासून अस्तित्वात होत्या. गणेश्वर येथील उत्खननामध्ये तांब्याचे बाण आणि भाले यांची अग्रे, मासेमारीचे गळ, बांगड्या, छिन्न्या यांसारख्या वस्तू आणि मातीची भांडी मिळाली. हडप्पा संस्कृतीच्या लोकांना गणेश्वर-जोधपुरा संस्कृतीचे लोक तांब्याच्या वस्तू पुरवत असत.

### गंगेचे खोरे

**गेरू रंगाची भांडी आणि ताम्रनिधी (Copper Hoards) :** गेरू रंगाच्या भांड्यांची खापरे नदीच्या पात्रात सापडतात. सहसा पाण्याच्या प्रवाहांमुळे ती झिजलेली आणि ठिसूळ झालेल्या अवस्थेत सापडतात. या संस्कृतीची स्थळे पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशचा पश्चिमेकडील भाग एवढ्या विस्तीर्ण प्रदेशात सापडली आहेत.


ताम्रनिधीतील काटेरी गळ, कुऱ्हाडीची पाती, कडे इत्यादी

या संस्कृतीच्या लोकांच्या घराच्या जमिनी व्यवस्थित चोपून तयार केलेल्या असत. त्या घरांच्या आत चुली, मातीच्या पक्क्या भाजलेल्या पुरुषरूपी बाहुल्या, बैल यांसारख्या वस्तू मिळाल्या. गाई-गुरांची हाडे तसेच तांदूळ आणि सातू यांचे अवशेष



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मिळाले. त्याच्या आधारे या संस्कृतीचे लोक स्थिर गाव-वसाहतींमधून राहत होते आणि ते शेती करत होते, हे स्पष्ट होते.

गेरू रंगाची भांडी वापरणाऱ्या लोकांच्या या संस्कृतीचा राजस्थानमधील काळ इसवी सनापूर्वी सुमारे ३००० वर्षे इतका प्राचीन आहे. ही संस्कृती गंगा-यमुनांच्या दुआबात इसवी सनापूर्वी २००० च्या सुमारास नांदत होती.

भारतातील ताम्रनिधी प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, ओडिशा आणि मध्यप्रदेश येथे मिळाले आहेत. ताम्रनिधींमधील वस्तूंचे स्वरूप पाहता त्या घडवणारे कारागीर तांब्याच्या वस्तू घडवण्यात निष्णात होते, हे स्पष्ट आहे. गेरू रंगाच्या भांड्याची संस्कृती आणि ताम्रनिधी हे काही ठिकाणी जवळच्या परिसरात आहेत. त्यामुळे ताम्रनिधीतील वस्तू घडवणारे कारागीर गेरू रंगाच्या भांड्याच्या संस्कृतीचे होते, असे मानले जाते.

ही संस्कृती म्हणजे हडप्पा संस्कृतीच्या उतरणीच्या काळात स्थलांतर केलेल्या हडप्पा लोकांची आहे, असे काही पुरातत्वज्ञांचे मत होते. काही अभ्यासकांनी गंगा-यमुनांच्या दुआबात सापडलेल्या ताम्रनिधींचा संबंध वैदिक आर्यांशी जोडला. परंतु या संस्कृतीचे मूलभूत लक्षण असलेली गेरू रंगाची भांडी आणि ताम्रनिधी यांच्यामध्ये असलेल्या सान्निध्यामुळे ती एक स्वतंत्र संस्कृती असावी, असाही एक मतप्रवाह आहे.

### बिहार, बंगाल, ओडिशा

बिहार, बंगाल, ओडिशा आणि मध्यप्रदेशात ताम्रनिधी मिळाले असले तरी गेरू रंगाची भांडी या प्रदेशांमध्ये मिळत नाहीत.

या राज्यांमध्ये ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींची स्थळे उजेडात आली आहेत. बिहारमधील चिरांड, सोनपूर यांसारख्या स्थळांच्या उत्खननात 'काळी-आणि-तांबडी' मातीची भांडी मिळाली. त्या भांड्यांचे घाट हडप्पा संस्कृतीच्या भांड्यांच्या घाटांसारखे आहेत. त्यावरून हडप्पा संस्कृतीचे लोक बिहारपर्यंत पोचले होते आणि त्यांचा प्रभाव स्थानिक संस्कृतीवर झाला होता, असे दिसते. बंगाल आणि ओडिशातही काही ताम्रपाषाणयुगीन स्थळांमधील भांड्यांचे काही घाट हडप्पा संस्कृतीचा प्रभाव दर्शवणारे आहेत. त्यामध्ये वाडगे, कुंडे यांचा समावेश आहे.

### मध्यप्रदेश

**(१) कायथा संस्कृती :** कायथा मध्यप्रदेशमधील उज्जैनपासून पूर्वेकडे २५ किमी अंतरावर छोटी काली सिंध या नदीच्या तीरावर आहे. ही नदी चंबळ नदीची उपनदी आहे.

कायथा संस्कृती नागरी हडप्पा संस्कृतीशी समकालीन होती. कायथा संस्कृतीच्या लोकांचे जीवन शेती आणि पशुपालनावर अवलंबून होते. ते प्रामुख्याने हाताने घडवलेली मातीची भांडी, गारगोटीच्या दगडांपासून बनवलेली सूक्ष्मास्त्रे वापरत होते. त्याखेरीज कायथा येथील घरांमध्ये तांब्याच्या कुऱ्हाडी आणि बांगड्या, मौल्यवान खड्यांचे मणी असलेले हार, संगजिरा (steatite) या दगडाच्या भुकटीपासून बनवलेले चकतीच्या आकाराचे छोटे मणी यांसारख्या वस्तू मिळाल्या. कायथा संस्कृती आणि हडप्पा संस्कृती यांच्यातील परस्परसंबंध हडप्पा नगरांच्या उदयाच्याही आधीच्या काळापासून असावा, असे दिसते.

कायथा संस्कृतीनंतर राजस्थानातील आहाड संस्कृतीचे लोक मध्यप्रदेशात आले. काही काळ या दोन्ही संस्कृती मध्यप्रदेशात एकत्रित नांदल्या असण्याचीही शक्यता आहे. त्यानंतरच्या काळात 'माळवा संस्कृतीचे अवशेष' मिळतात.

**(२) माळवा संस्कृती :** माळवा संस्कृतीचा उगम आणि विस्तार प्रथम माळव्यात झाला, हे तिच्या नावावरूनच स्पष्ट होते. ही संस्कृती मध्यप्रदेशात इसवी सनापूर्वी १८००-१२०० या कालखंडात अस्तित्वात होती. नर्मदा नदीवरील महेश्वरच्या पलीकडील तीरावर नावडाटोली नावाचे माळवा संस्कृतीचे महत्त्वाचे स्थळ आहे. त्याखेरीज मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील एरण, उज्जैन जिल्ह्यातील नागदा ही सुद्धा महत्त्वाची स्थळे आहेत.



नावडाटोली येथील माळवा संस्कृतीचा चषक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

नागदा आणि एरण येथील माळवा संस्कृतीच्या गाव-वसाहती तटबंदीयुक्त होत्या.

### गुजरात

गुजरातमधील ताम्रपाषाणयुगीन ग्राम-वसाहतींचा काळ हडप्पा संस्कृतीचा पूर्व हडप्पा (इ.स.पू. ३९५०-२६००), नागरी हडप्पा (इ.स.पू. २६००-१९००) आणि हडप्पा संस्कृती लयाला गेल्यानंतरचा हडप्पोत्तर (इ.स.पू.१९००-९००) या तीनही टप्प्यांशी मिळताजुळता आहे.

गुजरातमध्ये गारगोटीच्या वर्गातील मौल्यवान खड्यांचे स्रोत विपुल प्रमाणात आहेत. त्याचा उपयोग करून रंगीबेरंगी मणी बनवणे हा हडप्पा संस्कृतीमधील एक मोठा उद्योग होता. हे खडे उपलब्ध करून देण्यात गुजरातमधील नवाश्मयुगीन ग्राम-वसाहतींचा मोठा वाटा असावा. त्या प्रामुख्याने पशुपालकांच्या ग्राम-वसाहती होत्या. काही ठिकाणी हे लोक निमभटके जीवनही जगत असावेत.

गुजरातमधील ताम्रपाषाणयुगीन वसाहतींच्या मातीच्या भांड्यांमध्ये कच्छ-सौराष्ट्र, उत्तर गुजरात, असे प्रादेशिक वैविध्य आढळते. इसवी सनापूर्वी १९०० च्या सुमारास कच्छ-सौराष्ट्रमधील या ग्राम-वसाहती उजाड झाल्या.

हडप्पोत्तर काळामध्ये दक्षिण सौराष्ट्रात 'प्रभास संस्कृती' आणि ईशान्य सौराष्ट्रात 'रंगपूर संस्कृती' होत्या. या ताम्रपाषाणयुगीन संस्कृतींमधील मातीच्या भांड्यांचे आणि उत्तर हडप्पा संस्कृतीच्या भांड्यांचे रंग, घाट आणि नक्षी यांबाबत साम्य होते. त्या इसवी सनापूर्वी १८००-१२०० या काळात अस्तित्वात होत्या.

## ३.२ ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्र

महाराष्ट्रामध्ये उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक पोचले होते, याचा पुरावा दायमाबाद येथे मिळाला आहे. ते तिथे पोचण्याआधीच्या काळात तिथे जी ताम्रपाषाणयुगीन संस्कृती होती, तिला 'सावळदा संस्कृती' या नावाने ओळखले जाते. त्यानंतर तेथे अनुक्रमे माळवा संस्कृती आणि जोर्वे संस्कृती यांचे अवशेष मिळाले आहेत.

(दायमाबादवरील चित्रफितीसाठी https://www.youtube.com/watch?v= EzHb1n954fo)

**(१) सावळदा संस्कृती :** सावळदा हे धुळे जिल्ह्यात आहे. ते तापी नदीवर आहे. सावळदा संस्कृतीचा काळ इसवी सनापूर्वी सुमारे २०००-१८०० असा होता. या संस्कृतीचा उगम उत्तर महाराष्ट्रातील मध्याश्मयुगीन लोकांचा सौराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीच्या लोकांशी आलेल्या संपर्कातून झाला असावा.

दायमाबाद येथील या संस्कृतीचे लोक चाकावर घडवलेली मातीची भांडी वापरत होते. त्यावरील नक्षीमध्ये तीराग्रे, माशांचे गळ आणि विविध प्राणी यांच्या आकृतींचा समावेश होता. त्याखेरीज तांब्याच्या वस्तू, गारगोटी वर्गातल्या खड्यांचे मणी, हाडांपासून बनवलेली तीराग्रे, दगडी पाटे-वरवंटे इत्यादी वस्तू त्यांच्या वापरात होत्या. त्यांच्या गाव-वसाहतीभोवती तटबंदी बांधलेली होती. त्यांची घरे मातीची असून घरातील जमिनी गाळ आणि माती एकत्र चोपून बनवलेल्या होत्या.

सावळदा संस्कृतीच्या लोकांचा आणि सौराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीच्या लोकांचा संपर्क होता. धुळे जिल्ह्यातील कावठे या स्थळाच्या उत्खननात सापडलेल्या शंखांच्या वस्तू सौराष्ट्रातील हडप्पा संस्कृतीच्या लोकांशी असलेल्या विनिमयाचा पुरावा आहे.

**(२) माळवा आणि जोर्वे संस्कृती : महाराष्ट्राचे आद्य शेतकरी**

इसवी सनापूर्वी १६०० च्या सुमारास माळवा संस्कृतीचे लोक महाराष्ट्रात पोचले. शेतकऱ्यांच्या कायमस्वरूपी गाव-वसाहती महाराष्ट्रात प्रथम माळवा संस्कृतीच्या लोकांनी वसवल्या. ते महाराष्ट्राचे आद्य शेतकरी. महाराष्ट्रात आल्यावर त्यांचा संपर्क कर्नाटकातील नवाश्मयुगीन संस्कृतीच्या लोकांशी आला. त्याद्वारे माळवा संस्कृतीचे लोक घडवत असलेल्या मातीच्या भांड्यांचे तंत्रज्ञान, घाट आणि नक्षीचे नमुने यांमध्ये काही बदल घडून आले आणि 'जोर्वे संस्कृती' या नावाने ओळखली जाणारी नवीन संस्कृती उदयाला आली. अहमदनगर जिल्ह्यातील


दायमाबाद येथील मातीचा कुंभ



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

जोर्वे येथे ही संस्कृती प्रथम उजेडात आली.

महाराष्ट्रात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीचा विस्तार तापी, गोदावरी आणि भीमा या नद्यांच्या खोऱ्यात झाला होता. दायमाबाद, प्रकाशे (जिल्हा नंदुरबार) आणि इनामगाव ही गावे या संस्कृतीची विस्ताराने मोठी आणि त्या त्या नदीच्या खोऱ्यातील प्रमुख केंद्रे होती. या मोठ्या केंद्रांशी जोडली गेलेली छोटी-मोठी खेडी आणि शेतवाड्या होत्या. उदाहरणार्थ, नेवासे, नाशिक ही मोठी खेडी तसेच पुणे जिल्ह्यातील चांडोली आणि सोनगाव, नाशिक जिल्ह्यातील पिंपळदर ही छोटी खेडी आणि इनामगावजवळची वाळकी ही वाडी. पिंपळदर बागलाण घाटात, तापीचे खोरे आणि गोदावरीचे खोरे या दोहोंपासून मोक्याच्या ठिकाणी आहे. त्यामुळे विस्ताराने छोटे असले तरी व्यापाराच्या दृष्टीने ते महत्त्वाचे होते. घोड आणि मुळा नदीच्या संगमावर वसलेली वाळकी ही एक शेतवाडी होती.


इनामगाव (तालुका शिरूर, जिल्हा पुणे) येथील विस्तृत उत्खननामुळे माळवा आणि जोर्वे संस्कृतींमधील लोकांच्या जीवनाबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध आहे. इनामगाव येथील कालक्रम :

| | |
|---|---|
| १. माळवा संस्कृती | इ.स.पू. १६००-१४०० |
| २. पूर्व जोर्वे संस्कृती | इ.स.पू. १४००-१००० |
| ३. उत्तर जोर्वे संस्कृती | इ.स.पू १०००-७०० |

माळवा संस्कृतीनंतरच्या टप्प्यातील जोर्वे संस्कृतीचा समृद्ध काळ म्हणजे 'पूर्व जोर्वे' आणि उतरणीचा काळ म्हणजे 'उत्तर जोर्वे' असे दोन टप्पे होते. इनामगावच्या उत्खननात या दोन टप्प्यांतील लोकजीवन सविस्तर उलगडले गेले.

इनामगाव येथील माळवा संस्कृतीच्या काळातील लोकांची घरे आयताकृती आणि ऐसपैस होती. घराच्या भिंती कुडाच्या असत. घरामध्ये आडभिंत घालून घराचे दोन भाग केलेले असत. उभी कोठी ठेवण्यासाठी एक गोल ओटा, चार पायांचे रांजण ठेवण्यासाठी टेकूचे चार चपटे दगड व चुन्याने लिंपलेले बळद यांसारख्या गोष्टींवरून घरामध्ये दीर्घकालीन साठवणूक करण्यासाठी केलेली तरतूद लक्षात येते. क्वचित त्यावर जमिनीत गोल खड्डा करून झोपड्या (गर्तावास) उभारल्या जात.

माळवा संस्कृतीची मातीची भांडी पिवळसर रंगाची असत. त्यावर तपकिरी रंगात नक्षी काढलेली असते. त्यांचा पोत खरबरीत असतो. जोर्वे संस्कृतीची भांडी ही खणखणीत भाजलेली असल्यामुळे त्यांचा नाद हा धातूच्या भांड्यांप्रमाणे असतो. त्यांचा रंग लाल असतो आणि त्यावर काळ्या रंगाने नक्षी काढलेली असते. त्यामध्ये तोटीची भांडी, मध्यभागी कंगोरे असलेले वाडगे आणि कुंडे, चंबू, घडे अशा घाटाच्या भांड्यांचा समावेश असतो. उत्तर जोर्वे काळात भांड्यांचे घाट तेच राहिले तरी त्यांवर फारशी नक्षी काढेनासे झाले. इनामगाव येथे माळवा आणि पूर्व जोर्वे काळातील कुंभकारांच्या भट्ट्या मिळाल्या. त्या गोल आकाराच्या होत्या. पूर्व जोर्वे काळातील भट्टी मोठी आणि अधिक क्षमतेची होती. उत्तर जोर्वे काळात मात्र मातीची भांडी भाजण्यासाठी जमिनीवरच आवा रचला जात होता. इनामगाव हे इतर गावांना मातीच्या भांड्यांचा पुरवठा करणारे केंद्र होते.


जोर्वे संस्कृतीची मातीची भांडी

घर चौकोनी, प्रशस्त, एकापेक्षा अधिक खोल्यांचे आहे की गोल खड्डा करून त्यावर उभारलेली झोपडी आहे, यावरून त्या घरातल्या लोकांची आर्थिक परिस्थिती लक्षात येते. पूर्व जोर्वे काळात गोल झोपड्यांची संख्या नगण्य असली तरी उत्तर जोर्वे काळात गोल झोपड्यांची संख्या वाढलेली दिसते. पण या झोपड्या गर्तावासाहून वेगळ्या होत्या. काठ्यांचा वरच्या टोकाला बांधलेला जुडगा तळाकडे पसरवून तंबूप्रमाणे शंक्वाकृती झोपड्या उभ्या केल्या जात. अशा झोपड्या सहसा फिरस्ते लोक उभ्या करतात. उत्तर जोर्वे काळात हवा शुष्क होऊ लागली होती. त्यामुळे जोर्वे संस्कृतीच्या लोकांना फिरस्ते जीवन स्वीकारणे भाग पडले, हे या झोपड्यांमुळे लक्षात येते.

पूर्व जोर्वे काळात इनामगावमध्ये नदीला एक कालवा काढून नदीचे पाणी साठवण्याची सोय केली होती. ती सिंचनासाठी होती, हे स्पष्ट आहे. सिंचनाच्या



Downloaded from https:// www.studiestoday.com


Downloaded from https:// www.studiestoday.com

पाण्याचे वाटप गावच्या प्रमुखाकडे असे. ताम्रपाषाणयुगीन इनामगावच्या मध्यवर्ती जागेत ग्रामप्रमुखाचे पाच खोल्यांचे प्रशस्त घर होते. त्या घरात आणि घराच्या बाहेर धान्याच्या साठवणीची बरीच बळदे होती. येथील शेतकरी गहू, बार्ली, ज्वारी, मसूर, कुळीथ यांसारखी पिके घेत असत. त्याखेरीज त्यांच्या आहारात प्राण्यांचे मांस, मासे यांचाही समावेश होता. इतर ताम्रपाषाणयुगीन स्थळांप्रमाणे इनामगाव येथे गारगोटी वर्गातल्या रंगीबेरंगी खड्यांचे मणी, सूक्ष्मास्त्रे आणि तांब्याच्या वस्तू मिळाल्या आहेत.

इनामगावच्या प्रमुखाचे पद वंशपरंपरागत होते, हे दर्शवणारी दफनेही या घराच्या लगत मिळाली. ही दफने इतर सर्वसाधारण दफनांपेक्षा पूर्णतः वेगळ्या पद्धतीची होती. इनामगावामध्ये साधारणपणे जमिनीत खड्डा खणून त्यामध्ये मृत व्यक्तीला उताण्या अवस्थेत पुरले जाई. दफनाच्या दुसऱ्या पद्धतीत मात्र मृत व्यक्तीला एका चार पायांच्या, फुगीर पोटाच्या रांजणात बसलेल्या अवस्थेत पुरले होते. त्याच्यापेक्षा थोडे आधीच्या काळातले एक दफन तशाच प्रकारच्या रांजणात होते. परंतु त्यात सांगाडा नव्हता. ते प्रतीकात्मक दफन होते. हे लोक मृत बालकांना पुरण्यासाठी कुंभांचा वापर करत असत. अशा दफनांमध्ये मृत बालकाला कुंभाच्या आत झोपवून त्याच्या तोंडाशी दुसऱ्या कुंभाचे तोंड जोडून, ते दोन कुंभ पुरत असत.

**करून पहा.**

खालील माहितीच्या मदतीने ओघ तक्ता तयार करा.




### ३.३ भारतातील महापाषाणयुग

प्रतिकूल हवामानामुळे उत्तर जोर्वे काळात इसवी सनापूर्वी ७०० च्या सुमारास इनामगाव पूर्णपणे उजाड झाले. त्यानंतर ऐतिहासिक काळापर्यंत तिथे वस्ती झाली नाही. महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी हीच परिस्थिती होती. मात्र त्या काळात भटके जीवन जगणाऱ्या लोकांनी मोठाल्या शिळांचा उपयोग करून उभारलेली शिलावर्तुळे सापडतात. त्या शिलावर्तुळांच्या आत दफने असतात. या शिळा आकाराने खूप मोठ्या असल्यामुळे त्यांना महापाषाणीय वर्तुळे म्हणतात. त्यामुळे ही शिलावर्तुळे ज्या काळातील आहेत त्याला 'महापाषाणयुग' असे म्हणतात. त्यांचा उपयोग वेगवेगळ्या कारणांसाठी केला जात असला, तरी ती प्रामुख्याने मृतांच्या अस्थि पुरण्यासाठी, त्यांच्या स्मारकासाठी उभारली जात.



शिलावर्तुळे

अशा प्रकारची शिलावर्तुळे जगभर आढळतात. शिलावर्तुळांची परंपरा प्रागैतिहासिक काळापासून अस्तित्वात आहे. काही लोकांमध्ये ती आजही प्रचलित असलेली दिसते. उदाहरणार्थ, ओडिशातील बोडो, दक्षिण भारतातील तोडा, कुरुंब, ईशान्य भारतातील नागा आणि खासी इत्यादी जमाती. भारतातील अधिकांश प्राचीन शिलावर्तुळे साधारणपणे इसवी सनापूर्वी १५०० ते ५०० या काळातील आहेत. परंतु उत्तर भारतातील काही ठिकाणची शिलावर्तुळे नवाश्मयुगाइतकी प्राचीन आहेत. महाराष्ट्रात शिलावर्तुळे उभारणारे लोक प्रामुख्याने दक्षिण भारतातून आले असावेत. ही शिलावर्तुळे लोहयुगातील आहेत. महाराष्ट्रातील शिलावर्तुळे सर्वसाधारणपणे इसवी सनापूर्वी १०००-४०० या काळातील आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

महाराष्ट्रात विदर्भामध्ये प्रामुख्याने नागपूर, चंद्रपूर, भंडारा या जिल्ह्यांमध्ये फार मोठ्या संख्येने शिलावर्तुळे आढळतात. टाकळघाट, माहूरझरी, खापा, नायकुंड अशा अनेक ठिकाणी शिलावर्तुळांचे उत्खनन केले गेले. विशेष म्हणजे अनेक शिलावर्तुळे प्राचीन व्यापारी मार्गांवर होती. महापाषाणयुगीन कारागिरांच्या स्थिर गाव-वसाहतींचे अवशेष क्वचितच सापडले आहेत. शिलावर्तुळे उभारणारे महापाषाणयुगीन लोक फिरस्ते कारागीर होते. ते लोखंडाच्या वस्तू बनवत असत. नागपूरजवळ नायकुंड या ठिकाणी महापाषाणयुगीन काळातील लोखंड शुद्ध करण्याची भट्टी सापडली. महापाषाणयुगातील लोक वाहन म्हणून आणि सामान लादण्यासाठी घोड्याचा वापर करत. शिलावर्तुळांमधील दफनात घोड्यांची हाडे आणि घोड्यांचे तांब्याचे अलंकार पुरलेले आढळतात. त्यांच्या वापरात काळी-आणि-तांबडी मातीची भांडी असत.

महापाषाणीय संस्कृतीच्या लोकांचा भारतातील लोहयुगाच्या प्रारंभात महत्त्वाचा वाटा होता, हे निश्चितपणे सांगता येते.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. अस्थिकुंभावरील .................. या प्राण्याच्या पोटात मृताचे शरीर दाखवलेले आहे.
(अ) हरीण (ब) मोर
(क) मासा (ड) बैल

२. बालाथल येथे मोठ्या प्रमाणावर .................. भांड्याचे उत्पादन होत होते.
(अ) दगडाच्या (ब) तांब्याच्या
(क) मातीच्या (ड) काचेच्या

३. शेतकऱ्यांच्या कायमस्वरूपी गाव-वसाहती महाराष्ट्रात प्रथम .................. या संस्कृतीच्या लोकांनी वसवल्या.
(अ) सावळदा (ब) माळवा
(क) हडप्पा (ड) कायथा

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. सावळदा संस्कृती - दायमाबाद
२. माळवा संस्कृती - नावडाटोली
३. आहाड संस्कृती - सोनपूर
४. जोर्वे संस्कृती - इनामगाव

**प्र.२ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी स्थलांतर केले.
२. माळवा संस्कृतीच्या लोकांना महाराष्ट्राचे आद्य शेतकरी म्हटले जाते.

**प्र.३ तुमचे मत नोंदवा.**

हडप्पा संस्कृतीचे लोक बिहारपर्यंत पोचले होते.

**प्र.४ टीपा लिहा.**

१. बनास संस्कृती
२. माळवा संस्कृती
३. कायथा संस्कृती

**प्र.५ गुजरातमधील ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची माहिती दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

मुद्दे - (१) कालखंड (२) व्यवसाय (३) विस्तार (४) इतर संस्कृतींशी आलेल्या संबंधाचा पुरावा

**उपक्रम**

आंतरजाल, संदर्भ पुस्तके, क्षेत्र भेटी, वृत्तपत्रातील लेख इत्यादींच्या मदतीने उत्खननीय वस्तू/वास्तू यांची चित्रे मिळवा व त्यांचे शिक्षकांच्या मदतीने प्रदर्शन भरवा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ४. वैदिक काळ

४.१ वैदिक संस्कृती : वैदिक वाङ्मय, भाषाशास्त्र आणि पुरातत्त्व
४.२ वैदिक वाङ्मय आणि समाजरचना
४.३ वैदिक वाङ्मयातून उलगडणारी पूर्व वैदिक काळातील संस्कृती
४.४ उत्तर वैदिक काळ

## ४.१ वैदिक संस्कृती : वैदिक वाङ्मय, भाषाशास्त्र आणि पुरातत्त्व

अनेक वर्षांच्या शास्त्रीय संशोधनानंतर हडप्पा संस्कृतीच्या नाशाला कोणी बाहेरून आलेले लोक कारणीभूत नसून नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारख्या गोष्टी अधिक जबाबदार आहेत, हे स्पष्ट झाले आहे. हे आर्य कोण होते, ते भारताबाहेरून आले की ते प्रथमपासून भारतातच होते, त्यांच्या संस्कृतीचे पुरातत्त्वीय अवशेष कोणत्या प्रदेशांत सापडतात आणि ते कसे ओळखायचे, अशा अनेक प्रश्नांची निश्चित उत्तरे अजूनही मिळालेली नाहीत. त्यांच्या संस्कृतीची माहिती त्यांनी रचलेल्या वैदिक वाङ्मयातून मिळते. हे वाङ्मय मूलतः वैदिक जनसमूहांच्या देवताविषयक श्रद्धा आणि त्या देवतांची त्यांनी केलेली स्तवने अशा स्वरूपाचे आहे.

वैदिक लोकांच्या भौतिक जीवनाबद्दल काही उल्लेख ओघाओघाने या वाङ्मयात येतात. तसेच त्यांचा देव इंद्र याने शत्रूंवर मिळवलेल्या विजयाचे संदर्भ त्यांमध्ये दिलेले आढळतात. वैदिक संस्कृतीच्या काळाबद्दल वेगवेगळी मते आहेत. तथापि इसवी सनापूर्वी १५०० च्या सुमारास वैदिक लोकांनी ऋग्वेदाची रचना केली. याबद्दल सर्वसाधारण एकमत आढळते. लोकमान्य टिळकांनी ग्रह-ताऱ्यांच्या स्थिती गतीच्या आधारे हा काळ इसवी सनापूर्वी ६००० वर्षे इतका प्राचीन असल्याचे गणित मांडले. तसेच आर्यांचे मूळ स्थान उत्तर ध्रुवीय प्रदेशात होते, असे मत त्यांनी मांडले.

वादविवादांच्या या वाटेवरचा प्रवास इसवी सनाच्या सोळाव्या शतकात सुरू झाला. तोपर्यंत 'आर्य' या संकल्पनेचा उगम झालेला नव्हता. सोळाव्या शतकात पाश्चात्त्य अभ्यासकांचे लक्ष संस्कृत आणि लॅटीन-ग्रीक या भाषांमध्ये असलेल्या अनेक साम्यस्थळांकडे वेधले गेले. त्यातूनच इंडो-युरोपीय भाषागट ही संकल्पना उदयाला आली आणि त्या भाषांची जननी म्हणता येईल

**सहज जाता जाता :** बाराव्या शतकातील युरोपीय अभ्यासकांच्या वर्तुळात विविध भाषांच्या संदर्भात एखादा भाषागट आणि त्या गटातील भाषांची एक जननीभाषा अशी संकल्पना गृहीत धरून त्यासंबंधीची चाचपणी करण्यास सुरुवात झाली होती. असे असले तरी संस्कृत आणि लॅटीन या भाषांमध्ये काही प्रत्यक्ष दुवा असू शकतो, या कल्पनेने मूळ धरण्यास इसवी सनाचे अठरावे शतक उजाडले. या कल्पनेचा नेमका उगम केव्हा झाला असावा, याचा मागोवा घेताना सोळाव्या शतकाकडे लक्ष वेधले जाते. इसवी सन १५८३ मध्ये फिलिपो सासेटी नावाचा एक इटालियन व्यापारी केरळमधील कोची (कोचीन) येथे आला. त्यानंतर तो मायदेशी कधीच परतला नाही. तो भारतामध्ये कोची आणि गोवा येथे राहिला. भारतातील वास्तव्यात त्याने त्याच्या घरच्या लोकांना लिहिलेल्या सविस्तर पत्रांमध्ये त्याने भारतातील जीवनमान, भाषा आणि संस्कृती यांचे तपशीलवार वर्णन केले. अशा रीतीने भारतीय समाजाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यांचे वर्णन करणारा तो पहिलाच युरोपीय होता. त्याने संस्कृत भाषेचाही अभ्यास केला. या अभ्यासात संस्कृत आणि लॅटीन शब्दांमधील साम्य त्याच्या लक्षात आले. या साम्याची नोंद करणारा तो पहिला युरोपीय होता. इंडो-युरोपीय भाषांचे मूळ एक असावे या कल्पनेला चालना देण्यात त्याच्या अभ्यासाचा मोठा वाटा होता असे दिसते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

अशा एका भाषेचा शोध घ्यायला सुरुवात झाली. शब्दांचा उगम आणि अर्थ याचा विशेषत्वाने शोध घेणारी 'फिलॉलॉजी' (philology) ही भाषाशास्त्राची एक शाखा विकसित होण्यास सुरुवात झाली.

याच सुमारास प्राचीन भारतीय वाङ्मय आणि साहित्य यांच्या अभ्यासाविषयी युरोपीय विद्वत्वर्तुळात विशेष रुची निर्माण झाली. त्याची परिणती इसवी सन १७८४ मध्ये विल्यम जोन्स यांनी 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना करण्यात झाली. या काळात प्राचीन भारतीय संस्कृत ग्रंथांचे संकलन, अनुवाद यांसारखी कामे सुरू झाली. वैदिक वाङ्मयाच्या आणि पुरातत्वीय संस्कृतींच्या संशोधनाला चालना मिळाली.

या दोन क्षेत्रांमधील संशोधनाच्या आधारे वैदिक वाङ्मयाचे निर्माते पश्चिमेकडून आले आणि येताना अश्वविद्या, आऱ्यांची चाके असलेले वेगवान रथ, तसेच रथावर आरूढ होऊन अस्त्रे चालवण्याची विद्या या गोष्टी बरोबर घेऊन आले. थोडक्यात त्यांची युद्धविद्या भारतातील तटबंदीयुक्त नगरांमधून राहणाऱ्या हडप्पा लोकांच्या युद्धविद्येपेक्षा अधिक प्रभावी होती. हडप्पा संस्कृतीचे लोक म्हणजे वैदिक वाङ्मयामध्ये शत्रू म्हणून उल्लेख असलेले दस्यू, यांसारख्या कल्पना रुजत गेल्या.

पुरातत्वीय संशोधनाच्या आधारे आता हे स्पष्ट झाले आहे की हडप्पा संस्कृतीचा उगम, नागरी हडप्पा संस्कृतीचा विस्तार आणि ऱ्हास हा सर्व इतिहास प्रामुख्याने अफगाणिस्तान, बलुचिस्तान आणि इराण या प्रदेशांचे काही भाग, पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि गुजरात या भूभागात घडला. वैदिक वाङ्मयातील उल्लेखांच्या आधारे वैदिक संस्कृतीचा भौगोलिक परिसरही याच प्रदेशातील आहे. परंतु वैदिक संस्कृतीच्या कालक्रमाबद्दल एकवाक्यता नसल्यामुळे वैदिक आणि हडप्पा संस्कृतीचा एकमेकांशी नेमका कसा आणि काय संबंध होता याबद्दल अनेकांनी भाष्य केलेले असले तरी त्याबाबत निश्चित विधान करता येत नाही. कालक्रमाच्या दृष्टीने पाहता नागरी हडप्पा संस्कृती ही आधीची आणि नंतरची उत्तर हडप्पा संस्कृती म्हणजे वैदिक लोकांची संस्कृती, असे मानण्याकडे बहुतेक तज्ज्ञांचा कल दिसतो.

पूर्वेला सरस्वती (घग्गर-हाक्रा), पश्चिमेला सिंधु आणि पंजाबमधील शतद्रु (सतलज), विपाश (बियास), असिक्नी (चिनाब), परुष्णी (रावी), वितस्ता (झेलम) या नद्यांची खोरी म्हणजे सप्तसिंधुंचा प्रदेश, असे मानले जाते. याखेरीज अफगाणिस्तानमधील कुभा (काबूल), गोमती (गोमाल), सुवास्तु (स्वात) इत्यादी नद्यांचा उल्लेख आहे. या सर्व नद्यांच्या प्रदेशाला वैदिक लोकांनी 'देवनिर्मित देश' असेही म्हटलेले आहे. परंतु ते या प्रदेशात केव्हा आले, कोठून आले, यासंबंधीचे उल्लेख मात्र आढळत नाहीत.

वैदिक लोक प्रथमपासूनच सप्तसिंधुच्या प्रदेशात राहत होते, ते बाहेरून आले नाहीत, असे काही विद्वानांचे मत आहे. हडप्पा लोकांची संस्कृती आणि सप्तसिंधु प्रदेशातील वैदिक लोक एकच होते का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात संशोधक आता गुंतले आहेत. अर्थातच त्यांना अद्याप निश्चित उत्तर मिळालेले नाही. हडप्पा लिपी वाचण्यात निर्विवाद यश मिळाले, तर कदाचित या प्रश्नाचे उत्तर मिळेल, असे संशोधकांना वाटते.

### ४.२ वैदिक वाङ्मय आणि समाजरचना

वैदिक वाङ्मय भारतातील सर्वाधिक प्राचीन साहित्य असल्याचे मानले जाते. वैदिक वाङ्मयाची भाषा संस्कृत आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद म्हणजे वैदिक वाङ्मयाचा मूळ गाभा आहे. या चार वेदांच्या ग्रंथांना 'संहिता' असे म्हणतात. 'विद्' म्हणजे जाणणे आणि 'वेद' म्हणजे 'ज्ञान' असा अर्थ आहे. वेद मौखिक परंपरेने जतन केले गेले.

**ऋग्वेद**-देवतांची स्तुती करण्यासाठी रचलेली पदे आहेत. त्या पदांना 'ऋचा' असे म्हटले जाते. अनेक ऋचा एकत्र गुंफून 'सूक्त' तयार होते. अनेक सूक्तांचे मिळून एक 'मंडल' तयार होते.

**यजुर्वेद**-यज्ञविधींमध्ये म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांचे संकलन करून त्यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. त्या मंत्रांचा उपयोग केव्हा आणि कसा करावा याचे मार्गदर्शनही केलेले आहे. यज्ञात म्हटले जाणारे हे मंत्र म्हणजे ऋग्वेदातील ऋचाच असत. पद्यस्वरूपातील ऋचा आणि गद्यात त्यांचा मंत्र म्हणून उपयोग



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

करण्यासाठी दिलेले स्पष्टीकरण अशी यजुर्वेद संहितेची रचना आहे.

**सामवेद**–यज्ञविधींमध्ये ऋग्वेदातील ऋचांचे मंत्रस्वरूपात गायन कसे करावे याचे मार्गदर्शन केलेले आहे. भारतीय संगीताच्या निर्मितीमध्ये सामवेदाचे स्थान महत्त्वाचे आहे.

**अथर्ववेद**–दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टींसंबंधीचा विचार केलेला आहे. त्यामध्ये आयुष्यातील संकटे, दुखणी यांवर करायचे उपाय आणि औषधयोजना त्यांची माहिती दिलेली असते. राजनीतीसंबंधीची माहितीही त्यात आढळते.

कालांतराने ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, उपनिषदे यांची रचना केली गेली. त्यांचा समावेशही वेदवाङ्मयात केला जातो. वेदवाङ्मयाची निर्मिती दीर्घकाळ सुरू होती. ती पूर्ण होण्यास सुमारे १५०० वर्षांचा अवधी लागला असावा. वेदकालीन लोकजीवनाचा अभ्यास करण्यासाठी वेदवाङ्मय हे महत्त्वाचे साधन आहे. वेदकाळातील समाजरचना, कुटुंबव्यवस्था आणि दैनंदिन जीवन यांची माहिती त्यातून मिळते.

### वर्णव्यवस्था

वेदकाळातील समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण होते. चार वर्णांवर आधारित या व्यवस्थेचा उल्लेख ऋग्वेदातील दहाव्या मंडलात प्रथम येतो. वेदकाळाच्या उत्तरार्धात वर्णव्यवस्थेतील सुरुवातीची लवचीकता नष्ट झाली. तसेच जातिव्यवस्थाही रुजली आणि समाजात विषमता निर्माण झाली. वर्ण आणि जात हे सुरुवातीला व्यवसायावरून ठरत असत. नंतर जन्मावरून ठरू लागले. त्यामुळे त्यामध्ये बदल करता येणे अशक्य झाले.

### आश्रमव्यवस्था

मानवी आयुष्याचे चार टप्पे मानून त्यानुसार व्यक्तीने आपले जीवन कसे व्यतीत करावे याचा आदर्श वैदिक लोकांनी घालून दिला होता. त्यानुसार पहिला टप्पा हा 'ब्रह्मचर्याश्रम', दुसरा टप्पा हा 'गृहस्थाश्रम', तिसरा टप्पा हा 'वानप्रस्थाश्रम' आणि चौथा टप्पा 'संन्यासाश्रम', अशी विभागणी केलेली होती. ब्रह्मचर्याश्रमात व्रतस्थ वृत्तीने राहून ज्ञान आणि व्यवसायासाठी लागणारे कौशल्य संपादन करावे आणि गृहस्थाश्रमात, पत्नीच्या सहकार्याने गृहस्थाश्रम पार पाडावा, असे अपेक्षित होते. वानप्रस्थाश्रमामध्ये गृहस्थाश्रमाच्या कर्तव्यांमधून निवृत्त होऊन आवश्यकता भासल्यास मुलाबाळांना मार्गदर्शन करावे आणि ईश्वरचिंतनात वेळ घालवावा अशी सर्वसाधारण कल्पना होती. वानप्रस्थाश्रमामध्ये मनुष्यवस्तीपासून दूर रहावे, असेही सांगितलेले होते. संन्यासाश्रम या शेवटच्या टप्प्यात मात्र व्यक्तीने सर्व मायापाशांचा त्याग करून दूर निघून जावे. दीर्घकाळ एके ठिकाणी वस्ती करू नये, असे निर्बंध घातलेले होते.

## ४.३ वैदिक वाङ्मयातून उलगडणारी पूर्व वैदिक काळातील संस्कृती

ऋग्वेदकालीन संस्कृती ही पूर्व वैदिक काळातील संस्कृती होय. सप्तसिंधु प्रदेशात राहणाऱ्या वैदिक लोकांच्या जनसमूहांच्या नावांचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. पुरु, अनु, यदु, द्रुह्यु, तुर्वश यांसारख्या जनसमूहांची नावे त्यात आढळतात. हे जनसमूह शेती करणारे होते. ऋग्वेदामध्ये परुष्णी म्हणजे रावी नदीच्या तीरावर वैदिक जनसमूहांमध्ये झालेल्या युद्धाचा उल्लेख आहे. दहा जनसमूहांच्या प्रमुखांमध्ये झालेले युद्ध म्हणून त्याला 'दाशराज्ञ युद्ध' असे म्हटले जाते. सप्तसिंधु प्रदेशात ऋग्वेदकाळात वैदिक लोकांच्या जनसमूहांबरोबर काही स्थानिक जनसमूहांचे वास्तव्य होते. त्यांचा उल्लेख 'दास' किंवा 'दस्यू' आणि 'पणी' असा केलेला आहे. पणी हे वैदिक लोकांना त्यांचे शत्रू वाटत असत. ते वैदिक लोकांच्या गाई पळवून नेत असत.

ऋग्वेदातील जनसमूहांच्या स्थिर गाव-वसाहतींच्या संकुलास आणि त्यामधील लोकांसाठी 'कृष्ट्य' अशी संज्ञा वापरत असत. 'कृष्' म्हणजे नांगरट आणि नांगरट करणाऱ्या शेतकऱ्यांचा जनसमूह आणि त्यांच्या गाव-वसाहती म्हणजे कृष्ट्य. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात शेतीचे महत्त्व जाणून घेणे महत्त्वाचे आहे, असे स्पष्ट सांगितले आहे. नांगराचा फाळ नांगरट करणाऱ्या शेतकऱ्याला अन्न मिळवून देतो, असे म्हटलेले आहे. अश्विन आणि इंद्र या देवतांचा शेतीशी संबंध आहे. दोघे अश्विन नांगर धरतात आणि विपुल अन्न मिळवून



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**हे माहिती हवे :** उत्तर हडप्पा संस्कृतीचे लोक म्हणजे वैदिक लोक असा एक मतप्रवाह आहे. त्यानुसार उत्तर हडप्पा संस्कृतीच्या लोकांना प्रतिकूल हवामानामुळे आणि नैसर्गिक आपत्तींमुळे स्थलांतर करावे लागले. ते भारतात पूर्वेकडे गंगा-यमुनांच्या दुआबात आणि भारताबाहेर पश्चिमेकडे इराण, इराक आणि इजिप्त इत्यादी देशांमध्ये पोचले, असे मानले जाते. ते सिद्ध करण्यासाठी इराकमधील 'बोघाजकुई' येथे मिळालेल्या हिट्टाईट आणि मिट्टान्नी या जमातींमध्ये झालेल्या तहातील इंद्र, वरुण, नासत्य अशी वैदिक देवतांची नावे किंवा भारताबाहेर पश्चिमेकडील देशांमधून उजेडात आलेल्या पुरातत्त्वीय पुराव्यांचा आधार घेतला जातो. नेमक्या याच पुराव्यांच्या आधारे वैदिक लोक पश्चिमेकडून भारतात आले, असा पक्ष अनेक पाश्चात्त्य आणि भारतीय विद्वानांकडून मांडला गेला. इतिहासलेखनातील कूटस्थळे ही सैद्धान्तिक आणि वैचारिक वादांमधून कशी निर्माण होतात, याचे हे एक उदाहरण आहे.

भारतीय उपखंडातील पुरातत्त्वीय पुरावा आणि वेदांमधील वाङ्मयीन पुरावा यांचा समाधानकारक समन्वय साधून त्याच्या आधारे एक पूर्णतः स्पष्ट चित्र उभे करणे अजून तरी शक्य झालेले नाही. तरीही सप्तसिंधु प्रदेशातील वैदिक जनसमूहांनी उत्तर वैदिक काळात दोन मार्गांवरून स्थलांतर केले या गोष्टीबाबत निश्चिती दिसते. वैदिक साहित्यात त्यांचा उल्लेख 'उत्तरापथ' आणि 'दक्षिणापथ' या नावांनी केलेला आढळतो. हे दोन्ही मार्ग ज्या प्रदेशातून जातात त्या प्रदेशांची भौगोलिक रचना बदलत जाते. त्यानुसार तेथील पर्यावरणामध्येही टोकाचा फरक आहे. ही बाब लक्षात घेतली तर प्राचीन काळी दुर्गम अशा भौगोलिक परिसरांमधून सुरू असलेले दळणवळण लक्षात येते.

उत्तरापथाचा विस्तार मध्य आशिया, सप्तसिंधुचा प्रदेश ते पूर्वेकडे हिमालयाच्या पायथ्याचा प्रदेश, तेथून गंगा-यमुनांचा दुआब आणि तेथून गंगेच्या मुखाकडील प्रदेश असा आहे.

दक्षिणापथ गंगा-यमुनांचा दुआब आणि दक्षिणेतील प्रदेश यांना जोडणारा होता. सिंध प्रांताचा दक्षिणेकडील भाग, कच्छ, दक्षिण राजस्थान, माळवा आणि तेथून दख्खनचे पठार, असा या मार्गाचा विस्तार होता. हडप्पा संस्कृतीचे लोक या मार्गाने स्थलांतर करत महाराष्ट्रापर्यंत पोचले, याचा आढावा आपण मागील पाठात घेतला आहे.

देतात, असा वैदिक वाङ्मयात उल्लेख आहे. 'उर्वरा' म्हणजे नांगरट केलेली उपजाऊ जमीन. इंद्र हा 'उर्वरापति' आहे. सातू हे वैदिक लोकांचे प्रमुख पीक होते. सिंचनासाठी विहिरीतील पाण्याच्या उपयोगाचा उल्लेख ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात आहे. त्यांतील वर्णनानुसार विहिरीतील पाणी काढण्यासाठी गाडगी बांधलेल्या दगडी 'चक्राचा' (रहाटगाडगे) उपयोग करत होते. दगडाच्या चाकावरील गाडग्यांचे पट्टे घट्ट कसण्याचा उल्लेख आहे. ऋग्वेदामध्ये वरुणाच्या १००० दारे असलेल्या राजवाड्याचे उल्लेख आहेत. हे वर्णन रूपक, कवीचा कल्पनाविलास या स्वरूपाचे आहेत. तशा स्वरूपाच्या ऋग्वेदकालीन स्थापत्याचे पुरातत्त्वीय अवशेष उपलब्ध झालेले नाहीत.

वैदिक लोक शेतीसोबत पशुपालनही करत असत. त्यांच्या पशुधनामध्ये प्रामुख्याने गाई-गुरे, म्हशी आणि घोडे यांचा समावेश होता. 'पूषन' हा त्या पशुधनाचे रक्षण करणारा देव होता. ऋग्वेदकाळात 'रथकार' म्हणजे रथ बनवणारा आणि 'तक्षन' म्हणजे सुतार हे महत्त्वाचे कारागीर होते. रथकाराला रथाची रचना करण्याबरोबरच सुतारकामाचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक होते. सुतार लाकडी पात्रे, यज्ञातील विधींसाठी लागणारी उपकरणे, स्वयंपाकासाठी लागणारी उपकरणे, इतर घरगुती उपयोगाच्या वस्तू बनवत असत. ऋग्वेदामध्ये शंभर वल्ही (अरित्रम) असलेल्या शिडांच्या नावांचा उल्लेख आहे. या सर्व गोष्टींवरून वेदकाळातील सुतारांच्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

कौशल्याची कल्पना येते.

ऋग्वेदात कुंभकारासाठी काही संज्ञा वापरात असल्याचे दिसत नाही. परंतु 'उखा' म्हणजे स्वयंपाकासाठी वापरायचे भांडे तसेच 'पात्र', 'कुंभ', आणि 'कलश' यांसारखे शब्द वापरलेले दिसतात. कुंभकाराचा एक कारागीर म्हणून उल्लेख प्रथम यजुर्वेदामध्ये येतो. त्यासाठी 'कुलाल' अशी संज्ञा वापरलेली आहे.

'वय्य' म्हणजे विणकर आणि 'वय्या' हे त्याचे स्त्रीलिंगी रूप ऋगेदामध्ये आढळते. त्याखेरीज वस्त्रोद्योगाचा निर्देश करणारे तंतुम् (ताणा), ओतुम् (बाणा), विणकराची कांडी (तसर) असे इतर काही शब्दही ऋग्वेदामध्ये येतात. ऋग्वेदामध्ये लोकरी (उर्णा म्हणजे लोकर) वस्त्रांचा उल्लेख आहे. मात्र सुती किंवा रेशमी वस्त्रांचा नाही.

'चर्मन्मा' हा चामड्याचे काम करणारा कारागीर होय. चामड्याच्या अनेक वस्तूंचा उल्लेख ऋग्वेदात आहे. धातूंमध्ये 'हिरण्य' म्हणजे सोने आणि 'अयस' म्हणजे तांबे-कांस्य किंवा लोखंड या धातूंच्या वस्तू बनवल्या जात, परंतु या काळात लोखंडाचा उपयोग मर्यादित होता. धातूंच्या वस्तू बनवणाऱ्या कारागिराला 'कार्मार' असा शब्द होता. समाजामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था ऋग्वेदकालाच्या शेवटच्या टप्प्यात प्रस्थापित झाली असावी. त्याचा प्रथम उल्लेख ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात येतो. ते ऋग्वेदकालाच्या शेवटच्या टप्प्यात रचले गेले, असे मानले जाते.

वाहनांच्या संदर्भात रथाचा उल्लेख याआधी केलेला आहे. गाड्याला 'अनस' असा शब्द होता. नद्यांमधून होणाऱ्या वाहतुकीला 'नाव्य' असे म्हटले जाई. पूषन हा देव भूमार्गांचा, वरुण आणि अश्विन हे देव जलमार्गाचे अधिपती होते. ऋग्वेदात विनिमयाचे, खरेदी-विक्रीच्या व्यवहारात केल्या जाणाऱ्या घासाघाशीचे, नफा कमावण्यासाठी दूरवर जाणाऱ्या व्यापाऱ्यांचे उल्लेखही आहेत. 'निष्क' या सोन्याच्या अलंकाराचा उपयोग क्वचित प्रसंगी चलनासारखा केला जात होता.

## ४.४ उत्तर वैदिक संस्कृती

हा कालखंड साधारणपणे इसवी सनापूर्वी १०००-६०० असा मानला जातो. या काळातील इतिहास आणि संस्कृतीची कल्पना प्रामुख्याने त्या काळातील साहित्य ग्रंथांमधून मिळते. पुरातत्त्वीय पुराव्यांच्या आधारे या काळातील विशेषतः महाभारत आणि रामायण या महाकाव्यांमध्ये प्रतिबिंबित झालेल्या संस्कृतीचा अभ्यासही केला गेला. उत्तर वैदिक कालखंडामध्ये सप्तसिंधुच्या प्रदेशातून पूर्वेकडे झालेले स्थलांतर आणि त्याचे भौगोलिक संदर्भ यांचे चित्र उत्तर वैदिक साहित्याच्या आधारे स्पष्ट होत जाते. या कालखंडात उत्तर वैदिक संस्कृतीचा विस्तार उत्तरेला हिमालयाच्या पायथ्याचा प्रदेश, दक्षिणेला विंध्य पर्वत यांच्यामधील प्रदेशात झाला. या संदर्भात शतपथ ब्राह्मण या ग्रंथातील विदेघ माथव (विदेह माधव) याची कथा महत्त्वाची आहे. या कथेच्या विश्लेषणातून असे दिसते की, उत्तर वैदिक लोकांनी पश्चिमेकडून पूर्वेपर्यंतचा प्रदेश लागवडीखाली आणि वसाहतीखाली आणला.

उत्तर वैदिक काळात हळूहळू उत्तर भारतामध्ये वैदिक जनसमूहांच्या गाव-वसाहतींची संकुले तयार झाली. त्यांना 'जनपद' म्हणत असत. बहुतेक जनपदांमध्ये समाजातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व्यक्ती एकत्र येऊन सामाजिक निर्णय घेत असत. त्यांची कार्यपद्धती गणराज्याच्या स्वरूपाची होती. या जनपदांमधील जी प्रभावशाली ठरली त्यांच्या सत्तेचा विस्तार होऊन महाजनपदे अस्तित्वात आली. इसवी सनापूर्वी सुमारे १०००-६०० वर्षे या साधारणपणे ४०० वर्षांच्या कालावधीत घडलेल्या इतिहासाचा आढावा आपण पुढील पाठात घेणार आहोत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. शेतीचे महत्त्व ऋग्वेदाच्या ............ मंडलात मांडले आहे.
   (अ) चौथ्या (ब) दहाव्या
   (क) आठव्या (ड) सहाव्या

२. कुंभकाराचा कारागीर म्हणून उल्लेख ............ प्रथम होतो.
   (अ) ऋग्वेदामध्ये (ब) यजुर्वेदामध्ये
   (क) सामवेदामध्ये (ड) अथर्ववेदामध्ये

३. पशुधनाचे रक्षण करणारा ............ देव होता.
   (अ) इंद्र (ब) पूषन
   (क) अश्विन (ड) वरुण


**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. निष्क – सोन्याचा अलंकार
२. सातू – वैदिक लोकांचे प्रमुख पीक
३. कृष्ट्य – विहिरीतील पाणी काढण्याचे साधन
४. नाव्य – नद्यांमधून होणारी वाहतूक

**(क) नावे लिहा.**

१. भाषाशास्त्राची एक शाखा –
२. दहा जनसमूहांच्या प्रमुखांमध्ये झालेले युद्ध–
३. नांगरट केलेली उपजाऊ जमीन –

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

वैदिक लोकांना पणी हे त्यांचे शत्रू वाटत. कारण –
(अ) ते वेगळ्या जनसमूहातील होते.
(ब) त्यांची भाषा ग्राम्य होती.
(क) ते वैदिक लोकांच्या गाई पळवून नेत असत.
(ड) ते वैदिकांच्या आज्ञा पाळत नसत.

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

१. आर्यांच्या मूळस्थानाविषयी विविध मते आहेत.
२. ऋग्वेदकालीन जनसमूह शेती करणारे होते.

**प्र.५ पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१. ‘आर्य’ लोकांचे मूळ वसतिस्थान
२. इंडो–युरोपीय भाषागट

❖❖❖


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ५. जनपदे आणि गणराज्ये

५.१ 'जन' आणि जनपदे
५.२ जनपद
५.२.१ भौगोलिक सीमांची आणि स्वायत्ततेची जाणीव
५.२.२ जनपदांचा विस्तार आणि विकास
५.३ गणराज्य

## ५.१ 'जन' आणि जनपदे

नातेसंबंधांनी बांधलेले असल्यामुळे, ज्या लोकांमध्ये आपण एक आहोत अशी भावना असे, अशा लोकांच्या समूहाला वैदिक लोक 'जन' असे म्हणत. त्यांच्या गाव-वसाहतीला 'ग्राम' असे म्हटले जाई. एकापेक्षा अधिक ग्रामे मिळून तयार झालेल्या ग्रामसंकुलात एकाच जनातील लोक असल्यामुळे ते ग्रामसंकुल त्या त्या जनांच्या नावानेच ओळखले जाई. असे असले तरी, सुरुवातीस 'जन' या घटकाच्या व्याख्येत फक्त कुल, ग्राम, गोष्ठ (गोत्र-गौळवाडा) या गोष्टींचा समावेश होता. त्यांच्या भौगोलिक सीमांचा संदर्भ निश्चित ठरलेला नव्हता.

गेल्या पाठात आपण पाहिले, सप्तसिंधुच्या पूर्वेकडील प्रदेशातून स्थलांतर करत वैदिक लोक गंगेच्या मुखाच्या प्रदेशापर्यंत पोचले. या नवीन प्रदेशात वैदिक 'जन' स्थिरावू लागले. भौगोलिक सीमासंबंधीच्या जाणिवा 'जन' या संकल्पनेशी निगडित होऊ लागल्या. या नव्या जाणींवाच्या आधारे भौगोलिक सीमांनी बांधलेली आणि स्वतःची स्वतंत्र प्रशासनयंत्रणा असलेली 'जनपदे' अस्तित्वात आली. 'जनपद' म्हणजे जनांच्या वास्तव्याचे स्थान. जनपदांमध्ये हळूहळू अधिक औपचारिक स्वरूपाची प्रशासनयंत्रणा विकसित झाली. अशा रीतीने औपचारिक प्रशासनयंत्रणा असणारी स्वतंत्र जनपदे ही प्राचीन भारतातील पहिली प्रस्थापित राज्ये होत. ऋग्वेदकाळातील वाङ्मयात उल्लेख असलेल्या सर्वच जनांचा विकास स्वतंत्र जनपदांमध्ये झाला, असे मात्र म्हणता येणार नाही.

## ५.२ जनपद

'जनपद' या संज्ञेचा उल्लेख प्रथम ब्राह्मणग्रंथांमध्ये आढळतो. त्यानंतर उत्तर वैदिक साहित्यात आणि त्यानंतर महाभारत-रामायण ही महाकाव्ये, जैन आणि बौद्ध ग्रंथ, यांमध्ये जनपदांचा उल्लेख वारंवार येतो. जनपदांच्या संदर्भातील भौगोलिकतेचा विचार करताना या साहित्यामध्ये भारतीय उपखंडाची विभागणी 'प्राच्य' म्हणजे पूर्व दिशेचा, 'प्रातिच्य' म्हणजे पश्चिम दिशेचा, 'उदिच्य' म्हणजे उत्तर दिशेचा, 'दक्षिण' आणि 'मध्यदेश' अशा पाच प्रदेशांमध्ये केलेली दिसते. परंतु ही विभागणी प्रामुख्याने विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेशासंबंधीची आहे. पुराणग्रंथांमधील उल्लेखांमध्ये मात्र भौगोलिक जाणीवेचा विस्तार होऊन विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील 'दक्षिणापथ' आणि 'अपरांत' म्हणजे कोकण या प्रदेशांचा समावेशही झालेला दिसतो.

### ५.२.१ भौगोलिक सीमांची आणि स्वायत्ततेची जाणीव

भौगोलिक सीमांची आणि त्यायोगे नव्याने विकसित झालेली स्वायत्ततेची स्पष्ट जाणीव, हे भारतातील प्राचीन जनपदांच्या उदयामागील प्रमुख कारण होते, हे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवे. परंतु त्यांच्यामधील सुरुवातीची प्रशासनव्यवस्था ऋग्वेदातील 'जन' या घटकाच्या प्रशासनव्यवस्थेपेक्षा फारशी वेगळी नाही. जनपदांच्या सुरुवातीच्या काळात प्रशासनाच्या संदर्भातील निर्णयप्रक्रियेत 'सभा' आणि 'समिती' या दोन संस्थांना प्रथमपासूनच सर्वोच्च स्थान होते. जनपदाच्या प्रमुखास 'राजन' असे म्हटले जाई. परंतु त्याला निवडण्याचे किंवा पदावरून हटवण्याचे अधिकार सभा आणि समितीकडे असत. मात्र प्रशासनाची ध्येयधोरणे आणि समाजाच्या संघटनासंबंधीचे संकेत, यांसारख्या गोष्टी स्थलकालानुसार बदलणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेण्याकरता, आवश्यक बदल करता येण्याइतक्या लवचीक होत्या.


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

जनपदांच्या काळात एका विशिष्ट भौगोलिक परिघात अनेक पिढ्या स्थिर होत असताना, समाजाचे स्वरूप फक्त नातेसंबंधाने बांधलेला जनसमूह एवढ्यापुरतेच मर्यादित राहिला नाही. त्याबाहेरील लोकही जनपदात समाविष्ट होत गेले. जनपदांच्या सामाजिक संघटनांमध्ये सामायिकतेला महत्त्व देणाऱ्या मानसिकतेचे परिवर्तन वैयक्तिक कुटुंबाला महत्त्व देणाऱ्या मानसिकतेत होत गेले. त्याला अनुसरून कुटुंबप्रमुख आणि कुळधर्म यांचे स्थान लोकव्यवहारात महत्त्वाचे ठरले. व्यक्ती-व्यक्तींमधील आणि वेगवेगळ्या कुटुंबांमधील परस्पर सहकार्यावर आधारलेले साहचर्य हा समाजव्यवस्थेचा कणा बनला.

याच काळात जनपदाच्या संरक्षणासाठी अस्त्रशस्त्रविद्येत निपुण असणारा एक स्वतंत्र वर्ग उदयाला येऊ लागला. जनपदाचे रूपांतर राज्यसंस्थेत होण्यामध्ये या वर्गाचा वाटा मोठा आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये आणि त्यानंतरच्या व्याकरणग्रंथांमध्ये 'जनपदिन्' या शब्दाचा उल्लेख आहे. हा शब्द अस्त्रशस्त्रविद्येत निपुण असणाऱ्या त्या वर्गाचा निर्देश करणारा आहे.

### ५.२.२ जनपदांचा विस्तार आणि विकास

जनपदांचा विस्तार आणि विकास तीन पद्धतींनी झालेला दिसतो.

१. एकाच कुलाचे वंशज असलेले 'जन' विकसित होऊन जनपदाचा उदय होणे. उदाहरणार्थ, मत्स्य, चेदी, गांधार, काशी, कोसल इत्यादी जनपदे.

२. अनेक कुलांचे वंशज एकत्रित होऊन जनपदाचा उदय होणे. उदाहरणार्थ, पांचाल जनपद. पांचाल जनपदामध्ये समाविष्ट झालेले पाच जन कोणते हे निश्चित सांगता येत नाही. हेमचंद्र रायचौधरी यांच्या मते क्रिवी, तुर्वश, केशी, शृंजय आणि सोमक हे जन पांचाल जनपदामध्ये समाविष्ट झाले होते. पुढे कुरु आणि पांचाल यांचा कुरु-पांचाल असा एकत्रित उल्लेख होताना दिसतो. महाभारत काळापर्यंत ऋग्वेद काळातील 'भरत' या जनाचा समाविष्ट कुरूंमध्ये होऊन ते एकरूप झालेले दिसतात, ते इतके की भरत कुळातील लोकांचा उल्लेख कुरूंचे पूर्वज म्हणून केला जातो.

३. मोठ्या बलशाली जनपदांनी छोट्या जनपदांना जिंकून घेणे.

**अधिक माहितीसाठी :** प्राचीन जनपदांमधील काही जनपदांची नावे आणि त्यांचा उल्लेख करणारे प्रमुख ग्रंथ.

- प्राच्य : अंग, मगध (अथर्ववेद)
  किकट (ऋग्वेद आणि अथर्ववेद)
  पुण्ड्र (महाभारत)
- प्रातिच्य : अनु, अलिन, भलाण, द्रुह्यु, परशु, पख्त, पुरु, तुर्वश, यदु (ऋग्वेद)
  गांधार (ऋग्वेद आणि अथर्ववेद)
  शाल्व (महाभारत)
- उदिच्य : क्रिवि, वैकर्ण (ऋग्वेद)
  बाल्हिक (अथर्ववेद)
- दक्षिण : आंध्र (महाभारत)
  पुलिंद (सम्राट अशोकाचे लेख)
- मध्यदेश : अज, चेदि, भरत, मत्स्य, शिगृ, तृत्सु, उशिनर, यक्षु (ऋग्वेद)
  कुरू, शृंजय (ऋग्वेद आणि अथर्ववेद)

### ५.३ गणराज्य

उत्तर वैदिक काळातील साहित्य, जैन आणि बौद्ध साहित्य यांच्या आधारे जनपदे ही अधिकतर राजेशाही पद्धतीची असल्याचे दिसत असले, तरी काही जनपदे गणराज्याच्या पद्धतीची होती, असे दिसते. राज्यांचे वेगवेगळे प्रकार या साहित्यात सांगितले आहेत. त्या संदर्भात राज्य, स्वाराज्य, भौज्य, वैराज्य, महाराज्य, साम्राज्य आणि पारमेष्ठ्य अशा संज्ञा वापरलेल्या आहेत. या संज्ञांचे अर्थ आणि त्यांच्याद्वारे निर्देश केलेल्या राज्यांचे स्वरूप निश्चितपणे सांगता येणे कठीण आहे. उत्तर कुरु आणि उत्तर मद्र ही गणराज्ये 'वैराज्य' स्वरूपाची होती. म्हणजे ज्यांमध्ये कोणी एक व्यक्ती राज्यकर्ता नसून, जनपदाचे सदस्य एकत्रित होऊन राज्यकारभार चालवत असत. प्राचीन साहित्यात या राज्यांचा उल्लेख त्यांच्या राज्यकारभाराच्या पद्धतीला अनुसरून 'गणसंघ' असा केला जातो.

'गण' म्हणजे समान सामाजिक दर्जा असलेला सत्ताधारी वर्ग. तसेच 'संघ' म्हणजे 'अनेक कुळे किंवा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

अनेक जनपदे एकत्र आल्याने निर्माण झालेले राज्य'. इसवी सनापूर्वी सहाव्या शतकापर्यंत अनेक संघराज्ये अस्तित्वात आली होती.

**सहज जाता जाता :** वज्जी, शाक्य, लिच्छवी, मल्ल हे गणसंघ गौतम बुद्‌धांच्या चरित्रकथेशी निगडित आहेत. गौतम बुद्‌धांचा जन्म शाक्य कुळात झाला होता. त्यांचे पिता शुद्‌धोदन यांची शाक्य गणपरिषदेचे राजा (अध्यक्ष) म्हणून लोकांनी निवड केली होती.

रचनेच्या दृष्टीने प्राचीन भारतीय संघराज्यांचे किंवा गणराज्यांचे तीन मुख्य प्रकार होते.

१. एकाच कुळातील सदस्यांचे गणराज्य. उदाहरणार्थ, मालव आणि शिबी.

२. एकाहून अधिक कुळे एकत्र येऊन निर्माण झालेले गणराज्य. उदाहरणार्थ, वज्जी गणसंघ. त्यामध्ये आठ कुळांचा समावेश होता. वृज्जी, लिच्छवी, ज्ञातृक आणि विदेह हे त्यांतील महत्त्वाचे गण होते. त्यांतील लिच्छवी गण सर्वाधिक प्रभावशाली होता.

३. एकाहून अधिक स्वतंत्र गणराज्ये एकत्र येऊन निर्माण झालेले संघराज्य. उदाहरणार्थ, यौधेय-क्षुद्रक गणसंघ.

बौद्‌ध ग्रंथांमधील वर्णनांच्या आधारे भारतातील प्राचीन गणसंघांच्या किंवा संघराज्यांच्या राज्यव्यवस्थेसंबंधी कल्पना करता येते. निर्णय आणि त्यांची अंमलबजावणी या संदर्भातील अधिकारांची वाटणी या दृष्टीने गणसंघाची आपापली स्वतंत्र पद्‌धती असे. ढोबळमानाने त्यांतील फरकाचे वर्णन पुढीलप्रमाणे करता येईल :

**१. लोकसत्ताक पद्‌धती (Democracy)**- गणसंघाच्या प्रादेशिक विभागांना 'खंड' असे म्हटले जाई. सर्व खंडांमधून सक्षम व्यक्तींची निवड करून त्यांच्या हाती राज्यव्यवस्था सोपवणे, ही संकल्पना या व्यवस्थेचा आधार होता. ही पद्‌धती लोकसत्ताक होती. सिकंदराच्या स्वारीच्या वेळेस पंजाब आणि सिंधमध्ये या पद्‌धतीचे अनुसरण करणारी लोकसत्ताक गणराज्ये होती.

**अधिक माहितीसाठी :** गणसंघांच्या संदर्भात आणखी दोन प्रकारांचा उल्लेख प्राचीन साहित्यात आढळतो 'आयुधजीवि' संघ आणि 'वार्ता-शस्त्रोपजीवि' संघ. या दोन्ही प्रकारचे गणसंघ भारतीय उपखंडाच्या वायव्य प्रदेशात होते. त्रिगर्त गणसंघाचा उल्लेख आयुधजीवि असा केल्याचे आढळते. हे लोक अस्त्रशस्त्रविद्येत निपुण असून त्यावर त्यांची उपजीविका अवलंबून होती. उदाहरणार्थ, यौधेय, मालव, क्षुद्रक हे आयुधजीवी गणसंघ होते. वार्ता म्हणजे व्यापार. वार्ता-शस्त्रोपजीवि गणसंघातील लोक उपजीविकेसाठी व्यापार, शेती आणि पशुपालन, तसेच युद्‌धकला यांवर अवलंबून होते. कांबोज, सुराष्ट्र या गणसंघातील लोक व्यापार आणि युद्‌धकला यांवर उपजीविका करत असत.

या पद्‌धतीमध्ये प्रादेशिक स्तरावर निवड झालेल्या व्यक्तींना 'गणमुख्य' म्हटले जाई. गणमुख्य हे गणपरिषदेचे सदस्य असत. गणपरिषदेला गणसंघाच्या संदर्भातील महत्त्वाचे निर्णय घेण्याचे सर्वोच्च अधिकार होते. गणपरिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी गणप्रमुख (अध्यक्ष-त्यालाच 'राजा' असे म्हटले जाई), उपराजा (उपाध्यक्ष), सेनापती आणि भांडागारिक (कोषाध्यक्ष) हे मुख्य पदाधिकारी असत.

**२. अल्पलोकसत्ताक पद्‌धती (Oligarchy)**- या प्रकारात प्रशासनाचे सर्व अधिकार समाजातील अभिजनांच्या सभेकडे असत. पाणिनी आणि कौटिल्य यांनी या प्रकाराचा उल्लेख 'राजशब्दोपजीवी' संघ असा केला आहे. पाणिनीने वज्जी, अंधक-वृष्णी, यौधेय यांचा समावेश राजशब्दोपजीवी या प्रकारात केला आहे. कौटिल्याने वृज्जी किंवा वज्जी, मद्रक, कुरु, पांचाल इत्यादींचा समावेश या प्रकारात केला आहे. असे गणसंघ उत्तर प्रदेशाच्या पूर्वेकडील प्रदेशात आणि बिहार येथे अधिक प्रमाणात होते.

जनपदांच्या उदयाचे प्रमुख कारण हे भौगोलिक सीमांची आणि स्वायत्ततेची जाणीव होती, हे आपण



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पाहिले. त्यांतील काही बलशाली जनपदांचा विकास होत होत, इसवी सनापूर्वी आठव्या शतकापर्यंत त्यातून सोळा महाजनपदांचा उदय झाला. पुढील पाठात आपण त्या सोळा महाजनपदांचा परिचय करून घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा.**

१. जनांच्या वास्तव्याचे स्थान म्हणजे '..........' होय.
   (अ) गणराज्य (ब) गणसंघ
   (क) महाजनपद (ड) गोत्र

२. जनपदाच्या प्रमुखास '..........' म्हटले जाई.
   (अ) सेनापती (ब) भांडागारिक
   (क) राजन (ड) उपराजा

३. 'जनपदिन' या शब्दाचा उल्लेख असणाऱ्या अष्टाध्यायी या ग्रंथाचा कर्ता .......... आहे.
   (अ) कौटिल्य (ब) पाणिनी
   (क) चाणक्य (ड) व्यास

४. जनपदांच्या उदयाचे प्रमुख कारण हे भौगोलिक सीमांची आणि .......... जाणीव होती.
   (अ) एकतेची (ब) अधिकाराची
   (क) स्वायत्ततेची (ड) लोकसत्तेची

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. प्राच्य – पूर्व दिशेचा प्रदेश
२. प्रातिच्य – पश्चिम दिशेचा प्रदेश
३. उदिच्य – उत्तर दिशेचा प्रदेश
४. अपरांत – विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेश

**प्र.२ (अ) गटात न बसणारा शब्द ओळखा.**


१. प्राच्य – अंग, मगध, किकट, शाल्व
२. मध्यदेश – अज, भरत, वैकर्ण, मत्स्य
३. प्रातिच्य – अनु, पुण्ड्र, भलाण, परशु

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

यौधेय, मालव, क्षुद्रक हे आयुधजीवि गणसंघ होते. कारण –

(अ) हे गणसंघ भारतीय उपखंडाच्या वायव्य प्रदेशात होते.
(ब) हे अस्त्रशस्त्रविद्येत निपुण असून त्यावर त्यांची उपजीविका अवलंबून होती.
(क) हे व्यापारात निपुण होते.
(ड) हे शेती व पशुपालन करणारे गणसंघ होते.

**प्र.३ दिलेले संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१. गणराज्य आणि संघराज्य
२. वार्ताशस्त्रोपजीवि गणसंघ
३. जन व जनपदे

**प्र.५ पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

लोकसत्ताक आणि अल्पलोकसत्ताक पद्धतीचे वर्णन करा.

**उपक्रम**

गणराज्यांमधील लोकसत्ताक पद्धतीच्या राज्यव्यवस्थेवर आधारित अभिरूप नाटिका वर्गात सादर करा.

❖❖❖



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ६. भारतातील दुसरे नागरीकरण


६.१ महाजनपदांचा उदय
६.२ अश्मक/अस्सक महाजनपद
६.३ दुसरे नागरीकरण
६.४ महाजनपदे आणि त्यांच्या काळातील नगरे
६.५ महाजनपदांमधील राज्यव्यवस्था, श्रेणी व्यवस्था
६.६ तत्त्वज्ञान आणि विविध संप्रदाय
६.७ नवीन धर्मप्रवाह


## ६.१ महाजनपदांचा उदय

भौगोलिक विस्ताराच्या महत्त्वाकांक्षेतून निर्माण झालेल्या संघर्षात काही जनपदे प्रबल ठरली. त्यांनी जिंकून घेतलेल्या जनपदाचा भूप्रदेश आपल्या जनपदाला जोडण्यास सुरुवात केली. त्यांच्या सीमा विस्तारल्या आणि त्यांना महाजनपदांचे स्वरूप प्राप्त झाले. इसवी सनपूर्व ६०० च्या सुमारास भारतीय उपखंडाचा वायव्य प्रदेश ते मगधापर्यंत सोळा महाजनपदे उदयाला आलेली होती. निरनिराळे भूप्रदेश जिंकून घेऊन ते कायमस्वरूपी आपल्या राज्याला जोडून राज्यविस्तार करणे, ही संकल्पना महाजनपदांच्या उदयाच्या बरोबरीने रुजत गेली आणि महाजनपदांमधील सत्तासंघर्षाची परिणती सरतेशेवटी मगधासारख्या विशाल साम्राज्याच्या उदयामध्ये झाली. प्राचीन भारतात पुन्हा एकदा नागरी संस्कृतीचा उदय झाला.

सोळा महाजनपदांचा उल्लेख जैन आणि बौद्ध ग्रंथांमध्ये तसेच पुराणांमध्ये केलेला आढळतो. बौद्ध ग्रंथांचा काळ महाजनपदांच्या काळाशी अधिक निकटचा असल्यामुळे त्यात उल्लेख असणारी महाजनपदांची नावे अधिक ग्राह्य मानली जातात.

सोळा महाजनपदांपैकी अश्मक किंवा अस्सक महाजनपद हे नाव आजच्या महाराष्ट्राशी निगडित आहे.

**अधिक माहितीसाठी :** 'अश्मक' हे संस्कृत भाषेतील आणि 'अस्सक' हे पाली भाषेतील ही एकाच नावाची दोन रूपे समजली जातात. हे पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होईल.

१. पाणिनीने रचलेल्या 'अष्टाध्यायी' या व्याकरणग्रंथात 'अवंत्याश्मक' असा उल्लेख आहे. त्याचा अर्थ अवंती आणि अश्मक ही राज्ये एकमेकांलगत होती, असा होतो.


२. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्ये 'अश्वायन', 'अश्वकायन' आणि 'हस्तिकायन' अशा तीन राज्यांच्या नावाचा उल्लेख आहे. सिकंदराच्या स्वारीच्या वेळेस त्याच्या सैन्याला अफगाणिस्तान ते पंजाब या प्रदेशातून पुढे सरकत असताना काही लढवय्या जमातींच्या प्रतिकाराला तोंड द्यावे लागले. त्यामध्ये 'ॲस्पासिओय', 'अस्सकेनॉय' आणि 'अस्तकेनॉय' या गणराज्यांचा उल्लेख सिकंदराबरोबर आलेल्या ग्रीक इतिहासकारांनी केला आहे. ही तीन गणराज्ये म्हणजेच अनुक्रमे अश्वायन, अश्वकायन आणि हस्तिकायन ही होत. बौद्ध साहित्यात उल्लेख असलेले 'अस्सक' हे वायव्य प्रदेशातील अश्वकायनांशी संबंधित असावेत, ज्यांचा अश्मकांशी काही संबंध नसावा, असे इतिहासकारांचे मत आहे.

३. गौतम बुद्धांच्या काळात अस्सक राजाला 'अंधकराजा' म्हणून ओळखले जात होते, असे दिसते. अंधकराट्ट हे ठिकाण गोदावरीच्या तीरावर होते, जिथे गौतम बुद्धांचा समकालीन बावरी याचा आश्रम होता. हा बावरी मुळात कोसल राज्याचा रहिवासी होता. 'सूत्तनिपात' या ग्रंथानुसार तो कोसल राज्याची राजधानी श्रावस्ती येथून दक्षिणापथ येथील गोदावरीच्या तीरावरील अस्सक राज्यामध्ये आला. या उल्लेखाच्या आधारे बौद्ध ग्रंथामधील 'अस्सक' या पाली भाषेतील नावाचे संस्कृत रूप 'अश्मक' असे आहे आणि ती दोन्ही नावे एकाच प्रदेशाचा निर्देश करतात, याबद्दल शंका घेण्यास कारण उरत नाही.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




### ६.२ अश्मक/अस्सक महाजनपद

सोळा महाजनपदांपैकी अश्मक/अस्सक हे एकच राज्य 'दक्षिणापथ' नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात होते. बाकीची १५ महाजनपदे ही उत्तर भारतात होती. 'सूत्तनिपात' या ग्रंथामध्ये दक्षिणापथाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. त्यानुसार दक्षिणापथ हा महत्त्वाचा व्यापारी मार्ग होता. श्रावस्तीपासून उज्जयिनी, महिष्मती या मार्गाने येऊन, विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडे प्रतिष्ठानपर्यंत हा रस्ता पोचत असे.

'महागोविंद सूत्तांत' या बौद्ध ग्रंथात अस्सक राज्याचा 'ब्रह्मदत्त' नावाचा राजा होता आणि त्याच्या राजधानीचे नाव 'पोतन' होते, असा उल्लेख आहे. हे पोतन म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील 'नांदुरा' होय असे मानले जाते. पोतन या नगराची 'पोटली', 'पौडण्य' अशी नावेही आढळतात. अश्मक जनपदाला समकालीन असलेली विदर्भ, भोज, दंडक आणि कलिंग ही जनपदे दक्षिणापथामध्ये समाविष्ट होती. त्यांतील पहिली तीन जनपदे प्राचीन महाराष्ट्राचा भाग होती. त्याखेरीज आंध्र, शबर, पुलिंद आणि मुतिब यांसारख्या जमातींची राज्येही गोदावरी आणि कृष्णा या नद्यांच्या खोऱ्यात होती.

जैन ग्रंथानुसार, पहिले तीर्थंकर ऋषभनाथ यांचा पुत्र 'बाहुबली' यांना अश्मक राज्य दिलेले होते आणि पोदनपूर ही त्याची राजधानी होती. बाहुबलीची भव्य मूर्ती श्रवणबेळगोळ (जिल्हा हासन, कर्नाटक) येथे आहे. बाहुबली यांना केवलज्ञानप्राप्ती झाली होती.


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**हे माहीत असायला हवे :** एकाच नावाचे विविध संदर्भ उपलब्ध असतील तर इतिहासाचे लेखन करताना इतिहासकारांपुढे असलेली आव्हाने पुढील उदाहरणांवरून लक्षात येतील.

१. 'निमि जातक' या कथेत विदेह राज्याची राजधानी मिथिला येथे होऊन गेलेल्या राजांच्या नावाची यादी दिलेली आहे. त्यामध्ये अस्सक नावाच्या राजाचा समावेश आहे.

२. 'अस्सक जातक' या कथेत काशी राज्याच्या अस्सक नावाच्या राजाची आणि त्याच्या सौंदर्यवती राणीची गोष्ट आहे. त्यामध्ये पोटली ही अस्सक राजाची राजधानी असल्याचा उल्लेख आहे. प्राचीन काशी राज्याची राजधानी वाराणसी होती. मात्र पोटली या राजधानीच्या उल्लेखाच्या आधारे अस्सक राजा काशी राज्याचा मांडलिक असावा असे अनुमान करता येते.

३. 'चुल्ल कलिंग जातक' नावाच्या कथेनुसार दंतपुरच्या कलिंग राजाने दिलेल्या आव्हानामुळे अस्सक राजाने त्याच्याशी युद्ध करून कलिंग राजाचा पराभव केला व त्याच्या कन्येशी विवाह केला. त्यामुळे दोन्ही राज्यांत सख्य प्रस्थापित झाले. खारवेलाच्या हाथीगुंफा येथील कोरीव लेखात खारवेलाने पश्चिम दिशेकडील सातकर्णी राजाच्या प्रभावाला न जुमानता असिक नगरावर आक्रमण करून तेथील प्रजेला भयभीत करून सोडल्याचा उल्लेख आहे. काही इतिहासकारांच्या मते चुल्ल कलिंग जातकातील अस्सक आणि खारवेलाच्या कोरीव लेखातील असिक नगर एकच असावे.

### ६.३ दुसरे नागरीकरण

इसवी सनापूर्वी १००० च्या सुमारास भौगोलिकतेची जाणीव असलेली आणि निश्चित स्वरूपाची राज्यव्यवस्था असलेली जनपदे अस्तित्वात आली. भौगोलिक सीमांचा विस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा, त्यासाठी झालेला सत्तासंघर्ष यांमध्ये काही जनपदे प्रबल होऊन भारतीय उपखंडात अफगाणिस्तान ते बंगाल आणि विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडे गोदावरीच्या तटापर्यंत सोळा महाजनपदांचा उदय झाला.

महाजनपदांच्या राजधान्या आणि व्यापारामुळे महत्त्व पावलेली काही नगरे यांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा भारतामध्ये नागरी संस्कृतीचा उदय झाला. त्याला 'भारतातील दुसरे नागरीकरण' असे म्हटले जाते.

'महापरिनिब्बानसूत्त' या ग्रंथामध्ये चंपा, राजगृह, श्रावस्ती, साकेत, कौशांबी आणि वाराणसी या सहा नगरांचे विशेष महत्त्व असल्याचा उल्लेख आहे. इसवी सनापूर्वी सहाव्या शतकाच्या सुरुवातीस प्राचीन भारतातील ही आणि इतर नगरे भरभराटीला आलेली होती.

जनपदे आणि महाजनपदांच्या काळातील वैशिष्ट्यपूर्ण मातीची भांडी अनेक ठिकाणी मिळाली आहेत. तसेच अनेक ठिकाणी लोखंडाची अवजारे, चांदी आणि तांब्याची आहत नाणी सापडली आहेत. या नाण्यांचा उल्लेख प्राचीन भारतीय साहित्यात 'कार्षापण', 'पण' या नावांनी केलेला आढळतो.

**पुढील बाबी नागरी संस्कृतीच्या निर्देशक मानल्या जातात :** मध्यवर्ती प्रशासनव्यवस्था राबवण्यासाठी नागरी केंद्रांचा विकास, नागरी केंद्रांच्या गरजा पुरवणाऱ्या ग्राम-वसाहतींचे जाळे (प्रभावक्षेत्र), ग्राम-वसाहतींचे प्रशासन केंद्रवर्ती सत्तेशी संलग्न असणे, सुविहित करप्रणाली, अंतर्गत आणि दूरवरच्या प्रदेशांशी असणारा व्यापार, त्यासाठी भूमार्ग आणि जलमार्ग (नद्या आणि सागरी मार्ग) यांचे सुव्यवस्थित जाळे, वस्तुविनिमयाच्या जोडीने चलनाचा उपयोग करणारी क्रय-विक्रयपद्धती, सुप्रस्थापित कायदे आणि न्यायव्यवस्था. नागरीकरणाची ही सर्व वैशिष्ट्ये महाजनपदांच्या काळात अस्तित्वात होती.

### ६.४ महाजनपदे आणि त्यांच्या काळातील नगरे

**१. काशी :** हे महाजनपद सोळा महाजनपदांच्या सुरुवातीच्या काळात अधिक बलशाली होते. त्याची राजधानी वाराणसी होती. काशी महाजनपदाचे राजे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**हे समजून घ्या.**

व्यापार आणि उत्पादन व्यवस्थेच्या साखळीमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध घटकांचे संघटन आणि त्यामागील कार्यपद्धती यांसाठीच्या गरजांमधून हडप्पा संस्कृतीच्या नागरी केंद्रांचा उदय झाला. हडप्पा काळातील राज्यप्रणाली आणि त्या अनुषंगाने असलेल्या प्रशासनव्यवस्थेसंबंधी मात्र अजूनही संदिग्धता आहे.

दुसऱ्या नागरीकरणाच्या काळाच्या संदर्भात मात्र प्रत्येक महाजनपदाचे भौगोलिक स्थान, त्याच्या राजधानीचे नगर आणि महाजनपदातील इतर नगरे इत्यादींची माहिती विविध ग्रंथांमधून मिळते. उदाहरणार्थ, गौतम बुद्धांच्या जीवनकाळात त्यांनी ज्या ज्या नगरांना भेट दिली त्या नगरांची आणि तेथील प्रशासनाची माहिती, तसेच जातककथांमधूनही महाजनपदांमधील विविध नगरांची माहिती मिळते. गौतम बुद्धांच्या समकालीन राजांची नावेही बौद्ध साहित्याद्वारे कळतात. त्यांमध्ये गौतम बुद्धांच्या भ्रमंतीच्या अनुषंगाने आलेले भौगोलिक तपशील हे विश्वासार्ह आणि प्राचीन भारताच्या इतिहासलेखनासाठी विश्वासार्ह मानले जातात.

**महाजनपदे आणि त्यांच्या राजधानीची नगरे :**

१. काशी–वाराणसी
२. कोसल–श्रावस्ती
३. अंग–चंपा
४. मगध–गिरीव्रज/राजगृह
५. वृज्जी/वज्जी–वैशाली
६. मल्ल/मालव–कुशिनार/कुशीनगर
७. चेदि–शुक्तिमती/सोत्थिवती
८. वंश/वत्स–कौशांबी
९. कुरु–इंद्रप्रस्थ/इंद्रपट्टण
१०. उत्तर पांचाल–अहिच्छत्र,
    दक्षिण पांचाल –कांपिल्य
११. मत्स्य–विराटनगर
१२. शूरसेन–मथुरा
१३. अश्मक/अस्सक–पोटली/पोतन/पोदन
१४. अवंती–उज्जयिनी आणि महिष्मती
१५. गांधार–तक्षशिला
१६. कंबोज–राजपूर

महत्त्वाकांक्षी असून त्यांच्यापैकी अनेकांना 'सब्बराजुनाम अग्गराजा' (सर्व राजांमधील प्रमुख राजा) बनण्याची इच्छा होती असे उल्लेख जातककथांमध्ये येतात. 'महावग्ग' या ग्रंथामध्ये काशीच्या राजाने कोसलाचा पराभव करून ते काशी महाजनपदामध्ये विलीन केल्याचा उल्लेख आहे. मगधाचा राजा अजातशत्रू याने काशी राज्य मगधामध्ये विलीन केले. अजातशत्रू हा राजा गौतम बुद्धांचा समकालीन होता.

**२. कोसल :** भारतातील उत्तर प्रदेश आणि नेपाळमधील लुंबिनी या प्रदेशांमध्ये प्राचीन कोसल महाजनपदाचा विस्तार झालेला होता. श्रावस्ती ही कोसलची राजधानी होती. कोसल महाजनपदाचा राजा प्रसेनजित (पसेनदी*) हा गौतम बुद्धांचा अनुयायी होता. मगधाचा राजा अजातशत्रू याने कोसलचा पाडाव करून ते मगधामध्ये विलीन केले.

** पसेनदी हे प्रसेनजित या नावाचे पाली भाषेतील रूप आहे.*

**३. अंग :** या महाजनपदाची राजधानी चंपा होती. ते सागरी व्यापाराचे केंद्र होते. बिंबिसाराने अंग महाजनपदाचा पाडाव करून ते मगध राज्यामध्ये विलीन केले.

**४. मगध :** या महाजनपदाची सुरुवातीची राजधानी गिरीव्रज किंवा राजगृह येथे होती. पाच टेकड्यांनी वेढलेले असल्यामुळे गिरीव्रज हे शत्रूसाठी दुर्गम होते. बिंबिसार राजा गौतम बुद्धांचा समकालीन होता. त्याच्या काळात मगधाचे विस्तारवादी धोरण सुरू झाले.

**५. वृज्जी किंवा वज्जी :** वृज्जी हा 'महा अठ्ठकुल' म्हणजे आठ कुळांचा संघ होय. त्यांमध्ये



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

विदेह, लिच्छवी, वज्जी, शाक्य, ज्ञातृक इत्यादी कुळांचा समावेश होता. एकपण्ण जातककथेतील वर्णनानुसार वृज्जी संघाची राजधानी असणाऱ्या वैशाली नगराभोवती तीन कोट बांधलेले होते. तसेच नगराला तीन प्रवेशद्वारे आणि बुरूज होते. अजातशत्रूने वृज्जी संघ जिंकून मगधामध्ये विलीन केला.

**६. मल्ल :** या महाजनपदाची राजधानी उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यात कुशिनार किंवा कुशीनगर (कासिया) इथे होती. गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण कुशिनार येथे झाले. 'परिनिर्वाण चैत्ये ताम्रपट्ट इति' असा अभिलेख असलेला ताम्रपट ( इ.स.पूर्व ५ वे शतक) येथील परिनिर्वाण स्तूपापाशी मिळाला. उत्तर वैदिक काळात मल्ल जनपद राजसत्ताक होते. नंतर तेथील राजसत्ताक पद्धती जाऊन त्याचे गणराज्यात रूपांतर झाले. मल्ल महाजनपदात पावा आणि भोगनगर ही आणखी दोन महत्त्वाची नगरे होती. जैन ग्रंथांमधील वर्णनानुसार अजातशत्रूशी लढण्यासाठी मल्ल, लिच्छवी आणि काशी-कोसल प्रदेशातील अठरा गणराज्ये एकत्र येऊन एक संघ प्रस्थापित झाला होता. इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकापर्यंत मल्ल महाजनपद मौर्य साम्राज्यात समाविष्ट झाले होते.

**७. चेदि :** या महाजनपदाचा विस्तार आताचे बुंदेलखंड आणि आसपासच्या प्रदेशात झाला होता. शुक्तिमती किंवा सोत्थिवती ही चेदि महाजनपदाची राजधानी होती. उत्तर प्रदेशातील बांदा या शहराच्या परिसरात प्राचीन शुक्तिमती नगर वसलेले होते, असे मानले जाते.

**८. वंश किंवा वत्स :** या महाजनपदाची राजधानी कौशांबी (अलाहाबादजवळील कोसम) येथे होती. पुराणांमधील परंपरेनुसार गंगेला आलेल्या महापुरामुळे हस्तिनापूर उद्ध्वस्त झाले आणि पांडवांचा वंशज निचक्षु या राजाने त्याची राजधानी कौशांबी येथे हलवली. कवी भास याने लिहिलेल्या 'स्वप्नवासवदत्त' या नाटकाचा नायक, वत्स महाजनपदाचा राजा उदयन हा राजा बिंबिसार याचा समकालीन होता.

**९. कुरु :** या महाजनपदाची राजधानी इंद्रप्रस्थ किंवा इंद्रपट्टण येथे होती. दिल्लीजवळचे इंद्रपत येथे प्राचीन इंद्रप्रस्थ वसलेले होते. जातककथांमधील उल्लेखांच्या अनुसार इंद्रप्रस्थाचे राजे युद्धिठ्ठिल गोत्राचे होते.

**१०. पांचाल :** या महाजनपदाचे उत्तर पांचाल आणि दक्षिण पांचाल असे दोन भाग होते. भागीरथी नदी त्या दोहोंना विभागणारी नैसर्गिक सीमारेषा होती. उत्तर प्रदेशच्या बरेली जिल्ह्यातील अहिच्छत्र (रामनगरजवळ) ही उत्तर पांचालची राजधानी होती. फारूखाबाद जिल्ह्यातील कांपिल्य (कांपिल) येथे दक्षिण पांचालांची राजधानी होती. उत्तर पांचालाच्या प्रदेशावरील स्वामित्वासाठी कुरु आणि पांचाल या दोन्ही महाजनपदांमध्ये सतत लढाया होत असत. सुरुवातीस राजसत्ताक असलेल्या पांचाल महाजनपदाचे रूपांतर नंतर संघराज्यामध्ये झाले.

**११. मत्स्य :** या महाजनपदाची राजधानी विराटनगर ही आजच्या राजस्थानातील जयपूर जिल्ह्यातील बैराट येथे होती. हे महाजनपद पुढे मगधामध्ये विलीन झाले. बैराट येथे सम्राट अशोकाचे शिलालेख आहेत.

**१२. शूरसेन :** हे महाजनपद यमुना नदीच्या काठावर वसलेले होते. मथुरा ही त्याची राजधानी होती. ग्रीक इतिहासकारांनी त्याचा उल्लेख 'शूरसेनॉय' आणि मथुरेचा उल्लेख 'मेथोरा' असा केलेला आढळतो. पुढे ते मौर्य साम्राज्यामध्ये विलीन झाले.

**१३. अश्मक/अस्सक :** या महाजनपदाची पोटली ही राजधानी होती. हे महाजनपद काही काळ काशी महाजनपदाचे मांडलिक राज्य असावे, असे दिसते.

**१४. अवंती :** या महाजनपदाचा विस्तार मध्य प्रदेशातील माळवा, निमाड आणि त्यालगतचा प्रदेश यांमध्ये झालेला होता. अवंती जनपदाचे उत्तर अवंती आणि दक्षिण अवंती असे दोन भाग होते. उत्तर अवंतीची राजधानी उज्जयिनी (उज्जैन) आणि दक्षिण अवंतीची राजधानी महिष्मती (मांधाता, जिल्हा खांडवा) येथे होती. अवंतीचा राजा प्रद्योत हा गौतम बुद्धांचा समकालीन होता. इसवी सनापूर्वी चौथ्या शतकात अवंती महाजनपद मगध साम्राज्यात विलीन झाले.

**१५. गांधार :** या महाजनपदाचा विस्तार काश्मीर आणि अफगाणिस्तान या प्रदेशांमध्ये झालेला होता. तक्षशिला ही त्याची राजधानी होती. पुक्कुसाति किंवा पुष्करसारीन हा गांधाराचा राजा बिंबिसाराचा समकालीन होता आणि त्याने बिंबिसाराबरोबर राजनैतिक संबंध



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रस्थापित केले होते. इसवी सनापूर्वी सहाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत गांधार महाजनपद पर्शियन सम्राट दार्युश पहिला याने जिंकून घेतले. इराणमधील बेहिस्तुन येथील शिलालेखात (इसवी सनापूर्वी ५१६) गांधाराचा उल्लेख पर्शियन साम्राज्याचा भाग म्हणून केला आहे.

**१६. कंबोज :** महाजनपदाचा उल्लेख प्राचीन साहित्यात गांधाराच्या जोडीने येतो. राजपूर (राजौरी)ही त्याची राजधानी होती. उत्तम घोडे आणि घोड्यावर स्वार होऊन युद्ध करण्याचे कौशल्य यांच्यासाठी कंबोज येथील योद्धे प्रसिद्ध होते. सिकंदराच्या आक्रमणाच्या वेळेस कंबोजच्या लोकांनी त्याचा प्रतिकार केला होता. ग्रीक इतिहासकारांनी उल्लेख केलेले ॲस्पासिओय (अश्वायन) हे कंबोज महाजनपदाचा भाग होते. सम्राट अशोकाच्या लेखांमध्ये त्यांचा उल्लेख 'अराज' म्हणजे राजा नसलेले, म्हणजेच गणराज्य पद्धती असलेले, असा केलेला आहे.

## ६.५ महाजनपदांमधील राज्यव्यवस्था, श्रेणी व्यवस्था

**राज्यव्यवस्था :** पाचव्या पाठात आपण जनपदांच्या काळातील राज्यांचे प्रकार दर्शवणाऱ्या 'राज्य, स्वाराज्य, भौज्य, वैराज्य, महाराज्य, साम्राज्य आणि पारमेष्ठ्य' या संज्ञांचा उल्लेख केला होता. या सर्व संज्ञांचा नेमका अर्थ सांगणे कठीण असले तरी राज्य आणि साम्राज्य या संज्ञांचे यज्ञसंस्थेच्या अनुषंगाने केलेले स्पष्टीकरण 'शतपथ ब्राह्मण' आणि 'कात्यायन श्रौतसूत्र' या ग्रंथांमध्ये दिलेले दिसते. त्यानुसार राजसूय यज्ञ करणारा राज्याचा अधिपती हा 'राजा' असतो आणि त्याच्या अधिपत्याखालील प्रदेश हे 'राज्य' असते. राजाने वाजपेय यज्ञ केल्यानंतर 'साम्राज' या पदाची त्याला प्राप्ती होते आणि त्याच्या अधिपत्याखालील राज्याला 'साम्राज्य' म्हटले जाते. 'राजा' हा नेहमीच 'साम्राज' या श्रेष्ठपदाचा अभिलाषी असतो. 'राजा' हे पद अर्थातच कनिष्ठ असते.

राजा हा क्षत्रिय असावा आणि ब्राह्मणाने राजपद ग्रहण करू नये, असा संकेत होता. तरी वैदिक साहित्य आणि बौद्ध जातकांमधून या संकेताला असलेले अनेक अपवादही पहायला मिळतात. राजपद हे बहुधा वंशपरंपरेने मिळत असे. परंतु काही वेळा राजा हा लोकांनी निवडून दिल्याची उदाहरणेही आहेत. राजाच्या सर्वांत ज्येष्ठ पत्नीला 'राजमहिषी' असे म्हटले जाई. राज्याभिषेकाच्या प्रसंगी राजाबरोबर तिलाही अभिषेक होत असे. सामर्थ्यशाली राजा त्याचे सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठी अश्वमेध यज्ञ करत असे.

अभिषिक्त राजाचा तत्वत: त्याच्या प्रजेवर संपूर्ण अधिकार असे. प्रजेकडून किती कर वसूल करायचा हे राजा ठरवत असे. त्याच्या राज्यातील कोणताही भूभाग इच्छेनुसार दान करण्याचा अधिकार त्याला होता. असे असले तरी राजाची सत्ता पूर्णपणे अनियंत्रित नव्हती. पुरोहित, सेनानी, अमात्य, ग्रामणी इत्यादींच्या सल्ल्याने राजा निर्णय घेत असे. त्याखेरीज जनांची समिती किंवा परिषद भरत असे. त्यामध्ये समाजातील सर्वांना सहभागी होण्याचा हक्क असे. समिती किंवा परिषदेत सर्वसामान्य जनांनी निर्णय घेऊन राजाला सत्तेवरून दूर केल्याची उदाहरणेही आढळतात.

**श्रेणीव्यवस्था :** राज्याच्या समृद्धीसाठी शेती, पशुपालन यांच्याबरोबरीने व्यापार आणि व्यापाराचे सुयोग्य नियोजन आणि संघटन या गोष्टींनाही महत्त्व असते. महाजनपदांच्या समृद्धीमध्ये व्यापारी आणि कारागिरांच्या श्रेणींचा मोठा वाटा होता. या श्रेणींची विशिष्ट पद्धतीची रचना आणि कार्यपद्धती असे. विविध व्यवसायांचे स्थानविशिष्ट संघटन असणे, व्यावसायिक कौशल्यांचे वंशपरंपरेने होणारे हस्तांतरण करणे, अनुभवी ज्येष्ठांकडे व्यवसायाचे नेतृत्व असणे आणि ते इतरांनी स्वेच्छेने स्वीकारणे, ही श्रेणींची वैशिष्ट्ये होती.

श्रेणींचे स्वतःचे नियम असत. त्यामुळे त्यांची रचना बंदिस्त स्वरूपाची असे. श्रेणींचे बंदिस्त स्वरूप हे जातिव्यवस्था उदय पावण्याच्या कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण समजले जाते. श्रेणींमध्ये वेतनावर काम करणाऱ्या बाहेरील कामगारांना 'कर्मकार' आणि विनावेतन काम करणाऱ्यांना 'दास' असे म्हणत असत.

मौर्य काळापर्यंत श्रेणीव्यवस्थेला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवहारांमध्ये महत्त्व प्राप्त झाले होते. कौटिल्याच्या मते श्रेणींवर राजाचे नियंत्रण असणे अत्यंत महत्त्वाचे होते; कारण श्रेणींच्या रचनेमध्ये सत्तेच्या प्रभावी वहनाचे माध्यम बनण्याची क्षमता होती.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मौर्य काळातील रस्ते आणि दळणवळणाच्या व्यवस्थेची विशेष काळजी घेतली जात होती, हे सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या आधारे स्पष्ट दिसते. त्यामुळे मौर्य काळात मालाची ने-आण आणि लोकांचे जाणे-येणे हे अधिक सुकर झाले होते. अर्थातच ही परिस्थिती व्यापाराच्या वाढीसाठी तसेच श्रेणीच्या विकासासाठी अनुकूल होती.

श्रेणींच्या कार्यपद्धतीवर राजसत्तेचे नियंत्रण असे. श्रेणींच्या मार्फत होणारे उत्पादन, आर्थिक व्यवहार, एवढेच नव्हे तर श्रेणीविशिष्ट परंपरा इत्यादींच्या तपशीलवार नोंदी बारकाईने केल्या जात. नगरामध्ये प्रत्येक श्रेणीला स्वतंत्र जागा ठरवून दिलेल्या असत.

श्रेणीतील सदस्य आणि कर्मकार यांच्यातील परस्परसंबंध, उत्पादनाचे टप्पे, उत्पादित मालाची किंमत ठरवणे यांसारख्या गोष्टींसाठी प्रत्येक श्रेणीच्या स्वतंत्र परंपरा आणि त्यांवर आधारित नियम असत. त्यांमध्ये राजकीय प्रशासनयंत्रणा ढवळाढवळ करत नसे. त्यामुळे श्रेणींची स्वायत्तता अबाधित राहत असे. श्रेणीच्या संदर्भात एखादा निर्णय घ्यायचा असेल तर तो घेताना राजा श्रेणीच्या प्रतिनिधीचा सल्ला घेत असे.

कारागिरांच्या श्रेणीप्रमुखास ज्येष्ठक/जेठ्ठक असे म्हणत असत. व्यापाऱ्यांच्या श्रेणीप्रमुखास श्रेष्ठी/सेठ्ठी म्हटले जाई. उत्पादन आणि व्यापार यांखेरीज श्रेणी त्यांच्या निधीमधून समाजासाठी उपयुक्त कामेही करत असत. त्यांमध्ये गरजूंना दानधर्म आणि माफक दराने कर्ज देणे यांचा समावेश होता.

### ६.६ तत्वज्ञान आणि विविध संप्रदाय

महाजनपदांच्या काळात बदलत्या राजकीय आणि आर्थिक स्थितीचे प्रतिबिंब समाजाच्या लौकिक आणि पारलौकिक जीवनासंबंधीच्या धारणांच्या क्षेत्रात उमटणे अपरिहार्य होते. वैदिक परंपरांवर आधारलेल्या धारणांमध्ये गृहस्थजीवन, यज्ञसंस्था आणि लौकिक समृद्धी यासंबंधीचे विचार मध्यवर्ती होते. वैदिक काळाच्या शेवटी शेवटी मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा अर्थ, मानवाचे वैश्विक पसाऱ्यातील स्थान, मृत्यूचे रहस्य आणि मृत्यूनंतरचा आत्म्याचा प्रवास यांसारख्या अमूर्त गोष्टींचा विचार प्रकर्षाने सुरू झाला. उपनिषदांच्या निर्मितीची सुरुवात झाली. त्याद्वारे सुरू झालेल्या विचारमंथनातून आत्म्याचे अस्तित्व चिरंतन असते या धारणेवर आधारलेले तत्वज्ञान ते आत्म्याचे अस्तित्व नाकारणारे तत्वज्ञान अशा विविध प्रणाली उदयाला आल्या. त्यांमध्ये जे अनुभवसिद्ध असते त्यालाच सत्य मानणाऱ्या आणि वैदिक धारणांवर आधारलेली समाजव्यवस्था आणि कर्मकांडे यांना मुळापासून नाकारणारी चार्वाक किंवा लोकायत यांसारखी तात्त्विक प्रणालीही होती. चार्वाक हे अग्रगण्य नास्तिक दर्शन असून त्याने वेदप्रामाण्य, ईश्वर आणि परलोक यांचे अस्तित्व आणि त्यातून उद्भवणारे कर्मकांड यांना विरोध केला. भारतीय विचारधारेतील ते एकमेव जडवादी (भौतिकतावादी) दर्शन आहे.

प्राचीन भारतीय दर्शनांची तात्त्विक बीजे या काळात रोवली गेली, असे म्हणण्यास हरकत नाही. त्या दृष्टीने इसवी सनापूर्वीचे सहावे शतक महत्वाचे आहे. गृहस्थाश्रमाचा त्याग करून, अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठी एका स्थानावर न राहता सतत भटकंती करणारे 'परिव्राजक' किंवा 'श्रमण' आणि त्यांचा शिष्यसंप्रदाय यांची सुरुवात हे या काळाचे वैशिष्ट्य आहे. या काळात जे तत्वज्ञान समाजातील विविध स्तरांतील लोकांना मोठ्या प्रमाणावर आपलेसे वाटले. त्यामध्ये वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांनी केलेला उपदेश आणि त्यांनी मांडलेले तत्वज्ञान अग्रक्रमावर होते. त्यांच्या शिकवणुकीमध्ये समाजातील वर्ण आणि जातींवर आधारलेल्या समाजव्यवस्थेतील विषमतेतून बाहेर पडण्याचा मार्ग होता.

जैन आणि बौद्ध या दोन्ही दर्शनांचा अंतर्भाव नास्तिक दर्शनांमध्ये केला जातो. वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध या दोघांनीही वेदांचे प्रामाण्य आणि वैदिक कर्मकांड या गोष्टी नाकारल्या. त्यांना समाजाच्या सर्व स्तरांतून मोठ्या संख्येने अनुयायी मिळाले.

### ६.७ नवीन धर्मप्रवाह

**जैन धर्म :** जैन धर्माला खूप प्राचीन परंपरा आहे. जैन परंपरेनुसार वर्धमान महावीर हे जैन धर्माच्या २४ तीर्थंकरांपैकी शेवटचे तीर्थंकर होत. पार्श्वनाथ हे तेविसावे तीर्थंकर होते. त्यांनी त्यांच्या अनुयायांना अहिंसा, सत्य, अस्तेय आणि अपरिग्रह या चार प्रतिज्ञा दिल्या. महावीरांनी त्यांच्या अनुयायांना त्याच्या जोडीला पाचवी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा दिली. यांना 'पंचमहाव्रते' असे म्हणतात.



वर्धमान महावीर

वर्धमान महावीरांचे पिता सिद्धार्थ हे ज्ञातृक कुळाचे प्रमुख होते. आई त्रिशलादेवी या लिच्छवी कुळातील होत्या. वर्धमान महावीरांचा जन्म इसवी सन पूर्व ५९९ मध्ये वैशाली नगराजवळील कुंडग्राम येथे झाला. महावीरांच्या पत्नीचे नाव यशोदा होते. वयाच्या ३०व्या वर्षी त्यांनी सत्याच्या शोधार्थ गृहस्थाश्रमाचा त्याग केला. वयाच्या ४२ व्या वर्षी त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. लोक त्यांना 'केवली', 'जिन' आणि 'महावीर' अशा उपाधींनी संबोधू लागले. त्यांच्या अनुयायांना 'जैन' अशी उपाधी प्राप्त झाली. कैवल्यप्राप्तीनंतर ३० वर्षे वर्धमान महावीरांनी लोकांना उपदेश करण्यासाठी सतत भ्रमण केले.

महावीरांनी अर्धमागधी या लोकभाषेत उपदेश केला. त्यांनी सदाचरण आणि व्रतस्थ आयुष्याचा पुरस्कार केला. त्यांनी सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चारित्र या तीन तत्त्वांवर भर दिला. या तीन तत्त्वांना जैन धर्माची 'त्रिरत्ने' असे म्हणतात. त्रिरत्ने ही केवलज्ञानप्राप्तीच्या मार्गाची आकांक्षा करणाऱ्या व्यक्तीसाठी मूलभूत मार्गदर्शक तत्त्वे आहेत. चेतन आणि अचेतन अशा सर्व अस्तित्वामध्ये कमी-जास्त प्रमाणात जाणीव असते. त्यांना इजा केली तर त्या प्रत्येकामध्ये वेदना उत्पन्न होते, असे महावीरांनी सांगितले.

अनेकान्तवाद हे वर्धमान महावीर यांच्या तत्त्वज्ञानाचे गाभासूत्र होते. त्यानुसार सत्य हे एकांगी नसून त्याचे अनेक पैलू असतात.

महावीरांनी स्वतः जैन संघाची स्थापना केली. सम्राट चंद्रगुप्त मौर्य हा थेर भद्रबाहू या जैन संघाच्या सहाव्या प्रमुख आचार्यांचा समकालीन होता. जैन परंपरेनुसार सम्राट चंद्रगुप्ताने जैन धर्माचा स्वीकार केला होता.

**बौद्ध धर्म :** गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर हे समकालीन होते. गौतम बुद्धांचा जन्म नेपाळमधील लुंबिनी (रुम्मिनदेइ) येथे इसवी सन पूर्व ५६३ मध्ये झाला. गौतम बुद्धांच्या पित्याचे नाव शुद्धोदन होते. ते शाक्य कुळातील होते. गौतम बुद्धांच्या आईचे नाव मायादेवी होते. त्या कोलीय कुळातील होत्या. गौतम बुद्धांच्या पत्नीचे नाव यशोधरा होते.

वयाच्या २९ व्या वर्षी गौतम बुद्धांनी सत्याच्या शोधार्थ गृहत्याग केला. या घटनेला बौद्ध परंपरेत 'महाभिनिष्क्रमण' असे म्हटले जाते. त्यानंतर सहा वर्षे वेगवेगळ्या गुरूंचे मार्गदर्शन, तीव्र तपःसाधना यांसारख्या गोष्टींच्या माध्यमातून त्यांनी अंतिम सत्याचे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातून काही साध्य होत नाही, असे लक्षात आल्यानंतर ते निरंजन (लिलाजन) नदीच्या काठावर, गया येथे एका पिंपळ वृक्षाखाली ध्यानस्थ बसले. इथे वयाच्या ३५ व्या वर्षी त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. ते 'बुद्ध' आणि 'तथागत', तसेच 'शाक्यमुनी' म्हणून ओळखले जाऊ लागले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी सारनाथजवळील 'इशिपट्टण' येथे मृगवनामध्ये पहिला उपदेश केला. या प्रसंगाला 'धम्मचक्कपबत्तन' असे म्हटले जाते. पुढे ४५ वर्षे लोकांना धम्माचा उपदेश करण्यासाठी त्यांनी सतत भ्रमंती केली. त्यांनी पाली या लोकभाषेमध्ये उपदेश केला.



गौतम बुद्ध



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

गौतम बुद्‌धांनी त्यांच्या उपदेशात ‘दुःख’ या मनुष्यजीवनाच्या मूलभूत प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधले. मुळात दुःख उत्पन्न का होते आणि दुःख उत्पन्नच होऊ न देण्याचा उपाय काय, या दोन गोष्टींना अनुलक्षून त्यांनी लोकांना उपदेश केला. त्यांच्या उपदेशात त्यांनी चार ‘आर्यसत्ये’ सांगितली. (१) जगात सर्वत्र **दुःख** आहे. (२) दुःखाचे मूळ **तृष्णा** आहे. (३) तृष्णेवर विजय मिळवला की **दुःखनिरोध** होतो. (४) **अष्टांगिक मार्ग** हा दुःखनिरोधाचा मार्ग आहे.

अष्टांगिक मार्गामध्ये गौतम बुद्‌धांनी पुढील आठ गोष्टी सांगितल्या.

(१) सम्यक् दृष्टी (निसर्गनियमाविरुद्‌ध काहीही घडत नाही, हे स्वीकारणे)

(२) सम्यक् संकल्प (योग्य निर्धार)

(३) सम्यक् वाचा (योग्य बोलणे)

(४) सम्यक् कर्मान्त (योग्य वर्तणूक)

(५) सम्यक् आजीव (योग्य मार्गाने उपजीविका)

(६) सम्यक् व्यायाम (अयोग्य गोष्टी प्रयत्नपूर्वक टाळणे)

(७) सम्यक् स्मृती (चित्ताची अखंड सावधानता आणि त्यायोगे योग्य गोष्टींची स्मृती)

(८) सम्यक् समाधी (सुखदुःखाच्या पलीकडील अवस्थेमध्ये चित्त स्थिरावणे).

अष्टांगिक मार्गालाच ‘मध्यम प्रतिपद’ असे म्हटलेले आहे.

गौतम बुद्‌धांनी भिक्खूंचा संघ प्रस्थापित केला. बौद्‌ध धम्मामध्ये बुद्‌ध, धम्म आणि संघ यांना शरण जाण्याची संकल्पना महत्त्वाची आहे. या संकल्पनेला ‘त्रिशरण’ असे म्हणतात. ‘बुद्‌धं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि आणि संघं सरणं गच्छामि’ या तीन प्रतिज्ञा बौद्‌ध धर्मामध्ये आवश्यक मानलेल्या आहेत.

इसवी सनापूर्वी सहाव्या शतकात प्राचीन भारतात जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत परिवर्तन घडून आले. महाजनपदांमधील सत्तासंघर्षाला या शतकात सुरुवात झाली. काशी, कोसल, अवंती आणि मगध या चार महाजनपदांमध्ये हा सत्तासंघर्ष सुरू राहिला. इसवी सनापूर्वी चौथ्या शतकापर्यंत मगधाची राजसत्ता प्रबळ होत गेली आणि इतर महाजनपदांचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात येत गेले. मगधाच्या उदयाचा इतिहास आपण आठव्या पाठात समजून घेणार आहोत.

**खालील माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :** नेपाळमधील ‘रुम्मिनदेइ’ येथील उत्खननात मौर्य सम्राट अशोकाचा स्तंभलेख मिळाला. त्या लेखात असे म्हटले आहे की, ‘‘देवानामपिय पियदसी’’ राजाच्या राज्याभिषेकानंतर तो स्वतः या स्थळाला भेट देण्यासाठी आला आणि त्याने इथे प्रार्थना केली. तो असे जाहीर करतो की बुद्‌ध शाक्यमुनींचा जन्म इथे झाला याचे स्मरण देणारा दगडी स्तंभ इथे उभा करवला. लोकांमध्ये या स्थळाप्रती आदरभाव निर्माण होण्यासाठी त्याने हे केले. त्याने लुंबिनी ग्राम समृद्‌ध व्हावे या हेतूने त्यावरील कर माफ केला.’’



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा.**

१. अश्मक हा शब्द ............ भाषेतील आहे.
(अ) पाली (ब) संस्कृत
(क) अर्धमागधी (ड) प्राकृत

२. काशी या महाजनपदाची ............ येथे राजधानी होती.
(अ) गोरखपूर (ब) चंदानगर
(क) राजगृह (ड) वाराणसी

३. गौतम बुद्धांचा जन्म ............ येथे झाला.
(अ) कुशिनगर (ब) सारनाथ
(क) लुंबिनी (ड) पाटलीपुत्र

४. उत्तर पांचाल व दक्षिण पांचाल साम्राज्याची ............ नदी ही नैसर्गिक सीमा आहे.
(अ) यमुना (ब) भागीरथी
(क) गंगा (ड) निरंजन

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. कोसल – श्रावस्ती
२. अंग – चंपा
३. मत्स्य – मथुरा
४. गांधार – तक्षशिला


**प्र.२ (अ) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

बुद्ध, तथागत, शाक्यमुनी, वर्धमान महावीर

**(ब) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

गौतम बुद्धांनी ४५ वर्षे सतत भ्रमंती केली. कारण...
(अ) गुरूच्या शोधासाठी
(ब) तपश्चर्या करण्यासाठी
(क) लोकांना धम्माचा उपदेश करण्यासाठी
(ड) ज्ञान मिळवण्यासाठी

**प्र.३ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सोळा महाजनपदांचा उदय झाला.
२. भारतात दुसऱ्या नागरीकरणाची सुरुवात झाली.
३. वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांना अनेक अनुयायी मिळाले.

**प्र.५ पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१. नास्तिक दर्शन
२. गौतम बुद्धांनी सांगितलेले अष्टांग मार्ग

**प्र.६ खालील मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा.**

महाजनपदामधील राज्यव्यवस्था खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.
(अ) राज्यांचे प्रकार दर्शवणाऱ्या संज्ञा (ब) राजाची निवड (क) राजाचे अधिकार (ड) निर्णय प्रक्रिया

**उपक्रम**

१. जैन धर्मांच्या तीर्थंकरांची माहिती संग्रहित करा.
२. जातक कथांविषयी माहिती मिळवा. एखाद्या जातक कथेचे नाट्यीकरण करा.

❖❖❖


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ७. भारत आणि इराण (पर्शिया)


७.१ भारतीय उपखंड आणि इराण
७.२ पर्शियन (अखमोनीय) साम्राज्य आणि ग्रीस यांच्यातील लढाया
७.३ पर्शियन (अखमोनीय) साम्राज्य आणि भारत
७.४ इराणचा राजकीय आणि सांस्कृतिक प्रभाव
७.५ तक्षशिला
७.६ सिकंदराची स्वारी


## ७.१ भारतीय उपखंड आणि इराण


भारतीय उपखंड आणि इराण यांच्यातील व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध हडप्पा काळापासूनच प्रस्थापित झालेले होते, याचे पुरावे तेथील प्राचीन स्थळांच्या उत्खननांमध्ये मिळाले आहेत. हडप्पा संस्कृतीशी समकालीन असलेले एलामचे साम्राज्य हे इराणच्या नैऋत्य भागात होते. ते सांस्कृतिकदृष्ट्या मेसोपोटेमियाला अधिक जवळचे होते. एलाम साम्राज्याच्या राजधानीचे नाव 'सुसा' असे होते. त्यावरून त्या प्रदेशाला 'सुसियाना' असे म्हटले जायचे. पुढे इराणमध्ये विविध राजघराण्यांची सत्ता उदयाला आली तरी त्यांची राजधानी सुसा येथेच राहिली. सुसा येथील पुरातत्वीय संशोधनाच्या आधारे इराण आणि हडप्पा संस्कृती यांच्यातील व्यापारी आणि सांस्कृतिक संबंधांबाबत पुष्टिदायक पुरावा मिळालेला आहे.

**पर्शियन साम्राज्याचा नकाशा पाहण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या. :**
https://upload.wikimedia.org/wikipedia/commons/3/3a/Persian_Empire%2C_490_BC.pnghttps://commons.wikimedia.org/wiki/File:Persian_Empire,_490_BC.png

इराणच्या साम्राज्याची प्रस्थापना अखमोनीय घराण्यातील दुसरा सायरस याने केली. तो पार्स या जमातीमधील होता. या जमातीचे वास्तव्य अफगाणिस्तानला लागून असलेल्या इराणच्या वायव्येकडील डोंगराळ प्रदेशात होते. त्यामुळे त्या प्रदेशालाही 'पार्स' असेच नाव होते. त्या प्रदेशातील प्रमुख शहराचे नावही 'पार्स' असेच होते. ग्रीक लोक या शहरास 'पर्सिपोलिस' असे म्हणत. या पार्स प्रांतात उदयाला आलेले, म्हणून अखमोनीय साम्राज्याचा उल्लेख 'पर्शियन साम्राज्य' असा केला जातो.

सम्राट दुसरा सायरस याने 'पासारगाद' येथे राजधानी बांधण्यास सुरुवात केली होती. परंतु त्याच्या हयातीत ती पूर्णत्वाला गेली नाही. दुसरा सायरस याचा मुलगा दुसरा कॅम्बिसेस हा त्याच्यानंतर राजा झाला. त्याने त्याची राजधानी सुसा येथे हलवली. त्याने इजिप्त जिंकून घेतले होते.

दुसरा कॅम्बिसेस याच्यानंतर गादीवर आलेला पहिला दार्युश याने सुसाच्या तटबंदीचे मजबुतीकरण केले. 'सुसा' येथे त्याने मोठा राजवाडा आणि अपादान (अनेक खांबी सभागृह) बांधले. त्याच धर्तीवर त्याने 'पर्सिपोलिस' हे नवे शहर वसवले आणि तेथे स्वतःच्या निवासासाठी एक नवा राजवाडा आणि अपादान बांधले.



सुसा येथील अपादान– पुनर्रचित चित्र

इराण भौगोलिकदृष्ट्या पूर्व आणि पश्चिम आशियाला जोडणारा प्रदेश आहे. त्यामुळे पूर्व आणि पश्चिम आशियामध्ये चालणाऱ्या व्यापारात आणि



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पर्यायाने सांस्कृतिक देवाणघेवाणीत इराणचे स्थान महत्त्वाचे होते.

**सहज जाता जाता :** इराणचे 'एरियाना' असे आणखी एक प्राचीन नाव आहे. ग्रीक इतिहासकारांच्या लेखनात त्याचा उल्लेख 'एरियाने' या नावाने केलेला दिसतो. एरियाना हे एरियानेचे लॅटीन रूप आहे.

इतिहासपूर्व काळापासून सुरू असलेला आशिया आणि पर्शियन आखातापर्यंत आणि तेथून पुढे मेसोपोटेमिया आणि इजिप्तपर्यंत चालणारा व्यापार, पर्शियन साम्राज्याच्या काळात ग्रीस आणि रोमपर्यंत विस्तारला. प्राचीन काळापासून व्यापारी तांडे वापरत असलेल्या मार्गांवर पर्शियन सम्राटांनी सुरक्षिततेची व्यवस्था निर्माण केली. त्यांनी काही मार्गांची पुनर्बांधणीही केली. दुसरा सायरस आणि पहिला दार्युशने 'सुसा' येथून सुरुवात होऊन भूमध्य समुद्रापर्यंत पोचणारा रस्ता विकसित केला. हा मार्ग 'रॉयल रोड' या नावाने ओळखला जातो. हा मार्ग सुमारे २५०० किलोमीटर लांबीचा होता. रॉयल रोडच्या काही शाखा भारतीय उपखंड तसेच इजिप्त यांना जोडत असत. मॅसिडोनियातून आलेल्या सिकंदराने प्रथम पर्शिया आणि नंतर भारतीय उपखंडाचा वायव्य प्रदेश यांच्यावर स्वारी करण्यासाठी याच मार्गाचा उपयोग केला.

**सहज जाता जाता :** १. अलेक्झांडर या नावाचे रूपांतर 'सिकंदर' कसे झाले, हा भाषाशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे. 'अलेक्झांड्रॉस' या मूळ ग्रीक नावाचे अलेक्झांडर हे रूपांतर आहे. 'अलेक्झिन' म्हणजे रक्षण करणे आणि 'अॅन्ड्रॉस' म्हणजे माणूस. अलेक्झांडर या नावाचा अर्थ 'लोकांचे रक्षण करणारा असा होतो'. 'इस्कॅन्डर', 'स्कॅन्डर' ही अलेक्झांडर या नावाची पर्शियन रूपांतरे आहेत. त्याचेच रूपांतर 'सिकंदर' असे झाले.

२. सुसा, पासारगाद, पर्सिपोलिस आणि बेहिस्तुन येथील सम्राट दार्युश पहिला याच्या शिलालेखांना जागतिक सांस्कृतिक वारसास्थळाचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

## ७.२ पर्शियन (अखमोनीय) साम्राज्य आणि ग्रीस यांच्यातील लढाया

ग्रीक इतिहासकारांनी अखमोनीय साम्राज्य आणि ग्रीक नगरराज्ये यांमध्ये वारंवार झालेल्या लढायांबद्दल लिहिलेले आहे. त्यामध्ये हिरोडोटस या इतिहासकाराचे लेखन महत्त्वाचे आहे. पश्चिम आशियातील राज्ये तसेच भूमध्य समुद्रातल्या ग्रीक बेटांवरील नगरराज्ये अखमोनीय सम्राटांनी प्रथम जिंकून घेतली. या प्रदेशांमधील राज्यांशी त्यांच्या छोट्यामोठ्या लढाया होत असत. या लढायांमध्ये आयोनियाच्या ग्रीकांनी अखमोनीय सत्तेविरुद्ध केलेला उठाव महत्त्वाचा मानला जातो.

दुसरा सायरस याने इसवी सनापूर्वी ६व्या शतकाच्या मध्यावधीच्या सुमारास भूमध्य समुद्राच्या उत्तरेला असलेले 'लिडिया' हे राज्य जिंकून घेतले. त्यामुळे लिडियाच्या सत्तेखाली असलेली आयोनियातील ग्रीक नगरराज्ये आपोआपच अखमोनीय साम्राज्यात समाविष्ट झाली. आयोनियातील ग्रीक हे ग्रीसमधील अथेन्समधून स्थलांतर करून अॅनाटोलियात म्हणजे तुर्कस्तानच्या आशियामधील भूभागात आले होते. या प्रदेशाला 'आशिया मायनर' असेही म्हणतात.

पहिल्या दार्युशच्या काळात आयोनियातील सर्व ग्रीक नगरराज्यांनी एकत्रित येऊन अखमोनीय सत्तेविरुद्ध उठाव केला. पाच वर्षांच्या दीर्घ संघर्षानंतर अखेर अखमोनीय सेनाप्रमुखांना एकत्रित झालेल्या ग्रीकांचा पराभव करून आयोनियन बंडाचा पूर्ण बीमोड करण्यात यश मिळाले.

या उठावाच्या अपयशाचे परिणाम ग्रीस आणि पर्शियाच्या पुढील काळातील परस्परसंबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. उठावाच्या वेळी आयोनियन ग्रीकांना 'अथेन्स' आणि 'एरिट्रिया' या ग्रीसमधील नगरराज्यांनी मदत केली होती. त्याचे निमित्त करून पहिला दार्युश अथेन्सवर चाल करून गेला. अथेन्सजवळच्या मॅरेथॉनच्या मैदानावर ही लढाई झाली म्हणून तिला 'मॅरेथॉनची लढाई' म्हणतात. या लढाईत पहिल्या दार्युशच्या सैन्याला पराभव पत्करावा लागला.

पहिल्या दार्युशचा वारस झेरेक्सेसने पुन्हा एकदा ग्रीसवर स्वारी केली. मात्र त्यालाही माघार घ्यावी लागली. त्यानंतरही ग्रीस आणि अखमोनीय सत्तेमध्ये



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

दीर्घ काळ संघर्ष चालू राहिला. सरतेशेवटी अथेन्स आणि इतर नगरराज्यांच्या ग्रीक संघाने आयोनियामधील ग्रीकांना स्वतंत्र करण्यासाठी तेथील अखमोनीय सत्तेविरुद्ध लढा पुकारला. या संघर्षामध्ये कुठल्याच पक्षाला निर्णायक विजय मिळाला नाही आणि इसवी सनापूर्वी ४४९ मध्ये अथेन्सच्या नेतृत्वाखालील ग्रीक संघ आणि अखमोनीय सत्तेमध्ये तह झाला.

या दीर्घ काळ चाललेल्या संघर्षामध्ये अखमोनीय सत्ता दुर्बल होत गेली. ग्रीक आणि अखमोनीय संघर्षाचे दूरगामी परिणाम राजकीय आणि आर्थिक क्षेत्रावर होणे अपरिहार्य होते. परंतु त्याचा आणखी एक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरितीने झालेला परिणाम होता. मॅसिडोनियाचा राजा तिसरा अलेक्झांडर म्हणजेच महान जगज्जेता म्हणून उपाधी मिळालेला सम्राट सिकंदर याने पर्शियावर केलेली स्वारी हा तो परिणाम होय.

एरियन या इसवी सनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेल्या ग्रीक इतिहासकाराने लिहिलेल्या *'ॲनाबेसिस* ऑफ अलेक्झांडर'* या ग्रंथात तिसरा दार्युश, अखमोनीय साम्राज्याचा शेवटचा सम्राट आणि अलेक्झांडर या दोघांनी एकमेकांना लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख केला आहे. आपली आई, पत्नी आणि मुले यांना मुक्त करावे अशा आशयाचे पत्र तिसऱ्या दार्युशने अलेक्झांडरला पाठवले. अलेक्झांडरने उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात, पर्शियन सम्राटांनी ग्रीकांवर पूर्वी आक्रमण करून त्यांना दिलेल्या दुःखाची आठवण करून दिली आणि आक्रमक पर्शियनांना शिक्षा करण्यासाठी समुद्र पार करून आपण आशियात आलो आहोत, असे लिहिले. याच पत्रात पुढे तिसऱ्या दार्युशने आपल्याविरुद्ध ग्रीकांना भडकावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करून, त्याला अलेक्झांडरने तो पराभूत राजा असल्याची जाणीव करून देत, आपल्याबरोबर समान दर्जाच्या नात्याने वागण्याचा प्रयत्न करू नये, असे खडसावले.

> * *'ॲनाबेसिस' म्हणजे 'कूच करणे'.*

यावरून दुखावली गेलेली ग्रीकांची अस्मिता आणि पर्शियन सत्तेला आपण सहज नमवू शकतो हा आत्मविश्वास, या दोन गोष्टी काही अंशी तरी अलेक्झांडरच्या मोहीमेला प्रेरणा देणाऱ्या ठरल्या, असे म्हणता येते.

> **सहज जाता जाता :** हिरोडोटस याचा जन्म इसवी सनापूर्वी ४८४ मध्ये हेलिकारनॅसस नावाच्या एका प्राचीन ग्रीक नगरराज्यात झाला. ग्रीक नगरराज्ये आणि अखमोनीय साम्राज्य यांच्यात इसवी सनापूर्वी ५०० ते ४४९ या काळात झालेल्या लढाया आणि युद्धांमागील कारणपरंपरेचा वेध घेणे हा प्रमुख उद्देश मनाशी धरून त्याने लेखनास सुरुवात केली. त्यातून जो ग्रंथ सिद्ध झाला, त्या ग्रंथाचे ग्रीक नाव 'हिस्टोरिया' (द हिस्टरीज) असे आहे. ग्रंथाच्या सुरुवातीलाच त्याने म्हटले आहे, "मी, हेलिकारनॅससचा हिरोडोटस इथे माझ्या शोधातून मिळालेली माहिती सादर करत आहे. हेतू हा की काळाच्या ओघात मानवी कामगिरी विस्मरणाच्या पडद्याआड जाऊ नये आणि महान व नवल करावे अशा कृती- ग्रीकांच्या असोत की बर्बर (पर्शियन) लोकांच्या-त्यांचा गौरव उणावला जाऊ नये."
>
> एखाद्या विशिष्ट प्रश्नाचा वेध घेण्यासाठी माहिती जमवून त्या माहितीची कालक्रमानुसार मांडणी करण्यावर भर देणारा, हिरोडोटस हा पहिलाच इतिहासकार होता. हे करत असताना त्याने देव, मनुष्याचे नशीब यांसारख्या गोष्टींचा उपयोग केला नाही. नंतरच्या काळात कालक्रमानुसार घटनांची मांडणी करणे हे इतिहासलेखनाचे आवश्यक सूत्र बनले. इतिहासलेखनाला एका स्वतंत्र ज्ञानशाखेचे स्वरूप प्राप्त होण्याच्या प्रक्रियेत हे सूत्र पायाभूत ठरले म्हणून हिरोडोटसला इतिहासलेखनाचा जनक मानले जाते.

### ७.३ पर्शियन (अखमोनीय) साम्राज्य आणि भारत

ज्या काळात भारतातील महाजनपदांमधील सत्तास्पर्धेतून सरतेशेवटी मगध साम्राज्याचा उदय झाला, त्याच काळात भारतीय उपखंडाच्या वायव्य प्रदेशातील छोटी छोटी स्वतंत्र राज्ये जिंकून घेत अखमोनीय सम्राटांनी त्यांच्या साम्राज्याची सीमा पंजाबपर्यंत विस्तारली.

अखमोनीय सम्राटांचे अभिलेख आणि ग्रीक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

इतिहासकारांच्या नोंदींच्या आधारे अखमोनीय सम्राट दुसरा सायरस याने काबूलच्या खोऱ्याचा (गांधार) प्रदेश जिंकून घेतला, असे दिसते. हा प्रदेश अखमोनीय साम्राज्यात समाविष्ट होता. त्यानंतर पहिला दार्युश याने सिंध आणि पंजाब जिंकून घेतला. वितस्ता (झेलम) अखमोनीय साम्राज्याची पूर्वेकडील सीमा बनली. सिकंदराने अखोमनीय साम्राज्याचा पाडाव केला होता. पंजाबचा प्रदेश त्या अखोमनीय साम्राज्याचा हिस्सा होता.

भारतीय उपखंडातील सत्रपींमधून अखमोनीय साम्राज्याला मिळणारा महसूल इतर कोणत्याही सत्रपीतून मिळणाऱ्या महसुलापेक्षा कितीतरी पटीने अधिक होता. हिरोडोटसच्या नोंदीनुसार हा महसूल ३६० टॅलन्ट* कनकपराग** इतका होता. यातील अतिशयोक्तीची शक्यता मान्य केली तरीही अखमोनीय सम्राटांच्या खजिन्यात भारतीयांकडून मिळणाऱ्या महसुलाचा वाटा फार मोठा होता, हे लक्षात येते.

*‘टॅलन्ट’ हे वजनाचे एक परिमाण असून विविध प्राचीन प्रदेशांमध्ये प्रचलित असलेल्या परिमाणानुसार टॅलन्ट वजन हे साधारणपणे २० ते ४० किलोच्या कक्षेतील असते.

**कनकपराग (gold dust)-नदीकाठच्या वाळूत कणांच्या रूपात मिळणारे सोने.

### ७.४ इराणचा राजकीय आणि सांस्कृतिक प्रभाव

भारतीय उपखंडातील पर्शियन सत्तेचे वर्चस्व किमान दोन शतके तरी अस्तित्वात होते. मात्र सिकंदराने स्वारी करण्यापूर्वीच ते संपुष्टात आले होते. दोन शतकांच्या दीर्घ कालावधीत प्राचीन भारताच्या इतिहासावर पर्शियाचा काय ठसा उमटला याचा विचार करता, एक गोष्ट ठळकपणे पुढे येते, ती म्हणजे साम्राज्याच्या प्रशासनासाठी प्रत्येक जिंकलेल्या प्रांतावर सत्रपांची म्हणजे राज्यपालांची नेमणूक करण्याची पद्धत. ही पद्धत पुढे सिकंदर, शक आणि कुशाण राज्यकर्त्यांनीही राबवली.

अखमोनीय साम्राज्याच्या काळात भारतीय उपखंडाच्या वायव्य प्रदेशात अरेमाइक लिपी वापरात आली. याच लीपीतून पुढे खरोष्ठी ही प्राचीन भारतीय लीपी विकसित झाली. सम्राट अशोकाचे या प्रदेशातील लेख खरोष्ठी लीपीत कोरलेले आहेत. राजाज्ञा असलेले कोरीव लेख मोक्याच्या जागी प्रदर्शित करण्याची पद्धतही अखमोनीय सम्राटांच्या लेखांच्या उदाहरणावरून घेतलेली होती, असे दिसते.

हिरोडोटसच्या माहितीनुसार पहिला दार्युश याने सिंधू नदी आणि अरबी समुद्राची माहिती मिळवण्यासाठी अनेक शोधक पाठवले होते. त्यामध्ये ‘स्कायलॅक्स ऑफ कार्यंदा’ या नावाने ओळखला जाणारा आयोनीयाचा ग्रीक खलाशी होता. तो भारतापर्यंत पोचणारा पहिला आयोनियन ग्रीक होता. स्कायलॅक्सने सिंधू नदीपासून सुरुवात करून अरबी समुद्राच्या किनाऱ्याला वळसा घालत तांबड्या समुद्रात प्रवेश केला आणि तो नाईल नदीच्या मुखापाशी ‘सुएझ’ येथे पोचला. या त्याच्या प्रवासाला अडीच वर्षे लागली.

स्कायलॅक्सच्या प्रवासाचा वृत्तान्त ‘पेरिप्लस ऑफ स्कायलॅक्स’ या नावाने प्रसिद्ध आहे. त्याचा मूळ वृत्तान्त उपलब्ध नसला तरी त्याची माहिती ग्रीक इतिहासकारांच्या लेखनातून आपल्याला मिळते. स्कायलॅक्सच्या वृत्तान्तामुळे पश्चिमेकडील लोकांना, विशेषतः ग्रीकांना, प्रथमच भारतीय उपखंडाची माहिती उपलब्ध झाली. स्कायलॅक्सच्या मोहिमेच्या पूर्ततेनंतर थोड्याच अवधीमध्ये पहिल्या दार्युशने सिंधू नदीच्या खोऱ्याच्या खालच्या पट्ट्यातील प्रदेश जिंकून घेतला.

स्कायलॅक्स सुएझ येथे पोचला तेव्हा इजिप्तच्या फॅरोने खणलेला नाईल आणि तांबडा समुद्र यांना जोडणारा एक कालवा अस्तित्वात होता. दार्युशने तो पुन्हा खोदवला. त्यामुळे पर्शिया आणि भारतीय उपखंडातील दळणवळणासाठी एक सागरी मार्ग नव्याने खुला झाला.

या समुद्री मार्गामुळे अखमोनीय साम्राज्यात समाविष्ट असलेल्या भारतीय उपखंडातील वायव्य प्रदेश आणि सिंध-पंजाबच्या प्रदेशातील व्यापाराला उर्जितावस्था आली. पर्शियन बाजारांमध्ये भारतातून येणाऱ्या हस्तिदंत आणि सागवानी लाकूड या गोष्टींना मोठ्या प्रमाणावर मागणी होती. सुसा येथील दार्युशच्या कोरीव लेखात भारतीय हस्तिदंत आणि सागवानी लाकडाचा वापर राजवाड्याच्या बांधकामासाठी केल्याचे नमूद केले आहे.

हिरोडोटसने अखमोनीय सैन्यातील भारतीय सैनिकांचे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

वर्णन केले आहे. त्यानुसार इसवी सनापूर्वी ४८० मध्ये सम्राट झेरेक्सेसने ग्रीकांवर आक्रमण केले तेव्हा त्याच्या सैन्यात गांधार, सिंध आणि पंजाब येथील सैनिक होते. गांधारामधील सैनिकांजवळ वेताचे धनुष्य आणि आखूड दांड्याचे भाले होते. त्यांच्याजवळ घोडे तसेच घोडे जोडलेले रथही होते. भारतीय सैनिकांचा पोशाख सुती कापडाचा असून त्यांच्याजवळ वेतापासून बनवलेले धनुष्य आणि बाण होते. त्यांच्या बाणांची अग्रे लोखंडी होती. धनुष्यबाण चालवण्यात ते अत्यंत निपुण होते. झेरेक्सेसने ग्रीसमधून माघार घेतली तेव्हा त्याच्या सेनापतीने ग्रीसमध्ये सैनिकांची एक तुकडी ठेवण्याचे ठरवले. ही तुकडी भारतीय सैनिकांची होती.

अखमोनीय साम्राज्याचा संस्थापक दुसरा सायरस सत्तेवर येण्यापूर्वी पर्शियामध्ये चलनी नाणी वापरात नव्हती. मोठ्या प्रमाणावर वस्तुविनिमय प्रचलित होता. काही प्रसंगी वस्तूंचा मोबदला म्हणून ठरावीक वजनाच्या चांदीच्या लडीचा वापर केला जाई. सायरसने जिंकून घेतलेल्या लिडिया या ग्रीक राज्यामध्ये चलनी नाणी प्रचारात होती. त्याला 'स्टेटर' असे म्हणत असत. सायरसने लिडियाच्या धर्तीवर नाणी पाडण्यास सुरुवात केली.

पहिल्या दार्युशने स्वतःची प्रतिमा असलेली 'दारिक' ही सोन्याची आणि 'सिग्लॉस' ही चांदीची नाणी पाडायला सुरुवात केली. त्यामध्ये त्याने धनुष्यबाण धारण केलेले दिसते. एका दारिकची किंमत बारा सिग्लोइ* इतकी असे.



पर्शियन 'सिग्लॉस'

*'सिग्लोइ' हे सिग्लॉसचे अनेकवचन आहे.

या नाण्यांच्या बरोबरीने अखमोनीय साम्राज्यातील ग्रीक सत्रपींची नाणीही प्रचारात राहिली. काही सत्रप ग्रीक नाण्यांच्या धर्तीवर स्वतंत्र नाणीही पाडत असत. ही नाणी साच्यातून काढली जात. त्यांच्या दर्शनी भागावर राजाची प्रतिमा असे आणि मागील बाजूला आहत तंत्राचा उपयोग करून उमटवलेले एखादे चिन्ह असे.

भारतीय नाण्यांच्या आहत तंत्रावर या नाण्यांचा प्रभाव असण्याची शक्यता आहे.

सम्राट सायरसच्या आधीच्या काळात पर्शियामधील स्थापत्यामध्ये भव्य इमारतींचा समावेश नव्हता. त्यामुळे सुसा आणि पर्सिपोलिस येथील भव्य इमारतींचे स्थापत्य आणि त्यांतील शिल्पे यांच्यासाठी मार्गदर्शक ठरेल अशी पूर्वपरंपरा नव्हती. त्यासाठी सम्राट सायरसने त्याच्या अधिपत्याखालील आशिया मायनरमधील ग्रीक वसाहतींमधून स्थपती आणि शिल्पी आणवले होते.



पर्सिपोलिस येथील स्तंभ

सिकंदराने पर्शियावर विजय मिळवल्यानंतर पर्सिपोलिस उद्ध्वस्त केले. पर्शियन साम्राज्य संपुष्टात आले. पर्शियन सम्राटांसाठी काम करणाऱ्या स्थपती आणि कारागिरांचा राजाश्रय संपला. स्थलांतर करत ते भारतात पोचले. सम्राट अशोकाच्या दरबारात त्यांना राजाश्रय मिळाला. सम्राट अशोकाने उभ्या केलेल्या दगडी स्तंभांमध्ये त्या कारागिरांच्या शैलीचा प्रभाव दिसतो. अशा रीतीने भारतातील दगडी कोरीव कामाच्या कलेचा उगम पर्शियन आणि पर्यायाने ग्रीक शिल्पशैलीमध्ये दाखवता येतो.

### ७.५ तक्षशिला

महाभारतामध्ये नागवंशातील राजा तक्षक याचा उल्लेख आहे. तक्षशिला ही राजा तक्षकाची राजधानी होती. तक्षशिला या नगराच्या दीर्घकालीन अस्तित्वाचा पुरातत्त्वीय पुरावाही उपलब्ध आहे. तक्षशिला हे गांधार या महाजनपदाच्या राजधानीचे शहर होते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**सहज जाता जाता :** १. पहिल्या दार्युशच्या कोरीव लेखांमध्ये ग्रीकांचा उल्लेख 'यौन' असा केलेला आहे. यौन शब्दाचे मूळ 'आयोनिया' या ग्रीक शब्दामध्ये आहे. भारतीय साहित्यात आढळणारे 'योन' (प्राकृत) 'यवन' (संस्कृत) या शब्दांचा मूळ अर्थ 'आयोनियाचा रहिवासी' असा होतो. हे शब्द महाभारत, रामायण, पुराणग्रंथ आणि इतर साहित्यांमध्ये आढळतात.

२. लोकांमधील परस्परसंपर्कामुळे भाषांमधील शब्दांच्या देवाणघेवाणीतून मूळ शब्दाची रूपे कशी बदलत जातात, याचे आणखी एक उदाहरण पाहूया. प्राचीन पर्शियन भाषा अखमोनीय साम्राज्याची अधिकृत भाषा होती. अखमोनीय सम्राटांच्या कोरीव लेखांमध्ये ती वापरलेली दिसते. या लेखांमध्ये भारतीय उपखंडातील लोकांचा उल्लेख 'हिदुश', 'ह्दुश' असा केलेला आढळतो. आयोनियन ग्रीक बोलीत शब्दाच्या सुरुवातीस आलेल्या 'ह'चा उच्चार केला जात नाही. त्यामुळे स्किलॅक्सने त्याचे एकवचनी रूप 'इंदोस' आणि अनेकवचनी रूप 'इंदोइ' असे केले असावे. हिरोडोटसने हे शब्द पर्शियन हिदुश आणि ह्दुश या शब्दांना समानार्थी म्हणून वापरले. 'इंडिया' नावाचे मूळ या ग्रीक शब्दांमध्ये आहे.

तक्षशिला नगराचे अवशेष इस्लामाबाद या पाकिस्तानच्या राजधानीपासून साधारणपणे ३० किलोमीटर अंतरावर आणि ग्रॅन्ट ट्रंक रोडवर आहेत. त्यामध्ये एकूण १८ पुरातत्त्वीय स्थळांचा समावेश आहे. त्यांना जागतिक वारसास्थळाचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

तक्षशिला आणि भोवतालच्या परिसरात प्रागैतिहासिक काळापासून सूक्ष्मास्त्रांचा उपयोग करणाऱ्या लोकांचा वावर होता, याचा पुरावा काही गुहांमधील उत्खननांमधून मिळाला आहे. इसवी सनापूर्वी ३५०० च्या सुमारास तेथे नवाश्मयुगीन गाव-वसाहत वसली. तिचे अवशेष 'सराइ खोला' नाव असलेल्या स्थळाच्या उत्खननात मिळाले आहेत.

सिकंदराच्या स्वारीच्या वेळेस तक्षशिला येथे 'आंभी' नावाचा राजा राज्य करत होता. स्वागत करण्याच्या हेतूने नजराण्यांसह तो सिकंदराला सामोरा गेला. तक्षशिलेचे वर्णन सिकंदरासोबत आलेल्या ग्रीक इतिहासकारांनी, ''लोकांनी गजबजलेले, समृद्ध आणि सुव्यवस्थित प्रशासनव्यवस्था असलेले एक नगर'' असे केले आहे.

प्राचीन तक्षशिला नगरासंबंधीची माहिती बौद्ध साहित्य आणि ग्रीक इतिहासकारांच्या लेखनातून मिळते. तेथे अनेक विद्वान राहत होते. त्यांची कीर्ती ऐकून भारतीय उपखंडाच्या विविध प्रदेशांमधून विद्यार्थी शिकण्यासाठी येत असत. त्यामुळे तक्षशिला हे विद्येचे आणि शिक्षणाचे केंद्र बनले होते. त्याला अनौपचारिक विश्वविद्यालयाचे स्वरूप प्राप्त झाले होते. परंतु तेथील विद्वान आचार्यांनी काय किंवा कसे शिकवावे, अभ्यासक्रम काय असावा, यावर राजसत्तेचे नियंत्रण नव्हते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत बुद्धिमत्तेनुसार त्याच्या शिक्षणाचा कालावधी ठरत असे. औपचारिक परीक्षा घेण्याची पद्धत नव्हती. किंबहुना परीक्षा ही खऱ्या ज्ञानाची कसोटी मानली जात नव्हती. विद्यार्थी परिपक्व झाला की नाही हे वैयक्तिक पातळीवर आचार्य ठरवत असत.

तक्षशिला येथे शिकवल्या जाणाऱ्या विषयांमध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, वेदांगे, प्राचीन परंपरा आणि नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, गणित, संगीत, वैद्यक, पुराण, इतिहास, अस्त्रविद्या, काव्य यांसारख्या अनेक विषयांचा समावेश होता.

चंद्रगुप्त मौर्य वयाने लहान असताना आचार्य चाणक्यांनी त्याला शिक्षणासाठी तक्षशिला येथे नेले, असे समजले जाते. चाणक्य स्वतः तक्षशिलेचे रहिवासी होते. सम्राटपदी आल्यानंतर चंद्रगुप्त मौर्याने तक्षशिला येथे प्रादेशिक राजधानी स्थापन केली. सम्राट अशोकाच्या काळात तक्षशिला हे बौद्ध परंपरेच्या शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र बनले.

ग्रीक, शक, कुशाण यांच्या आक्रमणांच्या काळातही तक्षशिला येथील शिक्षणपद्धतीवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही. परंतु इसवी सनाच्या पाचव्या शतकात हूणांच्या आक्रमणामुळे तक्षशिला नगराचे विद्यावैभव हळूहळू नष्ट होत गेले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

### ७.६ सिकंदराची स्वारी

सिकंदराने भारतावर स्वारी केली. परंतु तो जिंकलेल्या प्रदेशांवर दीर्घकालीन सत्ता प्रस्थापित करू शकला नाही. त्याच्या स्वारीसंबंधीची माहिती प्रामुख्याने एरियन, कर्टिस, डिओडोरस, प्लुटार्क आणि जस्टिन या ग्रीक इतिहासकारांच्या लेखनातून मिळते.

सिकंदराच्या स्वारीच्या वेळेस अखमोनीय साम्राज्याची सिंध, पंजाब आणि अफगाणिस्तान या प्रदेशांवरील सत्ता कमकुवत झाल्यामुळे तिथे छोटी छोटी राज्ये उदयाला आली होती. त्यांच्या आपापसातील संघर्षामुळे सिकंदराच्या विरोधात त्यांची एकसंध फळी उभी राहिली नाही.

सिकंदर इसवी सनापूर्वी ३३४ मध्ये मॅसिडोनियाचा राजा झाला. इसवी सनापूर्वी ३३१ मध्ये अखमोनीय सम्राट तिसरा दार्युश याचा त्याने पराभव केला. त्यानंतर त्याने इराणच्या 'शिस्तान' प्रांतापर्यंत मजल मारली आणि तेथून काबूलकडे मोर्चा वळवला. काबूलच्या आसपासचा प्रदेश जिंकून घेतल्यानंतर तो हिंदुकुश पर्वताच्या पायथ्याच्या प्रदेशात आला. तेथून नाइकिया (Nicaea) नावाच्या ठिकाणी त्याने तळ ठोकला. हे नाइकिया उत्तरापथावर वसलेले होते.

नाइकिया इथे सिकंदर आणि तक्षशिलेचा राजा आंभी यांची भेट झाली. आंभीने सिकंदराचे स्वागत करून त्याच्याशी हातमिळवणी केली. शिसिकोट्टस (शशीगुप्त) नावाचा दुसरा एक राजा सिकंदराला स्वतःहून शरण आला. परंतु सर्वच भारतीय राज्यांनी सहजपणे शरणागती स्वीकारली नाही. काहींनी सिकंदराशी निकराचा सामना केला. या मोहिमेत सिकंदराने काबूल, सिंध आणि पंजाबमधील बहुतेक राज्ये जिंकून घेतली.

झेलम नदीच्या तीरावर सिकंदर आणि राजा पुरू (पोरस) यांच्यामध्ये अत्यंत निकराची लढाई झाली. या लढाईत पुरुचा पराभव झाला तरी त्याच्या पराक्रमाने सिकंदर आणि त्याचे सैन्य अत्यंत प्रभावित झाले. पुरुच्या सैन्यातील हत्तींचा वापर हा ग्रीकांसाठी नवीन होता. हत्तींची फळी फोडणे हे त्यांच्यासाठी एक मोठे आव्हान ठरले. ग्रीक इतिहासकारांनी पुरुच्या युद्धकौशल्याचे आणि धीरोदात्ततेचे कौतुक एकमुखाने केले आहे.

त्यापुढील वाटेत सिकंदर निसा नावाच्या एका ग्रीक वसाहतीपाशी पोचला. निसाच्या लोकांनी सुरुवातीला सिकंदराला विरोध केला तरी नंतर त्यांनी त्याचे स्वागत केले. त्यानंतर सिकंदर चिनाब आणि रावी नद्यांच्या दिशेने पुढे जात राहिला. तेथील राज्यांवर विजय मिळवत सिकंदर बियास नदीपर्यंत पोचला. तिथे पोचेपर्यंत सिकंदराच्या सैनिकांची उमेद संपत आली होती. त्यांनी

**अधिक माहितीसाठी :** बिहार ते अफगाणिस्तानपर्यंतच्या प्रदेशांना जोडणारा हमरस्ता, आधुनिक काळात 'ग्रँड ट्रंक रोड' या नावाने ओळखला जातो. व्यापारी मार्ग म्हणून गौतम बुद्धांपूर्वीच्या काळातही तो उपयोगात होता. 'उत्तरापथ' या नावाने तो ओळखला जाई. बंगालमधील 'ताम्रलिप्ती' (आधुनिक 'तामलुक') बंदरापासून सुरुवात होऊन तक्षशिला नगरापाशी त्याचा शेवट होत असे. सम्राट चंद्रगुप्त मौर्याने त्याची सुव्यवस्थित बांधणी केली. हा हमरस्ता जवळपास ३२०० किलोमीटर लांबीचा आहे.

सम्राट अशोकाने या हमरस्त्यावर व्यापारी आणि प्रवासी यांच्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा झाडे, मुक्कामाच्या सोईसाठी धर्मशाळा यांसारख्या अनेक सोई केल्या आणि मोक्याच्या ठिकाणी स्तंभलेख उभारले.

नंतर शेरशाह सूर आणि बादशाह अकबर या दोन सत्ताधीशांनी या हमरस्त्याचे नूतनीकरण केले. त्यानंतर ब्रिटिशांच्या काळात कोलकाता ते पेशावर हा ग्रँड ट्रंक रोडच्या बाजूने जाणारा नवीन डांबरी रस्ता बांधण्यात आला.

आधुनिक काळात हा रस्ता बांगलादेश, हावडापासून पश्चिम बंगाल, नंतर दिल्लीहून अमृतसरपर्यंत, तेथून लाहोर आणि पेशावरकडे व शेवटी काबूल येथे संपतो.


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पुढे जाण्यास नकार दिला. सिकंदराला परत जाणे भाग पडले.

परतण्यापूर्वी सिकंदराने पुरुकडे पंजाबमधील प्रदेशांचे आणि आंभीकडे सिंधमधील प्रदेशांचे आधिपत्य सोपवले. वारणावतीचा राजा अभिसार याच्या हाती त्याने काश्मीरचे राज्य सोपवले. परतीच्या वाटेवर त्याने शिबी, मल्ल इत्यादी राज्यांचा पाडाव केला. इतर प्रदेशांमध्ये त्याने ग्रीक सत्रपांची नेमणूक केली. ग्रीसकडे परतत असताना इसवी सनापूर्वी ३२५ मध्ये तो बॅबिलोन येथे मरण पावला.

सिकंदराच्या स्वारीचे भारताच्या राजकीय पटावर फारसे दूरगामी परिणाम झाले नाहीत. त्याच्या मृत्यूनंतर थोड्याच अवधीत चंद्रगुप्त मौर्याने बिहार ते अफगाणिस्तान अशा विशाल भूप्रदेशावर मगधाचे साम्राज्य प्रस्थापित केले आणि भारताच्या इतिहासाला वेगळे वळण लागले.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. इतिहासलेखनाचा जनक .................. यांना मानले जाते.
   (अ) हिरोडोटस (ब) अलेक्झांडर
   (क) स्कायलॅक्स (ड) दार्युश

२. सिकंदराच्या स्वारीच्या वेळेस तक्षशिला येथे .................. नावाचा राजा राज्य करत होता.
   (अ) चंद्रगुप्त (ब) आंभी
   (क) पुरु (ड) शशिगुप्त

३. सम्राट अशोकाचे लेख .................. लिपीत कोरलेले आहेत.
   (अ) सिंहल (ब) अरेमाइक
   (क) खरोष्ठी (ड) मोडी

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. पर्सिपोलिस – पहिला दार्युश याने वसवलेले शहर
२. हेलिकारनॅसस – या नगरराज्यात हिरोडोटसचा जन्म झाला
३. तक्षशिला – विद्येचे व शिक्षणाचे केंद्र
४. निसा – पर्शियन वसाहत

**(क) नावे लिहा.**

१. अखमोनीय साम्राज्याचा शेवटचा सम्राट
२. पहिल्या दार्युशने पाडलेल्या नाण्यांची नावे

**प्र.२ गटात न बसणारा शब्द ओळखा.**

पहिला दार्युश, झेरेक्सेस, दुसरा सायरस, सिकंदर

**प्र.३ घटना कालानुक्रमे लिहा.**

१. सिकंदर व पुरु यांच्यात निकराची लढाई झाली.
२. सिकंदराने सत्रपांची नेमणूक करून परतीचा मार्ग धरला.
३. इ.स.पूर्व ३२५ मध्ये बॅबिलॉन येथे सिकंदरचा मृत्यू झाला
४. सिकंदराने काबूल, सिंध जिंकले.

**प्र.४ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सम्राट सिकंदराने पर्शियावर स्वारी केली.
२. सिकंदराच्या स्वारीचे भारताच्या राजकीय पटावर फारसे दूरगामी परिणाम झाले नाहीत.

**प्र.५ तुमचे मत नोंदवा.**

१. हिरोडोटसला इतिहासलेखनाचा जनक मानले जाते.
२. प्राचीन काळी तक्षशिला हे विद्येचे व शिक्षणाचे केंद्र होते.

**प्र.६ सविस्तर उत्तरे लिहा.**

१. पर्शियन सत्तेचे भारतावरील राजकीय व सांस्कृतिक परिणाम स्पष्ट करा.
२. सिकंदराच्या स्वारीचे वर्णन करा.

**उपक्रम**

आंतरजालाच्या साहाय्याने पर्सिपोलिस येथील राजवाडा आणि सुसा येथील अपादान यांची अधिक माहिती संग्रहित करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ८. मौर्यकालीन भारत


८.१ मगध साम्राज्याचा उदय
८.२ नंद आणि मौर्य साम्राज्य
८.३ सम्राट अशोक
८.४ राज्यव्यवस्था, व्यापार, साहित्य, कला आणि समाजजीवन


भारतात अस्तित्वात असलेल्या सोळा महाजनपदांचा इतिहास आपण सहाव्या पाठात पाहिला. या महाजनपदांपैकी काशी, कोसल, अवंती आणि मगध या चार महाजनपदांमधील संघर्षात मगधाची राजसत्ता प्रबळ होत गेली आणि मगधाचे साम्राज्य उदयाला आले.

या काळात भारतातील पहिले साम्राज्य उदयाला आले. राज्याला साम्राज्याचे स्वरूप आले. या साम्राज्यांची प्रशासनव्यवस्था अधिक विकसित आणि विविध विभागांच्या द्‌वारे कार्य करणारी होती. साम्राज्याच्या अस्तित्वासाठी अनेक घटक आवश्यक असतात. उदाहरणार्थ, विस्तृत भूप्रदेशावर सत्ता, कररूपाने जमा होणाऱ्या महसुलाची व्यवस्था पाहणारी प्रशासन यंत्रणा, सम्राटाच्या हाती सर्व सत्ता केंद्रित असते आणि त्याच्या अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी सैन्य कार्यरत असते.

धर्मविधींचे उपयोजन सम्राटाच्या सत्तेला पुष्टी देण्यासाठी केले जाते. सत्ताधारी कुलांमध्ये सत्ता आणि तत्संबंधीचे अधिकार एकवटले जातात.

### ८.१ मगध साम्राज्याचा उदय

प्राचीन भारतात जी महाजनपदे होती त्यांमध्ये मगध हे एक महत्त्वाचे राज्य होते. सुपीक व समृद्‌ध जमीन, बारमाही वाहणाऱ्या नद्या, नौकानयनाची उत्कृष्ट सोय, व्यापारी बाजारपेठ इत्यादी कारणांमुळे मगध राज्य बलवान होत गेले.

इ.स.पू.सहाव्या शतकात मगधावर हर्यंक नावाच्या राजघराण्याची सत्ता होती. महाभारतात हर्यंक घराण्याचा उल्लेख येतो. बिंबिसार हा या घराण्यातील पहिला प्रसिद्‌ध राजा होय. त्याचे वडील महापद्‌म यांनी गिरिव्रज हा दुर्ग बांधून मगधाची पहिली राजधानी स्थापन केली. बिंबिसार गादीवर आल्यानंतर त्याने मगध साम्राज्याचा पाया रचण्यास सुरुवात केली. शेजारच्या अंग राज्यावर आक्रमण करून ते जिंकून घेतले. या विजयाने मगधाचे सामर्थ्य वाढले. बिंबिसाराने कोसल, लिच्छवी, विदेह, मद्र अशा अनेक राजघराण्यांशी वैवाहिक संबंध जोडून त्या जोरावर आपले विस्तारवादी धोरण पुढे नेले. गिरिव्रज दुर्गाच्या पायथ्याशी त्याने राजगृह ही नवी राजधानी स्थापन केली.

> **ही माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :**
>
> प्राचीन भारतातील राज्यसत्तेच्या संकल्पनांमध्ये 'चक्रवर्ती' या संकल्पनेचा समावेश आहे. ज्या सार्वभौम राजाचा रथ चारी दिशांना कोणत्याही अडथळ्यांशिवाय जाऊ शकतो, तो सार्वभौम राजा चक्रवर्ती असतो. त्याची सत्ता नैतिक अधिष्ठान असलेली आणि कल्याणकारी असावी, असे अपेक्षित असे. त्याची अधिसत्ता विस्तृत प्रदेशावर असते. चंद्रगुप्त मौर्य हा पहिला चक्रवर्ती सम्राट होय.

बिंबिसाराची हत्या करून त्याचा मुलगा अजातशत्रू गादीवर आला. त्याने पित्याचे विस्तारवादी धोरण अवलंबले. त्याने मगधाचे राज्य विंध्य पर्वताच्या पायथ्यापर्यंत विस्तारले. अजातशत्रूने गंगेच्या काठावर पाटलीग्राम येथे एक छोटा दुर्ग बांधला. स्थानिक उत्पादनाच्या खरेदी-विक्रीचे ते एक केंद्र बनले. पुढील काळात हेच पाटलीग्राम 'पाटलिपुत्र' या नावाने ओळखले जाऊ लागले. ते मौर्य साम्राज्याची राजधानी बनले.

नंतर जनतेने अजातशत्रूला पदच्युत करून शिशुनाग या त्याच्या मंत्र्याला राजा म्हणून निवडले. शिशुनाग घराण्याने इसवी सन पूर्व ४३० ते ३६४ या काळात



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

राज्य केले व त्यानंतर महापद्मानंद याने मगधाची गादी बळकावली व नंदवंशाची स्थापना केली.

**सहज जाता जाता :** पाटलिपुत्र हे प्राचीन काळातील महत्वाचे नगर होते. पाटलिपुत्र हे शहर प्राचीन भारतातील शिशुनाग, नंद, मौर्य, गुप्त आणि पाल या राजसत्तांची राजधानी होते. 'पाटली' हा एक भाताचा प्रकार आहे, ज्याचे पीक या प्रांतात घेतले जात असे. त्यामुळेच या शहराला पाटलिपुत्र किंवा पाटलीग्राम असे नाव पडले असावे. मेगॅस्थिनिसच्या इंडिका या ग्रंथात पाटलिपुत्र या नगराचा उल्लेख 'पालीबोथरा' असा केला आहे.

मगधाचा विकास होण्यामागे राजकीय स्थैर्य आणि इतर बाबी देखील कारणीभूत होत्या. गंगानदीच्या खोऱ्यात सर्व मोक्याच्या ठिकाणी मगधाचे नियंत्रण होते. अंग राज्य जिंकल्यामुळे भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेश त्यांच्या ताब्यात आला आणि दूरवरच्या प्रदेशांशी व्यापार वाढवण्यात मगधाला यश मिळाले. मगधाला नैसर्गिक साधनसंपत्तीचे वरदान लाभले होते. विशेषतः भातशेतीसाठी उपयुक्त सुपीक जमीन लाभली होती. साम्राज्य विस्तारामुळे महसुलात भर पडली. जंगलातून मिळणारे लाकूड, हस्तिदंत, लोखंड, तांबे यांचे स्रोत विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे प्रादेशिक उद्योगांना चालना मिळाली. राजकीय महत्वाकांक्षेच्या बरोबरीनेच धनधान्याची व व्यापाराची सुबत्ता ही मगध राज्यसत्तेच्या विकासासाठी आणि बलाढ्य साम्राज्यसत्ता स्थापनेसाठी कारणीभूत ठरलेली दिसते.

## ८.२ नंद आणि मौर्य साम्राज्य

**नंद घराणे :** पुराण ग्रंथांमध्ये नंद घराण्याचे वर्णन केलेले आहे. अजातशत्रूच्या काळात विस्तारलेले मगधाचे साम्राज्य महापद्माने अधिक विस्तारित केले. काही विद्वानांच्या मते नंदांचे राज्य दक्षिणेत नांदेडपर्यंत होते तर काहींच्या मते म्हैसूरपर्यंत. यावरून महापद्मानंद हा भारताचा महान सम्राट होता असे म्हणता येईल. धनानंद हा नंद वंशातला शेवटचा राजा. त्याच्या काळात राज्याचा खजिना अत्यंत समृद्ध होता. त्याचे लष्करी सामर्थ्य देखील प्रचंड होते. त्याच्या लष्करात २,००,००० पायदळ, ६०,००० घोडदळ, ६००० लढाऊ हत्ती आणि २००० रथ होते.

नंदांच्या काळात मध्यवर्ती सत्तेच्या दृढीकरणास साहाय्यभूत ठरलेला आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे महसुलासाठी कर पद्धतीला दिलेले महत्त्व. साम्राज्य विस्ताराबरोबर आर्थिकदृष्ट्या राज्याची भरभराट होऊ लागली. राज्याचा खजिना सदैव भरलेला असे. नंदांनी कालवे बांधले आणि जलसिंचनाची व्यवस्था केली. शेतीच्या विकासासाठी शासनाकडून अशा प्रकारच्या जलसिंचनाच्या सोई होणे महत्वाचे होते, तसेच त्या मार्गे व्यापारही चालत असे. चंद्रगुप्त मौर्याने इसवी सनापूर्वी ३२१ मध्ये पाटलिपुत्रावर आक्रमण करून नंदांची सत्ता संपुष्टात आणली.

**मौर्य साम्राज्य :** मौर्य साम्राज्य म्हणजे भारताच्या इतिहासातील सुसंघटीत व सुनियंत्रित असे पहिलेच साम्राज्य. धार्मिक ग्रंथ व इतर साहित्य, कोरीव लेख, नाणी, शिल्पे इत्यादी साधनांच्या साहाय्याने या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थिती अधिक स्पष्ट होते.

मौर्यांचे साम्राज्य भारतीय उपखंडाच्या मोठ्या भूभागावर पसरलेले होते व त्याचे नियंत्रण एकाच सत्तेकडून होत होते. या सत्तेकडून राजकीय व्यवस्थेमध्ये एकसूत्रता आणली गेली.

चंद्रगुप्त मौर्याने नंदांचा पराभव केला व मौर्य घराण्याची स्थापना केली. चंद्रगुप्त मौर्य याला 'महावंश' या ग्रंथात 'तो जंबुद्विपाचा म्हणजे भारतवर्षाचा सम्राट होता' असे म्हटले आहे. वायव्येकडील, उत्तरेकडील आणि दक्षिणेतील अनेक लहान-मोठी राज्ये जिंकून मौर्यांनी एक बलाढ्य राज्यसत्ता निर्माण केली. चंद्रगुप्ताचे ग्रीक राजा सेल्युकसशी झालेले युद्ध अत्यंत महत्वाचे होते. कारण त्याचा परिणाम म्हणजे मौर्य साम्राज्याची सीमा वायव्येकडे हिंदुकुश पर्वतापर्यंत पोहचली. मौर्यांचे साम्राज्य वायव्येकडे हिंदुकुश, पूर्वेकडे बंगालचा उपसागर व पश्चिमेकडे गुजरात, तसेच उत्तरेला हिमालय ते दक्षिणेला कृष्णा नदीपर्यंत विस्तारलेले होते.

इ.स.पू.२९८ च्या सुमारास चंद्रगुप्ताचे निधन झाले. त्याच्यानंतर त्याचा पुत्र बिंदुसार गादीवर आला. त्याच्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




कारकिर्दीत तक्षशिलेच्या प्रजाजनांनी केलेले बंड त्याने आपला पुत्र अशोक यास पाठवून शमवले. बिंदुसाराच्या कारकिर्दीत चंद्रगुप्त मौर्याने स्थापन केलेले साम्राज्य अबाधित राहिले. इ.स.पू.२७३ साली बिंदुसाराचा मृत्यू झाला.

### ८.३ सम्राट अशोक

बिंदुसाराच्या मृत्यूनंतर अशोक मौर्य साम्राज्याचा सम्राट बनला. इ.स.पू.२६८ साली त्याने राज्याभिषेक करवून घेतला. त्याने 'देवानं पियो पियदसी' (देवांचा प्रिय प्रियदर्शी) असा स्वतःचा उल्लेख त्याच्या अनेक शिलालेख व स्तंभलेखांतून केलेला आहे.

राजवटीच्या प्रारंभी सम्राट अशोकाचे धोरण पूर्वजांप्रमाणे दिग्विजयाचे आणि राज्यविस्ताराचे होते. त्याने कलिंगवर आक्रमण करून ते जिंकून घेतले. अशोकाचा कलिंगविजय इतिहासाला आणि त्याच्या जीवनाला निराळे वळण लावणारा ठरला. या युद्धात



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**हे माहीत असायला हवे :**

**अशोकाचे शिलालेख आणि स्तंभलेख :** अफगाणिस्तान, नेपाळ आणि भारत या प्रदेशांमध्ये सगळीकडे अशोकाचे शिलालेख आणि स्तंभलेख विखुरलेले आहेत. सम्राट अशोकाचा मीरतमध्ये असलेला स्तंभलेख इसवी सन १७५० मध्ये पेड्रोटिफेन-थेलरने शोधून काढला. अशोकाचे लेख ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. इसवी सन १८३७ साली जेम्स प्रिन्सेप याने आलेखातील ब्राह्मी लिपीचे वाचन केले. अशोकाचे शिलालेख अशोकाच्या कारकिर्दीच्या इतिहासाची अतिशय महत्वाची साधने आहेत. त्याच्या आधारे मौर्य साम्राज्याच्या सीमा निश्चित करणे शक्य होते. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी अशोकाने केलेल्या कामगिरीचे वर्णन यातून मिळते. बौद्ध धर्माची दीक्षा घेतली असली तरी आपल्या प्रजाजनांवर बौद्ध धर्म सक्तीने लादण्याचा प्रयत्न अशोकाने कधीच केला नाही. परदेशात बौद्ध धर्म आणि भारतीय संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी अशोकाने बौद्ध भिक्खूंना पाठवल्याचा लेखी पुरावा या शिलालेखांतून मिळतो. त्यामध्ये सम्राट अशोकाचा पुत्र महिंद (महेंद्र) आणि कन्या संघमित्ता (संघमित्रा) यांचा समावेश होता.

प्रचंड मनुष्यहानी झाली. अशोकाचा विजय झाला. कलिंगविजयाच्या प्रसंगी झालेल्या विनाशाने त्याच्या मनात परिवर्तन घडवून आणले. अहिंसाप्रधान, शांतीवादी बौद्ध धर्माकडे त्याचे मन वेधले गेले. दिग्विजयाची जागा धर्मविजयाने (धम्मविजय) घेतली. त्याने जगासमोर ठेवलेल्या धार्मिक आदर्शामुळे आणि तो व्यवहारात उतरवण्यासाठी निर्माण केलेल्या यंत्रणेमुळेच त्याची कारकीर्द महत्त्वाची ठरली.

धम्मविजयाच्या अंमलबजावणीसाठी अशोकाने काही नव्या गोष्टींचा अवलंब केला. उदा., धर्ममहामात्रांची नेमणूक, मद्यपान बंदी, नैतिक आचरणासंबंधीचे आदेश इत्यादी. नैतिक तत्त्वांचे अधिष्ठान प्राप्त झालेला सदाचारसंपन्न व्यवहार म्हणजेच अशोकाचा धर्म होय.

**ही माहिती तुम्हांला निश्चितच आवडेल :**

महाराष्ट्रात मौर्य साम्राज्याचा विस्तार इसवी सनापूर्वी ३२१ ते १८१ या काळात झाला. मौर्य गुजरातकडून सोपाऱ्यात आले असावेत. सोपारा हे प्राचीन प्रसिद्ध बंदर उत्तर कोकणात आहे. सोपारा आणि चौल (चंपावती) ही भरभराटीला आलेली व्यापारी केंद्रे आणि बौद्ध धर्माची अभ्यासपीठे होती. भगवानलाल इंद्रजींनी, 'बरुडा राजाचा कोट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, सोपाऱ्याच्या स्तूपाचे उत्खनन केले. या उत्खननात अशोकाच्या लेखाचा एक तुटलेला भाग मिळाला. अशोकाच्या १४ स्तंभलेखांपैकी तो आठवा स्तंभलेख होता. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या वस्तुसंग्रहालयात यांतील काही अवशेष ठेवले आहेत. ९वा स्तंभलेख भुईगाव नावाच्या गावात सापडला. त्याचे अवशेष मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आले आहेत.



नालासोपारा येथील स्तूपाचे अवशेष

धर्माचा प्रसार करण्यासाठी त्याने संघ बनवले आणि त्यांना देशोदेशी रवाना केले.

भगवान बुद्धांच्या निर्वाणानंतर राजगृह येथे बौद्ध धर्माची पहिली परिषद भरली होती. कालाशोक राजाने वैशाली येथे दुसरी परिषद भरवली. राजधानी पाटलिपुत्र येथे अशोकाने बौद्ध धर्माची तिसरी परिषद भरवली.

अशोकाच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेले मौर्य राजे सक्षम नव्हते. त्यामुळे मौर्य साम्राज्याचा ऱ्हास सुरू झाला. बृहद्रथ हा मौर्य घराण्याचा शेवटचा राजा होता. पुष्यमित्र या त्याच्या सेनापतीने त्याची हत्या केली आणि तो सत्तेवर आला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**महत्त्वाची माहिती :** अशोकाच्या शिलालेखांतून पश्चिमेकडील जगातील त्याच्या अनेक समकालीन राजांचा उल्लेख होतो. एका शिलालेखातील उताऱ्यातून ग्रीक राजा अंतियोक आणि अंतियोकाच्या राज्यापलीकडील प्रदेशातील चार ग्रीक राजे तुलमाय, अंतेकिना, मक आणि अलिकसुंदर या राजांची ओळख पटली आहे. ते म्हणजे सिरीयाचा अँटीओकस दुसरा थिओस (इ.स.पू.२६०-२४६); इजिप्तचा टॉलेमी दुसरा फिलाडेल्फस (इ.स.पू.२८५-२४७); मॅसिडोनियाचा अँटिगोनस गोनेटस (इ.स.पू.२७६-२३९); सायरिनचा मगस आणि एपिरसचा अलेक्झांडर. हा उतारा प्राचीन भारतीय इतिहासाचा कालानुक्रम जुळवण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा दुवा आहे.

## ८.४ राज्यव्यवस्था, व्यापार, साहित्य, कला आणि समाजजीवन

### राज्यव्यवस्था

मौर्यकालीन राज्यव्यवस्थेचे स्वरूप कौटिल्याचे 'अर्थशास्त्र', मेगॅस्थिनिसचे 'इंडिका' या दोन ग्रंथांमधून आणि सम्राट अशोकाच्या शिलालेखांवरून स्पष्ट होते. चंद्रगुप्त मौर्य पराक्रमी राजा आणि अत्यंत कुशल शासनकर्ता होता. त्याने एक सुनियंत्रित यंत्रणा उभी केली. तत्कालीन आर्थिक स्थिती व मौर्य काळाच्या गरजा यांतून मौर्य प्रशासनाला सुनिश्चित स्वरूप प्राप्त झाले होते. मौर्य सम्राटांनी एकछत्री साम्राज्य व्यवस्था निर्माण केली होती. त्याचबरोबर साम्राज्याच्या विस्तारलेल्या सीमा लक्षात घेता प्रशासनसत्तेचे विकेंद्रीकरण देखील त्यांनी स्वीकारले. साम्राज्याच्या प्रशासनात राजाला सल्ला देण्यासाठी बुद्धिमान, अनुभवी, चारित्र्यवान आणि निःस्वार्थी मंत्र्यांची परिषद असे. दैनंदिन राज्यकारभारासाठी त्यांतील काही मंत्र्यांची समिती असे, ज्यास 'मंत्रणा' असे संबोधले जाई. प्रशासनाची विविध खाती निर्माण करून त्यावर अनुभवी व तज्ज्ञ अधिकारी वर्ग नेमून मौर्यांनी प्रशासनाची स्थिर चौकट निर्माण केलेली दिसून येते. या अधिकाऱ्यांना अमात्य असे म्हणत. प्रधान, समाहर्ता (महसूल), सन्निधाता (अर्थ), सेनापती, युवराज यांसारख्या एकूण १८ अमात्यांचा उल्लेख अर्थशास्त्रात आढळतो. कौटिल्याने तीस प्रशासकीय विभागांची माहिती दिलेली आढळते. मौर्य साम्राज्यातील अधिकारांच्या उतरंडीची रचना, 'सम्राट' या पदापासून सुरुवात होऊन 'ग्रामणी' या शेवटच्या पदापर्यंत केलेली होती. प्रजाजनांना स्थानिक पातळीवर अंतर्गत कारभारात बऱ्याच प्रमाणात स्वायत्तता दिलेली होती. अशा प्रकारे मौर्य राज्य प्रशासनाचे विकेंद्रीकरण झालेले होते. मौर्य प्रशासनाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रजेची भौतिक व नैतिक अशी सर्वांगीण प्रगती होण्यासाठी केला गेलेला प्रयत्न. मुलकी आणि लष्करी क्षेत्रे एकमेकांपासून स्वतंत्र ठेवणे, स्वतंत्र न्यायव्यवस्था निर्माण करणे, अधिकाऱ्यांना विशिष्ट वेतनपद्धती लागू करणे, राज्यातील व्यापारावर नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबींमुळे मौर्य राज्यव्यवस्थेची प्रशंसा केली जाते.

### व्यापार

सुव्यवस्थित करप्रणालीमुळे महसुलात वाढ झाली. त्यापैकी 'बळी' हा लागवडीखालील जमिनीच्या प्रमाणात द्यायचा कर होता. 'भाग' हा उत्पन्नातील कराचा वाटा होता. शेतजमीन आणि शेतीचे उत्पादन यातून मिळणारा कर हा राज्यव्यवस्थेचा मूलभूत पाया होता. त्याखेरीज या काळात उद्योगांनाही चालना मिळाली. कापडनिर्मिती हा सर्वांत महत्त्वाचा उद्योग होता. याशिवाय धातुकाम, लाकूडकाम, हस्तिदंतावरील कलाकुसर, सूतकताई, विणकाम असे अनेक व्यवसाय चालू होते. समृद्ध शेती आणि भरभराटीस आलेले अनेक उद्योगधंदे यांमुळे अंतर्गत आणि परदेशी व्यापारही भरभराटीस आला होता. भूमार्ग व जलमार्ग यांमधून अंतर्गत व्यापार चालत असे. अनेक राजमार्ग आणि व्यापारी मार्ग या काळात निर्माण केले गेले. पाटलिपुत्र ते तक्षशिला, पाटलिपुत्र ते काशी-उज्जयिनी, पाटलिपुत्र ते ताम्रलिप्ती असे अनेक प्रमुख मार्ग अस्तित्वात आले.

लोखंडाचा वाढता वापर तसेच लोखंडी अवजारांमधील वाढते वैविध्य, रंगवलेली मातीची भांडी आणि दक्षिण भारतापर्यंतचे त्यांचे वितरण हे व्यापाराच्या विस्ताराचे एक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

निर्देशन आहे. भारताच्या किनारपट्टीवरील भरुच, रोरूक (रोडी), सोपारा व ताम्रलिप्ती अशी अनेक बंदरे व्यापारासाठी प्रसिद्ध होती. भारताचा ग्रीस, रोम, इजिप्त, सीरिया, बॅक्ट्रिया, श्रीलंका इत्यादी देशांशी व्यापार मोठ्या प्रमाणावर होत असे. भारतामधून या देशांकडे सुती व रेशमी कापड, क्षौम (लिनन), जरीची वस्त्रे, मसाले, हिरे, हस्तिदंत, सुगंधी द्रव्य इत्यादी वस्तू निर्यात केल्या जात. काचसामान, कापड रंगवण्याचे विविध रंग इत्यादींची आयात केली जाई. मालाच्या उत्पादनावर तसेच त्याच्या आयात निर्यातीवर सरकार कर वसूल करत असे. तत्कालीन साधनात 'वर्तनी' नावाच्या वाहतुकीच्या कराचा आणि 'शुल्क' नावाच्या जकातकराचा उल्लेख आढळतो. याच्या मोबदल्यात सरकार मालाच्या संरक्षणाची जबाबदारी घेत असे. व्यापारी तांड्यांचे संरक्षण करण्यासाठी 'चोररज्जूक' आणि 'सीमास्वामी' असे अधिकारी सरकारने नेमले होते.

### साहित्य

साहित्यामधून लोकांच्या विचारसरणीची आणि राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते. मौर्य काळात संस्कृत भाषेतील साहित्य निर्मितीबरोबरच पाली आणि अर्धमागधी या प्राकृत भाषेतील साहित्याचा प्रवाह देखील दिसून येतो. जैन व बौद्ध धर्मप्रसारासाठी प्राकृत भाषेत साहित्यनिर्मिती झाली. यांत प्रामुख्याने पाली, अर्धमागधी, मागधी, शूरसेनी, माहाराष्ट्री इत्यादी प्राकृत भाषांचा वापर केला गेला. पाणिनीचा 'अष्टाध्यायी' हा जगप्रसिद्ध ग्रंथ याच काळात रचला गेला. संस्कृत साहित्यातील श्रेष्ठ नाटककार भास याने 'स्वप्नवासवदत्तम' यासह तेरा नाटके लिहिली. या काळातील सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' हा होय. हा ग्रंथ १५ विभागात असून त्यामध्ये एकूण १८० प्रकरणे आहेत. अर्थशास्त्रात राजापासून गणिकांपर्यंत आणि राजनीतिपासून युद्धनीतिपर्यंत अनेक विषयांची चर्चा केलेली आढळते.

मौर्यकाळात संस्कृतबरोबर प्राकृत भाषेत विपुल ग्रंथसंपत्ती निर्माण झाली. विशेषतः सम्राट अशोकाने आपली आज्ञापत्रे प्राकृत भाषांमध्येच शिलांवर व स्तंभांवर कोरलेली आढळतात. बौद्ध साहित्यातील सुप्रसिद्ध 'तिपिटक' ग्रंथांचे संपादन याच काळात झाले. तिपिटकांपैकी 'अभिधम्मपिटक' हा ग्रंथ तिसऱ्या बौद्ध परिषदेनंतर रचला गेला.

हा काळ जैन साहित्याच्या दृष्टीने समृद्ध होता. 'दशवैकालिक', 'उपासकदशांग, 'आचाररंगसूत्र', 'भगवतीसूत्र' इत्यादी प्रसिद्ध जैन ग्रंथ याच काळात रचले गेले.

### कला आणि स्थापत्य

मौर्य राज्याच्या स्थापनेनंतर देशात सुख, शांती, समृद्धी आणि सुव्यवस्था नांदू लागली होती. मौर्यकालीन कला म्हणजे प्राचीन ऐतिहासिक काळातील स्थापत्य आणि शिल्पकलेचा प्रारंभ होय.



दिदारगंज येथील प्रसिद्ध चौरीधारिणीची मूर्ती

मौर्यकाळात दगड घडवणे आणि कोरणे यांत कारागिरांनी लक्षणीय नैपुण्य संपादन केलेले होते असे दिसते. दोन्हींतही एका विशिष्ट कलेची अभिव्यक्ती आणि दगड घडवल्यानंतर त्याला आरसी गुळगुळीतपणा आणण्याचे तंत्र यातील नैपुण्यही दिसते. यालाच मौर्यकालीन 'घोटाई' म्हणतात. या काळात घडवलेल्या यक्ष व यक्षी यांच्या मूर्ती सापडलेल्या आहेत. विशेषतः यक्षींच्या मूर्ती सुंदर व सुबक आहेत. दिदारगंज येथील प्रसिद्ध चौरीधारिणी मूर्तीचा समावेश त्यांमध्ये केला जातो. या काळात घडवलेल्या पारखम येथील यक्षमूर्ती व बेसनगर आणि पाटणा येथे मिळालेल्या स्त्री प्रतिमा मथुरा वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केलेल्या आहेत.

सम्राट अशोकाचे स्तंभ आणि त्यावरील शिल्पाकृती हे मौर्यकाळातील उत्कृष्ट शिल्पाचे नमुने आहेत. रामपूर्वा आणि लौरीया नंदनगड येथील स्तंभशीर्षावर सिंहाच्या शिल्पाकृती आहेत. सांकिशा येथील स्तंभशीर्षावर हत्तीची शिल्पाकृती आहे. सारनाथ येथील स्तंभशीर्षावर चार सिंहांच्या शिल्पाकृती आहेत. चार सिंहाचे हे शिल्प भारताचे 'राष्ट्रीय बोधचिन्ह' आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मौर्यकालीन स्थापत्यामध्ये कोरीव लेण्यांची सुरुवात झाली. मौर्यकालीन बराबार आणि नागार्जुनी टेकड्यांवरील कोरीव लेण्यांची कालनिश्चिती करता येते. अशा प्रकारची ही भारतातील पहिली कोरीव लेणी.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

या काळात कलावस्तू निर्माण करणाऱ्यांच्या संदर्भात 'विष्टी' ही संज्ञा वापरली गेली आहे. 'विष्टी' म्हणजे प्रजाजनांनी श्रमरूपाने दिलेला कर होता. विष्टीद्वारे कारागीर सरकारला विशिष्ट रकमेइतके परिश्रम विनावेतन देत असे.

पाटलिपुत्र येथे चंद्रगुप्ताचा एक अतिभव्य प्रासाद होता. मेगॅस्थिनिस इराणची राजधानी सुसा येथील राजप्रासादाशी त्याची तुलना करतो. विटांच्या उंच भिंतींचे तट त्या प्रासादाच्या संरक्षणार्थ बांधले होते व आतील बाजूस अनेक इमारती होत्या. त्या इमारतींचे बांधकाम दगडी होते. इमारतींच्या आत स्तंभ उभारले होते. त्यामध्ये लाकडाचाही उपयोग केलेला होता. चिनी प्रवासी फाहियानने याचे वर्णन केलेले आहे. कलाक्षेत्राला दिलेली अप्रतिम देणगी म्हणजे मौर्यकालीन एकसंध भव्य स्तंभ. धर्मप्रसारासाठी अशोकाच्या काळात अनेक स्तंभ उभारले गेले. त्याला आपण अशोकस्तंभ म्हणून ओळखतो. हे स्तंभ एकूण तीस ठिकाणी होते. ते गौतम बुद्धांच्या जीवनातील प्रमुख घटना ज्या ठिकाणी घडल्या तिथे आणि महत्त्वाच्या राजमार्गांवर उभारलेले होते. अशोकाच्या काळात मोठ्या प्रमाणावर स्तूपांची उभारणी केली गेली. अशोकाने आपल्या कारकिर्दीत सुमारे ८४,००० स्तूप बांधले, असे म्हटले जाते.



स्तंभशीर्ष

**समाजजीवन**

उत्खननांमधून मिळालेल्या पुराव्याच्या आधारे मौर्यकाळातील जीवनमान उंचावल्याचे दिसून येते. मौर्यकाळात चातुर्वर्ण्य पद्धती दृढ झाली होती. व्यवसायांवर आधारलेल्या भारतीय समाजाच्या सात वर्गांचे वर्णन मेगॅस्थिनिस करतो; पुरोहित, शेतकरी, धनगर व शिकारी, व्यापारी व मजूर, सैनिक, हेर आणि सरकारी अधिकारी हे ते सात वर्ग होते. मौर्यकालीन समाजाची नीतिमित्ता अत्यंत उच्च दर्जाची होती, असे मेगॅस्थिनिसने म्हटले आहे. लोकजीवन संपन्न व सुखी होते. नट, नर्तक, गायक, वादक अशा मनोरंजन करणाऱ्या वर्गाचा उल्लेख आढळतो. रथांच्या आणि घोड्यांच्या शर्यती, मल्लयुद्ध तसेच नृत्य-गायन स्पर्धा हे करमणुकीचे लोकप्रिय प्रकार होते. द्यूत खेळणे प्रचलित होते, पण त्यावर सरकारी नियंत्रण होते.

वैदिक काळापासून चालत आलेली शिक्षणाची परंपरा मौर्यकाळातही तशीच राहिली. मौर्यकाळात तक्षशिला, काशी, अयोध्या इत्यादी नगरे उच्च विद्या आणि कलांचे शिक्षण देणारी श्रेष्ठ केंद्रे बनली.

या काळात स्त्रियांच्या शिक्षणाची उपेक्षा सुरू झाली. परंतु कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार मौर्यकाळात स्त्रियांना काही अधिकारही देण्यात आले असावेत, असे दिसते. स्त्रीधनावर त्यांचा संपूर्ण अधिकार होता. अनाथ व दिव्यांग स्त्रियांची काळजी शासन घेत असे. अनेक स्त्रिया गुप्तचर यंत्रणेत काम करत.

मौर्य काळाला बहुविध पैलू आहेत व त्यामुळेच त्याला एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अशोकाच्या मृत्यूनंतर राज्यावर आलेल्या राजांच्या कारकिर्दीत मध्यवर्ती प्रशासनयंत्रणा कमकुवत होत गेली. त्यामुळे राजकीय अवनती सुरू झाली आणि साम्राज्याचे तुकडे पडू लागले. मौर्योत्तर काळात विघटित झालेल्या साम्राज्याचे पुन्हा संघटन करण्याचे काम शुंग आणि सातवाहन या घराण्यांच्या सत्तेखाली झाले. वैदिक धर्म, वर्णाश्रमव्यवस्था व वैदिक धर्मपरंपरेनुसार असलेली जीवनप्रणाली या सर्वांना पुन्हा महत्त्व आले. या घराण्यांविषयी आपण पुढील पाठात अभ्यास करणार आहोत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा**

१. हर्यंक घराण्यातील ............ हा पहिला प्रसिद्ध राजा होय.
(अ) चंद्रगुप्त मौर्य (ब) बिंबिसार
(क) अजातशत्रू (ड) महापद्म

२. नंद वंशाची स्थापना ............ यांनी केली.
(अ) धनानंद (ब) शिशुनाग
(क) महापद्मानंद (ड) सम्राट अशोक

३. संस्कृत साहित्यातील श्रेष्ठ नाटक 'स्वप्नवासवदत्तम्' ............ यांनी लिहिले.
(अ) कौटिल्य (ब) भारत
(क) कालिदास (ड) भास

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. मगध साम्राज्याचा पाया रचणारा – बिंबिसार
२. नंदाची सत्ता संपुष्टात आणणारा – चंद्रगुप्त मौर्य
३. चंद्रगुप्त मौर्य याच्या कालखंडात भारताला भेट देणारा चिनी प्रवासी – मेगॅस्थिनिस
४. कलिंग विजयाचा प्रसंगी झालेल्या विनाशाने मतपरिवर्तन झालेला – सम्राट अशोक

**प्र.२ योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

सम्राट अशोकांनी अनेक स्तंभ उभारले. कारण–
(अ) कला क्षेत्राच्या प्रसारासाठी
(ब) धर्मप्रसारासाठी
(क) व्यापारवृद्धीसाठी
(ड) आपल्या कार्याची ओळख व्हावी म्हणून

**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सम्राट अशोकाचा कलिंग विजय इतिहासाला आणि त्याच्या जीवनाला निराळे वळण लावणारा ठरला.
२. चंद्रगुप्ताचे ग्रीक राजा सेल्युकसशी झालेले युद्ध अत्यंत महत्त्वाचे होते.
३. मौर्य प्रशासनाला सुनिश्चित स्वरूप प्राप्त झाले होते.

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

१. चंद्रगुप्त मौर्य हा भारताच्या इतिहासातील पहिला चक्रवर्ती सम्राट होय.
२. अशोकाचे शिलालेख हे महत्त्वाचे ऐतिहासिक साधन आहेत.
३. मौर्यकालीन विविध व्यावसायिक श्रेणींचा विकास झाला.

**प्र.५ पान ५८ वरील मौर्य साम्राज्याचा नकाशा पहा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. अशोकाच्या साम्राज्यात समाविष्ट असलेले प्रदेश
२. सम्राट अशोकाचे शिलालेख आणि स्तंभलेख कोठे-कोठे आहेत?

**उपक्रम**

सम्राट अशोककालीन स्तूपांची माहिती मिळवा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ९. मौर्योत्तर काळातील भारत

९.१ शुंग साम्राज्य
९.२ सातवाहन साम्राज्याचा उदय
९.३ राज्यव्यवस्था, साहित्य, कला आणि लोकजीवन

मगध हे भारतातील आद्य साम्राज्य होते. मौर्यकाळात स्थिर आणि नियमबद्ध प्रशासन प्रस्थापित झाले. या सगळ्याचा अभ्यास आपण मागील पाठात केला आहे. सम्राट अशोकानंतर अंतर्गत कलहामुळे हे साम्राज्य दुर्बल बनले. शेवटचा मौर्य सम्राट बृहद्रथानंतर पुष्यमित्र शुंग गादीवर आला.

## ९.१ शुंग साम्राज्य

शुंगांचे साम्राज्य पूर्वेस मगध ते पश्चिमेस सियालकोट (पंजाब), तसेच उत्तरेकडे हिमालय ते दक्षिणेस विदर्भापर्यंत पसरलेले होते. पाटलिपुत्र मुख्य राजधानी असली तरी पुष्यमित्राने विदिशा येथे दुसरी राजधानी स्थापन केली. पुष्यमित्र शुंग हा पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी होता. त्याने कोसल, वत्स, अवंती इत्यादी प्रांतांवरील सत्ता बळकट केली. पुढे त्याने मगध साम्राज्याचा सियालकोटपर्यंतचा प्रदेश पुन्हा काबीज केला. डिमिट्रिअस या ग्रीक राजाचे आक्रमण त्याने शौर्याने परतवून लावले. डिमिट्रिअसच्या या पराभवाचा उल्लेख कालिदासाने 'मालविकाग्निमित्र' या नाटकात केला आहे.

**हे करून पहा.**

कालिदासाने लिहिलेल्या नाटकांची माहिती मिळवून त्यावर एक टिपण लिहा.

उत्तर भारतावर व दक्षिणेकडील काही भागांवर आधिपत्य स्थापन केल्यावर आणि ग्रीकांना सीमेपार केल्यानंतर आपले सामर्थ्य दर्शवण्यासाठी पुष्यमित्राने दोन वेळा अश्वमेध यज्ञ केला. मौर्य काळात खंडित झालेली यज्ञ करण्याची परंपरा त्याने पुनरुज्जीवित केली. बेसनगर (विदिशा) येथे हेलिओडोरस याने उभारलेला गरुडध्वज आहे. यावरून असे दिसते की वैष्णव संप्रदाय काही ग्रीकांनीही स्वीकारला होता. शुंग काळात संस्कृत साहित्याला उत्तेजन मिळाले. संस्कृत भाषेत होत गेलेल्या बदलांचा विचार करण्यासाठी पतंजली याने पाणिनीच्या अष्टाध्यायीवर 'महाभाष्य' हा ग्रंथ लिहिला. काही अभ्यासकांच्या मते या काळात महाभारतात लक्षणीय भर घातली गेली. तसेच मनुस्मृती या ग्रंथाची निर्मिती देखील याच काळात झाली.

साहित्याबरोबरच कला क्षेत्रात देखील शुंगांचे योगदान महत्त्वाचे ठरते. सांची व भारहूत येथील स्तूप, बेसनगर येथील गरुडस्तंभ हे या काळातील कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत. शुंगांच्या काळात शिल्पकलेची परंपरा अधिक समाजानुवर्ती झाल्याने त्यामध्ये सामान्यजनांच्या जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले आढळते.

शुंग घराण्याचा शेवटचा राजा देवभूती हा चैनी, विलासी होता. त्याचा मंत्री वासुदेव याने त्याला ठार मारून कण्व घराण्याची राजवट स्थापन केली. या घटनेचे वर्णन बाणभट्टाने 'हर्षचरित' या ग्रंथात केलेले आहे.

## ९.२ सातवाहन साम्राज्याचा उदय

उत्तरेत मौर्यांनंतर शुंग घराण्याची राजवट उदयास आली, तर दक्षिणेत सातवाहन घराण्याची सत्ता उदयास आली. मौर्य साम्राज्याचे विघटन झाले आणि त्यामुळे या सत्ता उदयाला येण्यास अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली. महाराष्ट्रातील सर्वांत प्राचीन राजसत्ता म्हणून सातवाहनांचा उल्लेख केला जातो. प्रारंभी सातवाहनांची सत्ता नाशिक, पुणे, औरंगाबाद येथे उदयास आली व पुढे महाराष्ट्र, आंध्र व कर्नाटक अशा विस्तीर्ण प्रदेशांवर पसरली. महाराष्ट्रातील पैठण हे नगर सातवाहनांची राजधानी होती. पुराणात आंध्र किंवा आंध्रभृत्य राजांचे उल्लेख येतात. हे आंध्र राजे म्हणजेच सातवाहन राजे होते, असे मत काही इतिहासकारांनी मांडले आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सातवाहन साम्राज्याचा विस्तार पाहण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.
https://en.m.wikipedia.org/wiki/File:Satvahana.svg

उत्तर महाराष्ट्रात सातवाहनांचे अनेक शिलालेख सापडतात. नाणेघाटाच्या शिलालेखात सातवाहनांचा पहिला राजा सिमुक (शिमुक) याचा उल्लेख येतो. सातवाहन राजवंशात सातकर्णी, हाल, गौतमीपुत्र सातकर्णी, यज्ञश्री सातकर्णी असे महत्वाचे राजे होऊन गेले.

सातवाहन घराण्याचा सर्वश्रेष्ठ राजा गौतमीपुत्र सातकर्णीच्या आधीचे राजे कर्तृत्ववान नव्हते. त्यामुळे त्या काळात शक सत्रपांनी भारताच्या पश्चिम भागात वर्चस्व प्रस्थापिक केले होते. गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांवर विजय मिळवला. या विजयाने सातवाहनांची प्रतिष्ठा पुन्हा उंचावली.

गौतमीपुत्र सातकर्णीने मध्य भारतात आणि संपूर्ण दक्षिणापथात दिग्विजय केला. त्याने दक्षिणेकडील राज्ये, अवंती, सुराष्ट्र (सौराष्ट्र) आणि महाराष्ट्रातील शक राजांचा पराभव केला. तसेच मध्य भारत व राजस्थान येथे असलेल्या गणराज्यांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. नाशिक जिल्ह्यात जोगळटेंबी येथे एक नाणेनिधी मिळाला. त्या नाण्यांमधील शक राजा नहपान याच्या नाण्यांवर गौतमीपुत्राच्या मुद्रा पुन्हा उमटवलेल्या दिसतात. यावरून नहपानावर विजय मिळवून त्याने आपले सामर्थ्य सिद्ध केले, हे स्पष्ट होते.

गौतमीपुत्रानंतर वाशिष्ठीपुत्र पुळुमावी आणि यज्ञश्री सातकर्णी हे महत्वाचे राजे होते. त्यानंतर मात्र सातवाहनांचा ऱ्हास सुरू झाला. शक आणि सातवाहनांच्या सतत चाललेल्या संघर्षामुळे ते दुर्बल होत गेले.

### ९.३ राज्यव्यवस्था, साहित्य, कला आणि लोकजीवन

**राज्यव्यवस्था :** सातवाहनांच्या राज्यव्यवस्थेत राज्यातील प्रदेशाची विभागणी छोट्या प्रांतांमध्ये केलेली होती व प्रत्येकावर मुलकी आणि लष्करी अधिकारी असत. त्यात 'अमात्य', 'महाभोज' हे मुलकी अधिकारी, 'महासेनापती' आणि 'महारथी' यांसारखे लष्करी अधिकारी यांचा समावेश होता. ग्राम हा प्रशासनाचा सर्वांत छोटा घटक होता. ग्राम हा कराचा स्रोत होता, तसेच युद्धप्रसंगी सैनिक भरतीचे काम ग्राम या घटकामार्फत होत असे. या कारणांमुळे ग्राम हे मध्यवर्ती यंत्रणेशी बांधले गेले होते.

शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन होते. त्याचबरोबर सातवाहनांच्या काळात उद्योग व व्यापाराची देखील वाढ झाली. त्यांच्या श्रेणी निर्माण झाल्या. त्यांच्यामार्फत उद्योगधंद्यांचे नियंत्रण केले जात होते, तसेच कर्ज देण्याचे कामही श्रेणी करत असत. सातवाहन काळात भारताचा रोमशी असलेला व्यापार वृद्धिंगत झाला. सातवाहन राजवटीत प्रतिष्ठान (पैठण), तगर (तेर), नासिक (नाशिक), करहाटक (कऱ्हाड) यांसारखी व्यापारी नगरे उदयास आली.

'पेरीप्लस ऑफ द एरिथ्रीयन सी' या ग्रंथात तगर (तेर) आणि प्रतिष्ठान (पैठण) यांचा उल्लेख आलेला आहे. त्यानुसार, ''दक्षिणापथ या प्रदेशातील व्यापारी स्थळांमध्ये दोन स्थळांना महत्त्व आहे. यांतील पहिले बॅरिगाझा (गुजरातमधील भरुच) पासून दक्षिणेस वीस दिवसांच्या प्रवासाने गाठता येणारे प्रतिष्ठान आणि दुसरे म्हणजे तगर. तगर हे फार मोठे शहर असून तेथे प्रतिष्ठानहून पूर्वेस दहा दिवस प्रवास केल्यानंतर पोचता

**अधिक माहितीसाठी :** सातवाहन सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी याची माता गौतमी बलश्री हिच्या नाशिक येथील शिलालेखात त्याच्या पराक्रमाची प्रशंसा आहे. त्यामध्ये गौतमीपुत्र सातकर्णीचा गौरव 'शकपहलवयवननिसूदन' म्हणजे शक, पल्लव व ग्रीक यांचे निर्दालन करणारा, 'सातवाहनकुलयशःप्रतिष्ठापनकर' – म्हणजे सातवाहन कुलाच्या यशाची प्रतिष्ठापना करणारा, 'त्रिसमुद्रतोयपितवाहन' म्हणजे ज्याचे घोडे तीन समुद्राचे पाणी प्यायले आहेत, असा केलेला आढळतो. या उल्लेखावरून गौतमीपुत्र सातकर्णीचे मांडलिकत्व दक्षिणेतील अनेक राजांनी स्वीकारले असावे, असे दिसते. सातवाहन राजे आपल्या नावाआधी आईचे नाव लावत असत. उदा., गौतमीपुत्र सातकर्णी, वाशिष्ठिपुत्र पुळुमावी इत्यादी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

येते. प्रतिष्ठानहून बॅरिगाझा येथे माळरानातून मार्ग काढत अंकिक (कार्नेलिअन) आणला जातो. याउलट तगर येथून सुती कापड, विविध प्रकारची मलमल आणि गोणपाट बॅरिगाझा येथे पाठवले जाते. त्याचप्रमाणे समुद्रकिनारपट्टीच्या प्रदेशातून तगरला येणारा निरनिराळा मालही तगरहून बॅरिगाझा येथे पाठवला जातो.''

जुन्नर व नाशिक या ठिकाणांच्या शिलालेखात कुलारिक*, तीलपिषक**, कोलिक*** अशा अनेक व्यावसायिकांचे उल्लेख आढळून येतात. अशा प्रकारची तटबंदीयुक्त सातवाहनांच्या राज्यात ३० नगरे अस्तित्वात असल्याचे उल्लेख प्लिनीच्या ग्रंथात सापडतात. त्यांतील काही ठिकाणच्या उत्खननात सापडलेल्या रोमन नाण्यांवरून या काळातील प्रगत व्यापाराचा देखील आढावा घेता येतो. सोपारा, कल्याण, भरुच ही त्या काळची व्यापाराची मुख्य केंद्रे होते.

**(कुंभकार), **(तेलाचे उत्पादन करणारे), ***(विणकर)*

**ही माहिती तुम्हांला नक्कीच आवडेल :** नाणेघाट हा महाराष्ट्रातील एक प्राचीन व्यापारी घाटमार्ग आहे. हा मार्ग पूर्वीचे जीर्णनगर (जुन्नर) व कोकण प्रदेशाला जोडतो. या मार्गाचे एक टोक वर जुन्नरच्या दिशेला तर दुसरे खाली कोकणात मुरबाड तालुक्यात (जिल्हा ठाणे) आहे. या घाटात सातवाहनांनी एक लेणे खोदवले, तेथील लेखांमध्ये सातवाहन सम्राज्ञी नागणिका आणि सातवाहन राजांचा पराक्रम, त्यांनी केलेले दानधर्म यांबद्दल माहिती आहे. हे लेख ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. तेथे सातवाहन राजांचे पुतळे होते. घाटाच्या तळाशी वैशाखखेडे नावाचे गाव आहे. तेथे प्रवाशांसाठी धर्मशाळा बांधलेल्या होत्या. घाटात जकात गोळा करण्यासाठी खोदवलेला दगडी रांजण आहे. सोपारा आणि कल्याण ही प्राचीन काळी महाराष्ट्रातील दोन अत्यंत महत्त्वाची व्यापारी केंद्रे होती. केवळ देशांतर्गतच नव्हे, तर परदेशांशीही येथून व्यापार चालत असे. विशेषतः रोमहून आयात होणारा माल सोपाऱ्याला उतरवला जाऊन तेथून कल्याण, नाणेघाट, जुन्नर, नेवासा मार्गे पैठण आणि कोल्हापूरकडे नेला जात असे. तसेच निर्यातीच्या वस्तूंची वाहतूक देखील याच मार्गावरून उलट दिशेने होत असे. या ठिकाणचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिलालेखांमध्ये 'दोन, चार, सहा, सात आणि नऊ' हे अंक आहेत आणि २,४,६,७ आणि ९ अशा पद्धतीने कोरलेले आहेत. ते प्रचलित अंकलेखनाशी मिळतेजुळते आहेत.



इ.स.पूर्व पहिल्या शतकाच्या कालखंडातील राजा पुळुमावी याच्या मुद्रेवरील जहाजाचे हे चित्र आहे. मुद्रेवरील हे चित्र सातवाहनांच्या काळातील समुद्री मार्गाने चालणाऱ्या व्यापाराचे निदर्शक आहे.

**साहित्य :** सातवाहनांच्या काळात विद्येला व कलेला राजाश्रय मिळाला. सातवाहनांच्या काळात प्राकृत भाषा व प्राकृत साहित्य समृद्ध झाले. त्यांनी प्राकृत भाषा व साहित्य यांना प्रोत्साहन दिले. सातवाहन घराण्याचा सतरावा राजा हाल याने 'गाथासप्तशती' या काव्यग्रंथाचे संपादन केले. त्याच्याच राज्यसभेतील मंत्री गुणाढ्य याने पैशाची या प्राकृत भाषेत 'बृहत्कथा' नामक अजोड ग्रंथ लिहिला. संस्कृत व्याकरणावर 'कातंत्र' हा ग्रंथ सर्ववर्माने लिहिला.

**कला आणि स्थापत्य :** मौर्य काळातील शिल्पांवर दिसणारा इराणी व ग्रीक शैलींचा प्रभाव शुंग व सातवाहन काळात कमी होऊन भारतीय शिल्पकलेच्या परंपरेचा विकास झाल्याचे दिसते. या काळात उभारली गेलेली सांची येथील क्रमांक १ च्या स्तूपाभोवतीची चार तोरणे ही शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहेत. बुद्धचरित्रातील अनेक प्रसंग या तोरणांवर कोरलेले आहेत. सातवाहनांच्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



कार्ले येथील चैत्य

काळात भाजे, कार्ले, नाशिक इत्यादी ठिकाणी डोंगर कोरून विहारांची व चैत्यगृहांची निर्मिती केलेली दिसते. विशेषतः कार्ले येथील चैत्य, चैत्यगृहाचे अतिभव्य प्रवेशद्‌वार, त्यावरील नक्षीकाम ही सर्व इ.स.पू. पहिल्या शतकातील भारतीय कलाकारांच्या शिल्पकौशल्याची साक्ष देतात.

**गाथासप्तशती :** सातवाहन राजा हाल याने मोठ्या प्रमाणावर प्राकृत भाषेतील कविता संकलित केल्या व त्यावर आधारलेल्या निवडक ७०० गाथांचा 'गाहा सत्तसई' (गाथासप्तशती) हा संग्रह संपादित केला. हा माहाराष्ट्री प्राकृत भाषेत रचलेला पहिला ग्रंथ आहे. त्यात मानवी भावना व व्यवहार आणि निसर्गाचे अत्यंत सुरस आणि सौंदर्यपूर्ण चित्रण केले आहे. विविध व्रते, आचार आणि तत्कालीन उत्सव यांची वर्णनेही त्यात केलेली आहेत. महाराष्ट्राच्या तत्कालीन समाजजीवनाचे प्रतिबिंब त्यामध्ये उमटले आहे. गाथासप्तशतीमधील काही शब्द आजच्या मराठीत देखील वापरात आहेत. मराठी भाषेतील अनेक शब्दांची मूळे गाथासप्तशतीतील महाराष्ट्री प्राकृत शब्दांमध्ये शोधता येतात. गाथा सप्तशतीमधील कवितांवरून महाराष्ट्रात माहाराष्ट्री प्राकृत आणि आधुनिक मराठी यांच्यातील दुवे स्पष्ट दिसतात.

**अधिक माहितीसाठी :** औरंगाबादजवळील अजिंठा येथील विश्वविख्यात लेण्यांपैकी ८, ९, १०, १२ व १३ क्रमांकांची लेणी सातवाहनांच्या काळातील आहेत. विशेष म्हणजे भारतीय चित्रकलेपैकी सर्वांत प्राचीन चित्रकला ज्या लेणी क्रमांक ९ व १० मध्ये आहेत, ती देखील याच काळातील आहेत.

**समाजव्यवस्था :** सातवाहन काळात समाजात चार वर्ण अस्तित्वात होते. तसेच या काळात जातीय व्यवस्थाही दृढ झाली. त्यामागील कारणांमध्ये वर्णसंकर, विविध व्यावसायिक श्रेणींचे बंदिस्त स्वरूप आणि बाहेरून आलेल्या परकीयांचा समाजातील अंतर्भाव यांचा समावेश आहे.

याखेरीज समाजात चार वर्गही होते. पहिला वर्ग हा महारथी, महाभोज आणि महासेनापती या अधिकारी लोकांचा होता. त्यांच्या नेमणुका विविध राष्ट्रकांवर (सुभे) होत असत. कोकण प्रदेशात महाभोज व घाटावरच्या प्रदेशात महारथी हे अधिकारी होते. दुसऱ्या वर्गात अमात्य, महामात्र आणि भांडागारिक या सेवकांचा, नैगम (व्यापारी), सार्थवाह (व्यापारी तांड्यांचे प्रमुख) व श्रेष्ठी (श्रेणीचे प्रमुख) यांचा समावेश होता. तिसऱ्या वर्गात लेखनिक (कारकून), वैद्य, हालकीय (शेतकरी), सुवर्णकार, गांधिक (सुगंधी पदार्थांचे व्यापारी) हे लोक समाविष्ट होते. तर चौथ्या वर्गात वर्धकी (सुतार), मालाकार (माळी), लोहवाणीज (लोहार), दासक (मच्छीमार) यांचा समावेश होत असे.

सातवाहनांच्या काळात ग्रीक, शक, पल्लव, कुशाण इत्यादी परकीयांची आक्रमणे होत राहिली. परंतु हे परके लोक येथील समाजात लवकरच मिसळून गेले. याचाच अर्थ तत्कालीन सामाजिक परिस्थिती विशेषतः समाजव्यवस्था ही परकीयांना सामावून घेण्याइतकी लवचीक होती. परकीय आक्रमकांच्या आगमनाने पुढील काळात घडून आलेले राजकीय बदल आणि त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रक्रियांचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. मौर्य घराण्यातील शेवटचा सम्राट ........... हा होता.

(अ) अजातशत्रू (ब) चंद्रगुप्त मौर्य

(क) बृहद्रथ (ड) सम्राट अशोक

२. नाशिक येथील शिलालेखात ........... या सातवाहन राजाचा उल्लेख 'त्रिसमुद्रतोयपितवाहन' असा केला आहे.

(अ) गौतमीपुत्र सातकर्णी (ब) हाल

(क) यज्ञश्री सातकर्णी (ड) सिमुक

३. सातवाहन राजा हाल याने ........... हा ग्रंथ संपादित केला.

(अ) बृहत्कथा (ब) गाथासप्तशती

(क) कातंत्र (ड) मेघदूत

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. कालिदास – 'मालविकाग्निमित्र'

२. गुणाढ्य – 'गाथासप्तशती'

३. सर्ववर्मा – 'कातंत्र'

४. पतंजली – 'महाभाष्य'

**प्र.२ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. सातवाहन काळात अनेक व्यापारी नगरांचा उदय झाला.

२. सातवाहन काळात जातीय व्यवस्था दृढ झाली.

**प्र.३ तुमचे मत नोंदवा.**

सातवाहन काळात प्राकृत भाषेला प्रोत्साहन मिळाले.

**प्र.४ टीपा लिहा.**

१. गौतमी बलश्रीचा नाशिक येथील शिलालेख

२. नाणेघाट – महाराष्ट्रातील एक प्राचीन व्यापारी घाटमार्ग

३. 'गाथासप्तशती' ग्रंथ

**प्र.५ सातवाहन घराण्याची माहिती दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

(अ) उदय आणि राज्यविस्तार (ब) प्रशासन व्यवस्था

(क) उद्योग व व्यापार (ड) साहित्य व कला

**उपक्रम**

तुमच्या परिसरात काही ऐतिहासिक अवशेषांची माहिती मिळवून माहिती-पुस्तिका तयार करा.

❖❖❖



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १०. भारतीय इतिहासातील नवे पर्व

१०.१ मध्य आशियातील भटक्या टोळ्या
१०.२ इंडो-ग्रीक, शक, कुशाण
१०.३ कुशाण साम्राज्य
१०.४ गुप्त साम्राज्य
१०.५ वर्धन साम्राज्य
१०.६ कर्कोटक साम्राज्य
१०.७ व्यापार, नाणी, कला, मूर्तिशास्त्र
१०.८ भारत - रोम व्यापार (महाराष्ट्रातील व्यापाराची केंद्रे)

मौर्य साम्राज्याच्या विघटनानंतर स्थानिक राजसत्तांच्या महत्त्वाकांक्षा बळावल्या. त्यानंतर प्रादेशिक राज्यांच्या उदयाला सुरुवात झाली. यांपैकी शुंग आणि सातवाहन राज्यांचा अभ्यास आपण मागील पाठात केला. याच सुमारास भारतावर ग्रीक, शक, कुशाण या परकीयांची आक्रमणे सुरू झाली. प्रादेशिक राज्यांच्या उदयाचा हा काळ राजकीय आणि सामाजिक संक्रमणाचाही काळ होता.

## १०.१ मध्य आशियातील भटक्या टोळ्या

सिकंदराच्या मृत्यूनंतर त्याने नेमलेल्या सत्रपांनी, आपापली स्वतंत्र राज्ये प्रस्थापित केली. वायव्येकडील ग्रीक राज्यांच्या उतरत्या काळातच मध्य आशियातील भटक्या टोळ्यांनी बॅक्ट्रियावर आक्रमणे केली. या काळातील उत्तर भारतात घडणाऱ्या घडामोडींमध्ये मध्य आशियातील टोळ्यांची स्थलांतरे महत्त्वाची होती. इ.स.पू.दुसऱ्या शतकाच्या उत्तरार्धात पहलव (पार्थियन) आणि शक (स्किथियन) यांनी हल्ले केले. मध्य आशियातील शकांना चीनमधून आलेल्या युएची टोळ्यांनी तेथून स्थलांतर करण्यास भाग पाडले. युएची हे पशुपालक होते. या भटक्या लोकांनी स्थानिक राजांवर त्यांच्या युद्धकौशल्याच्या जोरावर वर्चस्व मिळवले आणि तेथे स्वतःची राज्ये प्रस्थापित केली.

## १०.२ इंडो-ग्रीक, शक, कुशाण

**इंडो-ग्रीक :** वायव्य भारतातील ग्रीक सत्रपांना 'इंडो-ग्रीक' असे म्हटले जाते. भारतीय परंपरेत त्यांचा उल्लेख 'यवन' असा केला जातो. भूमध्य सागराच्या परिसरात आपले वर्चस्व प्रस्थापित करणे आणि पश्चिम व मध्य आशियातील व्यापारावर आपली पकड दृढ करणे, हे त्यांचे उद्देश होते. सेल्युकस निकेटर हा वायव्येकडील बॅक्ट्रिया प्रांतातील इंडो-ग्रीक राजा होता. इंडो-ग्रीक राजांमधील संघर्षात बॅक्ट्रिया राज्य बलाढ्य ठरले. बॅक्ट्रियाचा राजा डिमिट्रस याने इ.स.पूर्व १८० मध्ये भारतावर आक्रमण केले. त्याने तक्षशिला जिंकले. त्याची राजधानी साकल (सियालकोट) येथे होती. याच सुमारास युक्रेटायडिस या इंडो-ग्रीक राजाचे स्वतंत्र राज्य प्रस्थापित होते. अशा रीतीने वायव्य भागात दोन स्वतंत्र इंडो-ग्रीक राज्ये प्रस्थापित झाली होती. युक्रेटायडिसची राजधानी तक्षशिला येथे होती. डिमिट्रस आणि युक्रेटायडिस यांनी स्थापन केलेल्या या दोन्ही शाखांचे मिळून चाळीस इंडो-ग्रीक राजे होऊन गेले. इंडो-ग्रीकांचा इतिहास हा प्रामुख्याने त्यांच्या नाण्यांवरून समजतो. नाण्यांवरील ठसे, मजकूर, राजांचे चित्र, देवतांचे चित्र या नावीन्यपूर्ण गोष्टी ही त्यांची भारतीय नाणकपरंपरेला मिळालेली देणगी आहे.

> **इंडो-ग्रीक राज्याचा विस्तार पाहण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
> https://en.wikipedia.org/wiki/File:Indo-Greeks_100bc.jpg

**शक :** शक हे मध्य आशियातून आले. बॅक्ट्रियातील ग्रीकांना हुसकावून लावून त्यांनी आपले राज्य प्रस्थापित केले. त्यांच्या वसतिस्थानास पुढे शकस्थान (शिस्तान) असे नाव मिळाले. भारतातील पहिला शक राजा म्हणजे 'मोएस' उर्फ 'मोग'. त्याने गांधार आणि पंजाब हे प्रदेश जिंकून राज्य स्थापन केले. त्याच्यानंतर आलेल्या शक राजांच्या दुर्बलतेमुळे पहलव राजा गोंडोफर्नेसने त्याचा पराभव करून भारतात आपली सत्ता निर्माण केली.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



जुनागढ येथील शिलालेख

**अधिक माहितीसाठी :** शक राजा रुद्रदामन याची सत्ता सातवाहनांशी असलेले संबंध आणि सांस्कृतिक परिवर्तनाला दिलेला राजाश्रय यामुळे उल्लेखनीय ठरते. सौराष्ट्रातील जुनागढ येथील शिलालेख हा संस्कृतमधील महत्वाचा शिलालेख आहे. हा शिलालेख सम्राट अशोकाच्या लेखाखाली कोरलेला आहे. अशोकाचा लेख प्राकृतमध्ये तर रुद्रदामन याचा लेख संस्कृतमध्ये आहे. त्यावरून शक राजांनी संस्कृत भाषा स्वीकारली होती, असे दिसून येते. रुद्रदामनचा शिलालेख मुख्यतः मौर्यकालीन सुदर्शन तलावाच्या दुरुस्तीची नोंद करणारा आहे. सम्राट अशोकाच्या काळातील तलावाची डागडुजी रुद्रदामनने केली यावरून त्या तलावाचा दीर्घकाळ उपयोग होत होता, हे लक्षात येते. यामध्ये रुद्रदामनच्या प्रशस्तीमध्ये त्याच्या नर्मदा खोऱ्यातील विजयाची, सातवाहन राज्यावरील मोहिमांची आणि राजस्थानातील यौद्धेय गणराज्यावरील विजयाची स्तुती केलेली आहे.

पंजाबमधील शकांचे राज्य नाहीसे झाले तरी त्यांची भारतात, विशेषतः पश्चिम भारतात अनेक राज्ये अस्तित्वात आलेली होती. शकांनी आपली राज्यपद्धती इराणमधील अखोमनीय व सेल्युकिड पद्धतीनुसार चालवली. राज्याची विभागणी सत्रपींमध्ये (प्रांत) केली होती व प्रत्येक सत्रपीवर महाक्षत्रप हा लष्करी अधिकारी नेमला जात असे. या सत्रपींची उपविभागणी करून त्यावर प्रत्येकी एक सत्रप नेमला जाई. या सत्रपांना आपले शिलालेख कोरण्याची तसेच नाणी पाडण्याची परवानगी होती. त्यावरून त्यांना पुरेशी स्वायत्तता होती, असे दिसते.

**ही माहिती तुम्हांला निश्चित आवडेल :** शक हे मुख्यतः पशुपालक होते. त्यांच्या वास्तूंचे अवशेष मिळालेले नाहीत तरी त्यांची वैशिष्ट्यपूर्ण थडगी सापडलेली आहेत. शकाच्या मृत गटप्रमुखाबरोबर त्याचा घोडा, घोड्याचा साज आणि नेहमीच्या वापरातल्या गोष्टी दफन केल्या जात. घोडा हा शकांच्या संस्कृतीचा महत्वाचा भाग होता. घोड्यावर स्वार होऊन चपळतेने आक्रमण करणे, हे त्यांच्या युद्धकलेचे वैशिष्ट्य होते. खोगीर, लगाम, द्विमुखी धनुष्य यांमुळे त्यांचे युद्धतंत्र प्रभावी बनले होते.

**कुशाण :** मध्य आशियातून बॅक्ट्रियात आल्यावर कुशाणांनी इंडो-ग्रीकांचा प्रदेश काबीज केला. त्यांनी ग्रीकांच्या संस्कृतीचा अंगीकार केला. शकांना दक्षिणेकडे हुसकावल्यानंतर कुजुल कडफिसिस या कुशाण प्रमुखाच्या नेतृत्वाखाली युएची टोळ्या एकत्र आल्या व त्याने त्यांना हिंदुकुश पर्वतातून वायव्य भारतात आणले. त्याने स्वतःला बॅक्ट्रियाचा राजा घोषित केले. त्याची सत्ता काबूल, काश्मीरपर्यंत प्रस्थापित झाली व अशा रीतीने कुशाण सत्तेची स्थापना झाली. ही माहिती चिनी, ग्रीक व रोमन साहित्यांमधून मिळते. भारतीय साहित्यामध्ये कुषाणांचा उल्लेख 'तुखार' किंवा 'तुषार' असा केला जातो.

## १०.३ कुशाण साम्राज्य

शकांप्रमाणेच कुशाणांनी देखील छोटी छोटी राज्ये जिंकल्यानंतर तिथे सत्रपी प्रस्थापित केल्या. त्यावर सत्रप (क्षत्रप) नावाचे लष्करी अधिकारी नेमले. या सर्व क्षत्रपांमधील प्रमुख अधिकारी म्हणून राजा स्वतःला 'राजाधिराज', 'महाराज' अशी बिरुदे लावू लागला. राजा हा ईश्वराचा अंश असतो ही कल्पना कुशाणांच्या नाण्यांवरील लेखांमध्ये प्रथम आढळते. ते स्वतःला 'देवपुत्र' असे म्हणवत असत.

अनेक शक राजांना पराभूत करून कनिष्काने सम्राटपद मिळवले. त्याने काबूलपासून पाटलिपुत्रपर्यंत व काश्मीरपासून माळव्यापर्यंत कुशाण साम्राज्य उभारले. त्याने चीनवर देखील दोनदा आक्रमणे केल्याचे उल्लेख आढळतात. मध्य आशियापासून एवढ्या दूरवर पसरलेल्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

साम्राज्याचे प्रशासन करणे अवघड होते. त्यासाठी एक मध्यवर्ती केंद्र आवश्यक होते. म्हणूनच कनिष्काने पुरुषपूर (पेशावर) आणि मथुरा अशा दोन राजधान्या स्थापन केल्या. त्याने काश्मीरमध्ये 'कुंडलवन' येथील विहारात चौथी बौद्ध धर्मपरिषद आयोजित केली होती.

कुशाणांचा शेवटचा राजा 'वासुदेव' याच्या नावावरूनच कुशाणांनी भारतीय संस्कृती आत्मसात केली होती, हे लक्षात येते. त्याच्या कारकिर्दीत कुशाणांचा ऱ्हास सुरू झाला. कुशाण साम्राज्याचे तुकडे पडून ठिकठिकाणचे सत्रप स्वतंत्र झाले. कुशाणांची सत्ता पंजाब व गांधार या प्रदेशात इ.स.चौथ्या शतकापर्यंत अस्तित्वात होती.

**कुशाण साम्राज्याचा विस्तार पाहण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
https://en.m.wikipedia.org/wiki/Kushan_Empire#/media/File:Kushanmap.jpg

## १०.४ गुप्त साम्राज्य

गुप्तांच्या साम्राज्याचा इतिहास छोट्या राज्यातून बलाढ्य साम्राज्यात रूपांतर कसे होते ही प्रक्रिया दर्शवणारा आहे. 'श्रीगुप्त' हा गुप्त वंशाचा संस्थापक होता. त्याच्या नावामागे 'महाराज' अशी पदवी लावलेली आढळते. त्यावरून असे लक्षात येते की तो एक मांडलिक राजा होता. त्याचा मुलगा घटोत्कच यानेही 'महाराज' हेच बिरुद लावलेले दिसते. म्हणजेच त्या काळात गुप्त राजे हे मांडलिक होते. गुप्त राज्याचा विस्तार वाढवून त्याचे साम्राज्यात रूपांतर करण्याचे श्रेय पहिला चंद्रगुप्त याच्याकडे जाते. त्याच्या नावाआधी जोडलेल्या 'महाराजाधिराज' या पदवीने गुप्त राजांच्या वाढलेल्या प्रतिष्ठेची कल्पना येते. त्याने लिच्छवी कुळातील कुमारदेवी हिच्याशी विवाह केला. हा विवाह गुप्त राजघराण्याला राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरला. कुमारदेवीबरोबर प्रतिमा असलेले त्याचे नाणेही त्याने काढले. त्याची सत्ता मगध, साकेत (अयोध्या) आणि प्रयाग या प्रदेशांमध्ये पसरलेली होती. त्यानंतरच्या काळात गुप्त घराण्यात होऊन गेलेला प्रतिभावंत, पराक्रमी, कल्याणकारी राजा म्हणजे समुद्रगुप्त हा होय.

दिग्विजय करून सर्व भारत एकाच सत्तेच्या छत्राखाली आणावा अशी समुद्रगुप्ताची महत्त्वाकांक्षा होती. त्याने आपल्या नाण्यांवर 'सर्वराजोच्छेत्ता' अशी एक पदवी कोरलेली आहे. त्याचा अर्थ 'सर्व राजांची संज्ञा संपुष्टात आणणारा' असा होतो. समुद्रगुप्ताने प्रथम आपल्या राज्याशेजारील राज्ये जिंकून घेतली. उत्तर दिग्विजय करून त्याने दक्षिणेकडील राज्ये जिंकण्यासाठी मोहीम सुरू केली. त्या वेळी दक्षिणेत वाकाटकांची सत्ता प्रबळ होती. समुद्रगुप्ताने वाकाटकांचे राज्य वगळता दक्षिणेत कांचीपर्यंतचा प्रदेश आपल्या आधिपत्याखाली आणला. त्याने जिंकलेल्या प्रदेशांपलीकडील राजांना मांडलिक बनवले. या मांडलिक राजांकडून खंडणी घेऊन त्यांना आपले सार्वभौमत्व मान्य करायला लावले.


**ही माहिती तुम्हांला निश्चित आवडेल :** अलाहाबाद येथील अशोकस्तंभावर समुद्रगुप्ताची सविस्तर प्रशस्ती कोरलेली आहे. ही प्रशस्ती त्याच्या कारकिर्दीची माहिती देणारे लिखित साधन आहे. ही प्रशस्ती 'प्रयागप्रशस्ती' या नावाने ओळखली जाते. या स्तंभावर सम्राट अशोकाच्या धम्मविजयाचे महत्त्व सांगणारा लेख असून त्याखाली समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाचे वर्णन करणारा प्रशस्तीलेख आहे. हा एक विरोधाभासच म्हणावा लागेल.

या दिग्विजयानंतर समुद्रगुप्ताने 'अश्वमेध' यज्ञ केला आणि स्वतःला 'चक्रवर्ती' राजा म्हणून घोषित केले. शक, कुशाण आणि श्रीलंकेतील राजे या सर्वांनी गुप्तांची अधिसत्ता स्वीकारली. समुद्रगुप्ताच्या काही नाण्यांवर वीणावादक प्रतिमा आहे, त्यावरून तो संगीतज्ञही होता हे लक्षात येते. दुसरा चंद्रगुप्त याने शकांचा पराभव केला आणि तो गादीवर आला. त्याने 'विक्रमादित्य' हे बिरुद धारण केले. त्याने पश्चिमेकडील माळवा, गुजरात व काठेवाड या प्रदेशांमध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली. त्यामुळे पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे देखील गुप्तांच्या वर्चस्वाखाली आली आणि पश्चिमेकडील व्यापारामध्ये गुप्तांचा प्रवेश झाला. त्यानंतर चंद्रगुप्ताने हिंदुकुश ओलांडून वायव्येकडील प्रदेशही आपल्या सत्तेखाली आणला. अशा रीतीने संपूर्ण उत्तर भारतात त्याने सार्वभौम राज्य स्थापन केले. त्याने आपली मुलगी प्रभावती हिचा विवाह दक्षिणेतील वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन याच्याशी करून दिला व वाकाटकांशी मैत्रीपूर्ण नाते निर्माण केले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




दुसऱ्या चंद्रगुप्ताचा पुत्र कुमारगुप्त याच्या काळात मध्य आशियातील हुणांनी भारतावर आक्रमणे सुरू केली. कुमारगुप्ताने हुणांचे आक्रमण थोपवून धरले. कुमारगुप्तानंतरचे राजे आपल्या राज्याचे रक्षण करण्यास असमर्थ ठरले. शेवटी त्यांचे राज्य अनेक छोट्या राज्यांमध्ये विघटित झाले.

**ही माहिती तुम्हांला निश्चित आवडेल :** चंद्रगुप्त दुसरा हा पित्याप्रमाणेच विद्वानांचा आश्रयदाता आणि विद्या व कला यांचा भोक्ता होता. त्याच्या दरबारात नवरत्ने होती, असे म्हणतात. धन्वंतरी (वैद्य), क्षपणाक (फलज्योतिषी), अमरसिंह (कोशकार), शंकू (शिल्पज्ञ), वेतालभट्ट (मांत्रिक), घटकर्पूर (स्थपती, लेखक), कालिदास (महाकवी), वराहमिहीर (खगोलशास्त्रज्ञ) आणि वररुची (वैय्याकरणी) ही त्या नवरत्नांची नावे होत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**गुप्तकालीन राज्यव्यवस्था व लोकजीवन :** गुप्तकाळ हा अभिजात संस्कृतीचा काळ मानला जातो.

गुप्तकाळात राजा हा प्रशासनाचा केंद्रबिंदू असे. राजपुत्र, अमात्य आणि सल्लागार त्याला मदत करत. राजपुत्र कित्येक वेळा प्रांतांचे प्रांतपाल म्हणून काम पाहत असत. प्रत्येक प्रांताचे उपविभाग केले जात. त्या उपविभागांना 'विषय' असे म्हटले जाई. त्या विषयावर स्वतंत्र प्रशासक नेमला जात असे. त्यास 'विषयपती' असे म्हटले जाई. 'कुमारामात्य' हे प्रांतीय अधिकारी होते व 'आयुक्तक' हे जिल्ह्याचा कारभार पाहणारे अधिकारी होते. गुप्त प्रशासन हे विकेंद्रित होते. स्थानिक पातळीवरच अनेक निर्णय घेतले जात.

गुप्तकालीन राजांनी शेतीच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न केले. स्थानिक लोकांना शेतजमिनी कसायला देण्यावर त्यांचा भर होता. धार्मिक आणि शैक्षणिक संस्थांना जमिनी दान दिल्या गेल्या. या जमिनी करमुक्त असत. या जमिनींना अग्रहार असे म्हटले जाई. तसेच या काळात लष्करी आणि नागरी सेवेसाठी रोख पगार देण्याऐवजी इनामी जमिनी देण्याची पद्धत सुरू झाली. मध्ययुगाचे वैशिष्ट्य असलेल्या सरंजामदारी पद्धतीची मुळे इथे दिसू लागतात. गुप्त काळातील या सरंजामी पद्धतीच्या अर्थव्यवस्थेमुळे नागरी केंद्रांचा ऱ्हास झाला असे मानले जाते. दान दिलेल्या भूमीवर कर माफ करण्याच्या पद्धतीमुळे महसूल घटला आणि राजसत्ता आर्थिकदृष्ट्या दुर्बल झाली. या गोष्टींमुळे राजा हे सत्तेचे केंद्र न राहता सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन स्थानिक जमीनदारांच्या हाती सत्ता केंद्रित होऊ लागली.

युआन श्वांग या चिनी प्रवाशाच्या वृत्तान्तानुसार गुप्त साम्राज्यातील वायव्येकडील प्रदेशामध्ये ऊस आणि गहू ही पिके घेतली जात. मगध व त्याच्या पूर्वेकडे भातशेती होत असे.

खनिजे, प्राणी आणि वनस्पती हा गुप्तकाळात व्यापारी संपत्तीचा स्रोत होता. त्याचबरोबर या काळात कारागिरांची गुणवत्ता उंचावली होती, असे दिसते. सुवर्णकारांनी घडवलेली गुप्तकालीन सुवर्ण नाणी ही त्याचा उत्तम नमुना आहेत. गुप्त नाण्यांवर राजाच्या विविध पैलूंचे सौंदर्यपूर्ण आणि वास्तव दृष्टीने हुबेहूब चित्रण केलेले आहे. निगम, श्रेणी आणि गण अशा संघटना व्यापाऱ्यांनी व उद्योगपतींनी स्थापन केल्या होत्या.

गुप्तकाळापर्यंत अनेक परकीय जमाती आक्रमणाच्या निमित्ताने येऊन भारतात स्थायिक झाल्या होत्या. त्यांना समाजव्यवस्थेत सामावून घेण्यात आले. 'नारदस्मृती', 'याज्ञवल्क्य स्मृती' यांसारख्या स्मृतिग्रंथांची निर्मिती या काळात झाली. या ग्रंथांमध्ये त्या अनुषंगाने झालेल्या समाजरचनेचे वर्णन आढळते.

> **अधिक माहितीसाठी :** गुप्तकाळात भारतात कापूस मोठ्या प्रमाणावर होत होता व त्यापासून विविध प्रकारचे कापडही तयार केले जात असे. कापडाचे क्षौम (लिनन), चित्रपट्ट (छापील रेशमी), दुकूल (रेशमी), पुलकबंध (रंगीत सुती), पुष्पपट्ट (फुलांची नक्षी असलेले), अंशुक (मलमल) अशा अनेक प्रकारांचे उल्लेख आढळतात. या कापडांना देशी-विदेशी बाजारांमध्ये मोठी मागणी होती.

गुप्तकालीन समृद्धता तत्कालीन मूर्तीशिल्प व साहित्यावरून समजते. गुप्तकालीन राजकीय स्थैर्य आणि समृद्धी व गुप्त सम्राटांनी संस्कृत भाषेला दिलेला राजाश्रय यामुळे या काळात अनेक विषयांवर संस्कृत भाषेत ग्रंथनिर्मिती झाली. भारतीय वाङ्मयातील एक उत्कृष्ट कलाकृती म्हणजेच कालिदासाचे 'शाकुंतल' हे नाटक या काळात लिहिले गेले.

मानवी आकृती हा गुप्त काळातील शिल्पकलेचा केंद्रबिंदू होता. मानवी शिल्पे आणि देवी-देवतांच्या मूर्ती या काळात घडवल्या गेल्या. भारतीय मूर्तिविज्ञानाचा पाया या काळात रचला गेला. सारनाथ, देवगढ, अजिंठा अशा अनेक ठिकाणी या काळातील शिल्पे आढळतात. या काळात हिंदू, बौद्ध व जैन धर्माच्या मूर्ती घडवल्या गेल्या. विशेष म्हणजे प्रस्तर व धातू यांच्या बरोबरच मातीचाही उपयोग मूर्ती बनवण्यासाठी या काळात केला जात असे. गांधार शैलीत दिसणारा ग्रीक शैलीचा प्रभाव गुप्तकाळातील शिल्पकलेत दिसत नाही.

भारतीय मंदिर स्थापत्याचा पाया या काळात घातला गेला. घडीव दगडांचा वापर करण्यास सुरुवात झाली. सांची, भुमरा, देवगड या ठिकाणी सुरुवातीच्या मंदिरांचे अवशेष आढळतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**ही माहिती तुम्हांला निश्चित आवडेल :**



मेहरौली येथील लोहस्तंभ

गुप्त काळात धातूंचे मिश्रण व ओतकाम यामध्ये लक्षणीय प्रगती झाली होती. दिल्लीचा लोहस्तंभ त्याची साक्ष आहे. कित्येक शतके न गंजता राहिलेला हा लोहस्तंभ पाहता त्या काळी धातुविज्ञान अत्यंत प्रगत होते, हे लक्षात येते.

## १०.५ वर्धन साम्राज्य

गुप्त साम्राज्याच्या पडत्या काळात उत्तर भारतातील स्थानेश्वर (ठाणेसर) या ठिकाणी 'वर्धन', गंगा-यमुना दुआबात 'मौखारी', सौराष्ट्रात 'मैत्रक' इत्यादी वंशांचा उदय झाला. पुष्यभूती हा वर्धन राजघराण्याचा मूळ पुरुष होता. प्रभाकरवर्धन या राजाच्या राज्यारोहणापासून वर्धन घराणे प्रभावी बनले. 'परमभट्टारक महाराजाधिराज' हे सार्वभौमत्वाचे बिरुद त्याने धारण केले होते. या घराण्याचा सर्वांत प्रभावी राजा म्हणजे हर्षवर्धन होय. त्याच्या साम्राज्याचा विस्तार नेपाळपासून नर्मदेपर्यंत व सौराष्ट्रापासून बंगालपर्यंत झालेला होता. हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर त्याला कोणी वारस नसल्यामुळे त्याच्या साम्राज्याचे तुकडे पडले व उत्तर भारतात अनेक राज्ये स्वतंत्र झाली.

हर्षवर्धनाच्या दरबारी असणारा राजकवी बाणभट्ट याने लिहिलेल्या 'हर्षचरित' तसेच चिनी प्रवासी ह्युएन त्संग याने लिहिलेले प्रवासवर्णन यांतून या काळची बरीच माहिती मिळते. हर्षवर्धनाच्या कारकिर्दीत नालंदा व वल्लभी ही विद्यापीठे जगातील श्रेष्ठ विद्याकेंद्रे बनली होती. भारतातूनच नव्हे तर चीन, तिबेट, कोरिया, जपान, श्रीलंका इत्यादी देशांतून शेकडो विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी तेथे येत असत. हर्षवर्धनाचे साम्राज्य हे प्राचीन भारतातील शेवटचे बलाढ्य साम्राज्य होते.

## १०.६ कर्कोटक साम्राज्य

काश्मीरमध्ये होऊन गेलेल्या राजघराण्यांपैकी इसवी सनाच्या सातव्या ते नवव्या शतकातील कर्कोटक घराण्याचा उल्लेख युआन श्वांग याने केला आहे. त्याच्या भारतभेटीत तो काश्मीरमध्ये गेला होता. कल्हणाच्या राजतरंगिणीमध्येही या घराण्याचे सविस्तर वर्णन आहे. दुर्लभवर्धन हा कर्कोटक घराण्याचा संस्थापक होता. त्याचे साम्राज्य नर्मदेपासून तिबेटपर्यंत पसरलेले होते.

दुर्लभवर्धनाचा नातू ललितादित्य (मुक्तापीड, इ.स.७२४-७६०) याची कारकीर्द विशेष उल्लेखनीय आहे. त्याने त्याच्या कारकिर्दीत दोनदा दिग्विजय केला. त्यामुळे काश्मीरच्या उत्तर सीमेवरील, विशेषतः अमुदर्या नदीच्या खोऱ्यातील अनेक जमातींना त्याने पळवून लावले. त्यामध्ये तुखार (तुर्क) लोकांचा समावेश होता. उत्तरापथातील अवंतीपासून ते ईशान्येकडील प्राग्ज्योतिषपूर (आसाम) पर्यंतचा प्रदेश त्याने पादाक्रांत केला होता. अवंती (कनोज) येथील यशोवर्मा या राजाच्या मदतीने त्याने समुद्र पार करून द्वीपांतर (श्रीलंका) केल्याचा उल्लेख कल्हणाने केला आहे. यावरून असे दिसते की ललितादित्याने उत्तरेला तिबेटपासून दक्षिणेला कावेरी नदीपर्यंत साम्राज्य प्रस्थापित केले असावे. त्याची तुलना गुप्त साम्राज्याशी करता येईल. ललितादित्य हा विष्णूचा उपासक होता. त्याने मार्तंड मंदिराची निर्मिती केली. ललितपूर नावाचे नगर त्याने वसवले होते. झेलम नदीच्या तीरावरील आजचे लाटपूर म्हणजेच ललितपूर असावे. हुष्कपूर (उशकूर) येथे त्याने बौद्धविहार बांधले होते.

## १०.७ व्यापार, नाणी, कला, मूर्तिशास्त्र

इसवी सनापूर्वीचे दुसरे शतक ते इसवी सनाचे चौथे शतक हा सहा शतकांचा काळ भारतीय इतिहासामध्ये मध्य आशियातून आलेल्या टोळ्यांच्या आगमनाचा आणि त्यांनी प्रस्थापित केलेल्या राजघराण्यांचा काळ होता. हे लोक भारतात येईपर्यंत त्यांच्या मार्गातील अनेक संस्कृतींची वैशिष्ट्ये आत्मसात करत ते इथपर्यंत पोचले. त्यामुळे भारतातील सांस्कृतिक जीवनातही परिवर्तन घडून आले.

तत्कालीन भारतीय समाजात शेती व पशुपालन हीच उपजीविकेची प्रमुख साधने होती. त्याचबरोबर



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**अधिक माहितीसाठी :** बॅक्ट्रियातील काही नाणी आकार आणि वजन या बाबतीत ग्रीक धर्तीची आहेत. त्यामधील काही नाण्यांवर घुबडाची प्रतिमा दिसते. घुबड हे 'अथेना' देवीचे चिन्ह आहे. अथेना ही अथेन्सची अधिष्ठाती देवता होती. ग्रीक भाषेतील मजकूर असलेली इंडो-ग्रीक नाणी बॅक्ट्रियात सापडलेली आहेत. त्यामध्ये दर्शनी बाजूवर ग्रीक भाषेत लेख असे आणि मागील बाजूवर प्राकृत भाषेतील लेख असे. प्राकृत भाषेतील लेखासाठी खरोष्ठी लीपीचा वापर केलेला असे.

विविध उद्योगधंदे व व्यापार यांची या काळात प्रगती झाली. त्यामध्ये भारतीयांचा परकीयांशी आलेला संपर्क महत्त्वाचा ठरला. मौर्यकाळाप्रमाणे या काळातही व्यापारी आणि कारागिरांच्या श्रेणी कार्यरत होत्या. या काळात भारताचा समुद्री व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढीस लागला. भारतीय माल जहाजांतून तांबड्या समुद्रापर्यंत आणि तेथून इजिप्तमार्गे रोम येथे रवाना होत असे. भारतातून वाघ, सिंह, माकड यांसारखे प्राणी, पोपट, मोर यांसारखे पक्षी, लोकर, रेशीम, मलमल, सुती कापड, हस्तिदंत, मोती, मसाल्याचे पदार्थ, चंदन, औषधी वनस्पती, हिरे, माणके व इतर चैनीच्या वस्तू निर्यात केल्या जात असत आणि बाहेरील देशातून शिसे, तांबे, काच, चांदी, सोने, मद्य इत्यादी वस्तू आयात केल्या जात असत. या व्यापारामुळे भारतात सुवर्ण नाण्यांचा ओघ सतत येत असल्यामुळे भारतभूमी समृद्ध बनली होती.

बॅक्ट्रियन ग्रीकांनी जी सुवर्ण नाणी चलनात आणली त्यावर राजांच्या व देवदेवतांच्या आकृती कोरलेल्या होत्या. ग्रीक तसेच रोमन नाण्यांचा मोठा प्रभाव शक, कुशाण इत्यादी राज्यकर्त्यांच्या नाण्यांवर पडलेला दिसतो. शकांच्या नाण्यांवर खरोष्ठी लिपी आढळते.

या काळची नाणी ही ग्रीक, भारतीय व इराणी संस्कृतीचा संमिश्र प्रभाव दर्शवतात. भारतीय देवदेवतांच्या प्रतिमा नाण्यांवर दर्शवणारे कुशाण हे पहिले राजे होते. शिव प्रतिमा असलेली तांब्याची नाणी त्यांनी चलनात आणली होती. भारत व चीनच्या सीमेलगतच्या प्रदेशात कुशाणांची नाणी सापडली. कुशाण आणि चिनी राज्यकर्ते यांच्यामध्ये राजनैतिक संबंध होते. मध्य आशियात सापडलेल्या कुशाण नाण्यांवर खरोष्ठी लिपीतील प्राकृत मजकूर आढळतो. या पुराव्याच्या आधारे प्राकृत भाषा बोलणारे लोक या भारतीय उपखंडाबाहेर देखील वास्तव्यास होते, असे दर्शवतात.

भारतीय, ग्रीक, रोमन, इराणी आणि शक संस्कृतींचा संगम गांधार प्रदेशात झाला होता. त्यामुळे या प्रदेशाला सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले होते. पुष्कळावती, तक्षशिला, पुरुषपूर इत्यादी नगरांमध्ये ज्या मूर्तिकलेचा विकास झाला, तिला 'गांधार शैली' असे नाव मिळाले. या प्रकारातील मूर्तींचे विषय भारतीय होते पण शैली ग्रीक होती. बौद्ध धर्मातील महायान पंथाच्या उदयामुळे या कलाशैलीला प्रोत्साहन मिळाले. गौतम बुद्ध व बोधिसत्वांच्या मूर्तींबरोबरच त्यासाठी दान देणाऱ्यांचे पुतळे देखील पाषाणात कोरले गेले. परंतु ही शैली वायव्येकडील भारतापुरतीच सीमित राहिली. गांधारशैलीच्या मूर्तींमध्ये प्राकृतिक सौंदर्याला अधिक महत्त्व होते. याच सुमारास मथुरा व वाराणसी कलाशैली विकसित झाली. त्यांतील गौतम बुद्धांच्या प्रतिमा पूर्णपणे भारतीय स्वरूपाच्या होत्या. मथुरा हे भारतीय शिल्पकलेचे महत्त्वाचे केंद्र होते. प्रतिमा-शिल्प हे मथुरा शिल्प पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. विम तक्षम व कनिष्क या कुशाण राजांचे पुतळे या प्रतिमा शिल्पाचे नमुने आहेत. तसेच सरस्वती, विष्णू, सूर्य, शिव आणि कार्तिकेय यांच्या मूर्ती प्रथम या काळात निर्माण झाल्या. कुशाणकाळातील ही शिल्पकला भारतीय शिल्पकलेच्या इतिहासात 'नवनिर्मितीचा' काळ दर्शवणारी होती. या काळात तत्कालीन संपन्न समाजाचे प्रतिबिंब देखील कलेतून उमटवण्याचा प्रयत्न केला गेला.


गांधार शैली

### १०.८ भारत-रोम व्यापार (महाराष्ट्रातील व्यापाराची केंद्रे)

इसवी सनपूर्व पहिल्या शतकाच्या मध्यावर लिहिलेला 'द पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन सी' या ग्रंथात तांबडा समुद्र आणि भारतीय किनारपट्टी यांना जोडणारे सागरी मार्ग, बंदरे, प्रदेश, व्यापारात विनिमय होणाऱ्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

वस्तू या सर्वांचे उल्लेख आहेत. तांबडा समुद्र, भारत व रोमच्या व्यापारी संबंधांसाठी महत्त्वपूर्ण होता. व्यापारी मालामध्ये कापड, काळी मिरी, मूल्यवान खडे, हस्तिदंत आणि रोमन अभिजनांच्या मनोरंजनासाठी माकड, पोपट व मोर असे प्राणी भारतातून निर्यात केले जाऊ लागले. त्याचा मोबदला सुवर्ण नाण्यांच्या रूपाने चुकवला जात असे. प्रवाळ आणि मद्य आयात केले जाऊ लागले. दोन्ही बाजूंना कान असलेल्या मद्यकुंभांची (अँफोरा) खापरे उत्खननात सापडली आहेत. त्यांच्या तळाशी साठलेल्या द्रव्याचे परीक्षण केल्यानंतर ते मद्याचे अवशेष असल्याचे दिसते. त्याव्यतिरिक्त या भांड्यांचा वापर ऑलिव्ह तेल आणि गॅरम (माशांचे लोणचे) ठेवण्यासाठीही होई. रोमन बाजारात मागणी असलेल्या वस्तूंच्या बदल्यात प्रामुख्याने रोमन नाणी स्वीकारली जात. महाराष्ट्र आणि दक्षिण भारतात ज्या प्रमाणात ही नाणी सापडतात त्यावरून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या व्यापाराची कल्पना येते. या व्यापारामुळे बाजारपेठ आणि शहरे यांच्या संख्येत वाढ झाली. पश्चिम भारतातही अनेक महत्त्वाची बंदरे या काळात उदयास आली. महाराष्ट्रात येणाऱ्या व्यापारी वस्तूंची कोठारे (उत्पादनकेंद्रे) तेर, नेवासा, भोकरदन, कोंडापूर आणि सन्नती येथे होती. सोपारा आणि कल्याण ही बंदरे भारत रोम व्यापाराची महत्त्वाची केंद्रे होती. या केंद्रांमध्ये या व्यापाराची साक्ष असलेली रोमन भांडी (Amphora) आणि तांबडी भांडी उत्खननात सापडतात. तसेच रोमन नाण्यांच्या प्रतिकृती देखील सापडतात. दक्षिण भारतात व्यापाराच्या वाढीबरोबर धरणीकोट, अमरावती, नागार्जुनीकोंडा अशा ठिकाणी बौद्ध केंद्रेही स्थापन झाली होती.

पुढील पाठात आपण दक्षिण भारतातील राजसत्तांचा अभ्यास करणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. इंडो-ग्रीकांचा इतिहास हा प्रामुख्याने त्यांच्या .................... समजतो.
   (अ) साहित्यावरून (ब) कोरीव लेखांवरून
   (क) नाण्यांवरून (ड) मातीच्या भांड्यांवरून

२. गुप्त वंशाचा संस्थापक .................... हा होता.
   (अ) श्रीगुप्त (ब) घटोत्कच
   (क) समुद्रगुप्त (ड) रामगुप्त

३. शकांचा पराभव करून गादीवर आल्यावर ‘विक्रमादित्य’ हे बिरुद .................... याने धारण केले.
   (अ) दुसरा चंद्रगुप्त (ब) रामगुप्त
   (क) पहिला चंद्रगुप्त (ड) कुमारगुप्त

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. क्षौम – लिनन कापड
२. पुष्पपट्ट – सुती कापड
३. दुकूल – रेशमी कापड
४. अंशुक – मलमल कापड

**प्र.२ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. गुप्तकाळात स्थानिक जमीनदारांच्या हाती सत्ता केंद्रित होऊ लागली.
२. हूण स्वाऱ्यांची प्रत्येक लाट गुप्तांना दुर्बल बनवत गेली.

**प्र.३ तुमचे मत नोंदवा.**

दिग्विजयानंतर समुद्रगुप्ताने अश्वमेध यज्ञ केला.

**प्र.४ टीपा लिहा.**

१. गुप्तकालीन शिल्पकला
२. भारत-रोम व्यापार

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

गुप्त कालखंडातील विविध क्षेत्रांमधील प्रमाणीकरण कसे झाले ते लिहा.
(अ) गुप्तकालीन प्रशासनाची विभागणी
(ब) शेतीच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना
(क) गुप्तकालीन नाणी/नाणक शास्त्रातील प्रगती

**उपक्रम**

आंतरजालाच्या मदतीने बाणभट्ट लिखित ‘हर्षचरित’ या ग्रंथाविषयी अधिक माहिती मिळवा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ११. दक्षिण भारतातील राजसत्ता

११.१ दक्षिण भारतातील महत्त्वाची राज्ये
११.२ राज्यव्यवस्था, व्यापार, समाजजीवन
११.३ साहित्य, कला, स्थापत्य

या पाठात दक्षिण भारतात कोणती राज्ये होती, त्यांची राज्यव्यवस्था, व्यापार इत्यादी गोष्टींचा परिचय आपण करून घेणार आहोत.

## ११.१ दक्षिण भारतातील महत्त्वाची राज्ये

**चोळ, पांड्य व चेर राजघराणी :** चोळ, पांड्य व चेर या दक्षिण भारतातील प्राचीन राजसत्ता होत्या. मेगॅस्थिनिसचा 'इंडिका', पाणिनीचे 'व्याकरण' आणि सम्राट अशोकाचे शिलालेख यांमधून दक्षिणेकडील राज्यांचा उल्लेख येतो. 'संघम साहित्य' या नावाने ओळखले जाणारे प्राचीन तमिळ वाङ्मय हे दक्षिणेकडील राजसत्तांच्या इतिहासाचे एक प्रमुख साधन मानले जाते.

**अधिक माहितीसाठी :** भारतीय इतिहास आणि संस्कृती यांमध्ये दक्षिण भारताचा मोठा वाटा आहे. उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यातील सांस्कृतिक देवाणघेवाणीमुळे भारतीय संस्कृती वैविध्यपूर्ण आणि तरीही एकात्म झाली. दक्षिण भारतातील लोक द्राविड भाषा बोलणारे आहेत. द्राविड भाषागटामध्ये तमिळ, कन्नड, मल्याळम आणि तेलुगु या प्रमुख चार भाषा आहेत. बलुचिस्तानातील 'ब्रौही' भाषा ही द्राविड भाषागटातील आहे.

पहिल्या शतकात चोळांचे राज्य स्थापन झाले. तमिळ प्रदेशातील तंजावर आणि तिरुचिरापल्ली येथे चोळ राजवंश उदयास आला. या प्रदेशास 'चोळमंडल' म्हणून ओळखले जाऊ लागले. ('कॉरोमॉंडेल' हा इंग्रजी शब्द 'चोळमंडल' या शब्दाचा अपभ्रंश आहे.) चोळांच्या दक्षिणेला पुदुक्कोट्टैपासून कन्याकुमारीपर्यंत पांड्य घराण्याची सत्ता स्थापन झाली होती. त्यांच्या पश्चिमेस असणाऱ्या केरळच्या प्रदेशात चेरांचे राज्य निर्माण झाले होते. तत्कालीन साहित्यात चेरांच्या राज्याचा उल्लेख 'केडलपुतो' (केरलपुत्र) असा येतो. राजकीय वर्चस्वासाठी ही राज्ये कायम एकमेकांशी संघर्ष करत राहिली. त्यांच्यातील संघर्ष 'त्रिपक्षीय संघर्ष' म्हणून प्रसिद्ध आहे. संघम साहित्यातील अनेक कथांमधून चोळांचा पहिला राजा करिकाल याचा उल्लेख आढळतो. त्याने छोट्या-छोट्या अकरा राजांना एकत्र आणून मोठे सैन्य उभारले आणि चेर व पांड्य राजांचा पराभव करून तमिळ अधिसत्ता निर्माण केली.

कृष्णा-तुंगभद्रा या नद्यांच्या उत्तरेला देखील काही राज्यांचा उदय झाला. यात प्रामुख्याने सातवाहनांची सत्ता होती.

**वाकाटक घराणे :** सातवाहन सत्ता इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून क्षीण होण्यास सुरुवात झाली होती. त्याचा फायदा घेऊन स्वतंत्र राजसत्ता प्रस्थापित करणाऱ्यांमध्ये वाकाटक घराणे महत्त्वाचे होते. वाकाटक राजसत्तेच्या संस्थापकाचे नाव 'विंध्यशक्ती' असे होते. विंध्यशक्तिनंतर 'प्रवरसेन' हा राजा गादीवर आला. त्याने वाकाटक साम्राज्याचा विस्तार उत्तरेस माळवा आणि गुजरातपासून दक्षिणेस कोल्हापूर, कर्नूल (आंध्र प्रदेश) पर्यंत केला होता. कोल्हापूरचे त्या काळातील नाव 'कुंतल' असे होते. प्रवरसेनाने चार अश्वमेध यज्ञ केले आणि सम्राट ही पदवी धारण केली.


प्रवरसेनानंतर वाकाटक राज्याचे विभाजन होऊन दोन प्रमुख शाखा निर्माण झाल्या. त्यांतील एका शाखेची राजधानी 'नंदीवर्धन' (नगरधन-रामटेक, जिल्हा नागपूर) येथे होती. दुसऱ्या शाखेची राजधानी 'वत्सगुल्म' म्हणजे सध्याचे वाशिम (जिल्हा वाशिम) येथे होती.

गुप्त सम्राट, दुसरा चंद्रगुप्त याची कन्या प्रभावती हिचा विवाह वाकाटक राजा दुसरा रूद्रसेन याच्याशी झाला होता. याचा उल्लेख यापूर्वी आला आहे. 'हरिषेण' याचा मंत्री 'वराहदेव' हा बौद्ध धर्माचा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




अनुयायी होता. अजिंठा येथील १६ क्रमांकाचे लेणे त्याने खोदवून घेतले होते. अजिंठ्याच्या इतर काही लेण्यांच्या खोदाईचे काम आणि चित्रांचे रेखाटनाचे काम हरिषेणाच्या कारकिर्दीत करण्यात आले होते.

वाकाटक राजा दुसरा प्रवरसेन याने 'सेतुबंध' या माहाराष्ट्री प्राकृत भाषेतील रचना केली. तसेच कवी कालिदासाने या काळात रचलेल्या अनेक ग्रंथांपैकी 'मेघदूत' हे इतिहासलेखनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामध्ये वर्णन केलेल्या भौगोलिक संदर्भांच्या आधारे तत्कालीन शहरे आणि इतर स्थळे यांची माहिती मिळते.

**चालुक्य :** उत्तर भारतात सम्राट हर्षवर्धनचे राज्य असताना, चालुक्य घराण्याने दक्षिणेत सुमारे दोनशे वर्षे राज्य केले. या घराण्याचा मूळ संस्थापक जयसिंग होता. त्याने सहाव्या शतकाच्या सुरुवातीस वातापी (बदामी) येथे आपली राजधानी स्थापन केली. त्याचा नातू पहिला पुलकेशी हा चालुक्यांचा पहिला मोठा राजा. बदामीचा किल्ला त्याने बांधला. त्याने अश्वमेध यज्ञ करून 'महाराज' ही पदवी धारण केली होती. त्याने स्वत: 'पृथ्वीवल्लभ' आणि 'सत्याश्रय' अशी बिरुदे लावलेली आढळतात. पहिल्या पुलकेशीनंतर त्याचा मुलगा कीर्तिवर्मा राज्यावर आला. त्याच्या कारकिर्दीत त्याने वनवासीचे (कारवार) कदंब व अपरान्ताचे (उत्तर कोकण) मौर्य यांना जिंकून आपले राज्य वाढवले. कीर्तिवर्मा कलेचा भोक्ता होता. बदामीतील सुंदर लेणी त्याच्या आदेशाने निर्माण केली गेली.

दुसरा पुलकेशी हा चालुक्यांचा सर्वांत महान राज्यकर्ता होता. त्याने दक्षिण भारतात दिग्विजय करून चालुक्यांची सत्ता बलाढ्य बनवली. रविकीर्ती नावाच्या कवीने रचलेल्या प्रशस्तीमध्ये त्याच्या पराक्रमाचे वर्णन केलेले आहे. कदंब, मौर्य, नल, कलचुरी, राष्ट्रकूट, लाट, मालव व गुर्जर अशा अनेक राजांना पराभूत करून त्याने विदर्भ, महाराष्ट्र व कर्नाटक अशा विस्तीर्ण



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रदेशांवर चालुक्यांची सत्ता प्रस्थापित केली. सम्राट हर्षवर्धनाने दक्षिण जिंकण्यासाठी जी स्वारी केली, तिचा प्रतिकार दुसऱ्या पुलकेशीने केला. त्याने हर्षवर्धनाचा पराभव करून मोठी कीर्ती संपादन केली. या विजयानंतर त्याने 'परमेश्वर' हे बिरुद धारण केले. दक्षिण दिग्विजय करून त्याने त्याचे साम्राज्य नर्मदेपासून कावेरीपर्यंत आणि पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत विस्तारले. त्याच्या पराक्रमाची कीर्ती भारताबाहेरही गेली होती. या वेळी इराणमध्ये खुश्रू परविझ नावाचा बादशाह होता. त्याने त्याचा खास राजदूत सम्राट पुलकेशीकडे पाठवल्याचा उल्लेख मिळतो. हा संपूर्ण प्रसंग अजिंठा येथील पहिल्या क्रमांकाच्या लेण्यातील छतावर चित्रबद्ध केलेला आहे, असे काही विद्वानांचे मत आहे. कांचीच्या पल्लवांनी त्याचा पराभव करून, बदामी या राजधानीवर हल्ला चढवला व तिचा विध्वंस केला. दुसऱ्या पुलकेशीचा पुत्र विक्रमादित्य याने पल्लवांचा पराभव केला. चालुक्य व पल्लव यांचा हा संघर्ष पुढे बराच काळ चाललेला दिसतो. चालुक्यांचा शेवटचा राजा कीर्तिवर्मा याचा पराभव दंतिदुर्ग या राष्ट्रकूट राजाने केला.

**पल्लव :** साधारणपणे सहाव्या शतकापासून नवव्या शतकापर्यंत पल्लव राजे दक्षिण भारतातील एक प्रबळ शक्ती म्हणून ओळखले जातात. पण पल्लव मूळचे कोण, कुठले इत्यादीविषयी इतिहास तज्ज्ञांमध्ये एकमत नाही. पल्लवांचे काही प्राचीन ताम्रपट सापडले आहेत. त्यामध्ये सिंहवर्मा व शिवस्कंदवर्मा या आरंभीच्या पल्लवांची सत्ता पूर्व किनाऱ्यावर उदयास आली असे दिसते. कांची ही पल्लवांची राजधानी होती. सिंहविष्णूच्या कारकिर्दीपासून आपणास पल्लव घराण्याची संगतवार माहिती मिळते. त्याने चोळांचा प्रदेश जिंकून घेतला आणि कृष्णेपासून कावेरीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. सिंहविष्णूनंतर त्याचा पुत्र महेंद्रवर्मा गादीवर बसला. हा स्वत: मोठा पंडित होता. त्याने संस्कृतमध्ये 'मत्तविलास' हे प्रहसन लिहिले. त्याने संगीतविषयक ग्रंथ रचला. संगीत, नृत्य, शिल्पकला, चित्रकला इत्यादी अनेक कलांना त्याने राजाश्रय दिला. एकसंध दगडातून मंदिर खोदून काढण्याची पद्धत त्याने सुरू केली. त्याच्या कारकिर्दीत त्रिचिरापल्ली, चिंगलपूट, उत्तर व दक्षिण अर्काट जिल्ह्यांत अनेक मंदिरे बांधली गेली. याच्या कारकिर्दीत पल्लवांचे चालुक्य घराण्याशी युद्ध सुरू झाले. त्याचा पुत्र नरसिंहवर्मा याने चालुक्य सम्राट दुसरा पुलकेशी याचा पराभव केला. त्याच्या काळात महाबलिपुरम येथे अनेक मंदिरे निर्माण केली गेली. प्रसिद्ध चिनी प्रवासी युआन श्वांग काही काळ त्याच्या दरबारात होता. नरसिंहवर्माच्या याच्या लिखाणावरून राज्याविषयी बरीच माहिती मिळते. पल्लवांचे राज्य नवव्या शतकापर्यंत अस्तित्वात होते. अपराजित हा शेवटचा पल्लव राजा होता. चोळ राजा आदित्य याने त्याचा पराभव करून पल्लवांचे राज्य नष्ट केले.



**महाबलिपुरम येथील युधिष्ठिर रथमंदिर**

**राष्ट्रकूट :** राष्ट्रकूट घराण्यातील दंतिदुर्ग हा पहिला पराक्रमी राजा होता. राष्ट्रकूट घराण्याची सत्ता विंध्य पर्वतापासून ते दक्षिणेला कन्याकुमारीपर्यंत पसरलेली होती. दंतिदुर्गानंतर त्याचा चुलता कृष्ण पहिला हा गादीवर आला. त्याने चालुक्यांची सत्ता समूळ नष्ट केली. कृष्ण पहिला या राजाने वेरूळचे सुप्रसिद्ध कैलास मंदिर खोदवले. त्यानंतर आलेल्या राष्ट्रकूट राजांनी उत्तर भारतात आपला प्रभाव निर्माण केला. अमोघवर्ष हा राष्ट्रकूट घराण्यातील कर्तबगार राजा होता. अमोघवर्षाने 'रत्नमालिका' व 'कविराजमार्ग' या ग्रंथांची रचना केली. त्याने सोलापूरजवळ मान्यखेट (मालखेड) हे नवे नगर वसवले. परमार आणि कल्याणीचे चालुक्य यांनी केलेल्या आक्रमणांनी राष्ट्रकूट घराण्याचा ऱ्हास झाला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



वेरूळ येथील कैलास मंदिर

**शिलाहार :** या घराण्याच्या तीन शाखा होत्या – दक्षिण कोकण, उत्तर कोकण आणि कोल्हापूरचे शिलाहार. ते स्वत:ला 'तगरपुराधीश्वर' (तगर-तेर, जि. उस्मानाबाद) असे म्हणवून घेत. या तीनही शाखांचे राजे आद्यपुरुष म्हणून जीमूतवाहन याचा उल्लेख करताना दिसतात. शिलाहारांचा प्रभाव महाराष्ट्राबाहेर आढळून येत नाही. आधी राष्ट्रकूटांचे व नंतर चालुक्यांचे मांडलिकत्व पत्करून त्यांनी सुमारे तीनशे वर्ष राज्य टिकवून ठेवले.

**दक्षिण कोकण –** शिलाहारांची दक्षिण कोकणातील सत्ता सणफुल्ल या राजाने स्थापन केली. त्याचा मुलगा धम्मियार याने बालिपट्टण हे गाव वसवले व तेथे एक किल्ला बांधला. पुढे आदित्यवर्मा या राजाने आपले राज्य ठाण्यापासून गोव्यापर्यंत वाढवले. या घराण्याचा शेवटचा राजा रट्टराज होता. या घराण्याचा इतिहास खारेपाटणच्या एका ताम्रपटावरून ज्ञात होतो.

**उत्तर कोकण –** शिलाहारांची उत्तर कोकणातील शाखा कपर्दी या राजाने स्थापन केली. ही शाखा प्रारंभी राष्ट्रकूटांची मांडलिक होती. याची राजधानी स्थानक (ठाणे) येथे होती. त्यानंतरचा महत्त्वाचा राजा म्हणजे अपराजित. त्याने सुमारे पस्तीस वर्षे राज्य केले. पुढे छित्तराज राजाने राज्य केले. त्याच्या भावांमध्ये राज्य प्रस्थापित करण्यासाठी भांडणे झाली. या सर्वांचा फायदा घेऊन कोल्हापूरचे शिलाहार आणि कदंब यांनी उत्तर कोकणच्या प्रदेशाचे काही भाग जिंकून घेतले. छित्तराजाचा भाऊ मुम्मुणि याने याच काळात अंबरनाथ येथील आम्रेश्वर महादेवाचे भव्य मंदिर बांधून पूर्ण केले. महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्य प्रकारातील भूमिज शैलीचा हा प्रारंभ मानला जातो.

**कोल्हापूर –** या राज्यात सातारा, कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी आणि बेळगाव या सध्याच्या जिल्ह्यांचा समावेश होता. शिलाहारांची कोल्हापूर शाखा जतिग याने स्थापन केली. राजा भोज (दुसरा) हा या घराण्यातील महत्त्वाचा राजा होता. कोल्हापूर, वळीवडे व पन्हाळा ही या घराण्याच्या राजधानीची शहरे होती. खिद्रापूर येथील कोप्पेश्वर महादेवाच्या भव्य मंदिराच्या निर्मितीचे श्रेय या घराण्याकडे जाते.

**गोंड :** यादवांच्या काळात चांदा (चंद्रपूर) येथे गोंड घराण्याची स्थापना झाली. कोल भिल हा या घराण्याचा संस्थापक होता. त्याने गोंड जमातीला एकत्रित करून नाग घराण्याविरुद्ध उठाव केला. त्याने शिरपूर येथे राजधानी स्थापन केली. पुढील काळात खांडक्या बल्लाळसिंग याने बल्लारपूर येथे किल्ला बांधला व राजधानीचे ठिकाण शिरपूरहून बल्लारपूर येथे हलवले. त्याच्याच काळात अचलेश्वर येथे मंदिर बांधण्यात आले. निळकंठशाहच्या काळात नागपूरच्या रघूजी भोसले यांनी गोंड राजाचा पराभव केला व त्याचे राज्य विलीन केले. एकूण ६२ गोंड राजांनी महाराष्ट्रातील देवगड, नागपूर आणि चंद्रपूर येथे अनेक शतके राज्य केले.



राणी दुर्गावती

गोंड घराण्यातील राणी दुर्गावतीने मुघलांविरुद्ध दिलेला लढा महत्त्वाचा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

आहे. दुर्गावतीने पतीच्या मृत्यूनंतर सम्राट अकबराविरुद्ध लढताना प्राणार्पण केले, परंतु शरणागती पत्करली नाही.

**यादव :** मध्ययुगीन महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे घराणे म्हणजे यादव घराणे होय. यादव घराण्यातील पाचवा भिल्लम (इ.स. ११८५-९३) हा महत्त्वाचा राजा होय. त्याने कलचुरींचा पराभव करून राज्याचा विस्तार केला. त्याने देवगिरी येथे राजधानी स्थापन करून स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. पुढील काळात यादव घराण्यातील सिंघण राजा महत्त्वाचा होय. त्याने होयसळांचा, शिलाहारांचा पराभव करून यादव सत्तेचा विस्तार केला.

इ.स.१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खल्जीने दक्षिण भारतावर स्वारी केली. खल्जीने यादव राजा रामदेवचा पराभव केला. येथून पुढे यादव राज्याला उतरती कळा लागली. इ.स. १३०७ मध्ये अल्लाउद्दीनने आपला सेनापती मलिक काफूरला देवगिरीवर स्वारीसाठी पाठवले. त्याने यादवांचा पराभव केला. यादवांनी दिल्लीचे मांडलिकत्व पत्करले. इ.स.१३१० मध्ये यादव राजा शंकरदेव याची मलिक काफूरने हत्या केली. इ.स. १३१८ मध्ये दिल्लीच्या सुलतानांनी यादव सत्तेचा शेवट घडवून आणला.

महाराष्ट्राच्या इतिहासात यादव कालखंडास विशेष महत्त्व आहे. या काळात सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती झाली. यादवांच्या काळात महानुभाव आणि वारकरी पंथ उदयास आले. या काळात खानदेशात पाटण, कर्नाटकात सोलोटगी आणि मराठवाड्यात पैठण येथे विविध विद्या व शास्त्रांच्या अध्ययनाची केंद्रे होती. याच काळात धर्मशास्त्र, 'पूर्वमीमांसा', न्याय आणि वेदान्त या विषयावरील संस्कृत ग्रंथांच्या रचना झाल्या. याज्ञवल्क्य स्मृतीवरील अपरार्क याने लिहिलेली टीका, 'चतुर्वर्गचिंतामणि' हे संस्कृत ग्रंथ महत्त्वाचे आहेत. शारंगदेव यांचा संगीतशास्त्रावरील 'संगीतरत्नाकर' हा ग्रंथ आजही प्रमाण मानला जातो.

महानुभव पंडित म्हाइंभट्टांनी लिहिलेले 'लीळाचरित्र', मुकुंदराजाचे 'विवेकसिंधु', ज्ञानदेवांची 'भावार्थदीपिका' हे मराठी ग्रंथ याच काळातील होत. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदायाच्या नामदेव, जनाई, चोखोबा यांसारख्या संत कवींनी अभंगरचना केली. याच काळात अनेक मंदिरे बांधली गेली. या मंदिरांना हेमाडपंती मंदिरे असे म्हटले जाते. सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिर, अंजनेरी येथील मंदिर संकुल ही या काळात बांधल्या गेलेल्या मंदिरांची उत्तम उदाहरणे आहेत. हेमाडपंती मंदिरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भिंतींचे दगड सांधण्यासाठी चुना वापरलेला नसतो. दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंत उभारली जाते. या काळात अंकाई आणि टंकाई अशा किल्ल्यांचेही बांधकाम झाले.



सिन्नर येथील गोंदेश्वर मंदिर

## ११.२ राज्यव्यवस्था, व्यापार, समाजजीवन

दक्षिणेतील राज्यव्यवस्थेत 'महादंडनायक', 'राष्ट्रिक', 'देशाधिकृत', 'अमात्य', 'आयुक्त' यांसारखे अधिकारी होते. चोळांच्या राज्यात असलेल्या अधिकाऱ्यांच्या मंडळास 'उदानकुट्टम' असे म्हटले जाई. राज्य अनेक प्रांतात विभागलेले असे. त्या प्रांतांना 'मंडलम्' असे म्हणत. मंडलम्चा अधिकारी राजघराण्यातील सदस्य असे. त्याच्या हाताखाली 'विषयपती', 'देशाधिपती', 'देशाधिकृत', 'राष्ट्रिक' असे विविध अधिकारी असत. दक्षिणेतील राज्यांचे प्रशासन अत्यंत कार्यक्षम होते. राज्यकारभारातील प्रत्येक हुकमाची नोंद दप्तरी घेऊन त्यावर संबंधित अधिकाऱ्याची सही झाल्याशिवाय त्याची कार्यवाही होत नसे. स्वायत्त ग्रामसंस्था हे दक्षिणेतील राज्यपद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. गावाचा सर्व कारभार ग्रामसभा पाहत असे. ग्रामसभेच्या प्रमुखास 'ग्रामभोजक', 'ग्रामकूट' इत्यादी नावांनी ओळखले जात असे. ग्रामसभेच्या प्रमुखास गावकरीच निवडत असत तर काही वेळेस राजाकडून त्याची निवड होत असे. ग्रामसभेप्रमाणेच जिल्हा, प्रांत यांच्या पातळीवर ग्रामप्रमुखांची सभा असे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

जमीन महसूल राज्याच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत होता. याशिवाय जकात, व्यवसाय कर, यात्रा कर यांसारखे करही राज्याच्या उत्पन्नाची साधने होती.

चोळ, पांड्य, चेर, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव, शिलाहार, यादव या राज्यांच्या प्रदेशांत विशेष कौशल्यावर आधारित अनेक प्रकारचे व्यवसाय चालत असत. हस्तिदंत मलयगिरीच्या जंगलातून मिळवले जाई. चोळमंडलम्‌चा प्रदेश उत्तम दर्जाच्या वस्त्रांसाठी प्रसिद्ध होता. सुती कापड तसेच रंगीत, रेशमी वस्त्रांची निर्मिती या प्रदेशात होत असे. चेरांच्या राज्यात अत्यंत तलम कापड विणले जाई. भारत आणि रोम यांच्यामधील व्यापारात या गोष्टींना विशेष महत्त्व होते. मार्को पोलोच्या प्रवासवर्णनात त्याची नोंद आढळते. दक्षिण भारतातील व्यापार व उद्योगात या काळात भरभराट सुरू झाली. शेतीची समृद्धता, वाढते उद्योगधंदे यांमुळे पैठण, तगर (तेर), नाशिक इत्यादी नगरे उदयास आली.

**अधिक माहितीसाठी : दक्षिण भारतातील नाणी :** मौर्य राज्याच्या काळात दक्षिण भारतात मौर्यांची नाणी चलनात होती. मौर्यांच्या अस्तानंतर पांड्य राजांनी स्वतःची आहत नाणी पाडली होती. त्यावर सूर्य, घोडा, स्तूप, वृक्ष, मासा यांसारख्या आकृती कोरलेल्या असत. चेरांच्या नाण्यांवर एका बाजूला धनुष्यबाणाची आकृती व दुसऱ्या बाजूवर हत्तीची आकृती कोरलेली असे. चोळांच्या नाण्यांवर त्यांचे व्याघ्र हे राजचिन्ह पहायला मिळते. चोळांची नाणी सोन्याची व चांदीची असून त्यावर देवनागरी लिपीतील मजकूर कोरलेला असे. चोळ घराण्यातील 'राजराजा' या राजाची सुवर्ण, चांदी व तांबे अशा तिन्ही धातूंची नाणी मिळाली असून त्यावर राजराजाची प्रतिमा व व्याघ्र या आकृती कोरलेल्या दिसून येतात. रोमशी होणाऱ्या व्यापारामुळे अनेक रोमन नाणी देखील या प्रदेशात सापडतात. त्या नाण्यांवर भारतीय राजांचे शिक्के उमटवून ते पुन्हा चलनात आणल्याचे दिसून येते.

ग्रामीण क्षेत्रात निर्माण होणारी उत्पादने नगरात विक्रीसाठी आणली जात असत. ही उत्पादने जेथे विकली जात तो बाजारपेठेचा भाग नगराच्या मध्यभागी असे. दक्षिण भारतातील व्यापारी श्रेणी व्यापार आणि समाजव्यवस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असे.

### ११.३ साहित्य, कला, स्थापत्य

दक्षिणेकडील राज्यांमध्ये प्राचीन काळापासूनच काव्य आणि व्याकरणाच्या ग्रंथांच्या निर्मितीची परंपरा होती. तमिळ संस्कृतीत संघम साहित्याचा कालखंड हा सर्वांत प्राचीन साहित्याचा कालखंड मानला जातो. हे साहित्य दक्षिण भारताच्या राजकीय इतिहासाचे प्रमुख साधन आहे. एकूण तीन 'संघम' (विद्वान साहित्यिकांची परिषद) होऊन गेले, असे मानले जाते.

हा काळ संस्कृत वाङ्मयाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा होता. कालिदासाने 'मेघदूत' हे काव्य विदर्भातील रामटेक या ठिकाणी रचले. वाकाटकांच्या राजवटीत प्राकृत काव्यही निर्माण झाले. दुसरा प्रवरसेन या वाकाटक घराण्यातील राजाने 'सेतुबंध' हे सुप्रसिद्ध काव्य रचले. वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा संस्थापक सर्वसेन याने 'हरिविजय' हे काव्य रचले.

दक्षिण भारताच्या स्थापत्यकलेत मुख्यतः दोन शैली आढळतात. एक 'द्राविड' स्थापत्यशैली आणि दुसरी 'वेसर' स्थापत्यशैली.

कृष्णा नदीपासून कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशात द्राविड स्थापत्यशैलीचा उदय व विकास झाला. द्राविड शैलीचे वैशिष्ट्य म्हणजे शिखरांची उभारणी. या पद्धतीच्या शिखरांमधील मजले एकावर एक लहान होत गेलेले असतात. कांची येथील कैलासनाथ आणि वैकुंठपेरूमल मंदिर, तंजावर येथील बृहदीश्वर मंदिर इत्यादी मंदिरे द्राविड शैलीचे उत्कृष्ट नमुने आहेत.

चालुक्यांनी ऐहोळे, बदामी आणि पट्टदकल इत्यादी ठिकाणी मंदिरे बांधली.

राष्ट्रकूटांच्या काळात वेरूळ येथील जगप्रसिद्ध कैलास मंदिराची निर्मिती झाली.

चोळांच्या काळातील धातुशिल्पे ही भारतीय धातुशिल्पांमध्ये सर्वोत्कृष्ट आहेत. यांमध्ये नटराज शिवाच्या कांस्यमूर्ती सर्वांत प्रसिद्ध आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


नटराजाची कांस्य मूर्ती

वाकाटकांच्या काळात दक्षिणेतील शिल्पकला व चित्रकला यांनी उत्कर्षबिंदू गाठलेला दिसतो. अजिंठा लेण्यातील क्र. १,२,१६,१७ आणि १९ ही लेणी या काळात निर्माण झाली. या लेण्यांच्या शिल्पकारांना शरीररचनेचे व निसर्गातील बारकाव्यांचे उत्तम ज्ञान होते, असे दिसते.

आतापर्यंत आपण भारताच्या सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासाचा थोडक्यात आढावा घेतला. भारतीयांचे बाहेरील देशांशी प्राचीन काळापासून सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झालेले होते. पुढील दोन पाठांमध्ये आपण भारत आणि भारताबाहेरील देश यांच्यातील सांस्कृतिक संबंधांचा इतिहास समजून घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) खालील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करून लिहा.**

१. वाकाटक घराण्यातील प्रसिद्ध राजा .................... हा होता.
   (अ) सर्वसेन (ब) प्रवरसेन
   (क) जयसिंग (ड) चंद्रगुप्त

२. दुसरा पुलकेशीने दक्षिण दिग्विजय करून .................... हे बिरुद धारण केले.
   (अ) 'परमेश्वर' (ब) 'विषयपती'
   (क) 'देशाधिपती' (ड) सत्याजय

३. कालिदासाने .................... हे काव्य विदर्भातील रामटेक या ठिकाणी रचले.
   (अ) शाकुंतल (ब) मेघदूत
   (क) मालविकाग्नीमित्र (ड) हरिविजय

४. जगप्रसिद्ध कैलास मंदिराची निर्मिती .................... काळात झाली.
   (अ) चालुक्य (ब) पल्लव
   (क) चेर (ड) राष्ट्रकूट

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. सेतुबंध काव्य – पाणिनी
२. हरिविजय ग्रंथ – सर्वसेन
३. इंडिका ग्रंथ – मेगॅस्थेनिस
४. संगीतरत्नाकर – शारंगदेव

**प्र.२ गटात न बसणारा शब्द लिहा.**

१. दक्षिण भारतातील प्राचीन राजघराणी – चोळ, पांड्य, मौर्य, चेर
२. द्राविड शिल्पशैलीची उदाहरणे – राजराजेश्वर मंदिर, घारापुरी लेणी, हळेबीड येथील मंदिरे, बदामी येथील मंदिरे

**प्र.३ खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. दक्षिण भारतात चालुक्यांची प्रबळ सत्ता निर्माण झाली.
२. महाराष्ट्राच्या इतिहासात यादव कालखंडाला महत्त्व आहे.

**प्र.४ टीपा लिहा.**

१. दक्षिण भारतातील राज्यव्यवस्था
२. दक्षिण भारतातील नाणी

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

शिलाहार घराण्याविषयी माहिती लिहा.
(अ) संस्थापक (ब) दक्षिण कोकणचे शिलाहार
(क) उत्तर कोकणचे शिलाहार
(ड) कोल्हापूरचे शिलाहार

**उपक्रम**

वेरूळच्या कैलास मंदिराला भेट देऊन तेथील शिल्पाकृतींची माहिती गोळा करून टिपण तयार करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १२. भारत, वायव्येकडील देश आणि चीन

१२.१ प्राचीन काळातील व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध

१२.२ भारत आणि गांधार (अफगाणिस्तान आणि पाकिस्तान)

१२.३ भारत आणि चीन


## १२.१ प्राचीन काळातील व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध

भारताच्या प्राचीन इतिहासाचा आढावा घेत असताना आपण सुमारे ४००० वर्षे इतक्या प्रदीर्घ कालखंडातील ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रांमध्ये होत गेलेल्या स्थित्यंतरांचा अभ्यास केला. या पाठात भारताबाहेरील प्रदेशांमध्ये दिसणाऱ्या भारतीय संस्कृतीच्या खुणांचा परिचय आपण करून घेणार आहोत.

परकीय प्रदेशात गेलेल्या भारतीयांनी त्यांची संस्कृती, धर्म आणि राजकीय सत्ता स्थानिक लोकांवर लादण्याचा प्रयत्न केला नाही, ही बाब विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. त्या प्रदेशांमधील स्थानिक लोकांशी त्यांची सांस्कृतिक देवाणघेवाण झाली आणि त्यातून त्या स्थानिक संस्कृतींमध्ये मोलाची भर पडत गेली.

हिंदुकुश पर्वतापलीकडच्या प्रदेशात झालेला भारतीय संस्कृतीचा प्रसार हा प्रामुख्याने बौद्‌ध धर्माच्या प्रसाराशी निगडित आहे.

कथासरित्सागर, जातककथा, दिपवंश, महावंश या ग्रंथांमधून प्राचीन काळातील भारतातून दूरवरच्या प्रदेशांशी चालणाऱ्या व्यापाराचे संदर्भ दिलेले आढळतात. भारतीय व्यापाऱ्यांच्या समुद्री प्रवासाच्या आणि धाडसाच्या अनेक गोष्टी यांमध्ये सांगितलेल्या आहेत. संघम साहित्यात






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सोने घेऊन येणाऱ्या आणि काळी मिरी घेऊन जाणाऱ्या यवन जहाजांचा उल्लेख अनेकदा केलेला आढळतो. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक कोरीव लेखांमध्ये यवनांनी दिलेल्या दानांचे उल्लेख आहेत.

भारत आणि पश्चिम आशिया यांच्यामधील व्यापाराच्या संदर्भात 'जुन्या बायबल'मध्ये उल्लेख असलेले 'ओफीर' म्हणजे सोपारा बंदर असावे, असे मानले जाते. बॅबिलोनमधील इमारतींसाठी सागवान आणि देवदार लाकूड वापरले जात असे. या इमारती लाकडांखेरीज चंदन, हस्तिदंत, कासवाच्या पाठी, माकडे, मोर, मोती, मौल्यवान खडे तसेच काळी मिरी, दालचिनी आणि सुगंधी पदार्थ या गोष्टीही भारतातून निर्यात होत असत. समुद्री प्रवासात एका अनामिक खलाशाने केलेल्या दैनंदिन नोंदींचा वृत्तान्त 'पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन सी' (लॅटीन नाव 'पेरिप्लस मॅरिस एरिथ्रेइ') या नावाने प्रसिद्ध आहे. त्यामध्ये प्राचीन भारतातील भरुच, सोपारा, कल्याण यांसारखी बंदरे, उज्जैनसारखी महत्त्वाची व्यापारी केंद्रे यांची माहिती मिळते. यांखेरीज स्ट्रॅबो या ग्रीक इतिहासकाराने लिहिलेला 'जिओग्राफिया', थोरल्या प्लिनीने लिहिलेला 'नॅचरॅलिस हिस्टोरिया', क्लॉडियस टॉलेमी या ग्रीक गणित-भूगोलतज्ज्ञाने लिहिलेला 'जिओग्राफिया', एरियन या ग्रीक इतिहासकाराने लिहिलेला 'इंडिका'* यांसारखे ग्रंथ भारत-रोम यांच्यातील व्यापाराची माहिती देणाऱ्या साधनांमध्ये महत्त्वाचे आहेत.

**एरियन हा इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील इतिहासकार होता. तो स्वतः भारतात आला नव्हता. त्याच्या ग्रंथातील बराचसा भाग मेगॅस्थिनिसच्या 'इंडिका' या ग्रंथावर आधारलेला आहे.*

'पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन सी' मध्ये हिप्पॅलस या ग्रीक खलाशाने तांबडा समुद्र ते हिंदी महासागरापर्यंतच्या थेट मार्गावरील सर्व बंदरांचे अचूक भौगोलिक रेखाटन केल्याचा उल्लेख केला आहे.

इसवी सनाच्या पहिल्या शतकात रोमचा पहिला सम्राट ऑगस्टस याच्या काळात भारताचा रोमबरोबर असणारा व्यापार वाढीस लागला. या व्यापारात मध्य आशियातून जाणारा 'रेशीम मार्ग' आणि दक्षिण व पश्चिम भारताच्या किनाऱ्यावरील बंदरे यांना महत्त्व प्राप्त झाले. ग्रीक इतिहासकारांनी केलेल्या नोंदींमध्ये रोमन सम्राट ऑगस्टसच्या दरबारात भारतीय व्यापारी शिष्टमंडळ त्याच्या भेटीसाठी गेल्याचे उल्लेखही आहेत.

तमिळनाडू येथे मिळालेल्या नाणेनिधीमध्ये सोन्याची रोमन नाणी मिळाली आहेत. यांतील अनेक नाण्यांवर सोन्याचा कस ठरवण्यासाठी केलेले छेद आढळतात. त्याअर्थी त्या नाण्यांना चलन म्हणून महत्त्व नव्हते. केवळ त्यातून मिळणाऱ्या सोन्याच्या आंगीक मूल्याला महत्त्व होते, हे स्पष्ट होते. रोमन सम्राट नीरो याने त्याच्या वापरात असलेल्या पाचूच्या भारतीय प्याल्यासाठी एक दशलक्ष सुवर्णनाणी इतकी किंमत मोजली होती, असे उल्लेख आहेत. रोममधून फार मोठ्या प्रमाणावर सुवर्णनाण्यांच्या स्वरूपात रोमचा खजिना भारतामध्ये रिता होत आहे, असे वाटून थोरला प्लिनी या रोमन विचारवंतांने चिंता व्यक्त केली होती. भारताला त्याने 'जगातील सर्व सुवर्ण आपल्याकडे ओढून घेणारे कुंड' असे म्हटले होते. स्ट्रॅबोने केलेल्या वर्णनाच्या आधारे भारतातून आलेल्या सर्प, शिकारी कुत्री, वाघ, हत्ती यांसारखे प्राणी, पोपट, मोर यांसारखे पक्षी, गेंड्याचे कातडे आणि शिंग, उंची वस्त्रे, मोती आणि हस्तिदंत, मसाल्याचे पदार्थ अशा अनेक अमूल्य गोष्टींना श्रीमंत रोमन लोकांमध्ये फार मोठी मागणी होती.

सुवर्णनाण्यांखेरीज रोममधून भारतात शिसे, जस्त, पोवळी, मद्य, ऑलिव्ह तेल या गोष्टी आयात होत असत. गुजरातमध्ये बेट द्वारका येथील समुद्रात इसवी सन २०००-२००१ मध्ये केलेल्या पुरातत्त्वीय पाहणीत विविध आकारांचे मद्यकुंभ (ॲम्फोरे), जहाजांचे नांगर, खापरे, शिशाचा गोळा इत्यादी वस्तू मिळाल्या. ॲम्फोऱ्यांचा वापर रोमहून आयात होणारे ऑलिव्ह तेल आणि मद्य आणण्यासाठी होत असे. भारत-रोम व्यापाराचे पुरावे भारतातील अनेक स्थळांच्या उत्खननातून प्राप्त झाले आहेत. त्यावरून महाराष्ट्रातील पैठण, तेर, कोल्हापूर*, जालना जिल्ह्यातील भोकरदन (भोगवर्धन) इत्यादी शहरे महत्त्वाची व्यापारी केंद्रे होती, असे दिसते.

**कोल्हापूरचा उल्लेख टॉलेमीने 'हिप्पोकुरा' असा केला आहे.*



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**सहज जाता जाता :** किनारा जवळ आला की कावळे त्या दिशेने उडू लागतात आणि त्यामुळे खलाश्यांना किनाऱ्याकडे जाण्याची दिशा कळते, असे म्हणतात. जहाजावरील अशा कावळ्यांना 'दिशाकाक' असे म्हणत असत. हडप्पा संस्कृतीच्या एका मातीच्या वटिकेवर जहाजाचे चित्र आहे आणि त्यासोबत दिशाकाकही दाखवलेले आहेत.

प्राचीन काळी भारतीय जहाजांवरील खलाशी कावळ्यांचा उपयोग दिशेचे मार्गदर्शन मिळण्यासाठी करत असत, याची साक्ष 'बावेरू जातक' या जातककथेत मिळते. तसेच भारतीय व्यापारी समुद्री मार्गाने दूरवरच्या देशांपर्यंत जात असत, हेही या कथेतून समजते.

बावेरू म्हणजे बॅबिलोन असे मानले जाते. हे इसवी सनापूर्वी १८०० ते ६०० या कालखंडात मेसोपोटेमियामध्ये अस्तित्वात असलेले राज्य होते. हम्मुराबी हा बॅबिलोनचा प्रसिद्ध राजा होता. इसवी सनापूर्वी ५३९ मध्ये अखमोनीय सम्राट दुसरा सायरस याने बॅबिलोन जिंकून घेतले.

या कथेच्या आधारे भारतीय व्यापारी परदेशात कावळे, मोर यांसारखे पक्षी घेऊन जात असत, याला पुष्टी मिळते.

### १२.२ भारत आणि गांधार (अफगाणिस्तान आणि पाकिस्तान)

भौगोलिकदृष्ट्या अफगाणिस्तानचे (गांधार) स्थान भारत आणि मध्य आशियाला जोडणाऱ्या व्यापारी मार्गावर अत्यंत महत्त्वाचे होते. हा प्रदेश जनपदांच्या काळापासून ते इस्लामच्या आगमनापर्यंत सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी जोडला गेला होता.

मध्य आशियातून भारतात आलेले आक्रमक असोत की बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सम्राट अशोकाने भारतातून पश्चिमेकडे पाठवलेले भिक्खू असोत, अथवा चीनमधून भारतात आलेले बौद्ध भिक्खू असोत, सर्वजण अफगाणिस्तानमार्गेच आले-गेले.

**सम्राट अशोकाचा काळ :** सम्राट अशोकाच्या १३ क्रमांकाच्या लेखात समकालीन ग्रीक राजांची नावे दिलेली आहेत, हे आपण आठव्या पाठात पाहिले. त्यामध्ये त्या राजांच्या आधिपत्याखालील प्रदेशांमध्येही अशोकाच्या धम्मविजयाच्या संदेशानुसार लोकांची वर्तणूक नीतिमान झालेली असल्याचा उल्लेख आहे. कंबोज या प्राचीन अफगाणिस्तानमधील राज्याचा उल्लेखही त्यामध्ये केलेला आहे.

अफगाणिस्तानातील कंदाहार येथील सम्राट अशोकाच्या ग्रीक भाषेतील शिलालेखात ग्रीक आणि अरेमाईक लिपींचा वापर केला आहे. या शिलालेखावरून अफगाणिस्तानचा प्रदेश सम्राट अशोकाच्या साम्राज्याचा अंतर्गत भाग होता, हे स्पष्ट होते.

अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी काश्मीर आणि अफगाणिस्तानमध्ये पाठवलेल्या भिक्खूचे नाव 'थेर मह्यान्तिक' (मज्झान्तिक) आणि ग्रीक (योन) राज्यांमध्ये पाठवलेल्या भिक्खूचे नाव 'थेर महारक्खित' असे होते.

**कुशाण सम्राट कनिष्क आणि कुशाण सत्तेनंतरचा काळ :** कनिष्काचे साम्राज्य पूर्वेकडे पाटलिपुत्र आणि उत्तरेकडे काश्मीरपासून मध्य आशियापर्यंत पसरले होते. पुरुषपूर (पेशावर) आणि मथुरा या त्याच्या दोन राजधान्या होत्या. प्राचीन कपिशा (बेग्राम) ही कुशाणांची आणखी एक राजधानी होती. बेग्राम रेशीम मार्गावर मोक्याच्या ठिकाणी वसलेले होते. अफगाणिस्तान ते चीनपर्यंतचा व्यापारी मार्ग कुशाण राजांच्या ताब्यात होता. हा मार्ग तक्षशिला, खैबर खिंड येथून अफगाणिस्तानमधील बामियान आणि तेथून पामीरच्या पठारावरून चीनकडे जात असे.

त्या मार्गाने कुशाण राजवटीत बौद्ध धर्माचा प्रसार चीनपर्यंत होऊ शकला. सम्राट कनिष्काच्या काही नाण्यांवर गौतम बुद्धांची प्रतिमा असून त्याखाली 'बोद्दो' असा लेख असतो. नाण्यावर आढळणाऱ्या गौतम बुद्धांच्या प्रतिमांमध्ये या प्रतिमा



कनिष्काचे सोन्याचे नाणे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सर्वाधिक प्राचीन आहेत.

अफगाणिस्तानमार्गे भारतात आलेल्या फाहियान, युआन श्वांग यांसारख्या चिनी बौद्ध भिक्खूंनी तिथे पाहिलेल्या बौद्ध विहार आणि स्तूप यांचे वर्णन केले आहे. अफगाणिस्तानमध्ये बौद्ध विहार आणि स्तूप यांचे असंख्य अवशेष आहेत. त्यांतील 'शाहजी-की-ढेरी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या स्थळाचे उत्खनन झाले आहे. हे स्थळ पाकिस्तानमध्ये पेशावरजवळ आहे. 'शाहजी-की-ढेरी' येथे उजेडात आलेल्या स्तूपाचे विशेष महत्त्व आहे. हा स्तूप सम्राट कनिष्काच्या काळात बांधला गेला. तो 'कनिष्क स्तूप' या नावानेही ओळखला जातो. तेथील करंडकात मिळालेल्या अस्थी गौतम बुद्धांच्या आहेत, अशी परंपरेने मानले जाते. याशिवाय महासेन संघारामातील* कनिष्क विहाराच्या बांधकामावर देखरेख करणारा प्रमुख सेवक 'अग्निशाल' असे कोरलेले आहे. हा करंडक सध्या पेशावरच्या संग्रहालयात आहे.

**संघाराम म्हणजे बौद्ध भिक्खूंचे निवासाचे स्थान.*

प्राचीन काळी 'नगराहार' या नावाने ओळखले जाणारे, आधुनिक जलालाबादजवळचे 'हड्डा' हे स्थळ अफगाणिस्तानातील बौद्ध धर्माचे आणखी एक महत्त्वाचे केंद्र होते. तिथे अनेक स्तूप आणि विहार यांचे अवशेष आहेत. या स्तूपांच्या परिसरात मिळालेली शिल्पे गांधार शैलीचा अत्युत्कृष्ट नमुना आहेत. जागतिक वारशाचा दर्जा प्राप्त झालेले आणखी एक महत्त्वाचे ठिकाण 'तख्त-इ-बाही' या नावाने ओळखले जाते. ते गांधार प्रदेशातील पख्तुनख्वा प्रांतात आहे. हा भाग आता पाकिस्तानमध्ये समाविष्ट झालेला आहे.



**हड्डा येथील स्तूपावरचे शिल्प**

तख्त-इ-बाही येथील विहाराच्या वास्तुसंकुलाचे बांधकाम इसवी सनाच्या पहिल्या शतकात सुरू झाले. त्यानंतर तिथे इसवी सनाच्या सातव्या शतकापर्यंत विविध वास्तूंचे बांधकाम केले गेले. तेथील अवशेषांमध्ये तीन स्तूप आणि इतर वास्तूंचे अवशेष आहेत.

अफगाणिस्तानमधील प्राचीन बौद्ध स्तूप, विहार यांखेरीज जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा प्राप्त झालेल्या 'बामियानच्या बुद्धमूर्ती' विशेष उल्लेखनीय आहेत. बामियान काबूलच्या पश्चिमेस २५० किलोमीटर अंतरावर असून प्राचीन रेशीम मार्गावर आहे. तेथे 'कुह-ए-बाबा' नावाच्या पर्वतरांगांमधील एका कड्यामध्ये जवळपास ७५० गुहा खोदलेल्या आहेत. या गुहांमध्ये अतिशय सुंदर अशी बौद्ध भित्तिचित्रे रेखाटलेली होती. फक्त दोन गुहांमध्ये स्तूप होते. याच कड्यामध्ये दोन प्रचंड मोठे कोनाडे खोदून त्यामध्ये दोन उभ्या बुद्धमूर्तींची बांधणी केली होती. त्यांतील एक ५३ मीटर आणि दुसरी ३८ मीटर उंचीची होती. या मूर्तींचा गाभा कड्याच्या मूळ दगडात कोरला होता. नंतर त्यावर मातीचे अनेक थर चढवून गौतम बुद्धांची प्रतिमा आणि त्यांच्या अंगावरील वस्त्रे यांचा कलात्मक आकार साकारण्यात आला होता. गौतम बुद्धांचे हात लाकडी सांगाड्याच्या आधाराने तयार करून, ते लाकडी खुंट्यांच्या साहाय्याने मूर्तीवर बसवण्यात आले होते. युआन श्वांगने केलेल्या वर्णनानुसार मूर्तींच्या बाजूने रंगीत भित्तिचित्रे रेखाटलेली होती. इतकेच नव्हे तर मूळ मूर्तीसुद्धा रंगीत, सोन्याचा मुलामा चढवलेल्या आणि मौल्यवान रत्ने जडवलेल्या होत्या. बामियानच्या बुद्ध मूर्ती तालिबान या मूलतत्त्ववादी संघटनेने इ.स.२००१ मध्ये नष्ट केल्या.

युनेस्को आणि जपान, फ्रान्स, स्वित्झर्लंड अशा अनेक देशांमधील संघटनांच्या मदतीने अफगाणिस्तानचे सरकार बामियान येथील हा जागतिक वारसा पुन्हा पूर्वस्थितीला आणण्यासाठी काम करत आहे. हे काम सुरू झाल्यानंतर बामियान येथील काही गुहांमधील रंगीत भित्तिचित्रे उजेडात आली. त्याखेरीज एका १९ मीटर लांबीच्या महापरिनिब्बान मूर्तीचे अवशेषही मिळाले आहेत.

युआन श्वांगने केलेल्या वर्णनानुसार बामियान येथे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



बामियान येथील बुद्धमूर्ती

दुर्मिळ बौद्ध हस्तलिखितांचे एक ग्रंथालयही होते. पुरातत्त्वीय संशोधकांना भूर्जपत्रे आणि तालपत्रे यांच्यावर लिहिलेली काही हस्तलिखिते बामियान येथील एका विहारात मिळाली आहेत.

अफगाणिस्तानमध्ये हिंदू देवदेवतांच्या मूर्तीही मिळालेल्या आहेत. त्यात काबूल शहराच्या जवळ मिळालेली एक गणेशाची मूर्ती आहे. इसवी सनाच्या चौथ्या शतकातील ही मूर्ती गणेशाच्या मूर्तींमध्ये सर्वाधिक प्राचीन आहे. विशेष म्हणजे गणेशाची इतकी प्राचीन मूर्ती भारतातही मिळालेली नाही. काबूलजवळ 'खैर खाना' नावाचे एक मंदिर आहे. येथील उत्खननात सूर्यदेवतेची रथारूढ मूर्ती मिळाली.

अफगाणिस्तानमधील बौद्ध आणि हिंदू अवशेषांचा सविस्तर आढावा घेणे अवघड असले तरी वरील उदाहरणांवरून इस्लामपूर्व काळात गांधार प्रदेश सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी संलग्न होता, हे निर्विवादपणे लक्षात येते.

### १२.३ भारत आणि चीन

आशिया आणि युरोप यांना जोडणाऱ्या मार्गाचा 'रेशीम मार्ग' असा प्रथम उल्लेख फर्डिनांड व्हॉन रिश्टोफेन या जर्मन भूगोलशास्त्रज्ञाने केला. या रेशीम मार्गाची लांबी ६००० किलोमीटरहून अधिक आहे. हा एक सलग हमरस्ता आहे, असे वाटू शकेल. परंतु प्रत्यक्षात हा मार्ग रस्त्यांच्या अनेक शाखोपखांचे एक जाळे आहे.

रेशीम मार्गाची प्रमुख शाखा चीन, भारतमार्गे पुढे मध्य आशियातील वाळवंटांमधील ओॲसिसमधील शहरांना जोडत पुढे जाणारी होती. तेथील शहरांमधून व्यापाऱ्यांच्या निवासाची आणि भोजनाची सोय होत असे आणि त्यांना त्यांच्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठही उपलब्ध होत असे. या प्रमुख शाखेच्या उत्तरेकडे असलेल्या गवताळ प्रदेशामधून दुसरी एक शाखा जात असे. या दुसऱ्या मार्गाने गेल्यास करावा लागणारा प्रवास हा तुलनेने कमी अंतराचा होता. तरीही त्याचा अवलंब कमी होत असे. या मार्गावरील प्रवास करताना तेथील भटक्या पशुपालक टोळ्यांचा होणारा उपद्रव, तसेच निवास आणि भोजनाच्या सोई आणि बाजारपेठांचा अभाव, ही त्यामागील कारणे होती.

चीनच्या झिंजीयांग प्रांतातून निघणाऱ्या रेशीम मार्गाच्या दोन उपशाखा तक्षशिला नगरापर्यंत येत असत. त्यांतील एक काशगर या शहरापासून गांधार प्रदेशाकडे येत असे आणि दुसरी झिंजीयांग प्रांतातील यारकंद शहरापासून निघून लेहमार्गे काश्मीरमध्ये पोचत असे. याच मार्गाने भारत आणि चीनमधील भिक्खू चीनमध्ये ये-जा करत होते. या मार्गाच्या उत्तरेला 'गांसु' (कांसु) या चीनमधील प्रांतापासून सुरू होऊन हा मार्ग काशगरपर्यंत पोचत असे. चीनची अभेद्य भिंत या प्रांतातच आहे.

**सहज जाता जाता :**

- काही चिनी ग्रंथांमध्ये काश्मीरचा उल्लेख 'कि-पिन' या नावाने केलेला आढळतो. काही ग्रंथांमधून अफगाणिस्तानमधील कपिशा (बेग्राम) या शहराचा उल्लेखही याच नावाने केलेला आढळतो. भारताचा उल्लेख प्राचीन चिनी साहित्यात 'शेन-तु, 'तिएन-चु', 'तिएन-तु', 'झिएन-तु', 'युआन-तु', 'झुआन-तु' इत्यादी नावांनी केलेला आढळतो. युआन श्वांगने नोंदवलेले 'यिन-तु' हे नाव मात्र आधुनिक काळातही चीनमध्ये टिकून आहे.
- कनिष्काच्या काळात चीनमध्ये 'हान' नावाच्या राजसत्तेचे राज्य होते.
- भारत, चीन आणि मध्य आशिया या प्रदेशांमधून जाणाऱ्या रेशीममार्गावरील पहिल्या पुरातत्त्वीय पाहणीचे श्रेय सर ऑरेल स्टाईन या ब्रिटिश पुरातत्त्वज्ञाला जाते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

भारतातून चीनमध्ये बौद्ध धर्माच्या प्रसाराची सुरुवात इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून झाली. या काळात उदयाला आलेल्या 'हान' राजघराण्याने त्यांच्या साम्राज्याचा विस्तार मध्य आशियापर्यंत केला होता. रेशीम मार्गावर त्यांचे वर्चस्व होते. चिनी परंपरेनुसार हान राजघराण्याचा दुसरा राजा 'मिंग-ती' याने पाठवलेल्या त्याच्या प्रतिनिधीबरोबर 'कश्यप मातंग' आणि 'धर्मरक्ष' हे दोन बौद्ध आचार्य मध्य भारतातून इसवी सन ६७ च्या सुमारास चीनमध्ये गेले. त्यांनी त्यांच्यासोबत अनेक बौद्ध ग्रंथ पांढऱ्या घोड्यांवरून नेले. चीनमध्ये पोचल्यानंतर त्यांनी त्या ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवाद केला. त्या दोघांच्या सन्मानार्थ चिनी सम्राटाने एक मंदिर बांधले. 'व्हाइट हॉर्स टेंपल' या नावाने ते मंदिर ओळखले जाते. हे चीनमध्ये बांधले गेलेले पहिले बौद्ध मंदिर होय.

इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात हान राजसत्ता लयाला गेली. त्याबरोबर चीनमध्ये राजकीय विघटनाचा आणि अशांततेचा काळ सुरू झाला. तो इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत टिकला. या काळात चीनमध्ये बौद्ध धर्माची लोकप्रियता वाढीस लागली. अनेक चिनी यात्रेकरू मध्य आशियातील आणि भारतातील बौद्ध केंद्रांना भेट देऊ लागले. इसवी सनाच्या चौथ्या शतकात कुमारजीव या अत्यंत विद्वान आणि ख्यातनाम बौद्ध भिक्खूने अनेक बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेमध्ये अनुवाद केले. इसवी सनाच्या सहाव्या शतकात चीनमधील बौद्ध धर्माची लोकप्रियता शिगेला पोचली. या काळापर्यंत थेरवाद (हीनयान) आणि महायान या बौद्ध धर्माच्या दोन्ही शाखा आणि त्यांच्या अंतर्गत असणारे अनेक संप्रदाय चीनमध्ये प्रस्थापित झाले होते. सातव्या शतकात चीनमध्ये हळूहळू इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांचा प्रवेश झाला. तेराव्या शतकात होऊन गेलेला चंगेज खानचा नातू कुबलाई खान याला बौद्ध धर्माविषयी विशेष आकर्षण होते.

इसवी सनाच्या पहिल्या शतकात बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबरच चिनी कलाशैलीमध्ये एक नवीन प्रवाह सुरू झाला. या काळात चीनमध्ये आलेले अनेक महायान बौद्ध भिक्खू मध्य आशियातून आलेले होते. त्यांच्या प्रभावाखाली चीनमध्ये गौतम बुद्ध आणि बोधिसत्वांच्या मूर्ती बनवण्यास सुरुवात झाली. चीनच्या झिंजीयांग प्रांतात उदयाला आलेल्या या कलाशैलीला 'सेरेंडियन' (सेरेस म्हणजे चीन + इंडिया) कलाशैली असे म्हटले जाते. सेरेंडियन कलाशैलीवर गांधार शैलीचा प्रभाव आहे. ग्रीक, पर्शियन आणि चिनी कलाशैलींचे मिश्रण या शैलीत पहायला मिळते. सर ऑरेल स्टाईन यांनी केलेल्या पाहणी दौऱ्यात अनेक सेरेंडियन कलाशैलीतील टेराकोट्टा माध्यमातील अनेक शिल्पे उजेडात आली.

चीनमध्ये इसवी सनाच्या चौथ्या-सहाव्या शतकांत अनेक बौद्ध मंदिरे आणि विहार बांधले गेले. परंतु क्वचितच स्तूप बांधले गेले. त्याऐवजी प्रत्येक मंदिरात चिनी धाटणीचा एक पॅगोडा असे. पॅगोडाची इमारत लाकडी असल्यामुळे यातील बहुतेक इमारती आज अस्तित्वात नाहीत. हे पॅगोडे अनेक मजली असत. प्रत्येक मजला खालच्या मजल्यापेक्षा लहान होत जाई. सर्वांत वरच्या मजल्यावर धातूची दांडी (यष्टि) आणि त्यावर खालून वर क्रमशः लहान होत जाणाऱ्या धातूच्या कड्या असत. भारतीय स्तूपावरील छत्रीप्रमाणे असलेली ही यष्टि आणि कड्या यांची रचना एवढीच भारतीय स्तूपाची आठवण देणारी खूण या चिनी पॅगोडांच्या बांधणीत शिल्लक राहिली. नंतरच्या काळात पॅगोडांचे बांधकाम विटा आणि दगड वापरून केले गेले.

चीनमध्ये भारतीय बौद्ध कलापरंपरेचा प्रभाव कोरीव लेण्यांच्या रूपातही अस्तित्वात आहे. त्यांतील तीन स्थळांना जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा मिळाला आहे. त्या लेण्यांमधील 'डुनहुआँग' येथील लेणी प्राचीन रेशीम मार्गावर आहेत. ही लेणी 'मोगाओ लेणी' म्हणून ओळखली जातात. त्यांची निर्मिती तेराव्या-चौदाव्या शतकापर्यंत सुरू होती.

चीनच्या अंतर्भागातून येणारे व्यापारी डुनहुआँगपर्यंत येत. त्यांच्यासाठी भारत आणि पश्चिमेकडून येणाऱ्या परदेशी सौदागरांना भेटण्याचे 'डुनहुआँग' हे महत्वाचे केंद्र होते. येथील जवळपास ५०० लेण्यांमधील शिल्पे आणि भित्तिचित्रे अत्यंत समृद्ध आहेत. या लेण्यांमधून



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

बौद्ध ग्रंथांची हजारो हस्तलिखिते मिळाली.

पुढील पाठात भारतीय संस्कृतीचा प्रसार श्रीलंका आणि आग्नेय आशियातील देशांमध्ये कसा झाला याचा इतिहास आणि भारतीय संस्कृतीच्या तेथे आजही अस्तित्वात असणाऱ्या खुणा यांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. सोन्याची रोमन नाणी ......... येथील मिळालेल्या नाणेनिधी मध्ये मिळाली आहेत.
(अ) तमिळनाडू (ब) महाराष्ट्र
(क) कर्नाटक (ड) केरळ

२. हम्मुराबी हा ...... येथील प्रसिद्ध राजा होता.
(अ) सिरीया (ब) बॅबिलोन
(क) चीन (ड) ग्रीस

३. आशिया आणि ...... यांना जोडणाऱ्या मार्गाचा उल्लेख 'रेशीम मार्ग' असा केला जातो.
(अ) युरोप (ब) आफ्रिका
(क) अमेरिका (ड) रशिया

४. 'व्हाईट हॉर्स टेंपल' हे ........ मध्ये बांधले गेलेले पहिले बौद्ध मंदिर होय.
(अ) भारत (ब) जपान
(क) चीन (ड) इजिप्त

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**


१. स्ट्रॅबो – जिओग्राफिया
२. थोरला प्लिनी – नॅचरॅलिस हिस्टोरिया
३. हिप्पॅलस – हिप्पोकुरा
४. एरियन – इंडिका

**(क) ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटनासंबंधी नावे लिहा.**

१. जागतिक वारशाचा दर्जा प्राप्त झालेले गांधार प्रदेशातील एक महत्वाचे ठिकाण –

२. इ.स.चौथ्या शतकात अनेक बौद्ध ग्रंथांचे चिनी भाषेमध्ये अनुवाद करणारा बौद्ध भिक्खू –

**प्र.२ दिलेले संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. कुशाण राजवटीत बौद्ध धर्माचा प्रसार चीनपर्यंत झाला.

२. व्यापारी रेशीम मार्गाच्या कमी अंतराच्या शाखेचा अवलंब क्वचितच करत असत.

**प्र.४ तुमचे मत नोंदवा.**

इस्लामपूर्व काळात गांधार प्रदेश सांस्कृतिकदृष्ट्या भारताशी संलग्न होता.

**प्र.५ टीपा लिहा.**

१. शाहजी–की–ढेरी
२. बामियानच्या बुद्धमूर्ती

**प्र.६ पुढील प्रश्नाचे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उत्तर लिहा.**

प्राचीन कालखंडातील भारत आणि चीन यांच्या संबंधांची माहिती लिहा.
(अ) व्यापारी संबंध (ब) बौद्ध धर्माचा चीनमध्ये प्रसार (क) सेरेंडियन कलाशैली

**उपक्रम**

रेशीम मार्गाच्या संदर्भात आंतरजालाच्या साहाय्याने अधिक माहिती मिळवा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १३. भारत, श्रीलंका आणि आग्नेय आशिया

१३.१ भारत आणि श्रीलंका
१३.२ भारत आणि आग्नेय आशिया

## १३.१ भारत आणि श्रीलंका

श्रीलंका आणि भारत यांचा इतिहास प्राचीन काळापासून एकमेकांशी निगडित आहे. दीपवंश, महावंश, चूल्लवंश या तीन ग्रंथांमधून बुद्धपूर्व काळ आणि बुद्धोत्तर काळात भारतात आणि श्रीलंकेत होऊन गेलेले राजवंश, त्यांचे परस्परसंबंध आणि घडलेल्या ऐतिहासिक घटना यांची माहिती मिळते. या ग्रंथांना 'वंशग्रंथ' असे म्हटले जाते.

वंशग्रंथांमध्ये दिलेल्या माहितीनुसार, इसवी सनाच्या सुमारे सहाव्या शतकात श्रीलंकेत स्थापन झालेल्या पहिल्या राज्याचे नाव 'तांबपण्णी (ताम्रपर्णी)' असे होते. या राज्याचे दुसरे नाव 'राजरट' असे होते. ग्रीक इतिहासकारांनी श्रीलंकेचा उल्लेख 'तॅप्रोबेन' असा केला आहे. हे राज्य प्रस्थापित करणारा पहिला राजा विजय हा मूळचा भारताच्या वंग-कलिंग राज्यातील युवराज होता अशी आख्यायिका आहे. त्याच्या राज्यातून तो प्रथम सुप्पारक (सोपारा) येथे आला. तेथून तो श्रीलंकेत पोचला.

**श्रीलंकेतील प्राचीन राज्ये आणि महत्वाची बंदरे अभ्यासण्यासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
https://en.wikipedia.org/wiki/Anuradhapura_Kingdom#/media File:Important_ locations_of_Anuradhapura_Kingdom.png

सम्राट अशोकाचा पुत्र थेर महिंद (महेंद्र) याचे श्रीलंकेची राजधानी अनुराधपूर येथील मिहिनथले येथे आगमन झाले. त्याने श्रीलंकेचा राजा 'देवानामपिय तिस्स' या राजाला बौद्ध धर्माची दिक्षा (पब्बज्जा/प्रवज्ज्या) दिल्याचे सविस्तर वर्णन वंशग्रंथांमध्ये आहे. उपदेश प्राप्त झाल्यानंतर राजा आणि त्याच्यासह आलेल्या सर्व प्रजाजनांनी बौद्ध धर्म स्वीकारला.



**मिहिनथले येथे असलेला राजा देवानामपिय तिस्स याचा पुतळा**

राजा देवानामपिय तिस्स याच्या धाकट्या भावाची पत्नी अनुला हिने भिक्खुनी बनण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा थेर महिंदांनी त्यांची बहीण थेरी संघमित्ता हिला भारतातून बोलवावे अशी सूचना केली. त्यानुसार थेरी संघमित्ता (संघमित्रा) श्रीलंकेला आली. येताना तिने बोधिवृक्षाची फांदी आणली होती. स्वतः राजा देवानामपिय तिस्स तिच्या स्वागतासाठी हजर होता. थेरी संघमित्ताने अनुलाला दिक्षा दिली. अनुला ही भिक्खुनी झालेली श्रीलंकेतील पहिली स्त्री होती. थेरी संघमित्ताने श्रीलंकेतील पहिले भिक्खुनी शासन (भिक्खुनी संघ) प्रस्थापित केले.

थेरी संघमित्ताच्या आगमनाचे स्मरण म्हणून श्रीलंकेमध्ये दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या पौर्णिमेला *'उंडुवप पोया' या नावाचा उत्सव साजरा केला जातो.

**'उंडुवप पोया' म्हणजे डिसेंबर महिन्यातील पौर्णिमा.*

### श्रीलंकेतील महत्त्वाची सांस्कृतिक स्थळे

**अनुराधपूर-मिहिनथले :** थेर महिंद आणि थेरी संघमित्ता यांच्या अनुराधपूरजवळच्या मिहिनथले येथील वास्तव्यामुळे बौद्ध धर्म श्रीलंकेत रुजला आणि वाढला.

**अनुराधपूर-मिहिनथले येथील महत्त्वाचे स्तूप :** 'कंटकचेतिय' हा मिहिनथले येथील प्राचीन स्तूपांपैकी एक आहे. स्तूपाजवळ असलेल्या कोरीव शिलालेखांमध्ये जवळचा पाण्याचा तलाव आणि जमीन यांवरील करातून



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मिळणारा निधी या स्तूपाच्या देखभालीसाठी दिल्याचा उल्लेख आहे.

मिहिनथले येथील थेर महिंदांच्या शारीरिक धातूंवर (अस्थि) उभारलेला स्तूप 'अंबस्थल दगाबा' या नावाने ओळखला जातो.



थूपाराम स्तूप

थेरी संघमित्ताने श्रीलंकेत येताना तिच्याबरोबर गौतम बुद्धांच्या उजव्या खांद्याच्या अस्थि सोबत आणल्या होत्या. राजा देवानामपिय तिस्स याने अनुराधपूरमध्ये त्या अस्थिंवर 'थूपाराम' हा स्तूप उभारला. श्रीलंकेत अस्तित्वात असलेल्या स्तूपांमध्ये थूपाराम हा सर्वाधिक प्राचीन स्तूप आहे.

'बुद्धघोष' हा प्राचीन श्रीलंकेत होऊन गेलेला एक सुप्रसिद्ध भारतीय तत्त्वज्ञ होता. अनुराधपूरमधील 'महाविहार' येथे त्याचे वास्तव्य होते. 'विशुद्धिमग्ग' हा त्याने लिहिलेला ग्रंथ प्रसिद्ध आहे. विशुद्धिमग्ग हा ग्रंथ तिपिटक ग्रंथांच्या बरोबरीने महत्त्वाचा समजला जातो.

**पुलत्थीनगर (पोलन्नरुवा) :** चूल्लवंश या ग्रंथामध्ये पोलन्नरुवा या शहराचा उल्लेख 'पुलत्थीनगर' या नावाने केला आहे. इसवी सनाच्या दहाव्या शतकात चोळ सम्राट पहिला राजराजा याने श्रीलंकेवर आक्रमण केले आणि अनुराधपूर पूर्णपणे उद्ध्वस्त केले. त्याने पोलन्नरुवा येथे आपली राजधानी प्रस्थापित केली. त्याने पोलन्नरुवाचे नामकरण 'जननाथमंगलम' असे केले आणि तेथे एक शिवालय बांधले. त्यानंतर त्याने आपल्या राणीच्या स्मरणार्थ आणखी एक शिवालय बांधले. श्रीलंकेत असणाऱ्या हिंदू मंदिरांपैकी ही देवालये सर्वाधिक प्राचीन आहेत.

विजयबाहू याने चोळांचा पराभव करून श्रीलंकेतील त्यांचे वर्चस्व संपुष्टात आणले. त्याच्या वंशातील इसवी सनाच्या बाराव्या शतकात होऊन गेलेला पहिला पराक्रमबाहू हा राजा श्रीलंकेतील इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. त्याच्या काळापर्यंत श्रीलंकेतील बौद्ध संघ विस्कळित झाले होते. महाथेर कस्सप यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना एकत्रित करण्यावर पहिल्या पराक्रमबाहूने भर दिला.

श्रीलंकेतील रूहुना नावाच्या राज्याचा पहिल्या पराक्रमबाहूने पराभव केला. रूहुना राज्यातील राजवंशाच्या देखरेखीखाली असणारा गौतम बुद्धांचा दंतधातू 'निस्संक मल्ल' नावाच्या राजाने परत मिळवला. त्यावर पोलन्नरुवा येथे त्याने बौद्ध मंदिर बांधले.

मंदिराच्या मध्यभागी एक स्तूप आहे. स्तूपाच्या पायथ्याशी अर्धवर्तुळाकृती पायरीचा दगड हे श्रीलंकेच्या स्तूप स्थापत्याचे वैशिष्ट्य आहे. त्याला 'चंद्रशिला' असे म्हणतात. त्यावर हंस, हत्ती, घोडे आणि वेली यांच्या आकृती कोरलेल्या आहेत.



चंद्रशिला

पोल्लन्नरुवा येथील 'गलपोथा' (दगडावरील पोथी) हा एक वैशिष्ट्यपूर्ण अभिलेख आहे. हा ८.१७ मीटर लांबीच्या आणि १.३९ मीटर रूंदीच्या अखंड शिलापट्टावर कोरलेला लेख असून त्यामध्ये निस्संक मल्ल या राजाची कारकीर्द आणि पराक्रम यांचे वर्णन आहे. गलपोथाच्या एका बाजूस दोन हंसावलींच्या किनारींमध्ये गजलक्ष्मीची प्रतिमा कोरलेली आहे.

'श्री दलद मलिगव' या नावाने ओळखले जाणारे दंतधातूचे सध्याचे मंदिर कँडी या शहरात आहे. या मंदिराला युनेस्कोने जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा दिला आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



गलपोथा

**सहज जाता जाता :** गौतम बुद्धांच्या महापरिनिब्बानानंतर त्यांच्या अस्थींचे अवशेष भारतातील आणि बाहेरच्या देशांमधील बौद्ध संघांच्या हवाली करण्यात आले. अस्थींच्या या अवशेषांना 'धातू' असे म्हटले जाते. 'दीघ निकाय' या ग्रंथातील वर्णनानुसार गौतम बुद्धांचा डाव्या बाजूचा सुळा (दंतधातू) कलिंग देशाच्या राजाला मिळाला. हा दंतधातू पुढे श्रीलंकेत आला.

ज्याच्याकडे दंतधातू असेल त्याला राज्य करण्याचा दैवी अधिकार आहे, अशी श्रद्धा श्रीलंकेतील राजघराण्यांमध्ये रुजली. त्यामुळे सत्तेवर असलेल्या राजांनी तो आपल्या राजवाड्याच्या परिसरातच राहावा यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे दंतधातूचे स्थान सतत बदलत राहिले.

**दाम्बुल्ल आणि सिगिरिया :** श्रीलंकेतील दाम्बुल्ल येथील बौद्ध लेणी जागतिक सांस्कृतिक वारसा म्हणून जाहीर झालेली आहेत. या ठिकाणी असलेल्या पाच लेण्यांच्या अंतर्भागात गौतम बुद्ध आणि बोधिसत्त्व यांच्या मूर्तींबरोबर छतांवर काढलेली चित्रे आहेत.

दाम्बुल्ल शहराच्या जवळ असलेल्या सिगिरिया येथील पर्वतावर एका प्रचंड मोठ्या खडकावर बांधलेला किल्ला आणि राजवाडा होता. त्या खडकात राजवाड्याच्या प्रवेशद्वारापाशी कोरलेली सिंहाची एक प्रचंड मूर्ती आहे. त्यावरून या ठिकाणाचे नाव 'सिगिरिया' असे पडले. सिगिरिया येथील भित्तिचित्रांच्या शैलीची तुलना अजिंठा येथील भित्तिचित्र शैलीशी केली जाते.



सिगिरिया येथील भित्तिचित्र

**सहज जाता जाता :** इसवी सनापूर्वी तिसरे शतक ते इसवी सनाचे पहिले शतक या काळातील श्रीलंकेमध्ये मिळालेले कोरीव लेख अशोककालीन ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. अभ्यासकांच्या मते त्यातूनच हळूहळू आजची सिंहल लिपी विकसित होत गेली.

'ललितविस्तर सूत्र' या बौद्ध ग्रंथात एकूण ६४ भारतीय लिपींची यादी दिली आहे. त्यामध्ये 'ब्राह्मी' या लिपीचा उल्लेख आहे. ब्राह्मी लिपीपासून पुढे श्रीलंका आणि आग्नेय आशियातील अनेक लिपी विकसित झाल्या.

## १३.२ भारत आणि आग्नेय आशिया

आग्नेय आशियात प्रस्थापित झालेल्या भारतीयांच्या वसाहती आणि राज्ये यांची माहिती देणारे भारतीय साहित्य फारसे उपलब्ध नसले तरी चिनी सम्राटांच्या दरबारी नोंदींमध्ये या संदर्भातील माहिती उपलब्ध आहे. प्राचीन भारतीय साहित्यात 'सुवर्णभूमी' असा या प्रदेशाचा उल्लेख आढळतो.

आग्नेय आशियातील देशांशी भारताचे व्यापारी संबंध इसवी सनापूर्वी पहिले शतक ते इसवी सनाचे पहिले शतक या काळात सुरू झाले. भारतीय व्यापाऱ्यांसाठी मलाक्काच्या सामुद्रधुनीमार्गे येऊन चिनी समुद्रात प्रवेश करण्यासाठी मलाया द्वीपकल्प हा सोईचा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

बिंदू ठरला. मलाया द्वीपकल्पाच्या पश्चिमेकडील किनाऱ्यावर माल उतरवून तो पूर्व किनाऱ्याकडे नेणे आणि तो परत जहाजावर चढवणे हे संपूर्ण समुद्राला वळसा घालून जाण्यापेक्षा सोईचे होते. समुद्रमार्गाने चालणारा हा व्यापार इसवी सनाच्या दहाव्या शतकाच्या शेवटी चोळ राजांच्या राजवटीत लक्षणीयरित्या वृद्धिंगत झाला.

'आग्नेय आशिया' ही संज्ञा दुसऱ्या जागतिक युद्धाच्या काळात प्रचारात आली. बौद्ध ग्रंथांमध्ये सुवर्णभूमीचा उल्लेख आहे. आग्नेय आशियाचे अभ्यासक त्या प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन त्याचे दोन विभाग करतात : **१. मुख्य भूभाग** (या प्रदेशाचा उल्लेख इंडो-चीन या नावानेही केला जातो) - यामध्ये म्यानमार, थायलंड, कंबोडिया, लाओस, व्हिएतनाम हे देश आणि मलेशियाचा पश्चिम भाग यांचा समावेश होतो. **२. समुद्री प्रदेश** - म्हणजे मलाया द्वीपसमूह ज्यामध्ये मलेशियाचा पूर्व भाग आणि इंडोनेशियाचा समावेश होतो. या एवढ्या मोठ्या प्रदेशाचा समावेश आग्नेय आशियामध्ये केला जात असला तरी तेथील संस्कृती आणि इतिहास यांचा अभ्यास करत असताना तेथील स्थानिक वैविध्यांचा विसर पडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक ठरते.

**आग्नेय आशिया - संदर्भासाठी अधिक माहितीसाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**

(१) http://www.world-maps.co.uk/continent-map-ofsouth-east-asia.htm

(२) https://en.wikipedia.org/wiki/Khmer_Empire#/media/File:Map-ofsoutheast-asia_900_CE.png)

भारतातील लोकांचा आग्नेय आशियातील विविध प्रदेशांशी असलेला संपर्क इसवी सनापूर्वी दुसरे शतक ते इसवी सनाचे दुसरे शतक या कालखंडात व्यापाराच्या निमित्ताने वाढीस लागला होता. जहाजांवरून महिनोन्महिने प्रवास करणाऱ्या व्यापाऱ्यांबरोबर असलेल्या लवाजम्यात पुरोहित, भिक्खू, नशीब अजमावून पाहण्यासाठी निघालेले मुशाफीर, एखाद्या राजघराण्यातील महत्वाकांक्षी सदस्य असे विविध प्रकारचे लोक असत. या लोकांमार्फत आग्नेय आशियात भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. इतकेच नव्हे तर त्यांतील काहींनी तिथे स्वतंत्र राज्येही प्रस्थापित केली. आग्नेय आशियात प्रसृत झालेल्या भारतीय संस्कृतीच्या खुणा आजही पहायला मिळतात.

**म्यानमार :** 'म्यानमार' हा भारताच्या ईशान्य सीमेलगत असलेला शेजारी देश आहे. 'ब्रह्मदेश' हे या देशाचे पूर्वीचे नाव आहे. इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकात उत्तर आणि मध्य म्यानमारमध्ये 'प्यू' या नावाने ओळखली जाणारी नगरराज्ये अस्तित्वात आलेली होती. काही प्यू नगरे नव्याने वसली. त्यामध्ये हालीन आणि श्रीक्षेत्र ही नगरे महत्वाची होती.

श्रीक्षेत्र (ब्रिटिशकाळात 'प्रोम' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आणि सध्या 'प्येइ' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शहराजवळ) हे प्यू नगरांमध्ये विस्ताराने सर्वांत मोठे असलेले नगर होते. प्रचलित आख्यायिकांच्या अनुसार श्रीक्षेत्र या राज्यांचे संस्थापक असलेले दोन भाऊ हे गौतम बुद्धांच्या शाक्य कुळातील होते. इसवी सनाच्या पहिल्या शतकात म्यानमारमध्ये 'पगान' (बगान) हे राज्य उदयाला आले. इसवी सनाच्या अकराव्या शतकात त्याचे साम्राज्यात रूपांतर झाले आणि त्या साम्राज्यात श्रीक्षेत्रसह सर्व प्यू नगरराज्ये विलीन झाली.

पगान साम्राज्याचा संस्थापक 'अनव्रथ' हा म्यानमारच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ राज्यकर्ता मानला जातो. उत्तर आणि दक्षिण म्यानमारचे एकत्रीकरण करून आधुनिक म्यानमारच्या राष्ट्रीय अस्मितेचा पाया घालण्याचे श्रेय त्याला देण्यात येते. कंबोडियातील ख्मेर सत्तेच्या वाढत्या वर्चस्वाला त्याने पायबंद घातला. त्याच्या कारकिर्दीत श्रीलंका आणि आग्नेय आशियात क्षीण होत चाललेल्या थेरवादी बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन झाले.

प्यू नगरराज्यांमधील हालीन, बेइक्थानो आणि श्रीक्षेत्र या तीन नगरांभोवती असलेल्या तटभिंतींचे विटकाम, खंदक यांचे अवशेष अजूनही पाहण्यास मिळतात. तेथे करण्यात आलेल्या उत्खननांमध्ये तत्कालीन वास्तू, स्तूप, दफनभूमी आणि जलव्यवस्थापनाशी संबंधित असलेली बांधकामे यांचे अवशेष उजेडात आलेले आहेत. या तीनही नगरांच्या अवशेषांना जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा देण्यात आला आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

इसवी सनाच्या सहाव्या ते दहाव्या शतकाच्या दरम्यान बांधला गेलेला याँगान (रंगून) येथील 'श्वेडगॉन पॅगोडा' हा म्यानमारमधील स्तूपबांधणीचा एक उत्कृष्ट नमुना समजला जातो. म्यानमारमधील दोन व्यापारी बंधू भारतात आले असता त्यांची भेट गौतम बुद्धांशी झाली होती. त्या वेळी त्यांना गौतम बुद्धांकडून त्यांच्या मस्तकाचे आठ केस मिळाले होते. मायदेशी परतल्यावर त्यांनी ते राजाच्या हवाली केले आणि राजाने त्यावर जो पॅगोडा बांधला, त्याला 'श्वेडगॉन पॅगोडा' हे नाव मिळाले. हा पॅगोडा सोन्याच्या पत्र्यांनी मढवलेला आहे.



श्वेडगॉन पॅगोडा

पगान साम्राज्याचा इसवी सनाच्या अकराव्या ते बाराव्या शतकातला सम्राट क्यांझित्था याच्या कारकिर्दीत बांधले गेलेले 'आनंद मंदिर' ही आणखी एक महत्त्वाची वास्तू आहे. ती भारतीय आणि पगान स्थापत्यशैलीच्या संमिश्र बांधणीचा उत्कृष्ट नमुना आहे.



आनंद मंदिर

**थायलंड :** प्राचीन काळी थायलंडचे रहिवासी त्यांच्या देशाचा उल्लेख 'मुएंग थाइ' असा करत असत. परंतु बाहेरील जगामध्ये मात्र तो 'सयाम' या नावाने ओळखला जात असे. विसाव्या शतकात त्याचे नाव 'थायलंड' असे बदलण्यात आले. थायलंडमध्ये इसवी सनाच्या सहाव्या ते अकराव्या शतकात मॉन लोकांचे राज्य होते. त्याचे नाव होते 'द्वारावती'. द्वारावतीच्या काळात थायलंडमध्ये भारतीय संस्कृतीचा प्रसार झाला. मॉन संस्कृतीच्या घडणीमध्ये भारतीय शिल्प, साहित्य, नीतिशास्त्र आणि दंडनीती या क्षेत्रांमधील परंपरांचा मोठा वाटा होता. द्वारावती हे राज्य छोटे आणि आग्नेय आशियातील इतर राज्यांच्या तुलनेत दुर्बल होते. लेखन, कला, प्रशासन, धर्म आणि शास्त्र या क्षेत्रांमधील ज्ञानाच्या इतर राज्यांमध्ये झालेल्या विकासाचे श्रेय मॉन लोकांकडे जाते. थायलंडमधील लोप बुरी (लाओ पुरी), अयुथ्था (अयोध्या) यांसारख्या शहरांच्या जवळ द्वारावती कालखंडातील शिल्प आणि स्थापत्य यांचे अवशेष सापडले आहेत.



द्वारावतीचे प्रातिनिधिक शिल्प

द्वारावती शिल्पशैलीवर भारतीय शिल्पशैलीचा प्रभाव दिसतो. त्यामध्ये प्रामुख्याने बुद्धमूर्तींचा समावेश असला तरी शिवलिंग आणि विष्णूमूर्तीही सापडलेल्या आहेत. कंबोडियातील शिल्पशैलीचा उगम द्वारावतीच्या शिल्पशैलीत असावा, असे मानले जाते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

इसवी सनाच्या चौदाव्या शतकात थायलंडमध्ये 'अयुथ्थ्या' नावाचे राज्य उदयाला आले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात म्यानमारने केलेल्या आक्रमणात अयुथ्थाचा संपूर्ण पाडाव झाला. आक्रमकांनी अयुथ्था शहर जाळले आणि तेथील कलाकृती, ग्रंथालये, मंदिरे इत्यादी सर्व आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अयुथ्थाच्या राजांच्या नावामागे 'राम' हा उपसर्ग जोडलेला दिसतो. त्याचे कारण तिथे रामचरित्राला मिळालेली लोकप्रियता आहे. थाइ रामायणाची स्वतंत्र परंपरा आहे. तिला 'रामाकिएन' (राम आख्यान) असे म्हटले जाते. रामाकिएन मधील कथा थायलंडमधील कलेच्या शिल्प, लोकसंगीत, नृत्य, नाट्य या सर्व माध्यमांमधून जपलेल्या आहेत.

**व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया :** युरोपियन वसाहतींच्या काळात व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया या तीन देशांना मिळून 'इंडो-चीन' असे नाव दिले गेले.

इसवी सनाचे आठवे ते बारावे शतक या कालखंडात कंबोडियामध्ये मॉन आणि ख्मेर वंशाच्या लोकांचे राज्य होते. ख्मेर साम्राज्याचा उदय कंबोडियामध्ये झाला.

> **नकाशाच्या संदर्भासाठी खालील संकेतस्थळाला भेट द्या.**
> https://commons.wikimedia.org/wiki/
> File:Bandovietnam-final-fillscale.svg)

**१. व्हिएतनाम 'फुनान' :** हे व्हिएतनाममधील मेकाँग नदीच्या मुखाच्या प्रदेशातील प्राचीन राज्य होते. फुनानची माहिती प्रामुख्याने चिनी साहित्यातून मिळते. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात चीनमध्ये हान नावाचे घराणे राज्य करत होते. ते लयाला गेल्यानंतर चीनच्या साम्राज्याचे तीन तुकडे झाले. त्यांतील दक्षिणेकडच्या राज्याला रेशीम मार्गापर्यंत पोचण्यासाठी पर्याय उरला नाही. तेव्हा तेथील राजाने समुद्री मार्गाचा पर्याय शोधण्यासाठी काही लोक पाठवले. त्यांना मेकाँग* नदीच्या मुखाच्या प्रदेशात एक राज्य प्रस्थापित असलेले आढळले. त्यास त्यांनी 'फुनान' असे नाव दिले. त्यांच्या वर्णनानुसार फुनानमध्ये तटबंदीयुक्त शहर, राजवाडा, प्रस्थापित करप्रणाली, कायदे, लिखित नोंदी करण्याची पद्धत आणि कौशल्यावर आधारित व्यवसाय करणारा कारागीरवर्ग होता. हवाई छायाचित्रणाच्या आधारे या वर्णनाला दुजोरा मिळाला आहे. फ्रेंच पुरातत्त्वज्ञ लुई मेलरे याने केलेल्या उत्खननात विटांमध्ये बांधकाम केलेल्या मंदिरांचे अवशेष, अलंकार घडवण्याचे कारखाने आणि राहण्याची घरे यांचे येथे अवशेष मिळाले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातील रोमन नाणीही मिळाली.

> **मेकाँग नदी तिबेटच्या पठारावर उगम पावून, चीनच्या युन्नान प्रांतातून, म्यानमार, लाओस, थायलंड, कम्बोडिया आणि शेवटी व्हिएतनाम अशी वाहत येऊन दक्षिण चीनच्या समुद्राला मिळते.*

**२. चंपा :** व्हिएतनामच्या किनारी प्रदेशात 'चंपा' हे प्राचीन राज्य होते. 'चंपा' राज्यात अनेक ठिकाणी ब्राह्मी लिपीत कोरलेले संस्कृत लेख मिळाले आहेत. चंपा म्हणजे 'चामवंशीय' लोकांचे राज्य. तेथील शहरांची* नावे इंद्रपूर, अमरावती, विजय, कौठार, पांडुरंग अशी होती. विजय हे शहर चंपा राज्याची राजधानी होते. कोरीव लेखांमध्ये तेथील राजे आणि राण्या यांची नावे आणि त्यांनी बांधलेल्या हिंदू दैवतांच्या मंदिरांचे, विशेषतः शिवमंदिरांचे उल्लेख सापडतात. त्याचबरोबर लाकडी बुद्धमूर्तीही मिळाल्या आहेत. त्यावरून व्हिएतनाममध्ये व्यापारी केंद्र असलेली फुनानसारखीच इतर नगरराज्ये अस्तित्वात होती आणि तेथून विविध वस्तूंची आयात-निर्यात होत असे, हे स्पष्ट होते.

> **चंपा या राज्यातील नगरांच्या नावासाठी नकाशा पहा :*
> *https://upload.wikimedia.org/wikipedia/*
> *commons/4/45/VietnamChampa1.gif*

इसवी सनाच्या चौथ्या ते चौदाव्या शतकाच्या कालखंडात चंपा राज्यामध्ये शैव मंदिरे बांधली गेली. ही मंदिरे 'माइ सान' नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका दरीमध्ये आहेत. त्यांतील 'भद्रेश्वर' मंदिर महत्त्वाचे समजले जाते. माइ सान येथे एके काळी ७० हून अधिक मंदिरे होती. या मंदिरांच्या प्रांगणात संस्कृत आणि चाम भाषेत कोरलेल्या लेखांचे दगडी पट्ट उभारलेले आहेत. याच परिसरात राजघराण्यातील व्यक्तींची दफनस्थळे आहेत. हा परिसर राजघराण्यातील लोकांच्या धार्मिक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रसंगांसाठी राखीव होता, असे दिसते. माइ सान येथील मंदिरांच्या परिसराला जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा लाभलेला आहे.

माइ सानची मंदिर स्थापत्यशैली वैशिष्ट्यपूर्ण होती. शिखरांची उभारणी मेरू पर्वताच्या संकल्पनेवर आधारलेली होती.



**'माइ सान' येथील मंदिराच्या शिखरावरील शिल्प**

व्हिएतनाम, लाओस आणि कंबोडिया या तीन देशांत सुमारे वीस वर्षे सुरू असलेल्या युद्धाला 'व्हिएतनाम युद्ध' म्हणून ओळखले जाते. या युद्धात माइ सानचा परिसर उद्ध्वस्त झाला.

**३. लाओस :** हा देश भूवेष्टित आहे. लाओसचे अधिकांश लोक मूळचे दक्षिण चीनमधून आलेले 'लाओ' वंशाचे लोक आहेत. लाओसमधील राज्याचे नाव 'लाओ सांग' असे होते. हे राज्य इसवी सनाच्या चौदाव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत अस्तित्वात होते. एकोणिसाव्या शतकात थायलंडने केलेल्या आक्रमणापुढे लाओ सांगचा टिकाव लागला नाही. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात लाओसमधील व्हिएनशिएन येथे पुन्हा एकदा फ्रेंच लोकांनी त्यांचे प्रशासकीय केंद्र प्रस्थापित केले.

आग्नेय आशियातील इतर देशांप्रमाणेच लाओसमध्येही बौद्ध धर्म प्रमुख आहे. तेथील सांस्कृतिक आणि साहित्यिक जीवनात बुद्धचरित्र आणि रामायण यांच्याशी संबंधित कथांचा प्रभाव पहायला मिळतो. विशेषतः शिल्पकला आणि नृत्य-नाट्य या माध्यमांमध्ये बुद्धचरित्र आणि रामायणातील कथासूत्रांचे सादरीकरण केलेले पहायला मिळते. सोळाव्या शतकात लाओसमध्ये रचले गेलेले 'सान सिनसे' नावाचे एक महाकाव्य केवळ लाओसमध्येच नव्हे तर थायलंडमध्येही लोकप्रिय आहे. त्याच्या कथासूत्रामध्ये आणि रामायणाच्या कथासूत्रामध्ये साधर्म्य आहे.

**४. कंबोडिया :** याचे प्राचीन नाव 'कंबुजदेश' असे होते. त्याचा इतिहास तेथील मंदिरांच्या प्रांगणांमध्ये असणाऱ्या कोरीव लेखांच्या आधारे समजतो. हे लेख संस्कृत आणि ख्मेर भाषेत आहेत. कंबोडियात सर्वप्रथम प्रस्थापित झालेल्या राज्याचे नाव 'चेन्ला' असे होते. तेथील लोक 'ख्मेर' वंशाचे होते. कंबोडियातील भारतीय संस्कृतीचा प्रभाव चेन्ला काळापासून दिसून येतो. चेन्ला राज्याच्या संस्थापकाचे नाव दुसरा 'जयवर्मन' असे होते. इसवी सन ८०२ मध्ये त्याचा राज्याभिषेक झाला. त्याच्या राजधानीचे नाव 'हरिहरालय' होते.

चेन्ला राज्याच्या राजांनी पुढील ५०० वर्षांत व्हिएतनामपासून म्यानमार आणि उत्तरेला चीनपर्यंत राज्याचा विस्तार केला. हे साम्राज्य 'ख्मेर साम्राज्य' म्हणून ओळखले जाते. सातवा 'जयवर्मन' या राजाच्या कारकिर्दीनंतर ख्मेर साम्राज्याला उतरती कळा लागली आणि इसवी सनाच्या पंधराव्या शतकात थायलंडमधील अयुथ्थाच्या राजांनी ख्मेर साम्राज्याचा पूर्ण पाडाव केला.

इसवी सनाच्या अकराव्या शतकातील दुसरा सूर्यवर्मन आणि बारा-तेराव्या शतकांतील सातवा जयवर्मन यांची कारकीर्द कंबोडियातील मंदिरस्थापत्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होती. दुसऱ्या सूर्यवर्मनने 'यशोधरपूर' या राजधानीच्या शहरात जगविख्यात 'अंकोरवट' हे विष्णुमंदिर बांधले. त्याचे क्षेत्रफळ सुमारे ५०० एकर म्हणजेच सुमारे २ चौरस किलोमीटर इतके आहे. मुख्य प्रवेशद्वार पश्चिमेला असून मंदिराभोवती २०० मीटर रुंदीचा प्रचंड मोठा खंदक आहे. मंदिराच्या कोरीव शिल्पांमध्ये आग्नेयेकडील भिंतीवर असलेले समुद्रमंथनाचे शिल्प प्रसिद्ध आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



अंकोरवट मंदिर

सूर्यवर्मनच्या मृत्यूनंतर काही वर्षांनी चंपाच्या राजाने अंकोरवटवर हल्ला केला आणि अंकोरवटची नासधूस केली. पुढे अंकोरवटचे रूपांतर बौद्ध मंदिरामध्ये झाले.

सातव्या जयवर्मनने ख्मेर साम्राज्याची आधीची राजधानी यशोधरपूरपासून जवळच 'अंकोरथॉम' ही नवी राजधानी बांधली. त्याने बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. अंकोरथॉम शहराचे नियोजन, जलव्यवस्थापन आणि स्थापत्य यांमध्ये ख्मेर शैलीच्या परिपक्वतेचा प्रत्यय येतो. अंकोरथॉमचा मध्यवर्ती बिंदू म्हणजे 'बयोन मंदिर'. बयोन मंदिर हे मेरू पर्वताचे प्रतीक आहे. बयोन मंदिररूपी मेरू पर्वताला रवीच्या स्वरूपात मध्यवर्ती ठेवून, समुद्रमंथन करणाऱ्या देव आणि दानव यांच्या शिल्पाकृती मंदिराच्या दक्षिणेकडील प्रवेशमार्गाच्या दोन्ही बाजूंना पहायला मिळतात. शहराच्या भोवती असणाऱ्या खंदकातील पाणी 'ईस्ट बॅरे' आणि 'वेस्ट बॅरे' या नावांच्या दोन जलाशयांमधून येते. याच जलाशयांमधून अंकोरथॉम, अंकोरवट आणि त्यांच्या परिसरातील इतर अनेक मंदिरांना पाणीपुरवठा होत असे. अंकोरथॉमच्या प्रवेशद्वारावरील शिखरे त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. ही शिखरे किंचित स्मित करणाऱ्या मानवी चेहऱ्याच्या आकाराची आहेत. आकाराने प्रचंड असणाऱ्या या चेहऱ्यांची बांधणी अनेक दगड वापरून केलेली आहे. त्यांतील प्रत्येक दगडाचे कातीव काम चेहऱ्याच्या आकारानुसार करून घेऊन, मग ते दगड एकमेकांमध्ये बसवून, हे चेहरे साकारलेले आहेत.

अंकोरवट, अंकोरथॉम आणि त्यांच्याभोवतीचा परिसर हा युनेस्कोने जागतिक सांस्कृतिक वारसा म्हणून जाहीर केलेला आहे.

**मलेशिया आणि इंडोनेशिया :** युरोपीय लोकांच्या आगमनाआधी मलेशियामध्ये तीन प्राचीन राज्ये होऊन गेली. वायू पुराणात 'मलयद्वीप' या नावाने मलेशियन द्वीपकल्पाचा उल्लेख केलेला आढळतो. सातव्या शतकात होऊन गेलेला इ-त्सिंग/यि-जिंग या चिनी बौद्ध भिक्खूने 'मलायु' राज्याला भेट दिली होती. टॉलेमीने त्याचा उल्लेख 'मलेउ कोलान' आणि 'गोल्डन केर्सनीझ (सुवर्णद्वीप)' असा केला आहे. तंजावर येथील बृहदीश्वर मंदिरातील कोरीव लेखात त्याचा उल्लेख 'मलैयुर' असा केलेला आहे. चोळ राजा राजेंद्र याने पराभूत केलेल्या राज्यांपैकी ते एक राज्य होते. चीनच्या दरबारी दप्तरांमध्येही मलायुचा उल्लेख आढळतो.

**१. श्रीविजय :** हे राज्य आग्नेय आशियातील एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या राज्यांमध्ये प्रबळ ठरले. या राज्याचा उगम सुमात्रामध्ये झाला. मलायु आणि त्याच्या शेजारची तुलनेने दुर्बळ असलेली राज्ये हळूहळू श्रीविजय राज्यामध्ये समाविष्ट झाली. अकराव्या शतकात चोळांनी केलेल्या आक्रमणाला तोंड देताना श्रीविजय राज्य दुर्बळ झाले. चौदाव्या शतकात मलायुचा शेवटचा राजा 'परमेश्वरन' उर्फ 'इस्कंदर शाह' याने मलायातील पहिल्या सुलतानशाही राज्याची स्थापना केली.

**२. मजपहित :** तेराव्या शतकामध्ये पूर्व जावामध्ये 'मजपहित' नावाचे राज्य उदय पावले. हे भारतीय संस्कृतीचा प्रभाव असणारे शेवटचे राज्य होते. या राज्याच्या संस्थापकाचे नाव विजय असे होते. या राजाने कुबलाई खानाला जावामधून हाकलून देण्यात यश मिळवले आणि इंडोनेशियातील जावा, बाली आणि इतर


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**अधिक माहितीसाठी :** इ-त्सिंग/यि-जिंग भारतात येण्यापूर्वी आणि चीनला परत जाताना दोन्ही वेळा इंडोनेशियातील सुमात्रा या बेटावर थांबला होता. तिथे राहून तो संस्कृत व्याकरण शिकला होता. सुमात्रातील राज्याचा उल्लेख त्याने 'शिली फोशी' म्हणजे श्रीविजय या नावाने केला आहे. तिथल्या राजाने त्याला मलायुला पाठवले होते. मलायु येथे तो दोन महिने राहिला. त्याच्या परतीच्या प्रवासातही तो मलायु येथे गेला होता. परंतु मधल्या वीस वर्षांच्या काळात मलायुचे नाव श्रीविजय झाले असल्याचे त्याने नमूद केले आहे. श्रीविजयमध्ये एक हजाराहूनही अधिक बौद्ध भिक्खू संस्कृत शिकण्यासाठी राहत असल्याचेही त्याने नमूद केले आहे.

**अधिक माहितीसाठी :** सुमात्रामध्ये अनेक कोरीव लेख मिळालेले आहेत. ते प्राचीन मलायु भाषेत असून त्यासाठी पल्लव ब्राह्मी लिपीचा (तमिळ ब्राह्मीचे एक रूप) वापर केला आहे.

काही बेटांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करून मजपहित राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. पंधराव्या आणि सोळाव्या शतकामध्ये उदयाला आलेल्या इस्लामी राज्यांमुळे मजपहितचे अस्तित्व हळूहळू संपुष्टात आले.

**३. शैलेन्द्र :** या जावामधील राज्याचे राज्यकर्ते भारतातून आले होते, असे मत काही भारतीय इतिहासकारांनी मांडले होते. परंतु त्याबद्दल एकमत नाही. इसवी सनाच्या आठव्या ते नवव्या शतकात शैलेन्द्र सत्ता भरभराटीला आली. शैलेन्द्र राजे बौद्ध धर्माचे अनुयायी होते. त्यांनी अनेक बौद्ध मंदिरे आणि स्तूप बांधले. त्यात मध्य जावातील बोरोबुदुरचा स्तूप स्थापत्य, शिल्पकला आणि बौद्ध तत्त्वज्ञानाची अभिव्यक्ती या सर्वच दृष्टीने अद्वितीय आहे. त्याला जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा देण्यात आला आहे.

शैलेंद्र काळात मध्य जावातील डिएंगच्या पठारावर बांधलेला हिंदू मंदिरांचा समूह 'डिएंग मंदिरे' या नावाने ओळखला जातो.

**४. मतराम :** 'मतराम' नावाची एक समकालीन सत्ता जावाच्या पूर्व भागात होती. संजय नावाचा राजा या राज्याचा संस्थापक होता. मतराम राजवटीच्या काळात 'महाभारत' आणि 'हरिवंश' या ग्रंथांची जावानीज भाषेत भाषांतरे झाली. प्राचीन जावानीज भाषेतील काव्यरचना 'शार्दूलविक्रिडित' सारख्या संस्कृत वृत्तामध्ये बांधलेल्या आहेत. त्यांना 'काकविन' असे म्हटले जाते.

इंडोनेशियातील 'वायांग' या नावाने ओळखला जाणारा छायानाट्याचा खेळ विशेष प्रसिद्ध आहे. हा खेळ विशिष्ट पद्धतीने बनवलेल्या कातडी किंवा लाकडी पुतळ्या वापरून केला जातो. त्यामध्ये महाभारत आणि रामायणामधील कथा सादर केल्या जातात. रामायण, महाभारतातील कथांच्या आधारे कलावंतांकडून रंगमंचावर सादर केले जाणारे नृत्यनाट्यही 'वायांग' या नावाने ओळखले जाते.



**वायांग छायानाट्य**

इंडोनेशियात हिंदू, विशेषतः शैव संप्रदायाची मंदिरेही बांधली गेली. त्यामध्ये प्रांबनान येथील मंदिर समूह खूप महत्त्वाचा मानला जातो. या समूहातील मंदिरांना जागतिक सांस्कृतिक वारशाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यांतील प्रमुख मंदिर 'चंडी* प्रांबनान' किंवा 'चंडी लारा/रारा जोंग्रांग' या नावाने ओळखले जाते. ते मतरामचा राजा दक्ष याने बांधले. हे मंदिर शिवाचे असून त्यामध्ये दुर्गा देवीची एक सुंदर मूर्ती आहे. तिला स्थानिक लोक 'लारा जोंग्रांग' असे म्हणतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

*'चंडी' म्हणजे मंदिर.

अशा रीतीने या आणि याआधीच्या पाठात भारताबाहेरील देशांमध्ये त्या त्या देशातील संस्कृतींच्या घडणीत भारतीय संस्कृतीने महत्त्वाची भूमिका बजावली, याचा इतिहास आपण पाहिला. बौद्ध धर्माचा प्रसार आणि व्यापार यांच्यामुळे भारतीय संस्कृतीच्या भारताबाहेरच्या प्रसारास सुरुवात झाली. त्या इतिहासाने इसवी सनाच्या सुरुवातीपासून मध्ययुगापर्यंतचा कालखंड व्यापलेला आहे.

**अधिक माहितीसाठी :** बौद्ध तत्त्वज्ञानानुसार विश्वाच्या अस्तित्वाच्या तीन पातळ्या असतात : (१) कामधातू (इच्छारूपी बंध) (२) रूपधातू (आकाररूपी आणि नामरूपी बंध) (३) अरूपधातू (बंधमुक्तता). बोरोबुदुरच्या स्तूपाची रचना या तीन पातळ्यांच्या संकल्पनेवर आधारलेली आहे. पहिल्या दोन पातळ्यांवर क्रमाने लहान होत जाणारे चौथरे आहेत. प्रत्येक चौथऱ्याभोवती शिल्पाकृती असून कोनाड्यांमध्ये बुद्धमूर्ती आहेत. अंतिम पातळीवर तीन वर्तुळाकृती चौथरे आणि त्यांच्या कडेने जाळीदार स्तूप आहेत. त्या स्तूपांच्या आत बुद्धमूर्ती आहेत. सर्वांत शेवटच्या वर्तुळाकृती चौथऱ्यावर भरीव स्तूप आहे. अत्यंत भव्य असा हा स्तूप इसवी सन ८०० च्या सुमारास बांधला गेला.



बोरोबुदुर स्तूप



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. 'बुद्‌धघोष' हा प्राचीन श्रीलंकेत होऊन गेलेला एक सुप्रसिद्‌ध .......... होता.
(अ) विचारवंत (ब) तत्त्वज्ञ
(क) राजा (ड) धर्मगुरू

२. पगान साम्राज्याचा संस्थापक......... हा होता.
(अ) क्यांझित्था (ब) अनव्रथ
(क) अयुथ्था (ड) जयवर्मन

३. कंबोडियाचे प्राचीन नाव ........होते.
(अ) कंबुज देश (ब) लाओस,
(क) अंकोरवट (ड) सुमात्रा

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. म्यानमारमधील स्तूप बांधणीचा उत्कृष्ट नमुना – श्वेडगॉन पॅगोडा
२. चंपा राज्यामधील शैव मंदिरे – माइ सान
३. कंबोडियातील जगविख्यात विष्णुमंदिर –अंकोरवट
४. अंकोरथॉमचा मध्यवर्ती बिंदू – डिएंग मंदिरे

**(क) नावे लिहा.**

१. सम्राट अशोकाचा पुत्र –
२. लाओसमधील प्राचीन राज्याचे नाव–
३. चामवंशीय लोकांचे राज्य –
४. मलायुचा शेवटचा राजा–

**प्र.२ टीपा लिहा.**

१. चेन्ला राज्य
२. अंकोरवट विष्णुमंदिर
३. मजपहित राज्य
४. चंपा राज्य

**प्र.३ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. थायलंडमधील भारतीय संस्कृतीचा प्रसार स्पष्ट करा.
२. म्यानमार आणि भारत यामधील सांस्कृतिक संबंधांविषयी माहिती लिहा.

**उपक्रम**

पाठामध्ये आलेल्या जागतिक वारसास्थळांची नावे शोधा. आंतरजालाच्या (इंटरनेट) मदतीने चित्रे मिळवा. वास्तूचे नाव, ठिकाण, देश यांचा तक्ता तयार करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १४. दिल्लीची सुलतानशाही, विजयनगर आणि बहमनी राज्य

१४.१ भारतातील राजकीय स्थिती
१४.२ अरब आणि तुर्कांचे आक्रमण
१४.३ अलाउद्दीन खल्जी आणि देवगिरीचे यादव
१४.४ व्यापार आणि वाणिज्य
१४.५ शहरीकरण
१४.६ कला, स्थापत्य, साहित्य, समाजजीवन
१४.७ विजयनगर साम्राज्य
१४.८ बहमनी राज्य

भारताच्या इतिहासामध्ये प्राचीन कालखंडाचे मध्ययुगात झालेले संक्रमण हे विविध क्षेत्रातील बदलांमध्ये प्रतिबिंबित झालेले दिसते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांत हे संक्रमण घडून आले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

एखादे युग ठरावीक काळी संपते आणि दुसऱ्या युगाची सुरुवात होते, असे प्रत्यक्षात घडत नाही. नवे युग सुरू झाले तरी जुन्या युगाच्या काही परंपरा अस्तित्वात राहतात आणि त्याबरोबरीने नवीन परंपरा उदयाला येत असतात. त्यानुसार इतिहासात कालखंडाची कल्पना मांडली जाते. परंतु एखाद्या युगाची सुरुवात आणि त्याचा अंत अशी विभागणी त्यांतील स्थलकालाच्या बदलणाऱ्या संदर्भामुळे करणे कठीण जाते.

## १४.१ भारतातील राजकीय स्थिती

प्राचीन कालखंडातील काही राजघराणी मध्ययुगीन कालखंडातही अस्तित्वात राहिली व त्याचबरोबर नवीन सत्तांचा उदय देखील झाला. दक्षिण भारतातील चोळ राज्याचे रूपांतर मध्ययुगीन कालखंडात साम्राज्यात झाले होते. पांड्य, पल्लव इत्यादी सत्तांचा पराभव करून 'विजयालय' नावाच्या राजाच्या कारकिर्दीपासून चोळांची सत्ता अधिक विस्तारीत झाली. कालांतराने त्याचे रूपांतर एका साम्राज्यात झाले. हर्षवर्धनाच्या साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तर भारतात अनेक छोट्या मोठ्या राज्यांचा उदय झाला होता. या राज्यांमध्ये सतत सत्तासंघर्ष सुरू होता. परंतु या कालखंडात उत्तर भारतात एकछत्री साम्राज्य निर्माण झाले नाही. तेराव्या शतकात भारताच्या या राजकीय स्थितीचा फायदा तुर्की आक्रमकांनी घेतला. त्यावेळी राजस्थानचे चौहान, कनोजचे प्रतिहार आणि गढवाल (राठोड), बुंदेलखंडाचे चंदेल, माळव्यातील परमार, गोरखपूरचे कलचुरी, त्रिपुरीचे कलचुरी (मध्य प्रदेश), गुजरातमधील चालुक्य (सोळंकी), बंगालमधील पाल अशी अनेक राजघराणी अस्तित्वात होती. त्यांनी तुर्कांच्या आक्रमणाचा प्रतिकार केला. परंतु आपापसातील संघर्षामुळे त्यांचा परकीय आक्रमकांपुढे निभाव लागला नाही.

## १४.२ अरब आणि तुर्कांचे आक्रमण

उमायद घराण्यातील मुहम्मद बिन कासिम याने इ.स.७१२ साली सिंधवर आक्रमण केले. त्याने सिंधपासून मुलतानपर्यंतचा सर्व प्रदेश जिंकून घेतला. मुहम्मद-बिन-कासीमच्या नंतर भारतातील अरबांची सत्ता स्थिर राहिली नाही.

भारतात इस्लामची सत्ता तुर्कांनी रुजवली. त्यांनी भारतावर अनेक आक्रमणे केली. भारतातील कोणतीही सत्ता या आक्रमणांचा यशस्वी प्रतिकार करू शकली नाही. तुर्कांनी भारतातील प्रचंड संपत्ती लुटून नेली. अनेक राज्ये नष्ट केली व इस्लामी सत्ता स्थापन केली.

अफगाणिस्तानमधील गझनीच्या राज्याचा सुलतान सबक्तगीन याने अकराव्या शतकात पंजाबच्या जयपाल राजावर हल्ला केला. हे राज्य हिंदुकुश पर्वतापासून ते चिनाब नदीपर्यंत होते. सबक्तगीनच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र महमूद हा गझनीचा सुलतान बनला. संपत्तीची लूट करणे आणि इस्लाम धर्माचा प्रसार करणे या उद्देशाने त्याने भारतावर एकूण १७ स्वाऱ्या (इसवी सन १००१ ते १०१८) केल्या.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



खैबरखिंड

**अधिक माहितीसाठी :** अफगाणिस्तानातून पाकिस्तानात प्रवेश करण्यासाठी हिंदुकुश पर्वत ओलांडून यावा लागतो. हा मार्ग खैबर खिंडीतून जातो. ही खिंड भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली आहे. प्राचीन काळी भारताचा मध्य आशियाशी चालणारा व्यापार या खिंडीमार्गे चाले. पर्शियाचा सम्राट दार्युश याच्यानंतर सिकंदर याच मार्गाने भारतात आला. मध्ययुगात गझनीचा महमूद, बाबर, नादिरशाह, अहमदशाह अब्दाली इत्यादींच्या भारतावरील स्वाऱ्या याच मार्गाने झाल्या. विसाव्या शतकात ब्रिटिशांनी रेल्वेमार्ग बांधला. त्या मार्गाचे शेवटचे स्थानक पाकिस्तानातील पेशावर शहराच्या जवळ असलेले जामरूद हे होते. जामरूदपासून खैबर खिंडीच्या चढणीला सुरुवात होते. हा मार्ग सुमारे ५२ कि.मी. चा आहे. त्यावर ३४ बोगदे व लहानमोठे ९२ पूल आहेत.

गझनीच्या महमूदनंतर भारतावर मुहम्मद घोरीच्या आक्रमणांची मालिका सुरू झाली. तो अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. भारताची संपत्ती लुटण्याबरोबरच भारतात आपले राज्य स्थापन करणे हा त्याचा मुख्य उद्देश होता. राजपूत राजा पृथ्वीराज चौहान याने त्याचा प्रतिकार केला. त्या दोघांमध्ये दोन युद्धे झाली. त्याला 'तराईची युद्धे' म्हणतात. दुसऱ्या तराईच्या युद्धात पृथ्वीराज चौहानचा पराभव झाला. त्या पराभवानंतर राजपुतांना एकत्र करू शकणारे प्रभावी व्यक्तिमत्व राहिले नाही. मुहम्मद घोरीने सिंधपासून बंगालपर्यंत तुर्की साम्राज्य निर्माण करण्यात यश मिळवले. एकीचा अभाव, विखुरलेल्या सत्ता, राष्ट्रभावनेचा अभाव, खड्या सैन्याची कमतरता, तुर्कांची कुटील राजनीती आणि युद्धामधील आक्रमकता या कारणांमुळे भारतातील राज्यांना तुर्की आक्रमणासमोर माघार घ्यावी लागली.

मुहम्मद घोरीने गुलाम असलेल्या कुतुबुद्दीन ऐबक याला दिल्ली आणि आजूबाजूचा प्रदेश दिला. मुहम्मद घोरीच्या मृत्यूनंतर कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा पहिला सुलतान झाला. हाच गुलाम घराण्याचा संस्थापक होय.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

### १४.३ अल्लाउद्‌दीन खल्जी आणि देवगिरीचे यादव

कुतुबुद्‌दीन ऐबकानंतर अल्तमश हा दिल्लीच्या गादीवर आला. त्याच्या मृत्यूनंतर त्याची मुलगी रझिया दिल्लीची सुलतान झाली. अल्तमशने रझियाला बालपणापासूनच राज्यकारभाराचे शिक्षण दिले होते. ती कर्तबगार, पराक्रमी आणि प्रजाहितदक्ष होती. प्रसंगी ती लष्करी मोहिमांचे नेतृत्व करत असे. दिल्लीच्या गादीवर आलेली ती पहिली आणि एकमेव स्त्री होय. रझियानंतर दिल्लीच्या गादीवर आलेला महत्त्वाचा सुलतान बल्बन होता.

गुलाम वंशाचा अस्त झाल्यावर खल्जी वंशाचा उदय झाला. अल्लाउद्‌दीन खल्जीने देवगिरीच्या यादवांवर आक्रमण केले व प्रचंड संपत्ती हस्तगत केली.

दक्षिणेतील देवगिरी हे संपन्न शहर होते. देवगिरीवर रामदेवराय यादव हा राजा राज्य करत होता. अल्लाउद्‌दीनने देवगिरीवर अचानक इ.स.१२९६ मध्ये हल्ला चढवला. अचानक झालेल्या आक्रमणापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी रामदेवरायाने देवगिरीच्या (दौलताबाद) किल्ल्यात आश्रय घेतला. अल्लाउद्‌दीनने किल्ल्याला वेढा घातला. शहरात लुटालूट केली. किल्ल्यातील धान्यसाठा संपत आला होता. रामदेवरायाला अखेर त्याच्याशी तह करावा लागला. अल्लाउद्‌दीनचा विजय झाला आणि रामदेवरायाकडून त्याला देवगिरीच्या आसपासचा प्रदेश आणि प्रचंड द्रव्य मिळाले.

इ.स.१३१२ च्या सुमारास अल्लाउद्‌दीनने आपला मोर्चा पुन्हा दक्षिणेकडे वळवला. पुढील काळात देवगिरीचा राज्यकर्ता रामदेवराय याने अल्लाउद्‌दीनला खंडणी देण्याचे बंद करताच त्याने आपला सरदार मलिक काफूर याला दक्षिणेकडे रवाना केले. अल्लाउद्‌दीनच्या या दक्षिण स्वारीला राजकीय आणि आर्थिक कारणे होती. देवगिरीचा बंदोबस्त करून आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी संपत्ती गोळा करणे, हे महत्त्वाचे कारण होते. तसेच आपल्या राज्यविस्तारासाठी अल्लाउद्‌दीनने सैन्यसंख्या वाढवली होती. मोठ्या संख्येने कायमस्वरूपी खडे सैन्य उभारणारा अल्लाउद्‌दीन हा पहिला सुलतान होता. बाजारभाव नियंत्रणासाठी त्याने काही नव्या आर्थिक सुधारणा राबवल्या होत्या. त्यामुळे राज्याच्या खजिन्यावर ताण पडत होता. सैन्य व सेनाधिकारी यांना नव्या मोहिमेमध्ये गुंतवणे आवश्यक होते. या सर्व गोष्टी त्याच्या दक्षिणेकडील स्वारीस कारणीभूत ठरल्या.

खल्जी घराण्यानंतर दिल्लीवर तुघलक घराण्याने राज्य केले. त्या घराण्यातील मुहम्मद बिन तुघलकची कारकीर्द महत्त्वाची ठरली. राजधानीचे स्थलांतर आणि चलन व्यवस्थेतील बदल या मुख्य गोष्टी त्याच्या अपयशाला कारणीभूत ठरल्या. तांब्याची नाणी पाडणारा तो पहिला सुलतान होता. दिल्लीवरून देवगिरीला राजधानीचे स्थलांतर करण्याचे त्याने ठरवले. राज्याच्या सोईच्या दृष्टीने राजधानीचे ठिकाण बदलणे चुकीचे ठरत नाही, परंतु मुहम्मद तुघलकाचा हा निर्णय चुकीचा ठरला. दळणवळणाचा अभाव, व्यापाराची हानी, जनतेची नाखुषी या सर्व कारणांमुळे या निर्णयाला अपयश मिळाले व त्याने आपली राजधानी देवगिरीहून पुन्हा दिल्लीला हलवली. सुलतानाची व राज्याची प्रतिष्ठा यामुळे खालावली.

तैमूर या मध्य आशियातील मंगोल* सत्ताधीशाने नासरूद्‌दीन महमूद याच्या काळात भारतावर स्वारी केली आणि तुघलक घराणे संपुष्टात आले. त्याच्या दिल्लीतील अनुपस्थितीत मुघलांनी स्वारी करून पंजाब जिंकला व ते दिल्लीपर्यंत येऊन पोचले.

**भारतातील मुघल राज्यकर्ते स्वतःला मध्य आशियातील मंगोल राज्यकर्त्यांचे वंशज समजत असत.*

या काळात दक्षिणेत एक महत्त्वाची घटना घडली. मुहम्मद तुघलकाला दक्षिणेत आपले साम्राज्य उभारण्यात यश आले नाही. परंतु त्याच्याच काळात दक्षिणेत दोन नवी राज्ये उदयाला आली होती. ती म्हणजे विजयनगरचे आणि बहमनी राज्य. विजयनगरची स्थापना होऊन सुलतानशाहीच्या विरोधात एक प्रबळ राज्य उदयास आले होते.

तुघलकानंतर दिल्लीच्या गादीवर सय्यद घराण्याची सत्ता होती. सय्यद घराण्यानंतर लोदी घराण्याची सत्ता स्थापन झाली. इब्राहीम लोदी हा शेवटचा सुलतान ठरला. त्याच्या स्वभावदोषामुळे त्याला अनेक शत्रू निर्माण झाले. अफगाण सरदारही त्याचे विरोधक बनले. पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी काबूल-कंदहारचा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सत्ताधीश बाबर यास इब्राहीम लोदीविरुद्ध पाचारण केले. स.स.१५२६ मध्ये बाबराने इब्राहीम लोदीचा पानिपतच्या पहिल्या लढाईत पराभव केला आणि त्याचबरोबर सुलतानशाहीचा शेवट झाला आणि भारतात मुघलांची सत्ता सुरू झाली.

## १४.४ व्यापार आणि वाणिज्य

सुलतान राजवटीत शेती हाच बहुसंख्य लोकांचा व्यवसाय होता. शेतीचे उत्पन्न व त्यावरील महसूल हेच प्रमुख राज्याच्या उत्पादनाचे साधन होते. त्याबरोबर या काळात कापड उद्योग खूप मोठ्या प्रमाणावर चालू होता. दिल्ली, आग्रा, लाहोर, मुलतान, बनारस, पाटणा, खंबायत, बुऱ्हाणपूर, देवगिरी ही त्या काळातील कापड उद्योगाची प्रमुख केंद्रे होती. सुती कापडाची निर्यात बंगाल व गुजरातमधून मोठ्या प्रमाणात होत असे. त्यात मलमल, तागाचे कापड, सॅटीन व किनखाप (जरीचे कापड) यांचा समावेश असे.

या काळात कापड रंगवण्याच्या उद्योगास महत्त्व आले होते. गोवळकोंडा, अहमदाबाद, ढाका इत्यादी ठिकाणी या उद्योगांची केंद्रे होती. धातू उद्योग, साखर उद्योग, चर्मोद्योग असे विविध प्रकारचे उद्योगधंदे त्या वेळी चालत असत. या काळात भारतात कागदाचे उत्पादन होऊ लागले. चिंध्या व झाडाची साल यांपासून कागद तयार केला जात असे. काश्मीर, सियालकोट, दिल्ली, गया, बिहार, बंगाल व गुजरात या प्रदेशांत कागद निर्मितीचा उद्योग चालत असे.

सुलतान राजवटीत भारताच्या अंतर्गत व्यापाराची वाढ झाली. आठवड्याचा बाजार व मंडई यामधून स्थानिक व्यापार चालत असे. व्यापारी मालाची मोठी उलाढाल होत असल्याकारणाने व्यापारी पेठांचा उदय झाला. दिल्ली, मुलतान, जौनपूर, बनारस, आग्रा, पाटणा या व्यापारी पेठांतून भारतीय तसेच परकीय व्यापारी माल उचलत असत. तो खुष्कीच्या किंवा नद्यांच्या मार्गाने बंदरापर्यंत नेत असत. तेथून तो इराण, अरबस्तान, चीन इत्यादी देशांकडे समुद्री मार्गाने जात असे. यामध्ये प्रामुख्याने सुती कापड, मलमल, रंगीत कापड, सुंगधी तेल, नीळ, साखर, कापूस, आले, सुंठ इत्यादी वस्तूंचा समावेश असे. भारतात घोड्यांची आयात केली जाई. ती इराक, तुर्कस्तान, इराण या प्रदेशांमधून होत असे. मक्का आणि एडन येथून पोवळे, पारा, शिसे, तुरटी, केशर, सोने व चांदी हे धातू यांची आयात केली जाई.

**ही माहिती तुम्हांला नक्की आवडेल:**
अमीर खुसरौ हा फारसी भाषेत रचना करणारा प्रख्यात कवी व विद्वान होता. दिल्लीच्या राजदरबारात बल्बन या सुलतानाच्या राजवटीत राजकवी म्हणून त्याचे आयुष्य व्यतीत झाले. त्याच्या लिखाणातून त्याने ढाक्याच्या मलमलीचे वर्णन केले आहे. तो म्हणतो, ‘‘मलमल इतकी तलम असते की शंभर हात मलमल डोक्याला गुंडाळली तरी त्यातून डोईचे केस दिसून येतात.’’ इतकी तलम असली तरी तिच्या मजबुतीचे वर्णन देखील तो पुढील शब्दांत करतो, ‘‘शंभर हात लांबीची मलमल सुईच्या छिद्रातून आरपार जाऊ शकते. पण त्याच सुईने त्या मलमलीस छिद्र पाडता येत नाही.’’ तत्कालीन कारागिरी व कापड उद्योग केवढ्या परमोच्च बिंदूस पोचला होता, हे यावरून स्पष्ट होते.

सुलतानशाहीच्या काळात चलन व्यवस्थेत मूलगामी बदल घडून आले. नाण्यांवर आता देवी-देवतांच्या प्रतिमेऐवजी खलिफांची व सुलतानांची नावे कोरली जाऊ लागली. नाणे पाडण्याचे वर्ष, टांकसाळीचे ठिकाण इत्यादी तपशीलही अरेबिक लिपीमध्ये कोरले जाऊ लागले. नाण्यांच्या वजनासाठी ‘तोळा’ हे प्रमाण प्रचलित झाले.



मुहम्मद बिन तुघलकाची नाणी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**सहज जाता जाता :** सुलतान राजवटीत आर्थिक क्षेत्रात काही प्रयोग केले गेले. अल्लाउद्‌दीन खल्जीने बाजारावर प्रशासकीय नियंत्रण आणण्याचा प्रयोग केला होता. या प्रयोगात बाजारातील धान्य, भाजीपाला, फळे, नित्योपयोगी वस्तू तसेच गुलाम, घोडे इत्यादींचे भाव निश्चित केले गेले. त्याच किमतीत व्यापाऱ्यांना वस्तू विकण्याची सक्ती केली गेली. दुष्काळाच्या काळात नियंत्रित दरात वस्तू बाजारात उपलब्ध करून देण्याचे काम सरकार करत असे. त्यासाठी शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना गरजेपुरते धान्य ठेवून उरलेले सर्व धान्य सरकारला कमी दरात विकावे लागे. या प्रयोगात शेतकरी वर्गाची सर्वांत जास्त पिळवणूक होऊ लागली.

## १४.५ शहरीकरण

शहरांचा उदय आणि अस्त तेथील राजकीय आणि सांस्कृतिक घडामोडींवर अवलंबून असतो. शहरीकरणाची प्रक्रिया ही विशेषतः राजकीय आणि आर्थिक विकासाशी जोडली जाते. राज्यकर्त्यांची शहर वसवण्यात व त्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका असते. इब्न खल्दून या अरब इतिहासकाराच्या मते, राज्यकर्त्यांच्या धोरणातून व्यापाराला चालना मिळत असते. काही शहरांना प्रशासनाचे केंद्र किंवा तेथील मागणी असलेल्या उत्पादनामुळे महत्त्व प्राप्त होते.

सुलतानशाहीच्या काळात शहरीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. तेराव्या शतकाच्या अखेरीस दिल्ली ही सुलतानांची राजधानी म्हणून आकारास येऊ लागली. खल्जी घराण्यातील अल्लाउद्‌दीन खल्जीने 'सिरी' हे शहर उभारले. तुघलक घराण्यातील सुलतानांनी 'तुघलकाबाद', 'जहाँपन्हा' आणि 'फिरोजाबाद' ही तीन शहरे वसवली. सय्यद आणि लोदी घराण्यातील सुलतानांनी आग्रा शहरास आपली राजधानी बनवले. या काळात अनेक छोटी-मोठी राजघराणी होती आणि त्यांच्या राजधान्यांचे स्वरूप देखील छोट्या-मोठ्या शहरांसारखेच होते. व्यापार आणि दळणवळणाची साधने वाढत गेली, त्यातून शहरांचा विकास होत गेला.

## १४.६ कला, स्थापत्य, साहित्य, समाजजीवन

सुलतानी राजवटीचे राजकीय जीवनावर जसे परिणाम झाले, तसेच धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावर देखील झाले. भारतीय कलेच्या क्षेत्रात काही नवीन पैलूंची भर पडली. उदा., रझिया सुलतान संगीतकार व गायकांना बक्षिसे देऊन प्रोत्साहित करत असे. बल्बन हा स्वत: एक संगीतकार होता. त्याने इराणी संगीत आणि भारतीय संगीत यांच्या संयोगातून अनेक नवीन रागांची निर्मिती केली होती. बल्बनच्या दरबारात अमीर खुसरौ व अमीर खास यांसारखे अनेक प्रसिद्ध कवी आणि संगीतकार होते.

सुफी संतांचा संगीतकलेच्या विकासामध्ये मोठा वाटा होता. ख्वाजा मोईनुद्‌दीन चिश्ती यांचे अनुयायी दिल्ली दरबारात रोज संध्याकाळी कव्वालीचा कार्यक्रम करत असत. कव्वाली हा संगीतातील प्रकार त्यावेळी बराच लोकप्रिय होता. जौनपूरचा हुसेनशहा शारुखी याने ख्याल गायकी विकसित करून संगीतात मोठे योगदान दिले.

इस्लामी राज्यकर्त्यांनी भव्य मशिदी, दर्गे व कबरी यांची निर्मिती केली. इराणी स्थापत्य आणि भारतीय स्थापत्य यांचा मनोहर संगम त्यांच्या स्थापत्यशैलीत दिसून येतो. इस्लामी शैलीच्या इमारती बांधणारा कुतुबुद्‌दीन ऐबक हा पहिला शासक होता. त्याने विजयाचे स्मारक म्हणून 'कुव्वत-इ-इस्लाम' ही मशीद दिल्ली येथे बांधली. मेहरौली येथील 'कुतुबमिनार' हे भारतीय इस्लामी स्थापत्याचे सुप्रसिद्ध उदाहरण आहे. कुतुबुद्‌दीन ऐबक याच्या काळात कुतुबमिनारचे बांधकाम सुरू झाले आणि अल्तमशच्या काळात ते पूर्ण झाले. नंतरच्या काळात कुतुबमिनारच्या परिसरात अनेक इमारती बांधल्या गेल्या. त्यांमध्ये व अल्लाउद्‌दीन खल्जीने अलाई दरवाजा व जमाअलखान मशीद या इमारतींचा समावेश आहे. फिरोजशाह तुघलकाने दिल्ली शहरात 'फतहाबाद' आणि 'हिसार-इ-फीरुझ' नावाच्या इमारती बांधल्या. त्याने अनेक किल्ले, पूल, धर्मशाळा, कालवे बांधले. तुघलक घराण्यातील सुलतानांनी बांधलेल्या इमारती भव्य पण साध्या होत्या.

दिल्लीच्या सुलतानांनी साहित्य निर्मितीस उत्तेजन दिले. अरबांच्या काळात आणि सुलतानांच्या कारकिर्दीत



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



कुतुबमिनार

अनेक व्यवहारोपयोगी संस्कृत ग्रंथांचे फारसी भाषेत अनुवाद झाले. गझनीचा महमूद याच्या काळात भारतात आलेल्या अल्बेरूनीने संस्कृत भाषेचा अभ्यास करून अनेक ग्रंथांचे अरबी भाषेत भाषांतर केले. सुलतानांच्या दरबारात साहित्यिक, कवी यांना उदार आश्रय मिळत होता. सीरिया, अरबस्तान, इराण इत्यादी देशातून अनेक विद्वान भारतात येत. त्यांनाही सुलतानांच्या दरबारात आश्रय मिळे. कोशशास्त्र या ग्रंथाचे भाषांतर 'तुली' या कोशकाराने केले. सुलतानशाहीच्या काळात अनेक इतिहासकार होऊन गेले. त्यांपैकी हसन निझामी, झियाउद्दीन बरनी, अफीफ याह्या ही प्रसिद्ध नावे आहेत. या काळात फारसी, अरबी व तुर्की या भाषांच्या एकत्रीकरणातून उर्दू ही नवी भाषा दक्षिण भारतात उदयास आली.

सुलतानशाहीच्या काळात मुसलमानी समाज तुर्क, उलेमा, मुघल, अरब व भारतीय मुसलमान अशा अनेक घटकांचा बनला होता. बहुतेक सुलतान तुर्क व पठाण जमातीचे होते. अमीर उमरावांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झाला. या काळात मक्तबा (प्राथमिक शाळा) आणि मदरसे यांची स्थापना झाली.

### १४.७ विजयनगर साम्राज्य

तेराव्या शतकाच्या अखेरीस दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खल्जी याच्या आक्रमणांमुळे दक्षिणेतील स्थानिक राजसत्तांची आर्थिक घडी मोडकळीस येऊ लागली. त्या काळात हरिहर व बुक्क यांनी 'विजयनगर' या नवीन राज्याची स्थापना इसवी सन १३३६ मध्ये केली. राजा कृष्णदेवराय याच्या कारकिर्दीत विजयनगरच्या राज्याचा विस्तार झाला आणि त्याचे साम्राज्य पश्चिमेस दक्षिण कोकणापासून पूर्वेस विशाखापट्टणपर्यंत आणि उत्तरेस कृष्णा नदीपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत पसरले. त्याचा 'आमुक्तमाल्यदा' हा ग्रंथ राजनीतिविषयी आहे.



कृष्णदेवराय

निकोलो काँटी हा इटालियन प्रवासी आणि अब्दूर रझाक हा इराणी प्रवासी विजयनगर येथे येऊन गेले होते. त्यांचे प्रवास वृत्तान्त विजयनगरच्या इतिहासाची महत्त्वाची साधने आहेत.

### १४.८ बहमनी राज्य

इ.स.१३४७ मध्ये दक्षिणेतील काही सरदारांनी हसन गंगूच्या नेतृत्वाखाली सुलतान मुहम्मद तुलघकाच्या सैन्याविरुद्ध उठाव केला. त्यांनी दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. हसन गंगूने 'अल्लाउद्दीन बहमतशाह' किताब घेऊन बहमनी राज्याची स्थापना केली.


त्याने कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे राज्याची राजधानी स्थापली. त्याने राज्यविस्तारावर भर दिला. बहमनी सत्तेच्या कालखंडात महमूद गावान या वजीराने सत्ता अधिक प्रबळ केली. त्याने सैनिकांना जहागिरीऐवजी रोख वेतन दिले. महसूल व्यवस्थेत सुधारणा केली. जमिनीची मोजणी करून शेतसारा निश्चित केला.

गावानला गणित आणि वैद्यक विषयात गती होती. व्यक्तिगत ग्रंथसंग्रह करणे, बिदर येथे मदरसा स्थापन करणे यांमुळे तो समकालीनांपेक्षा वेगळा ठरला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




महमूद गावाननंतर बहमनी सरदारांमध्ये गटबाजी वाढीस लागली. परिणामी बहमनी सत्ता दुर्बल झाली. विजयनगर व बहमनी यांच्यामधील संघर्षाचा बहमनी राज्यावर प्रतिकूल परिणाम झाला. प्रांतातील अधिकारी अधिक स्वतंत्र वृत्तीने वागू लागले. बहमनी राज्याचे विघटन झाले. त्यातून वऱ्हाडची इमादशाही, बिदरची बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी बहमनी राज्याची पाच शकले झाली. इसवी सन १५६५ मध्ये झालेल्या तालिकोटच्या लढाईत विजयनगरच्या रामरायाचा बहमनी राज्याच्या अंतर्गत असलेल्या पाचही शाह्यांनी विजयनगरचा निर्णायक पराभव केला आणि वैभवसंपन्न विजयनगर साम्राज्याचा अस्त झाला.

सुलतानशाहीच्या काळात भारताच्या राजकीय व सामाजिक जीवनावर दूरगामी स्वरूपाचे परिणाम घडून आले. एका नव्या मिश्र संस्कृतीची निर्मिती झाली. सुलतानशाहीच्या अस्तानंतर उत्तरेत मुघलांचे साम्राज्य उदयास आले. त्याचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. बल्बनच्या दरबारात ......... हा राजकवी होता.
(अ) अल्बेरूनी (ब) तुली
(क) अमीर खुसरौ (ड) हुसेन शहा शारुखी

२. इस्लामी शैलीच्या इमारती बांधणारा ......... हा पहिला शासक.
(अ) फिरोजशाह तुघलक
(ब) कुतुबुद्दीन ऐबक
(क) अल्लाउद्दीन खल्जी
(ड) अकबर



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. राजस्थान – चौहान

२. कनोज – प्रतिहार

३. बुंदेलखंड – चंदेल

४. त्रिपुरी – परमार

**प्र.२ पुढील घटना कालानुक्रमे लिहा.**


१. दुसऱ्या तराईच्या युद्‌धात पृथ्वीराज चौहानचा पराभव झाला.

२. मुहम्मद तुघलकाने राजधानी दिल्लीहून देवगिरीला हलवली.

३. गझनीचा सुलतान सबक्तगीन याने पंजाबच्या जयपाल राजावर हल्ला केला.

४. कुतुबुद्‌दीन ऐबक दिल्लीचा पहिला सुलतान झाला.

**प्र.३ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.४ विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. भारतात अरब सत्तेचा विस्तार झाला नाही.

२. राजपूत राज्यांना तुर्की आक्रमणासमोर माघार घ्यावी लागली.

**प्र.५ तुमचे मत नोंदवा.**

सुलतान राजवटीत कापड उद्योग भरभराटीला पोचला होता.

**प्र.६ टीपा लिहा.**

१. खैबर खिंड

२. सुलतानशाही कालखंडातील नाणी

**प्र.७ अल्लाउद्‌दीन खल्जीने देवगिरीच्या यादवांवर आक्रमण केले त्याची माहिती दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

(अ) आक्रमणाची कारणे (ब) आक्रमण व घटना (क) आक्रमणाचे परिणाम

**उपक्रम**

रझिया सुलतान या हिंदी चित्रपटाविषयी माहिती मिळवा आणि त्याचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून परीक्षण करा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १५. मुघलकालीन भारत

१५.१ भारतातील मुघल सत्ता
१५.२ महसूल व्यवस्थेतील सुधारणा
१५.३ कला, स्थापत्य, साहित्य
१५.४ व्यापार, उद्योग, समाजजीवन
१५.५ मुघल साम्राज्य आणि दख्खन

दिल्लीच्या सुलतानशाहीचा मुघलपूर्व काळ हा भारतातील इस्लामी सत्तेचा पहिला कालखंड ठरतो. या कालखंडाचा सविस्तर अभ्यास आपण मागील पाठात केला. दिल्लीच्या तख्तावर शेवटचा सुलतान लोदी घराण्याचा होता. सुलतान इब्राहीम लोदी सत्तेवर असताना बाबराशी झालेल्या युद्धात तो ठार झाला. त्यानंतर दिल्लीची सुलतानशाही संपुष्टात येऊन तेथे मुघलांची सत्ता प्रस्थापित झाली. सुलतानशाहीच्या ऱ्हासानंतर साधारणत: इ.स.१५२६ ते १७०७ दरम्यानच्या काळात मुघल सत्ता प्रबळ होती. या काळात मुघलांचे राज्य भारतात सर्वत्र पसरले होते. कला वाङ्‌मयीन क्षेत्रांतील निर्मिती, प्रशासन व्यवस्था, परराष्ट्र संबंध, व्यापार-उदीम आदी क्षेत्रांतील भरभराट यांमुळे मुघलकाळाने समृद्धीचा मोठा टप्पा गाठलेला होता.

### १५.१ भारतातील मुघल सत्ता

सोळाव्या शतकाच्या प्रारंभी भारताची राजकीय घडी काहीशी विस्कळित होती. मुहम्मद तुघलकानंतर सुलतानशाहीला उतरती कळा लागली होती. दिल्लीची सुलतानशाही मोडकळीस येऊन उत्तर, मध्य व दक्षिण भारतात अनेक स्वतंत्र राज्ये निर्माण झाली होती. दक्षिणेतील बहमनी राज्य पाच शाह्यांमध्ये विभागले गेले आणि दक्षिणेकडील विजयनगरचे राज्य उत्कर्षाच्या शिखरावर होते. याच काळात पोर्तुगीजांनी पश्चिम किनारपट्टीलगतच्या भागात आपले बस्तान बसवण्यास प्रारंभ केला होता. मध्ययुगातील सत्तांची परंपरागत लष्करी व्यवस्था नवीन आक्रमणांना तोंड देण्यास समर्थ नव्हती. अद्ययावत शस्त्रास्त्रांचा वापर भारतीय करू शकले नाहीत. या सगळ्याचा फायदा घेऊनच मुघलांनी भारतावर अधिसत्ता स्थापन केली.

**अधिक माहितीसाठी :** ‘मुघल’ अथवा ‘मोगल’ हा ‘मंगोल’ या पर्शियन शब्दाचा अपभ्रंश आहे. मुघल मध्य आशियातून आले होते. ते मंगोल राज्यकर्ता चंगीजखान आणि तुर्क तैमूरलंग यांचे वंशज होते. आपल्या पूर्वजांचा मुघलांना अभिमान होता. तैमूरने केलेल्या भारतावरील स्वाऱ्यांच्या स्मृतीने बाबराला भारतात स्वारी करण्यास प्रोत्साहित केले होते. बाबराचा जन्म उझबेकिस्तान येथे झाला. तो मध्य आशियातील फरघाना प्रांताचा राजा होता. त्याने उत्तर भारतातील लोदी अफगाणांचा पराभव केला व मुघलांचे राज्य भारतावर प्रस्थापित केले. मुघलांनी भारतावर तीन शतकांहून अधिक काळ राज्य केले.

पानिपतच्या रणांगणावर झालेल्या युद्धात बाबराच्या समोर इब्राहीम लोदीचे विशाल सैन्य टिकू शकले नाही. व्यूहरचनेचे कौशल्य, शक्तिशाली तोफखाना, हेरखाते आणि खंबीर नेतृत्व यांच्या जोरावर बाबराने इब्राहिम लोदीचा पराभव केला. बाबराने दिल्ली येथे सत्ता स्थापना केली. त्याचा प्रतिकार करण्यासाठी मेवाडचा राजा राणा संग याच्या नेतृत्वाखाली राजपूत राजे एकत्र आले. राजस्थानमधील खानुआ येथे झालेल्या लढाईत बाबराने आपल्या युद्धकौशल्याच्या जोरावर राजपुतांना पराभूत केले. बाबरानंतर त्याचा थोरला पुत्र हुमायून तख्तावर आला. तथापि बिहारमधील शेरशाह सूर याने केलेल्या पराभवामुळे हुमायूनला राज्यापासून वंचित राहावे लागले.

शेरशाह सूर याने प्रशासनयंत्रणेत काही सुधारणा केल्या. त्याने उत्तर भारतात विखुरलेल्या अफगाण सरदारांना एकत्र आणले व अफगाणांची सत्ता स्थापन



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




केली. शेरशाहचे वंशज कर्तबगार नव्हते. त्यामुळे शेरशाहच्या मृत्यूनंतर हुमायूनने आपले गमावलेले राज्य पुन्हा मिळवले.

हुमायूननंतर त्याचा पुत्र अकबर हा गादीवर आला. तो बुद्धिमत्ता, सहिष्णुता, खंबीरपणा व धडाडी यांमुळे सर्वश्रेष्ठ मुघल सम्राट ठरला. बाबराने स्थापन केलेल्या राजसत्तेचे रूपांतर अकबराच्या काळात वैभवशाली साम्राज्यसत्तेत झाले. त्याने काबूलपासून बंगालपर्यंत व काश्मीरपासून वऱ्हाड-खानदेशापर्यंत आपली अधिसत्ता निर्माण केली. या कालखंडात मेवाड अधिपती महाराणा प्रताप यांच्याकडून अकबराला तीव्र विरोध झाला. अकबराला शेवटपर्यंत मेवाड जिंकता आले नाही. त्यामुळे साम्राज्यविस्तार करत असताना अकबराने राजपुतांबरोबर सामोपचाराचे धोरण स्वीकारले. हिंदुस्तानात मुघल सत्ता मजबूत करायची असेल तर येथील लोकांची मने न दुखावता मुघल राज्याचा पाया भक्कम करता येईल हे अकबराच्या लक्षात आले होते.

अकबरानंतर जहांगीर, शाहजहान आणि औरंगजेब यांनी दिल्लीचे तख्त समर्थपणे सांभाळले. औरंगजेबाने राज्यकर्ता म्हणून मुघलांचे साम्राज्य दख्खनच्या प्रदेशात विस्तारण्यासाठी सतत प्रयत्न केले. त्याची कारकीर्द सरहद्द प्रांतातील युद्धे, उत्तर व दक्षिण भारतविषयक धोरण, कट्टर धार्मिक धोरण, मराठा-मुघल संघर्ष इत्यादींसाठी विशेष महत्त्वाची ठरली. औरंगजेबाची शेवटची सुमारे पंचवीस वर्षे दक्षिण हिंदुस्थानात मराठ्यांशी संघर्ष करण्यात गेली. या काळात दक्षिणेतील मराठ्यांचा राज्यविस्तार, युरोपीय लोकांचा हिंदुस्तानच्या राजकारणातील हस्तक्षेप या गोष्टींना सुरुवात झाली. त्याचबरोबर मुघल सत्तेला उतरती कळा लागली. शेवटी इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात बहादूरशाहच्या काळात मुघल सत्तेची अखेर झाली.

### १५.२ महसूल व्यवस्थेतील सुधारणा

अकबराने शेरशाह सूर याने निर्माण केलेल्या महसूल व्यवस्थेत काही सुधारणा केल्या. त्यामुळे मुघलांची



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

महसूल व्यवस्था अधिक शिस्तबद्ध बनली. त्याने जमिनीचे सर्वेक्षण करून जमिनीची प्रतवारी केली. त्यानुसार जमिनीची विभागणी सुपीक, नापीक, बागाईत आणि जिराईत अशा चार प्रतींमध्ये करण्यात येऊ लागली. प्रत्येक शेतकऱ्याकडे असणाऱ्या जमिनीचे क्षेत्र नोंदवले गेले. जमिनीतील उत्पादन ठरवण्यासाठी तत्पूर्वीच्या दहा वर्षांतील उत्पादनाची सरासरी काढली गेली व या सरासरी उत्पन्नाचा १/३ हिस्सा जमीन महसूल म्हणून निश्चित करण्यात आला. हा महसूल १० वर्षांसाठी कायम केला गेला. यामुळे शेतकरी पुढील १० वर्षे जमीन महसुलाबाबत निश्चिंत होत असे. महसुलाची निश्चिंती झाल्यावर शेतकऱ्यांकडून त्यासंबंधीची 'कबुलायत' व 'पट्टा' ही कागदपत्रे तयार केली जात असत. या पद्धतीनुसार महसूल रोख अथवा शेतमालाच्या रूपात वसूल केला जात असे. तसेच शेतकऱ्यांना जमीन कसण्याकरिता काही कर्जाऊ रक्कम दिली जाई व पुढील काळात सुलभ हप्त्याने ती वसूल केली जात असे. दुष्काळ, महापूर, रोगराई अशा संकटाच्या काळी शेतकऱ्यांना महसुलात माफी अथवा सूट मिळण्याची तरतूद या पद्धतीत होती. अशा पद्धतीने महसुलाबाबत निश्चिंती निर्माण झाल्यामुळे शेतकरी समाधानी झाला. यामध्ये बादशाह अकबराचे लोककल्याणकारी धोरण प्रतिबिंबित झालेले दिसते. अकबराच्या दरबारातील राजा तोडरमल हा त्याने केलेल्या जमीनविषयक सुधारणांसाठी प्रसिद्ध आहे.

### १५.३ कला, स्थापत्य, साहित्य

मुघल काळात अकबर, जहांगिर व शहाजहान अशा तीन सम्राटांच्या कारकिर्दीचा प्रदीर्घ कालखंड शांतता, सुव्यवस्था व समृद्धीचा होता. कला आणि स्थापत्य या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू झाले. मशिद, कबरी व प्रासाद येथील संगमरवरी दगडातील वेलबुट्टीचे कोरीव काम त्या काळातील कला क्षेत्रातील प्रगतीची साक्ष देतात. फत्तेपूर सिक्री येथील शेख सलीम चिश्तीच्या कबरीची व ताजमहालाची कोरीव नक्षी हे या काळातील उत्कृष्ट नमुने आहेत. बादशाह अकबर आणि जहांगीर यांच्या काळात हस्तिदंतावरील कोरीव कलेला राजाश्रय दिला गेला. मुघलकालीन चित्रकलेचा उगम इराणी चित्रकलेतून झाला. बाबराच्या



बुलंद दरवाजा – फत्तेपूर सिक्री

आत्मचरित्राच्या फारसी हस्तलिखितांमध्ये इराणी शैलीतील लघुचित्रे आहेत. अकबराच्या काळात या चित्रकलेला अधिक उत्तेजन मिळाले. त्याने आपल्या दरबारात कुशल चित्रकारांची नेमणूक केली होती. जहांगीराच्या काळात दरबारातील व शिकारीच्या प्रसंगांची चित्रे काढण्यास प्रोत्साहन दिले गेले. पशुपक्षी, ढगांची रचना, मनुष्याकृती, नैसर्गिक दृश्ये या वैशिष्ट्यांमुळे त्या काळातील चित्रकला अधिक वास्तव, जिवंत व आकर्षक बनली.



मुघल चित्रकला



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**अधिक माहितीसाठी :** १७५८ मध्ये मराठ्यांनी अहमदशाह अब्दालीच्या सैन्याला अटकेपार घालवून दिले. अब्दालीला पळवून लावल्यावर मराठ्यांचा मुक्काम लाहोर येथे शालीमार बागेत होता. या संदर्भात मराठी रियासत खंड ४ मध्ये रियासतकार गो.स.सरदेसाई लिहितात–

''इकडे मागे दादासाहेबाने (रघुनाथराव पेशवे) येऊन लाहोरचा कब्जा घेतला. शहराबाहेर बादशहांचा पुरातन वाडा शालीमार बागांत आहे. त्यांत आदिनाबेगने दादांचा मुक्काम ठेवून त्याच्या सत्कारार्थ प्रचंड दीपोत्सव केला, त्यास एक लाख खर्च झाले. हा समारंभ बहुधान्यसंवत्सराच्या वर्षारंभी शुभ मुहूर्तावर सिद्‍ध होऊन रघुनाथदादाचा भाग्यरवि उगवला.''

मराठा सरदार हरि रघुनाथ भिडे यांनी २१ एप्रिल १७५८ रोजी पत्र लिहून पंजाबस्वारीची हकीकत पुण्याला पेशव्यांस लिहून पाठवली. त्यांतील पुढील वाक्य महत्वाचे आहे. ''दक्षिणी फौज पूर्वी दिल्लीपलीकडे आली नव्हती ते चिनाबपर्यंत पोचली.''

मुघल काळात संगीतकलेला राजाश्रय मिळाल्याचे दिसून येते. अकबराच्या काळात इराणी, काश्मिरी, तुर्की इत्यादी संगीतकारांना उदार राजाश्रय दिला गेला होता. तानसेन हा अकबराच्या दरबारातील एक महान गायक होता. या काळात हिंदुस्थानी संगीताचा उत्कर्ष झाला. जहांगीर आणि शाहजहान यांच्या काळात देखील संगीत कलेला प्रोत्साहन दिले गेले. औरंगजेबाच्या कारकिर्दीत मात्र या सर्व कलांवर बंदी घातल्यामुळे कलेचा ऱ्हास झालेला दिसून येतो.

**सहज जाता जाता :** औरंगजेबाच्या काळात चित्रकलेचा राजाश्रय काढून घेण्यात आल्यामुळे चित्रकार राजस्थान, बुंदेलखंड, गुजरात, हिमालयीन पहाडी प्रदेश येथील लहान–मोठ्या सत्ताधीशांकडे आश्रयास गेले. तेथे त्यांनी त्यांची चित्रकला जोपासली आणि त्यातूनच 'राजस्थानी' आणि 'पहाडी' अशा दोन चित्रशैली उदयास आल्या. रागमाला, बारामास (निसर्गाच्या विविध ऋतूंमधील चित्रे) हे त्यांच्या चित्रांचे विषय बनले. पहाडी शैलीच्या चित्रकारांनी दैनंदिन जीवनातील विषयांव्यतिरिक्त धार्मिक, ऐतिहासिक असे अनेक विषय रेखाटले. पहाडी शैलीतूनच पुढे बसौली, गढवाली व कांगडा अशा विविध शैली निर्माण झाल्या.

अकबराच्या काळापर्यंत स्थापत्यकलेवर इराणी स्थापत्यकलेचा प्रभाव अधिक प्रमाणात आढळून येतो. पुढील काळात त्यात बदल होत गेला आणि ही कला 'भारतीय–इस्लामी स्थापत्यकला' (इंडो–इस्लामिक) म्हणून नावारूपाला आली. सुलतानशाही काळातील स्थापत्यात भक्कमपणा आणि साधेपणा ही वैशिष्ट्ये दिसतात. मुघल काळात मात्र कलाकुसर व सौंदर्य ही वैशिष्ट्ये अधिक जाणवतात. बाबराच्या काळात पानिपतमधील काबूलबाग मशीद, उत्तरप्रदेशात संभल येथील जामा मशीद इराणी शैलीत बांधली गेली. शेरशाहच्या काळात सहस्राम (बिहार) येथे बांधलेली कबर ही भारतीय–इस्लामी स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. दिल्ली येथे शेरशाहने पुराना किल्ला बांधला. अकबराच्या काळात फत्तेपूर सिक्री हे नगर वसवले गेले. त्यामध्ये जामा मशीद, बुलंद दरवाजा अशा वास्तूंची उभारणी झाली. त्याने आग्र्याचा किल्ला, लाहोरचा किल्ला, अलाहाबादचा किल्ला, अटकचा किल्ला असे महत्त्वाचे किल्ले बांधले. लाल दगडांचा आणि संगमरवरी दगडाचा वापर, भव्य घुमट, कमानी ही या काळातील स्थापत्याची वैशिष्ट्ये होती.

मुघल बादशाह हे निसर्गप्रेमी होते. त्यांनी विस्तीर्ण बागा तयार केल्या. त्यांपैकी लाहोर येथील शालीमार बाग तसेच काश्मीरमधील शालीमार बाग, निशात बाग या आजही प्रसिद्‍ध आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



लाहोर येथील शालीमार बाग

शहाजहानचा काळ हा मुघल स्थापत्याचा उत्कृष्ट काळ होता. दिल्लीच्या लाल किल्ल्यातील दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास, जामा मशीद, मोती मशीद या इमारती त्याच्या काळात बांधल्या गेल्या. आग्र्याचा ताजमहाल ही या काळातील एक अजोड आणि अमर कलावास्तू म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानंतर मात्र मुघल स्थापत्यास उतरती कळा लागली.



ताजमहाल

मुघलकाळात उत्तमोत्तम अशा फारसी भाषेतील साहित्यकृती निर्माण झाल्या. बाबर हा स्वत: फारसी व तुर्की भाषांचा जाणकार होता. 'बाबरनामा' हे त्याचे आत्मवृत्त प्रसिद्ध आहे. त्यानंतरचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे हुमायूनच्या काळातील मिर्झा हैदर याचा 'तारिखे-रशिदी' हा होय. अकबराने राजतरंगिणी, लीलावती, रामायण, महाभारत, हरिवंश व पंचतंत्र या संस्कृत ग्रंथांचे फारसीत भाषांतर करवून घेतले. अबुल फझल याने 'अकबरनामा' आणि 'ऐन-इ-अकबरी' हे सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिले. शाहजहानचा मुलगा दारा शुकोह हा संस्कृत पंडित होता. त्याने अनेक उपनिषदांचे फारसीमध्ये भाषांतर केले. मुघल काळात बादशहाचे चरित्र व इतिहास या दोन विषयांवर अनेक साहित्यकृती निर्माण झाल्या. त्यांतील 'तारिखे-खाफीखान' हा खाफीखानाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

मुघल काळात गोस्वामी तुलसीदासांचे 'रामचरितमानस', सूरदास व संत मीराबाईचे काव्य, मलिक मुहम्मद जायसीरचित 'पद्मावत', संत कबीराचे दोहे हे स्थानिक बोलीभाषेतील साहित्य प्रसिद्ध आहे.

### १५.४ व्यापार, उद्योग, समाजजीवन

मुघल काळात अंतर्गत व्यापारातील मालवाहतूक जलद झाली. मुघल काळात अंतर्गत व्यापारासाठी नवे महामार्ग तयार केले गेले. आग्रा येथून काबूल, कंदहार, खंबायत, बुऱ्हाणपूर, बंगालकडे जाणारे मार्ग तयार करण्यात आले. परदेशांशी होणारा समुद्री व्यापार प्रामुख्याने खंबायत, भरुच, सुरत, दाभोळ, कालिकत यांसारख्या पश्चिम किनारपट्टीवरील बंदरातून होत असे.

अरबस्तान, इराण, चीन, आर्मेनिया आणि युरोप खंडातील काही देश यांच्याशी भारताचा व्यापार चालत असे. रेशमी कापड, गालिचे, नीळ, चामड्याच्या वस्तू, साखर, आले, हिंग, रत्ने अशा अनेक प्रकारच्या वस्तू भारतातून परदेशी रवाना होत असत. भारतात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये सोने, चांदी, घोडे, चिनी रेशमी कापड इत्यादींचा समावेश होता. या काळात पोर्तुगिज, डच, फ्रेंच, इंग्रज यांच्या वखारी स्थापन झालेल्या होत्या. युरोपियन मालाच्या बदल्यात भारतातून मसाल्याचे पदार्थ, सुती कापड इत्यादी वस्तू नेल्या जात. सुरत हे मुघलांचे अंतर्गत तसेच परदेशी व्यापाराचे महत्त्वाचे केंद्र होते.

मुघल काळात भारतीय कापड उद्योग अधिक भरभराटीस आला. भारतीय सुती कापडास अरबस्तान, अफ्रिकेचा पूर्व किनारा, इजिप्त, म्यानमार, मलाक्का इत्यादी प्रदेशांतून मोठी मागणी होती. आग्रा येथे कापड रंगवण्यासाठी लागणाऱ्या रंगांचे उत्पादन होत असे.


Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**अधिक माहितीसाठी :** मुघल काळात परदेशी व्यापार भरभराटीस आलेला दिसून येतो. भारतातून होणारी निर्यात आयातीपेक्षा अधिक होती. भारतातून निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये रेशमी कापड, रत्ने, मसाल्याचे पदार्थ अशा अनेक वस्तूंचा समावेश होता तर आयातीच्या वस्तूंमध्ये मुख्यत: चैनीच्या वस्तूंचा अंतर्भाव असे. परदेशी व्यापाऱ्यांना भारतीय मालाची किंमत चांदीच्या स्वरूपात द्यावी लागत असे. त्यामुळे भारतात दरवर्षी कित्येक टन चांदी येत असे. एडवर्ड टेरी नावाच्या युरोपियनाने म्हटले होते की, 'नद्या जशा समुद्राला मिळतात व तेथेच राहतात तसे जगातील चांदीचे प्रवाह भारताला येऊन मिळतात आणि तेथेच राहतात.'

नीळ, हळद, लाख, कुसुंब इत्यादी पदार्थांपासून विविध प्रकारचे रंग तयार केले जात. ओतकामाच्या उद्योगात शस्त्रास्त्रे व शेतकऱ्यांना लागणारी अवजारे तयार केली जात. तांबे व पितळ यांपासून बनवलेल्या भांड्यांना मोठ्या प्रमाणात मागणी होती. कागद निर्मितीसाठी बिहार प्रांत प्रसिद्ध होता. येथे रेशमापासून कागद तयार केला जात असे. सियालकोटचा कागद पांढराशुभ्र म्हणून प्रसिद्ध होता. मीठ आणि साखर यांचे उत्पादन हे या काळातील महत्त्वाचे उद्योग होते.

मुघल काळात साम्राज्यातील बहुसंख्य लोक खेड्यात राहत असत. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण असे. गावाची सुरक्षितता व सुव्यवस्था तसेच गावातील दैनंदिन जीवनाच्या गरजा गावातच पूर्ण होत असत. या काळात जातिव्यवस्था स्थिर राहिली.

मुघल काळात उच्च वर्गातील मुसलमान व हिंदू या दोन्ही समाजांमध्ये स्त्रियांची पडदा पद्धत प्रचलित होती. सुलतानशाही काळातील शिक्षण पद्धतीमध्ये मुघलकाळातही अकबर बादशाहपर्यंत फारसे बदल झाले नाहीत. अकबराने मात्र या पद्धतीत महत्त्वाच्या सुधारणा केल्या. त्याने इस्लामच्या धर्मशिक्षणाबरोबरच भारतीय तत्त्वज्ञान, कृषिशास्त्र, राज्यशास्त्र, खगोलशास्त्र अशा अनेक नवीन शास्त्रांचा अभ्यासक्रमात समावेश केला. मुघल काळात, संभलपूर (उत्तरप्रदेश), अहमदाबाद इत्यादी अनेक ठिकाणी मदरसे प्रस्थापित झाले होते. दक्षिण भारतात अहमदनगर, गुलबर्गा, बुऱ्हाणपूर, विजापूर, गोवळकोंडा, हैदराबाद ही शहरेही यासाठी प्रसिद्ध होती. अहमदनगर येथे संत ताहीर यांनी प्रस्थापित केलेला मदरसा होता. मदरशांमध्ये सुसज्ज ग्रंथालये होती. त्यांची देखभाल करण्यासाठी खास सेवकवर्ग नेमलेला होता.

### १५.५ मुघल साम्राज्य आणि दख्खन

बाबर व हुमायून यांच्या काळात राज्याचा विस्तार उत्तर भारतापुरता मर्यादित होता. नर्मदा नदीच्या दक्षिणेस खानदेशच्या सुलतानाचे राज्य, अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी प्रमुख राज्ये होती. अकबराने निजामशाही जिंकण्यासाठी मोहीम राबवली.

अकबराने इ.स.१५९५ मध्ये अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा दिला. या वेळी हुसेन निजामशहाची मुलगी चांद सुलताना (चांदबिबी) हिने अत्यंत धैर्याने आणि हुशारीने यशस्वी प्रतिकार केला. तिच्या मृत्यूनंतर निजामशाहीची राजधानी अहमदनगर मुघलांनी जिंकली. अकबर स्वत: दक्षिणेकडे आला व दक्षिणेत जिंकलेल्या प्रदेशाचे त्याने अहमदनगर, वऱ्हाड व खानदेश असे तीन सुभे निर्माण केले. अकबराच्या दक्षिण मोहिमेच्या वेळी शाहजादा सलीम याने पित्याविरुद्ध बंड पुकारले आणि त्यामुळे अकबराला त्याची दक्षिण मोहीम घाईने आटोपती घ्यावी लागली. शहाजहानच्या काळात निजामशाही राज्य लयाला गेले. मात्र आदिलशाही व कुतुबशाही यांनी आपले अस्तित्व टिकवले. नंतरच्या काळात औरंगजेबाला त्यांचे उच्चाटन करण्यात यश मिळाले.

या दरम्यान दख्खनमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठ्यांच्या राज्याने औरंगजेबाशी तीव्र निकराचा संघर्ष केला. त्याचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. मुघल बादशाह बाबर याचा जन्म.........येथे झाला.
   (अ) बलुचीस्तान (ब) कझाकीस्तान
   (क) उझबेकीस्तान (ड) अफगाणिस्तान

२. मुघल बादशहा हुमायूनचा पराभव .......... याने केला.
   (अ) इब्राहिम लोदी (ब) शेरशाह सूर
   (क) बाबर (ड) अकबर

३. अकबरनामा हा ग्रंथ.........याने लिहिला.
   (अ) महमद कासिम (ब) अबुल फजल
   (क) मिर्झा हैदर (ड) बदाऊनी

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. खाफीखान – अकबरनामा
२. मलिक मुहम्मद जायसी – पद्‌मावत
३. संत कबीर – दोहे
४. मिर्झा हैदर – तारिखे रशिदी

**(क) ऐतिहासिक व्यक्तींची नावे लिहा.**

१. इब्राहीम लोदी याचा पराभव करणारा –
२. अकबराचा यशस्वी प्रतिकार करून निजामशाहीचे रक्षण करणारी –

**प्र.२ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. बाबराच्या विरोधात राजपूत राजे एकत्र आले.
२. शेरशहा सूर आदर्श राज्यकारभारासाठी प्रसिद्ध होता.
३. सम्राट अकबराने हिंदुस्तानात सत्तेचा पाया भक्कम केला.
४. औरंजेबाच्या काळात मुघल कलेचा ऱ्हास झाला.

**प्र.३ टीपा लिहा.**

१. मुघलकालीन कला
२. मुघलकालीन साहित्य

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. मुघलकाळामध्ये महसूल व्यवस्थेत कोणते बदल करण्यात आले?
२. मुघलकाळातील स्थापत्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**उपक्रम**

मुघल साम्राज्यातील सम्राट अकबराच्या साम्राज्य विस्ताराची व तत्कालीन शहरांची माहिती संग्रहित करा.

❖❖❖



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १६. स्वराज्य ते साम्राज्य

१६.१ संतांची कामगिरी
१६.२ स्वराज्याची स्थापना व विस्तार
१६.३ मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम
१६.४ शिवकालीन राज्यव्यवस्था
१६.५ शाहू महाराजांची सुटका
१६.६ पेशवेकाळ
१६.७ कला, स्थापत्य, साहित्य
१६.८ व्यापार, उद्योग व समाजजीवन

अल्लाउद्दीन खल्जीने देवगिरीच्या यादवांचा पराभव केला आणि दक्षिण भारतात दिल्ली सुलतानांची राजवट सुरू झाली. खल्जीनंतर तुघलक आणि बहमनी या सत्तांनी महाराष्ट्रात राज्य केले. पुढे बहमनी राज्याचे विघटन होऊन महाराष्ट्रात निजामशाही आणि आदिलशाही या सत्तांचा अंमल होता. दक्षिणेच्या प्रदेशात प्रवेश करण्याचा प्रयत्न मुघलांनी सुरू केला होता. त्यातून निजामशाही संपुष्टात आली. अशा पार्श्वभूमीवर सतराव्या शतकाच्या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठी सत्तेचा उदय झाला.

## १६.१ संतांची कामगिरी

अंधश्रद्धा व कर्मकांड यांचा समाजावर जबरदस्त पगडा होता. लोक दैववादाच्या आहारी गेले होते. त्यांची प्रयत्नशीलता थंडावली होती. रयतेची स्थिती फारच हलाखीची होती. अशा परिस्थितीत समाजात चैतन्य निर्माण करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रातील संतांनी केले.

महाराष्ट्रात श्रीचक्रधर स्वामी, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास यांच्यापासून सुरू झालेली संतपरंपरा समाजाच्या विविध स्तरांतून आलेल्या संतांनी पुढे चालवली. या संतपरंपरेमध्ये समाजातील सर्व स्तरांतील लोक होते. उदा., संत चोखामेळा, संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत सेना, संत शेख महमंद इत्यादी. त्याचप्रमाणे या संतमंडळीत संत निर्मळाबाई, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई सिऊरकर यांसारख्या स्त्रियाही होत्या.

संतांनी लोकांच्या मनात आपला प्रदेश, आपली भाषा, आपले साहित्य, आपली संस्कृती यांविषयी स्वत्वभावना निर्माण केली. लोकांना समतेचा संदेश दिला. माणुसकी व मानवताधर्म शिकवला. एकमेकांवर प्रेम करावे, एकत्र यावे व एकजुटीने राहावे ही त्यांची शिकवण होती. संतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. परचक्र किंवा दुष्काळजन्य परिस्थिती किंवा निरनिराळ्या प्रकारची निसर्गसंकटे यांतून दैनंदिन जीवन जगताना संतांचा भक्तीचा उपदेश हा लोकांचा आधार ठरला. संतांच्या या कार्यामुळे महाराष्ट्रातील लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

## १६.२ स्वराज्याची स्थापना व विस्तार

सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात निजामशाही व आदिलशाही या दोन राजवटी महाराष्ट्रामध्ये प्रस्थापित झाल्या होत्या. या दोन शाह्यांच्या दरबारात पराक्रमी मराठा सरदारांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. या मराठा सरदारांच्या जहागिरी सह्याद्रीच्या परिसरात अत्यंत दुर्गम भागात होत्या. या सरदारांचे अस्तित्व एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणेच होते. शहाजीराजे भोसले हे निजामशाहीतील एक मातब्बर सरदार होते. निजामशाहीच्या अस्तानंतर त्यांनी आदिलशाहीची मनसबदारी पत्करली. शहाजी राजे पराक्रमी, धैर्यशील, बुद्धिमान आणि श्रेष्ठ राजनीतिज्ञ होते. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तमिळनाडू येथील अनेक प्रदेश त्यांनी जिंकून घेतले होते. पुणे, सुपे, शिरवळ, इंदापूर, चाकण येथील प्रदेश त्यांना जहागीर म्हणून मिळाले होते. स्वराज्य स्थापन करावे ही त्यांची स्वतःची तीव्र



शहाजीराजे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

आकांक्षा होती. म्हणूनच त्यांना स्वराज्याचे संकल्पक म्हटले जाते. त्यांनी शिवराय आणि जिजाबाई यांना विश्वासू आणि कर्तबगार सहकारी बरोबर देऊन बंगळूरहून पुण्याला पाठवले.

शहाजीराजांचे स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी वीरमाता जिजाऊंनी शिवरायांना प्रोत्साहन दिले. त्या कर्तबगार आणि द्रष्ट्या राजनीतिज्ञ होत्या. स्वराज्य स्थापन करण्याच्या कामात त्यांनी शिवरायांना सातत्याने मार्गदर्शन केले आणि त्यादृष्टीने उत्तम शिक्षण देण्याची व्यवस्था केली.



वीरमाता जिजाबाई



छत्रपती शिवाजी महाराज

स्वराज्याची संकल्पना शहाजीराजे भोसलेंनी मांडली व तिची पूर्तता त्यांचे पुत्र शिवाजी महाराज यांनी केली. शिवरायांनी स्वराज्य स्थापनेची सुरुवात मावळ भागात केली. त्यांच्या अत्यंत पराक्रमी व कुशल नेतृत्वाबरोबरीने महाराष्ट्राची भौगोलिक रचना, स्थानिक मावळ्यांचा सहभाग, निजामशाही व आदिलशाहीच्या सेवेत असताना सरदारांना मिळालेले प्रशासकीय आणि लष्करी अनुभव अशा अनेक बाबी स्वराज्य स्थापनेस साहाय्यभूत ठरल्या.

**अधिक माहितीसाठी :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची सुरुवात मावळ भागात केली. मावळचा प्रदेश डोंगराळ, दऱ्या-खोऱ्यांचा व दुर्गम होता. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधल्या खोऱ्याला 'मावळ' आणि या खोऱ्यांत राहणाऱ्या लोकांना 'मावळे' म्हणत. छत्रपती शिवाजीराजांच्या सैन्यातील मावळ्यांचा स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मोठा सहभाग होता. शिवाजी महाराजांनी तेथील लोकांच्या मनात विश्वासाची व आपलेपणाची भावना निर्माण केली. या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात त्यांना निष्ठावान सहकारी व सवंगडी मिळाले. त्यांच्या बळावरच शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे कार्य हाती घेतले. मावळमधील सहकारी कान्होजी जेधे, तानाजी मालुसरे, नेतोजी पालकर, बाजी पासलकर, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे इत्यादींनी स्वराज्य स्थापनेत महत्त्वाचे योगदान दिले.

शहाजी महाराज आदिलशाहीत रुजू झाल्यानंतर त्यांनी पुणे, सुपे परगण्यांतील जहागिरीचा कारभार शिवरायांकडे सोपवला. परंतु या जहागिरीतील आणि आसपासचे किल्ले आदिलशाहीच्या ताब्यात होते. या काळात 'ज्याचे किल्ले त्याचे राज्य' अशी परिस्थिती असे. ते जाणून शिवाजी महाराजांनी किल्ले ताब्यात घेण्यास सुरुवात केली. त्यांनी तोरणा किल्ला सर करून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. किल्ले राजगड येथे शिवरायांनी स्वराज्याची पहिली राजधानी स्थापन केली. स्वराज्यविस्ताराच्या आड येणाऱ्या चंद्रराव मोरे यांचा बंदोबस्त करून महाराजांनी जावळीचा मोक्याचा प्रदेश ताब्यात घेतला. या विजयानंतर शिवाजी महाराजांच्या कोकणातील हालचाली वाढल्या. राजांच्या वाढत्या हालचालींचा धोका लक्षात आल्यामुळे विजापूर दरबाराने अफझलखान या बलाढ्य सरदारास त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले.

महाराजांना संपवण्याचा जणू विडाच उचलून आलेल्या अफजलखानाची कपटबुद्धी ओळखून शिवाजी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**अधिक माहितीसाठी :** इसवी सन १६५७ च्या सुमारास कल्याण, भिवंडी जिंकल्यानंतर स्वराज्याची सीमा समुद्राला भिडली. इंग्रज, फ्रेंच मिठाचा व्यापार करत होते. महाराजांना समुद्रावर सत्ता हवी होती. पण महाराजांजवळ लढाऊ गलबते कशी बांधायची ही माहिती नव्हती. तत्काळ त्यांनी पोर्तुगिजांशी संबंध प्रस्थापित केला. पोर्तुगिजांना सिद्दीचे भय होते. महाराजांनी त्यांना भासवले की ते सिद्दीविरुद्ध लढा देणार आहेत. रूय लैतांव व्हियेगस (Rui Leitao Viegas) व त्याचा मुलगा फेर्नाव व्हियेगस (Fernao Viegas) या लढाऊ जहाजे बांधणाऱ्या जाणकारांसोबत महाराजांनी निवडक कोळी धाडले व त्याकडून २० लढाऊ नौका तयार करून घेतल्या. महाराजांनी अशाच लोकांना पाठवले की जे प्रशिक्षित होऊन युद्धनौका तयार करण्याचे काम करू शकतील. १६७५ पर्यंत महाराजांकडे ४०० छोट्या-मोठ्या युद्धनौका होत्या. सुरतेच्या दुसऱ्या स्वारीत महाराजांनी ही गलबते सुरतेच्या किनाऱ्यावर आणली होती. सुरतेची लूट त्यावरून स्वराज्यात आणली गेली. या घटनेवरून सहज लक्षात येईल की महाराजांनी जमिनीबरोबरच समुद्रावर सत्ता स्थापन केली. महाराजांच्या या दूरदृष्टीमुळे त्यांना भारताच्या 'आरमाराचे जनक' म्हणून ओळखले जातात. त्यातून मायनाक भंडारी, दौलतखान कान्होजी आंग्रे यांसारखे सागरी योद्धे पुढे आले.

महाराज पूर्ण तयारीनिशी प्रतापगडावर त्याला सामोरे गेले. अपेक्षेप्रमाणे अफझलखानाने दगाफटका करण्याचा प्रयत्न करताच शिवरायांनी त्याचा डाव उलटवून त्याला ठार मारले. त्याच्या बलाढ्य सैन्याला पळता भुई थोडी करून, त्याने आणलेला मोठा खजिना आणि शस्त्रसाठा ताब्यात घेतला. त्यामुळे स्वराज्याच्या तिजोरीत लक्षणीय भर पडली.

अफझलखानाचे पारिपत्य झाल्याचे समजताच विजापूर दरबाराने सिद्दी जौहरला स्वराज्यावर पाठवले. त्याने पन्हाळा किल्ल्याला वेढा घालून शिवरायांना कोंडीत पकडले. या बिकट प्रसंगी स्वराज्याचा एकनिष्ठ सेवक शिवा काशिद याने स्वतः शिवरायांचा वेष धारण करून शिवरायांचा पन्हाळा गडावरून सुटकेचा मार्ग सुकर केला. खरा प्रकार उघडकीस आल्यावर सिद्दीने शिवा काशिदला ठार केले. अशा तऱ्हेने शिवा काशिदने स्वराज्यासाठी प्राणार्पण केले. शिवरायांचा पाठलाग करणाऱ्या सिद्दी मसूदला घोडखिंडीत रोखण्याचे कार्य बाजीप्रभू देशपांडे यांनी केले. या प्रसंगी बाजीप्रभू देशपांडे यांनी वीरमरण पत्करून शिवरायांना विशाळगडावर सुखरूप पोहचू दिले.

दिल्लीच्या तख्तावर नव्याने आलेल्या औरंगजेबाने शिवरायांच्या वाढत्या महत्वाकांक्षेची दखल घेतली नसती तर नवल! त्याने आपला मामा शायिस्ताखान याला मोहिमेवर पाठवले. शायिस्ताखान पुणे शहरात लाल महालात मुक्कामी होता. शिवरायांनी अत्यंत हिकमतीने लाल महालात प्रवेश करून खानाची बोटे कापली. त्याला लाल महाल सोडणे भाग पडले. आत्मविश्वास वाढलेल्या शिवरायांनी औरंगजेबाची आर्थिक राजधानी मानली गेलेल्या संपन्न सुरत शहरावर हल्ला करून मोठ्या प्रमाणात लूट प्राप्त केली. या प्रकाराने संतप्त झालेल्या औरंगजेबाने मिर्झा राजे जयसिंग आणि दिलेरखान या मातब्बर सरदारांस स्वराज्यावर पाठवले. त्यांनी स्वराज्यातील अनेक किल्ले ताब्यात घेतले. प्रसंग ओळखण्यात वाकबगार असलेल्या महाराजांनी तात्पुरती माघार घेऊन पुरंदरचा तह केला. त्यानुसार महाराजांना पुत्र संभाजी राजांसह आग्रा येथे औरंगजेबाच्या भेटीस जावे लागले. तेथे औरंगजेबाने दगाबाजी करून महाराजांना नजरकैदेत ठेवले. महाराजांनी अत्यंत शिताफीने पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी देऊन सुटका करवून घेतली.

स्वराज्यात परतल्यावर शिवरायांनी अल्पावधीतच औरंगजेबाला द्यावे लागलेले किल्ले परत जिंकून घेतले.

स्वराज्याचे अस्तित्व स्वतंत्र व सार्वभौम आहे. हे स्पष्ट करण्यासाठी स्वराज्यास सर्वमान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे, हे महाराजांच्या लक्षात आले. त्यांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. शिवाजी महाराजांच्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

राज्याभिषेकानंतर जिंकलेल्या प्रदेशांना एकत्रितपणे राज्याचे स्वरूप आले. राज्याभिषेकानंतर त्यांनी कर्नाटक मोहीम राबवली. दक्षिण विजयानंतर अल्पावधीतच महाराजांचे ३ एप्रिल १६८० मध्ये निधन झाले. त्यांच्या निधनाने स्वराज्याची अपरिमित हानी झाली.

### १६.३ मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांनी स्वराज्य सांभाळले. त्यांचा मुघल बादशाह औरंगजेब याच्याशी सतत संघर्ष सुरू होता. याच काळात सत्तासंघर्षाच्या कारणास्तव औरंगजेबाचा मुलगा अकबर याने संभाजी महाराजांशी मैत्रीपूर्ण नाते निर्माण केले. त्याला शासन करण्याकरिता व मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्याकरिता औरंगजेब स्वतः प्रचंड सैन्य व अनुभवी सरदारांना घेऊन दक्षिणेत आला. पुढील पंचवीस वर्षे त्याने महाराष्ट्रात तळ ठोकून मराठ्यांशी युद्ध केले. परंतु तो स्वराज्य नष्ट करू शकला नाही. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना अत्यंत क्रूरपणे ११ मार्च १६८९ रोजी ठार केले. या घटनेनंतर मराठ्यांची मानसिकता दुर्बल होईल असे औरंगजेबाला वाटत होते, परंतु मराठ्यांनी एकजुटीने मुघलांशी लढा दिला व आपली सत्ता विस्तारित केली.


छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांच्या नंतर छत्रपती राजाराम महाराजांनी रायगडावर सत्तेची सूत्रे हाती घेतली. औरंगजेबाने रायगडाला वेढा घालण्यासाठी झुल्फिकारखानास पाठवले. त्याने गडाला वेढा दिला. गडावर छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी येसूबाई व राजपुत्र शाहू होते. छत्रपतींच्या घराण्यातील सर्वांनी एकाच वेळी एका गडावर राहणे धोक्याचे होते. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजी किल्ल्यावर जायचे आणि महाराणी येसूबाईंनी रायगड किल्ला लढवायचा असे ठरले. १६८९ मध्ये रायगड मुघलांच्या ताब्यात गेला. महाराणी येसूबाई आणि राजपुत्र शाहू यांना कैद करून दिल्लीला पाठवण्यात आले. महाराणी येसूबाई पुढील ३० वर्षे मुघलांच्या कैदेत होत्या.

जिंजीला जाताना राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्ध संघर्षाची जबाबदारी रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यावर सोपवली होती. संताजी व धनाजी यांच्या गनिमी काव्यामुळे मुघलांना आपल्या प्रचंड साधनसामग्रीचा व अवजड तोफखान्याचा उपयोग करणे कठीण झाले. फारसे किल्ले, प्रदेश व खजिना ताब्यात नसताना मराठ्यांनी मुघलांना सळो की पळो करून सोडले. अत्यंत कठीण समयी केलेले स्वराज्याचे संरक्षण ही राजाराम महाराजांची सर्वांत मोठी कामगिरी होय.


छत्रपती राजाराम महाराज

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर (मार्च १७००) त्यांची पत्नी महाराणी ताराबाई यांनी औरंगजेबाशी लढा दिला. अत्यंत विपरीत परिस्थितीत स्वराज्याचे नेतृत्व महाराणी ताराबाईंनी केले. त्यांनी सगळा कारभार एकहाती घेऊन आपल्या सरदारांच्या साहाय्याने स्वराज्य संघर्ष पंचवीस वर्षे चालू ठेवला. या काळात युद्धाचे क्षेत्र विस्तारले आणि मराठे सरदारांनी मुघलांविरुद्ध महाराष्ट्राबाहेरही संघर्ष केला. युद्धाचे पारडे बदलत चालल्याची ही खूण होती. मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम हा मुघल सत्ताधीशांनी बाळगलेली साम्राज्याची लालसा आणि मराठ्यांच्या मनातील स्वातंत्र्याची आकांक्षा यातील लढा होता.


महाराणी ताराबाई



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

अखेर औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा स्वातंत्र्यसंग्राम संपुष्टात आला. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या प्रारंभी मुघल सत्तेचे धोरण आक्रमक होते व मराठ्यांचे धोरण बचावाचे होते. परंतु अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ही परिस्थिती बदलली व मुघल सत्तेला नमवून मराठ्यांनी जवळजवळ भारतभर सत्ताविस्तार केला.

### १६.४ शिवकालीन राज्यव्यवस्था

स्वराज्य स्थापनेनंतर स्वराज्य विस्तारून महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड येथील प्रदेश; कर्नाटक राज्यातील बेळगाव, कारवार, धारवाड तसेच आंध्र प्रदेश, तमिळनाडू राज्यातील जिंजी, वेल्लोर आणि आसपासचा बराचसा भाग स्वराज्यात समाविष्ट झाला होता. स्वराज्याचा कारभार सुव्यवस्थित राहण्यासाठी शिवाजी महाराजांनी आदर्श राज्यव्यवस्था राबवली होती.

अष्टप्रधान मंडळाची निर्मिती व वाढ राज्याच्या विस्ताराबरोबरच होत गेली. राज्याभिषेकानंतर महाराजांनी अष्टप्रधानांची विशिष्ट पदे निर्माण केली. त्यात पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सेनापती, सुमंत, न्यायाधीश आणि पंडितराव यांचा समावेश होता.

शिवरायांच्या लष्करी व्यवस्थेत गुप्त हेरखात्याला महत्त्व होते. बहिर्जी नाईक हेरखात्याचा प्रमुख होता. कोणतीही मोहीम करण्यापूर्वी शिवराय हेरांकडून बातम्या मिळवत आणि मगच मोहिमेचा बेत आखत.

अष्टप्रधान जेव्हा स्वारीवर जात तेव्हा त्यांचे मुतालिक (प्रतिनिधी) त्यांचा कारभार पाहत होते. अष्टप्रधानांच्या कचेरीतील कामांसाठी दरकदार नेमले जात होते. त्यांत मुख्यतः दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जामदार (खजिनदार) व पोतदार (नाणेतज्ज्ञ) हे अधिकारी होते.

प्रांताच्या बंदोबस्तासाठी राज्याचे दोन विभाग केले गेले. एक सलग असणाऱ्या प्रदेशाचा व दुसरा विखुरलेल्या दक्षिणेकडील प्रदेशाचा. पहिल्या मुलखाचे तीन भाग केले. पेशव्यांकडे उत्तरेकडील प्रदेश दिला त्यात साल्हेरपासून पुण्यापर्यंतचा वरघाट व उत्तर कोकणाचा समावेश होता. मध्यविभागात दक्षिण कोकण, सावंतवाडी व कारवार हा भाग होता. हा सचिवाकडे सोपवण्यात आला. तिसऱ्या भागात पूर्वेकडील वरघाटाचा प्रदेश म्हणजे सातारा-वाई ते बेळगाव आणि कोप्पळपर्यंतचा प्रदेश हा भाग मंत्र्यांकडे सोपवण्यात आला. कर्नाटकाचा स्वतंत्र सुभा करून त्यावर हंबीरराव मोहिते व रघुनाथ नारायण अमात्य यांची नेमणूक केली गेली. या सर्व विभागांवर सरसुभेदारांची नेमणूक होई व ते प्रधानांबरोबर काम करत. यास 'राजमंडळ' म्हणत. किल्लेदार व कारकून वर्गाची नेमणूक स्वतः महाराज करत. दरवर्षी प्रधानांनी महाराजांना हिशोब सादर करायचा अशी व्यवस्था असे.

विभागीय कारभारात सरसुभेदार मदत करत, त्यांना देशाधिकारी म्हणत. मुसलमानी राजवट व शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था यांतील मुख्य फरक म्हणजे

**अधिक माहितीसाठी : शिवशाही धारापद्धत-शिवकाठी :** जमिनीची धारा (प्रत) ही सर्वांत महत्त्वाची बाब होती. जमिनीवरील शेतसारा ठरवण्यासाठी पूर्वी निजामशाहीतील मलिक अंबर याने ठरवलेली पद्धत अमलात आणली गेली होती. पण ती शिवाजी महाराजांनी बदलून वेगळी पद्धत लागू केली. त्यांनी जमिनीचे मोजमाप ठरवण्यासाठी काठीचे माप ठरवले. पाच हात व पाच मुठी मिळून एक 'काठी'. वीस काठ्यांच्या औरस-चौरसांचा (लांबी-रुंदीचा) एक 'बिघा' व १२० बिघ्यांचा एक 'चावर' असे जमिनीचे मोजमाप ठरवले. अण्णाजी दत्तो (सचिव) यांनी गावोगावी जाऊन जमिनीच्या संबंधातील जमिनीचा 'धारा', 'चावराणा', 'प्रतबंदी' इत्यादी बाबी लावणीवरून ठरवल्या. चावराणा म्हणजे जमीन मोजून तिच्या सीमा ठरवणे. डोंगरी जमिनीच्या साऱ्याची आकारणी बिघ्यावर न करता नांगरावर होई. आकारणीत जमिनीच्या कसाबरोबर पिकाची प्रतही पाहण्यात येई. आकार (सारा) ठरवताना तीन वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी घेऊन मगच सारा ठरवण्यात येई. वाजट (पडीक) जमीन, जंगल, कुरण इत्यादी गावची जमीन साऱ्यासाठी विचारात घेतली जात नसे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सरसुभे महसुली विभाग नसून कारभार व्यवस्थेसाठीच केले गेले. त्यामुळे सुभेदार मनमानी करू शकत नसत.

सुभेदारास सरकारी करवसुलीचे कामी प्रजेचे परंपरागत अधिकारी, परगण्याचे देशमुख व देशपांडे यांच्यावर अवलंबून राहावे लागत होते. जमिनीची लागवड व वसाहत करवून सरकारचा सारा गोळा करणे हे देशमुखाचे मुख्य काम असे. सर्व सरकारी अधिकाऱ्यांना वतन न मिळता वेतन दिले जात होते.

गाव हे राज्यव्यवस्थेत महत्त्वाचे घटक होते. नवीन गावे वसवली जाऊ लागली. तेथील रयतेला कसण्यास गुरेढोरे, बीजासाठी दाणा-पैका, उदरनिर्वाहासाठी दाणा-पैका देण्यात येई व तो ऐवज दोन वर्षांनी जेव्हा पीक येई तेव्हा कापून घेतला जाई. या पद्धतीला 'तगाई पद्धत' म्हटले गेले.

### १६.५ शाहू महाराजांची सुटका

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर देखील मुघलांचे मराठ्यांना पराभूत करण्याचे प्रयत्न सुरूच होते. मराठ्यांमध्ये फूट पाडून त्यांचा पराभव करण्याचा प्रयत्न मुघलांनी केला. त्यासाठी मुघलांच्या कैदेत असलेल्या शाहू महाराजांची त्यांनी सुटका इ.स.१७०७ मध्ये केली. या सुटकेनंतर महाराणी ताराबाई आणि शाहू यांच्यात युद्ध झाले. त्यात शाहू महाराजांचा विजय झाला. त्या वेळी शाहू महाराजांच्या पक्षात महत्त्वाची कामगिरी बजावणारे बाळाजी विश्वनाथ यांची पेशवेपदावर नेमणूक झाली. तेव्हापासून पेशवे काळ सुरू झालेला दिसून येतो.


छत्रपती शाहू महाराज

### १६.६ पेशवेकाळ

बाळाजी विश्वनाथांच्या नंतर पहिला बाजीराव यांना पेशवे पदावर नियुक्त केले गेले. त्यांच्या कारकिर्दीत मराठी साम्राज्याचा विस्तार माळवा, राजस्थान आणि बुंदेलखंडामध्ये झाला. त्यांनी निजामाला नामोहरम केले. पहिला बाजीराव यांच्यानंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांना पेशवेपद बहाल केले. या काळात झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाला. मराठ्यांची सत्ता दुर्बल झाली.


पहिला बाजीराव पेशवा

मराठी सत्तेची घडी पुन्हा एकदा बसवण्याचा प्रयत्न माधवराव पेशव्यांनी केला. पानिपतचा पराभव हा केवळ राजकीय पराभव नसून त्याचा मोठा परिणाम मराठ्यांच्या मानसिकतेवर देखील झालेला दिसून येतो. मराठ्यांमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण करण्याचे तसेच उत्तरेमध्ये मराठ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित करण्याचे प्रयत्न माधवरावांनी केले. पानिपतचा मोठा पराभव पचवून उत्तरेच्या राजकारणात धैर्याने उभे राहण्यात मराठे यशस्वी झाले. ही बाब अत्यंत महत्त्वाची होती. यामध्ये मल्हारराव होळकर, अहिल्याबाई होळकर, रघूजी भोसले, महादजी शिंदे, नाना फडणवीस यांचा मोलाचा वाटा आहे.


माधवराव पेशवा


मल्हारराव हे इंदौरच्या घराण्याचे संस्थापक होते. त्यांनी दीर्घकाळ मराठी राज्याची सेवा केली. पानिपतच्या युद्धानंतर उत्तरेत मराठ्यांची प्रतिष्ठा सावरण्यात त्यांचा मोठा वाटा होता. मल्हाररावांचा पुत्र खंडेराव याच्या मृत्यूनंतर


मल्हारराव होळकर



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




**अधिक माहितीसाठी :** अफगाणिस्तानातून आलेले पठाण हिमालयाच्या पायथ्याशी अयोध्येजवळ स्थायिक झाले होते. या पठाणांना रोहिले म्हणतात. रोहिलखंड या नावाने हा प्रदेश ओळखला जातो. नजीब खान हा रोहिल्यांचा सरदार होता. उत्तर भारतातील मराठ्यांचे वर्चस्व त्याला मान्य नव्हते. त्याने अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशाह अब्दाली याला भारतात येण्यास निमंत्रित केले. त्याच्या सांगण्यावरून अब्दालीने भारतावर स्वारी केली. प्रचंड प्रमाणात लूट करून तो परतला. परंतु मराठ्यांनी त्याच्या सैन्याचा अटकेपर्यंत पाठलाग केला व अटकेवर मराठ्यांचा ध्वज फडकला. अटक हे सध्याच्या पाकिस्तानात आहे.

इंदौरच्या कारभाराची सूत्रे अहिल्याबाई होळकर यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या काळात महेश्वर हे राज्यकारभाराचे प्रमुख केंद्र होते. त्यांनी भारतात महत्त्वाची धार्मिक स्थळे, मंदिरे, घाट, धर्मशाळा, पाणपोई यांची उभारणी केली. त्या प्रजाहितदक्ष, लोककल्याणकारी आणि उत्कृष्ट प्रशासक होत्या.


अहिल्याबाई होळकर

नागपूरकर भोसल्यांपैकी रघूजी भोसले हे सर्वांत कर्तबगार होते. त्यांनी पूर्व भारतात बंगालपर्यंत मराठी सत्तेचा दरारा निर्माण केला. पानिपतच्या पराभवानंतर उत्तर भारतात मराठ्यांचे वर्चस्व आणि प्रतिष्ठा निर्माण करण्याची


रघूजी भोसले



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



महादजी शिंदे

कामगिरी महादजी शिंदे यांनी केली. त्यांनी फ्रेंच लष्करी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आपली फौज प्रशिक्षित केली आणि आपला तोफखाना सुसज्ज केला. महादजींनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठ्या जिद्दीने इ.स.१७७१ ते १७९४ या काळात दिल्लीचा कारभार सक्षमपणे पाहिला. माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठ्यांच्या राज्याची घडी नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनी बसवली.

पेशवा माधवरावांनंतर गादीवर आलेले नारायणराव आणि सवाई माधवराव हे दोन्ही पेशवे अल्पायुषी ठरले. त्यांच्या अकाली मृत्यूनंतर मात्र मराठ्यांच्या सत्तेचा ऱ्हास सुरू झाला. या सुमारास मुघलांची सत्ता देखील दुर्बल झालेली होती. या परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांनी मराठ्यांच्या राजकारणात शिरकाव केला. शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव याच्या काळात मराठा इंग्रजांमध्ये झालेल्या युद्धात मराठ्यांची सत्ता पूर्णपणे नष्ट झाली आणि भारतावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. इंग्रजांनी सर्व भारत आपल्या आधिपत्याखाली आणला.

### १६.७ कला, स्थापत्य, साहित्य

**कला :** सचित्र हस्तलिखित पोथ्या, पटचित्रे व चित्रित पत्रिका, लघुचित्रे आणि काचचित्रे या विविध स्वरूपांत मराठी चित्रकलेचा आविष्कार झालेला आढळतो. 'भगवद्गीता', 'सप्तशती', 'भागवतपुराण' अशा काही संस्कृत आणि 'ज्ञानेश्वरी', 'शिवलीलामृत', 'पांडवप्रताप' अशा काही मराठी ग्रंथांची सचित्र हस्तलिखिते उपलब्ध आहेत. त्यांतून दशावताराची चित्रे आढळतात. पोथ्यांच्या फळ्यांवर गणपती, ऋद्धिसिद्धी, रामपंचायतन, गोपालकृष्ण, विष्णुलक्ष्मी यांची चित्रे गडद अशा लाल, हिरव्या आणि पिवळ्या रंगांनी चित्रित केली आहेत. लघुचित्रांमध्ये व्यक्तिचित्रे, रागमाला, तालमाला, मिरवणुकी इत्यादी प्रसंगांची चित्रे आहेत. थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, पिलाजी जाधवराव यांची उत्कृष्ट व्यक्तिचित्रे उपलब्ध आहेत. चित्रकाम बहुधा वाड्यांच्या दर्शनी भागांवर तसेच दिवाणखान्याच्या व शयनगृहांच्या भिंतीवर आढळून येते. देवालयात मंडपाच्या भिंती, ओवऱ्या, शिखरे, गाभाऱ्याच्या भिंती आणि छत ही सुद्धा चित्रकामाने सुशोभित केलेली दिसतात. वाठारचा नाईक निंबाळकरांचा वाडा, मेणवलीचा नाना फडणविसांचा वाडा, चांदवडचा रंगमहाल, मोरगावचे मयूरेश्वर मंदिर, पांडेश्वरचे शिवमंदिर, बेनवडीचा मठ अशा काही ठिकाणी अद्यापही अठराव्या शतकातील भित्तिचित्रे आहेत. या भित्तिचित्रांचे विषय मुख्यत: पौराणिक आहेत. त्यांत रामायण, महाभारत आणि पुराणे यांतील प्रसंग आहेत. दशावतार आणि कृष्णलीलांची चित्रे सर्वत्र आढळतात. तत्कालीन सामाजिक जीवनातील प्रसंगही लोकप्रिय होते. राजसभा, राजपुरुषांची भेट, मिरवणुकी यांचा यात समावेश होतो.



लघुचित्र - मराठी चित्रकला

मराठी अमलात मुख्यतः भजन-कीर्तन होई. वीरवृत्ती निर्माण करणारे पोवाडे, वाङ्मय या काळात तयार झाले. ऐतिहासिक काव्य शाहिरांच्या पोवाड्यातून व कटावातून निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अज्ञानदास याने अफझलखान वधाविषयी रचलेला आणि तुळसीदासाने सिंहगडच्या लढाईचा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

रचलेला पोवाडा प्रसिद्ध आहे.

उत्तर पेशवाईत लावणी वाङ्मयाला बहर आला. या क्षेत्रात अनंतफंदी, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ व होनाजी बाळा यांनी मोठा लौकिक मिळवला.

मराठेशाहीत लावणीनृत्य, कोळीनृत्य, गजनृत्य, वाघ्या मुरळीचे नृत्य, वासुदेवाचे नृत्य यांची जोपासना झाली. संगीत कलेची उपासनाही केली गेली.

**स्थापत्य :** शिवाजी महाराजांनी दुर्ग-स्थापत्याला प्राधान्य दिले. दख्खनमध्ये तीन शतके किल्ल्यांची रचना झाली होती. त्याचा उपयोग महाराजांना झाला. त्यांच्या पदरी या विषयातील जाणकार देखील होते. पुण्यातील कसबा गणपती व विठ्ठलवाडीचा विठोबा या मंदिरांचा वीरमाता जिजाबाईंनी जीर्णोद्धार केला. पेशवे काळात राज्यात संपन्नता आली आणि सर्व प्रकारच्या कलाशिल्पाला नवचैतन्य प्राप्त झाले. पुणे, सातारा, नाशिक या शहरांची वाढ झाली. सगळीकडे फरसबंद रस्ते, दुतर्फा चिरेबंद वाडे, मधूनच कमानदार वेशी असे चित्र दिसू लागले.

उत्तर पेशवाईत मंदिर बांधणीला मोठ्या प्रमाणावर आरंभ झाला. ही मंदिरे तीन प्रकारची आहेत. यादवकालीन घाटाची मंदिरे सासवड (वटेश्वर, संगमेश्वर), माहुली (विश्वेश्वर), जेजुरी अशा ठिकाणी दिसतात. ती आकाराने मोठी असत. त्या मंदिराचे विधान तारकाकृती असे, मंदिराचे जोते अनेक थरांनी बांधले जात होते व त्याला विविध नावे असत. शिखरांचे बांधकाम विटांचे असे आणि ते चुनेगच्ची पद्धतीने केलेले असे. नाशिकचे काळाराम, गोराराम, सुंदरनारायण, त्र्यंबकेश्वर येथील महादेवाचे तसेच नेवाशाचे मोहिनीराज ही मंदिरे माळवा-राजस्थानमधील मंदिरांसारखी आहेत. या मंदिरांची संपूर्ण बांधणी दगडी होती. या मंदिरामध्ये इतर प्रकारच्या मंदिरांपेक्षा कोरीवकाम अधिक आहे. तिसऱ्या प्रकारात पुणे, सातारा, वाई, यांसारख्या ठिकाणांच्या मंदिरांची बांधणी खास पद्धतीची होती. या पद्धतीच्या वैशिष्ट्यांमध्ये चौकोनी गाभारा, कमानींची व त्यासमोर लाकडी सभामंडप, गाभारा यांचा समावेश होतो. शिखर टप्प्याटप्प्याने निमुळते होत जाते. शिखरांवर लहान कोनाड्यांतून चुनेगच्चीमध्ये मूर्तिकाम केलेले असून मूर्ती सुबक व उठावदार असतात. यामध्ये दशावतार, देव-देवतांच्या मूर्ती, स्त्रिया आणि पुरुष यांच्या मूर्ती आहेत. दगडी दीपमाळा हे मंदिरांचे खास

**अधिक माहितीसाठी :** वाड्यांच्या बांधकामात कच्च्या व पक्क्या विटा वापरत. वाड्यांचा तळमजला दगडी तर वरचे मजले विटांचे असत. लाकडी खांब-तुळया यांवर आधारलेले सामान्यपणे तीन किंवा पाच मजले असत. प्रशस्त अशा मोकळ्या चौकांभोवती खोल्या बांधल्या जात. वाड्यांमध्ये बहुधा दोन चौक असत. काही वाड्यांमध्ये तीन ते सात चौक देखील असत. पुण्याचा विश्रामबाग वाडा, मेणवलीचा नाना फडणविसांचा वाडा आणि कोपरगावचा राघोबाबादादांचा वाडा या मोठ्या वाड्यांना अनेक चौक होते. वाड्यामधील खांब आणि तुळया चौकोनी असत. त्यात भौमितिक नक्षीच्या जोडीला वेलपत्ती व मधेमधे पोपट, मोर, माकडे यांच्या आकृती असत.



सिंधुदुर्ग



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


जेजुरी

वैशिष्ट्य आहे. जेजुरी येथील दीपमाळा शहाजीराजांनी बांधलेल्या आहेत. बहुतेक गावे व मंदिरे नद्यांच्या काठी असल्याने मंदिरांच्या समोरच्या नदीतीरावर दगडी घाटही बांधण्यात आले. नाशिक, पुणतांबे, वाई, मेणवली, माहुली इ. ठिकाणी असे विस्तीर्ण घाट दिसतात. अनेक ठिकाणी बांधलेल्या छत्र्या (समाधी) लक्षणीय आहेत.

**साहित्य :** या काळात मराठी साहित्याचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. समकालीन संत तुकाराम वारकरी संप्रदायातील प्रमुख आध्यात्मिक कवी होते. त्यांनी रचलेल्या अभंगांमुळे समाजावर मोठा प्रभाव पडला. समर्थ रामदासांनी मराठीमध्ये 'दासबोध' आणि 'मनाचे श्लोक' लिहिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी फारसी शब्दांना पर्यायी संस्कृत शब्द असणारा 'राज्यव्यवहारकोश' हा ग्रंथ तयार करवून घेतला. छत्रपती संभाजी महाराज हे स्वत: उत्तम साहित्यिक आणि संस्कृत भाषेचे उत्तम जाणकार होते. छत्रपती संभाजी महाराजांनी 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. राजनीतीवरील प्राचीन भारतीय ग्रंथांचे अवलोकन करून त्याचे सार संभाजी महाराजांनी बुधभूषण या ग्रंथात मांडले. संभाजी महाराजांना संस्कृतसह अनेक भाषा अवगत होत्या. 'नायिकाभेद', 'नखशीख' आणि 'सातसतक' हे ब्रज भाषेतले ग्रंथ त्यांनी लिहिले. महम्मद कासीम फेरिस्ता याने बारा खंडात 'गुलशने इब्राहिमी' हा हिंदुस्तानाचा इतिहास लिहिला.

अठराव्या शतकात वामन पंडित यांनी 'यथार्थदीपिका', रघुनाथ पंडित यांनी 'नलदमयंती स्वयंवर', श्रीधर नाझरेकर यांनी 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'रामविजय' आणि मोरोपंत यांनी अनुवाद केलेला 'महाभारत' यासारख्या अनेक सुप्रसिद्ध साहित्यकृती निर्माण झाल्या. जुन्या मराठी ऐतिहासिक साहित्यातील ग्रंथांमध्ये बखर साहित्य महत्त्वपूर्ण आहे. शूरवीरांचे गुणगान, ऐतिहासिक घडामोडी, लढाया, थोर पुरुषांची चरित्रे यांविषयीचे लेखन आपणांस बखरीत वाचायला मिळते. उदा., 'सभासद बखर', 'भाऊसाहेबांची बखर, 'पानिपतची बखर'. पेशवे काळात कृष्ण दयार्णव आणि श्रीधर हे प्रमुख कवी होते. महिपतीचा 'भक्तिविजय' हा ग्रंथ याच काळातील आहे.

### १६.८ व्यापार, उद्योग व समाजजीवन

व्यापारउदीमावर राज्याची आर्थिक भरभराट अवलंबून असते याची जाण छत्रपती शिवाजी महाराजांना होती. त्यांनी ठिकठिकाणी पेठा वसवून व्यापाऱ्यांना व उद्योजकांना प्रोत्साहन दिले होते. या पेठांवर शेटे व महाजन हे वतनी अधिकारी नेमले जात असत. चौल, राजापूर, दाभोळ, केळशी, रत्नागिरी ही या काळातील काही महत्वाची बंदरे व व्यापारी उलाढालीची केंद्रे होती. दाभोळ येथून मिरे, लाख व जाडेभरडे कापड इत्यादी गोष्टी निर्यात केल्या जात. चौल येथून रेशमी कापड, अफू व नीळ या वस्तू निर्यात केल्या जात असत. राजापूर येथून मिरे, वेलदोडे, सुती कापड यांचा व्यापार होत असे. राजापूर येथून माल भरून परदेशी

**अधिक माहितीसाठी :** स्वराज्यातील उद्योगांना संरक्षण देण्याचे शिवाजी महाराजांचे धोरण होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिठाचा उद्योग होय. त्यांनी कोकणातील मीठ उद्योगाला संरक्षण दिले. त्या वेळी पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेशातून स्वराज्यात मिठाची आयात मोठ्या प्रमाणात होत असे. त्यामुळे कोकणात उत्पादित होणाऱ्या मिठाच्या विक्रीवर प्रतिकूल परिणाम होतो. हे ध्यानात घेऊन महाराजांनी पोर्तुगीजांच्या प्रदेशातून स्वराज्यात येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली. पोर्तुगीजांकडून येणारे मीठ महाग होऊन त्याच्या आयातीत घट व्हावी आणि स्थानिक मिठाची विक्री वाढावी हा त्या मागचा हेतू होता.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

व्यापाऱ्यांची जहाजे तांबडा समुद्र व इराणच्या आखाताकडे जात असत.

गाव अथवा खेडे हे स्वराज्यातील एक महत्वाचा घटक होते. ते सर्व बाबतींत स्वयंपूर्ण असे. त्यामुळेच राज्य कोणाचेही असले तरी त्या भागातील अर्थव्यवस्थेवर फार परिणाम होत नसे. प्रत्येक खेड्यात बारा बलुतेदार असत. त्यांचे व्यवसाय वंशपरंपरेने ठरलेले असत. बलुतेदारी पद्धतीमधील प्रत्येक व्यवसायाला समाजात निश्चित असे एक स्थान होते. सोनार, लोहार, तांबट इत्यादी बलुतेदार आपापला व्यवसाय सांभाळत असत. मोठ्या खेड्यात आठवड्याचा बाजार भरवला जात असे. अशा खेड्याला कसबा असे म्हटले जाई. त्यात लोक दैनंदिन गरजेच्या लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यास येत असत. कापड उद्योग, धातुकाम, साखर उद्योग असे काही उद्योग अस्तित्वात होते.

तत्कालीन महाराष्ट्रातील समाजात सरदार, वतनदार, बलुतेदार आणि रयत असे वर्ग होते. ग्रामीण भागात रयतेमध्ये शेतकऱ्यांची संख्या अधिक होती. महाराष्ट्रात वाई, नाशिक, पैठण इत्यादी ठिकाणी पाठशाळा चालवल्या जात असत. समाजामध्ये पारंपरिक सण, उत्सव, व्रत वैकल्ये इत्यादी उत्साहाने साजरे केले जात. सण उत्सवांना राज्यव्यवस्थेकडून देखील प्रोत्साहन मिळत असे कारण अशा प्रकारच्या सामाजिक उत्सवांमुळे लोकांमध्ये नवचैतन्य निर्माण होण्यास मदत होते व ऐक्याचे वातावरण निर्माण होत असे.

**अधिक माहितीसाठी : मराठेकालीन शहरीकरण–**राजकीय विस्तार आणि व्यापारी हालचाली यातून मराठी राज्यात शहरीकरणाचा विकास झाला असे दिसून येते. विविध उद्योगधंदे, व्यापार, व्यवसाय यांच्या निमित्ताने अनेक शहरे उदयास आली. पेशवे काळात शहरीकरणाचे प्रमाण अधिक वाढले. पेशव्यांनी पुणे ही आपली राजधानी केल्यामुळे पुण्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला. अनेक बाजार पेठांची संख्या वाढली. पुणे, इंदापूर, सासवड, जुन्नर, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पैठण, कोल्हापूर, सातारा, अहमदनगर, कोकणातील समुद्रकिनाऱ्यावरील अनेक लहान मोठी बंदरे ही व्यापार उद्योगाच्या निमित्ताने भरभराटीला आलेली होती.

मराठ्यांच्या स्वराज्यस्थापनेपासून ते साम्राज्य विस्तारापर्यंतचा प्रवास हा मध्ययुगीन भारतातील महत्त्वाचा घटक आहे. मराठ्यांची सत्ता संपुष्टात आली व इंग्रजांनी बहुतांश भारत आपल्या आधिपत्याखाली आणला. अनेक क्षेत्रांत स्थित्यंतरे घडून आली. मध्ययुगातून आधुनिक कालखंडाकडे भारताची वाटचाल सुरू झाली.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. भारतातील आरमाराचे जनक म्हणून .......... ओळखले जातात.
   (अ) छत्रपती शिवाजी महाराज
   (ब) छत्रपती संभाजी महाराज
   (क) छत्रपती राजाराम महाराज
   (ड) छत्रपती शाहू महाराज

२. अफगाणिस्तानातून आलेले पठाण हिमालयाच्या पायथ्याशी ........ जवळ स्थायिक झाले होते.
   (अ) वाराणसी (ब) मथुरा
   (क) अयोध्या (ड) दिल्ली

३. छत्रपती संभाजी महाराजांनी ......... हा संस्कृत ग्रंथ लिहिला.
   (अ) नायिकाभेद (ब) बुधभूषण
   (क) नखशीख (ड) सातसतक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. नाईक निंबाळकरांचा वाडा – वाठार
२. नाना फडणविसांचा वाडा – मेणवली
३. काळाराम मंदिर – जेजुरी
४. मोहिनीराज मंदिर – नेवासे

**(क) नावे लिहा.**

१. स्वराज्यातील जमाखर्च ठेवणारा –
२. विभागीय कारभारात मदत करणारा –
३. रोहिल्यांचा सरदार–

**प्र.२ पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. शहाजीराजांना स्वराज्याचे संकल्पक म्हटले जाते.
२. छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमारदल उभारले.
३. छत्रपती शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांकडून येणाऱ्या मिठावर मोठी जकात बसवली.

**प्र.४ टीपा लिहा.**


१. मराठाकालीन कला
२. मराठाकालीन स्थापत्य

❖❖❖



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com









महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

मराठी इतिहास इ. ११ वी

₹ ८४.००

Downloaded from https:// www.studiestoday.com